म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७९

REFBK-0006983

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत

**सूचना :—** ... करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[ कृ. मा. प. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

त्रि. प्र. ग्रं. सं.

# काँग्रेसचा कल्पवृक्ष

( सन १८८५ ते सन १९४८ )

काँग्रेसच्या जन्मापासून
गांधीजींच्या वधापावेतों.

६६३३
६०८३

विठ्ठल वामन हडप

प्रथमावृत्तीचे एकमेव विक्रेते

ग. पां. परचुरे-प्रकाशन मन्दिर
गिरगांव, मुंबई.

REFBK-0006983

प्रकाशक

आदर्श वाङ्मय प्रकाशन
खासबाग, कोल्हापूर.

# आदर्श वाङ्मय प्रकाशन

संपादक : **यशवंत हडप**

आपण स्वतंत्र झालों. आतां ह्या स्वतंत्र हिंद राष्ट्रांतील कष्टाळू कोटमाप गरीब खेडूत जनतेचें महात्माजींच्या दरिद्री नारायणाचें जीवन श्रमसौंदर्यानें शोभून सुख–शांतीनें समृद्ध व्हावें यासाठीं सर्व परींच्या सुलभ समाज–शिक्षणाची राष्ट्राला फार मोठी गरज आहे. संवाद, प्रहसनें, इतिहास, गोष्टी, चरित्रें असें या प्रकारचें सोपें, सरळ, शुद्ध, सत्य व स्वस्त आणि लिहितांवाचतां येणाऱ्या अगदीं सामान्य खेडूत, शेतकरी कामगार, स्त्री-पुरुष, मुलें अशा आबाल-वृद्धांना कळणारें व रमवणारें आणि सुजाण करणारें नामवंत लेखकांचें निरनिराळ्या विषयांवरील सुलभ समाजशिक्षण–वाङमय प्रसिद्ध करीत आहों.

**गांधी पुण्यतिथीला प्रसिद्ध होत असलेलें**
**आमचें दुसरें सुलभ समाजशिक्षण प्रकाशन**

# गरिबांचे गांधीजी

लेखक : **विठ्ठल वामन हडप**

•

सर्वाधिकार सुरक्षित
प्रथमावृत्ति : डिसेंबर १९४८

**किंमत १॥ रुपया**

•

प्रकाशक: **यशवंत हडप**, आदर्श वाङमय प्रकाशन, खासबाग, कोल्हापूर.

मुद्रक: **न. वि. सरदेशपांडे**, आदर्श मुद्रणालय, **पुणें २.**

वा. मी १०८८
नि. ७३२
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४/१४/७८
४९८३
४८३३

# न म न

आपले गांधीजी म्हणजे आपली काँग्रेस, आणि काँग्रेस म्हणजे गांधीजी. सूर्यापासून प्रकाश, कस्तूरीपासून सुवास अथवा धरणीपासून जीवन कधीं अलग करतां आलें आहे ?

आज आपलें हिंद राष्ट्र स्वतंत्र झालें आहे; आपल्या ह्या भारतमातेच्या मस्तकावर आपल्या काँग्रेसचा तिरंगी झेंडा 'शुभं भवतु' 'शुभं भवतु' म्हणत फडकतो आहे. ही काँग्रेस तिरंगी झेंडा दिगंतांत फडकविणारी ही काँग्रेस गांधीजींची आहे.काँग्रेसचा तिरंगी झेंडा त्यांचा परिसाप्रमाणें लोहाचेंही सुवर्ण, अमंगलाचेंही मंगल दुष्टतेचीही सुष्टता करणारा सत्य, अहिंसाधर्म जो काँग्रेस यथाशक्य आचरीत आली तोही त्यांचाच आणि काँग्रेसनें भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें तेंही त्या सत्य-अहिंसा धर्माचें आचरण करूनच प्राप्त करून दिलें.

काँग्रेस जन्माला आली त्रेसष्ट वर्षांपूर्वीं सन १८८५ सालीं. पण आजची आपली दरिद्री नारायणांची काँग्रेस जन्माला आली ती हिंदी राजकारणांत गांधीजींनी पदार्पण केलें त्या मंगल दिनीं जन्माला आली. आपण सारे ह्या काँग्रेसनें पुनीत केलेल्या भारतमातेचे पुत्र. पण आपणांपैकीं किती जणांना ह्या काँग्रेसचें चरित्र माहीत आहे ? तें आपण माहीत करून घ्यायला नको ? आपल्या आयाबहिणींना, बायकामुलांना, शेजाऱ्यापाजाऱ्यांना, गोरगरीबांना सर्वांना माहीत करून द्यायला नको ?

तेवढ्यासाठीं काँग्रेसची ही सरळ, सोपी पण अगदीं खरी खरी इतिहास-कथा आहे. वास्तविक त्रेसष्ट वर्षांचा काँग्रेसचा इतिहास यथावत् कथन करा-

यचा म्हटलें तर तें एक आधुनिक विराट महाभारत होईल. पण साधारण लिहितां वाचतां येणाऱ्या व श्रमसौंदर्यानें शोभणारें सुख-शांतीचें कष्टाळू पवित्र जीवन जगणाऱ्या आज-उद्यांच्या सर्वसामान्य गोरगरीब हिंदी नागरिकांना इतक्या खोल पाण्यांत शिरून काय करायचें आहे? ज्या नंदादीपाच्या प्रकाशांत आपण पारतंत्र्याचा अपवित्र अज्ञातवास टाळून स्वतंत्रतेच्या पवित्र जीवनांत आलों, तें जीवन अधिक पवित्र व सुख-शांतीनें अधिक समृद्ध करणारा मार्ग प्रकाशमान करून आपली सोबत करणारा तो उजळता नंदादीप आपल्या हातीं असला म्हणजे झालें. 'काँग्रेसचा कल्पवृक्ष' यापेक्षां दुसरी तिसरी कसलीही अपेक्षा करीत नाहीं.

आमचा विद्यार्थीवर्ग व सर्वसाधारण संसारी स्त्रीवर्ग यांना आपल्या कांग्रेसच्या म्हणजेच आपले राष्ट्रपिते महात्मा गांधी यांच्या आजवरच्या थोर कार्याची आणि जातां जातां त्यांच्या शिकवणुकीचीही सुबोध व निर्मळ तोंडओळख ह्या कल्पवृक्षाच्या छायेखालीं व्हावी हा हेतु ह्या पुस्तकानें सफल झाला म्हणजे देखील पुरे.

खासबाग, कोल्हापूर.<br>
ता. १५ डिसेंबर, १९४८

**विठ्ठल वामन हडप**

## प्रमुख आधार-ग्रंथ

1. The History of the Indian National Congress ( Parts I & II ) by Dr. Pattabhi Sitaramayya.

2. An Autobiography by Pt. Javaharlal Nehru.

3. The Story of My Experiments with truth by M. K. Gandhi

४. **महात्मा गांधी** ( जीवन चरित्र ) ले. **दा. न. शिखरे.**

# १ काँग्रेसचा जन्म

तारीख १५ आगस्ट १९४७या दिवशींचा सूर्य स्वतंत्र हिंदुस्थानच्या क्षितिजावर उगवला. अडीचशें वर्षांपेक्षां अधिक काळ आपल्या राशीला आलेली इंग्रजी साम्राज्यशाहीची गुलामगिरी झुगारून देऊन तो पुन्हा आपल्या घरचा आपण धनी झाला. काँग्रेसच्या जन्मापासून आजवरची तिची तपश्चर्या फळाला आली.

हिंदुस्थान हा एका काळचा जगांतील अतिशय भरभराटलेला, संपन्न व सुखी देश. पूर्वीं जगभर लोक हिंदुस्थानला सुवर्णभूमि म्हणत असत तें अगदीं खरें होतें. सोन्यानेंही मोजतां मापतां येणार नाहीं इतकी अपरंपार धन–धान्य संपदा तेव्हां हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतून देखील आढळत होती.

हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश आहे. कामकरी म्हणजे देखील मूळचा शेतकरीच. शेतकऱ्यांतूनच काम करतां करतां कामकरी वर्ग उभा राहिला. शेतकरी शेतांत कष्ट करतो तर कामगार शेताबाहेर समाजाच्या उद्योगधंद्यां-तून, कारखान्यांतून काम करतो. पण दोघेही कष्ट करतात व दोघेही आपल्या ह्या हिंद राष्ट्राच्या कोटमाप लोकसंख्येला सुखानें जगण्यासाठीं नाना प्रकारची धन–धान्य–संपदा निर्माण करतात.

हा शेतकऱ्यांचा हिंदुस्थान आज दोनशें अडीचशें–वर्षांहून जास्त काळ गुलामगिरींत खितपत पडला होता. त्याला त्या गुलामगिरींतून आपल्या भारतीय राष्ट्रसभेनें ऊर्फ काँग्रेसनें बाहेर काढलें. पूज्य महात्मा गांधींसारखा आज सारें जग आदरानें ज्याचे पाय आठवून मस्तक नमवितें असा आपला

महान् राष्ट्रपिता काँग्रेसला कल्पवृक्ष लाभला. त्याच्या हातून आपला हिंदुस्थान स्वतंत्र झाला.

गांधीजी जसे काँग्रेसचे आहेत तशीच काँग्रेस ही हिंदुस्थानची आहे व हिंदुस्थान हा कष्ट करून धन–धान्य–संपदा उत्पन्न करणाऱ्या हिंदी शेतकरी–कामकऱ्यांचा देश आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य आज महात्मा गांधींच्या नेतेपणाखालीं काँग्रेसनें मिळवून दिलें हें खरें. पण हें एवढें प्रचंड बळ, प्रतिपक्षाशीं सतत माणुसकीच्या न्यायानें झगडून त्या युद्धांत यश मिळविण्याजोगें हें अचाट सामर्थ्य काँग्रेसला तरी हिंदुस्तानचे कोटमाप शेतकरी–कामकरी जनतेंतूनच मिळालें. महात्मा गांधी जे हिंदुस्थानच्या उद्धारासाठीं हिंदुस्थानच्या दरिद्री नारायणाला सतत भजत असत, तो दरिद्री नारायण म्हणजेच ही हिंदी शेतकरी–कामकरी जनता होय. आणि काँग्रेस तरी या सर्वांचा योग्य कैवार घेऊन आजपावेतों देशाच्या स्वातंत्र्ययुद्धांत लढली, म्हणूनच ती यशस्वी झाली.

अशी ही आपली काँग्रेस सन १८८५ या वर्षीं जन्माला आली. ती जन्माला आली तेव्हां हा आपला हिंदुस्थान दुःखांत व दारिद्र्यांत होरपळत होता. त्या दुःखांना व दारिद्र्याला कारण हिंदुस्थानांतील ती इंग्रजी राजवट होय.

सुमारें साडेतीनशें वर्षांपूर्वीं इंग्रज हिंदुस्थानांत प्रथम व्यापारी म्हणून आले. व्यापारांत त्यांनीं आमचा देश मोठ्या हिकमतीनें धुऊन नेला. आपला व्यापारधंदा वाढविला, आपली संपत्ति वाढविली, आणि आमचा देश मात्र व्यापार करतां करतां धुऊन नेला. आमचा व्यापारधंदा धुळीला मिळवला. नुसती एक कापडाचीच गोष्ट घ्या. हिंदुस्थानचें बहुमोल उंची कापड तेव्हां प्राचीन काळापासून जगभर गाजत होतें. परदेशांतील मोठमोठ्या श्रीमंतांना, सरदार–दरकदारांना व राजाराणींना सुखासाठीं व चैनीसाठीं पडेल ती किंमत देऊन हिंदुस्थानांतील कापड घेतल्याखेरीज चैन पडत नसे. इतकी तेव्हां आमच्या तलम, भारी कापडाची थोरवी. ही जी गोष्ट कापडाची तीच इतर अनेक वस्तूंची.

पण इंग्रजांनीं हिंदुस्थानांत व्यापार करतां करतां आम्हांला सगळ्या बाजूंनीं अगदीं पिळून काढलें. आमची शेती बुडविली, आमचे उद्योगधंदे बुड-

विले, परदेशांशीं चालणारा आमचा व्यापार बुडविला आणि आमच्या पिळवणुकीवर स्वत: ते मात्र धनकुबेर झाले. त्यांचा व्यापारधंदा वाढला. इतका वाढला कीं दूरदूरच्या देशांना भारी किंमतीचें देखील कापड पुरविणारा आमचा देश स्वत:चें अंग झाकण्यासाठीं दीनवाणेपणानें विलायती कापडाकडे पाहूं लागला. काँग्रेसचा व गांधीजींचा खादीवर एवढा भर कां होता हें यावरून ओळखा. ही जी स्थिति शेतीची व कापडाची तीच खेडोपाडींच्या इतर उद्योगधंद्यांचीही. ग्रामोद्योगावर व शेती-सुधारणेवर काँग्रेसचा व गांधीजींचा भर एवढ्याचमुळें होता.

इंग्रज हिंदुस्थानांत व्यापार करतां करतां आम्हांला चकवून, फसवून, भुलवून, छळून, गांजून आमच्यावर राज्य करूं लागले. आम्हीं इंग्रजांचे ताबेदार गुलाम होऊन बसलों. गुलाम एकाच परीनें नाहीं, सर्व परींनीं आमचा शेतकरी शेतीला महाग झाला. पाटबंधाऱ्यांची निगा नाहीं शेतीच्या साधनांची सोय नाहीं, जमिनीचा जबर सरकारी सारा मात्र वाढतच होता. आणि त्याची वसुली तरी किती कडकपणानें, दांडगाईनें करीत असत ! बरें, अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं शेतकऱ्यानें पोलिसांकडे जावें तर पोलीसच जुलूम करणारा आणि लांचखाऊ. कोर्टकचेरीची पायरी चढावी तर पावलोपावलीं गैरसोयी. आणि खर्च देखील इतका पडायचा कीं तो भागवतां भागवतां शेतकऱ्याचे डोळे पांढरे व्हायचे. बरें, येतील त्या अडचणी सोसूनही शेती करावी तर तिथें हत्यारांचा कायदा, जंगलचा कायदा असले कायदे शनीसारखे छळायला उभे. न्याय मागायला जावें तर दाद नाहीं.

ही जी दैना शेतकऱ्याची तीच कामकऱ्याची व तीच नोकरी-धंदेवाल्या मध्यम वर्गाचीही. आमचे लोक कांहीं बुद्धीनें आणि कर्तबगारीनें इंग्रजांपेक्षां कमी नव्हते आणि नाहींत. पण त्यांच्या बुद्धीचें आणि कर्तबगारीचें चीज होईल तर ना ? मोठ्या अधिकाराच्या, मोठ्या पगाराच्या सरकारी नोकऱ्या इंग्रज सरकार विलायतेंत चढाओढीच्या परीक्षा घेऊन देऊं लागलें तेव्हां आमच्या बुद्धिमान् लोकांची ही किती कुचंबणा व्हायची ! आम्हीं कानीं कपाळीं ओरडून सांगितलें कीं आय्. सी. एस्. ची परीक्षा घ्यायची ती हिंदुस्थानांत तरी घ्या ! पण नाहीं. उलट विलायतेंत देखील हिंदी विद्यार्थी गोऱ्या विद्यार्थ्यांशीं बरोबरी करून परीक्षेंत वरचे नंबर मिळवतात, म्हणून

त्या परीक्षेला बसायची वयाची मर्यादा मुळांतच कमी होती ती आणखी कमी केली.

सरकारी नोकरींत ह्या अशा अडचणी. हिंदी व्यापारधंदा तर ठार बुडालेला. तिकडे शेतीची तशी दैना. याप्रमाणें चोहों बाजूंनीं दारिद्र्य, कुचंबणा मानखंडना आणि त्यांतच दुष्काळाची भर! इतकीं दुःखें सोसूनही आम्हांला हाय म्हणायची चोरी. कायद्यानें मुद्रणस्वातंत्र्याची गळचेपी झालेली. स्थानिक स्वराज्याच्या क्षुल्लक बाबतींतही आम्हीं आमचा कारभार करायला स्वतंत्र नाहीं. आमच्या मुलांनीं काय शिकावें, कसें शिकावें, सुशिक्षित होऊन कसें पुढें यावें हें देखील ठरवायचा आम्हांला अधिकार नाहीं. इतकें आमच्या विश्वविद्यालयांचें स्वातंत्र्य देखील सरकारनें कायद्यानें हिरावून घेतलें होतें.

असा आम्हां हिंदी लोकांपुढें सर्व बाजूंनीं जगण्यामरण्याचा प्रश्न राक्षसासारखा उभा होता. लोकांच्या हालअपेष्टा इतक्या वाढल्या होत्या कीं असल्या जिण्यापेक्षां मरणें बरें असें त्यांना वाटावें. अशिक्षित शेतकरी–कामकऱ्यांना आपलीं दुःखें बोलून वेशीवर टांगतां येत नव्हतीं. म्हणून त्यांची मुस्कटदाबी करणें जबरदस्त सरकारला बरेच सोपें होतें. पण मध्यमवर्गांतील शिकल्यासवरल्या नोकरीधंदेवाल्या पांढरपेशा लोकांचीं तोंडें बंद करणें हें कांहीं तितकें सोपें काम नव्हतें.

शेतकरी वर्ग देखील अशिक्षित असला तरी असा तोंड दाबून बुक्क्यांचा मार किती दिवस सहन करणार? मुंबई इलाख्यासारख्या ठिकाणीं शेतकऱ्यांचे दंगेधोपे अधून मधून वाढतच होते. आमचा सुशिक्षित बुद्धिजीवि पांढरपेशा मध्यमवर्ग तर चिडून मनांतून बंडाची कठोर भाषा बोलूं लागला होता. बंड म्हणजे तरी हे लोक खून, मारामाऱ्या, सावकारांच्या घरावर दरवडे, बाजारांची लुटालूट याखेरीज आणखी काय करणार?

अशा प्रकारच्या बंडाची आग हिंदुस्थानांत धुमसत असलेली ज्या कांहीं थोड्या बड्या डोळस इंग्रज अधिकाऱ्यांना आढळली असेल त्यांपैकीं एलन आक्टेव्हियन ह्यूम हे एक प्रमुख डोळस बडे सनदी अधिकारी होते. त्यांनीं स्वतः पुष्कळ विचार करून व गव्हर्नर जनरलसारख्या बड्यांत बड्या सरकारी अधिकाऱ्यांशीं विचारविनिमय करून ठरविलें कीं देशांतील तरुण

पिढीच्या अंतःकरणांत सांचणाऱ्या ह्या बंडखोरीच्या जळजळीत वाफेला वेळींच कांहींतरी वाट काढून दिली पाहिजे.

ह्यूमसाहेबांना ह्या बंडखोरीच्या वाफेचा स्फोट व्हायला नको होता. तो स्फोट झाला तर त्यांत हिंदुस्थानला धोका आहे या भीतीमुळें असो, किंवा इंग्रजी राजवटीला धोका आहे या भीतीमुळें असो; पण त्यांनीं त्या वाफेला वाट करून दिली खरी.

ह्यूमसाहेबांच्या ह्या प्रयत्नांतच काँग्रेसचा जन्म झाला. प्रांतोप्रांतीं अशा स्वरूपाच्या संस्था व चळवळी निर्माण होतां होतां एके दिवशीं–ता. २८ डिसेंबर सन १८८५ रोजीं दोनप्रहरीं बारा वाजतां मुंबईला गोकुळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या इमारतींत काँग्रेसचें पहिलें अधिवेशन भरलें.

तो कांग्रेसचा जन्मदिवस होय.

• • •

# २ आरंभींचीं तीस वर्षें

आजची काँग्रेस माध्यान्हीच्या सूर्यासारखी हिंदुस्थानांतील खडोपाडीं आपल्या महान् कीर्तिवैभवानें प्रकाशते आहे. पण आरंभीं याच काँग्रेसचा व्याप फार तर मोठमोठ्या शहरांपलीकडे नव्हता.

आजची काँग्रेस ही हिंदुस्थानच्या कोटयवधि जनतेची काँग्रेस झाली आहे. पण आरंभीं ही काँग्रेस हिंदुस्थानांतील बडया बडया सुखवस्तु सुशिक्षितांची व त्यांतही बडया बडया देशप्रेमी सरकारी नोकरांची व नामांकित वकील, डॉक्टर, बॅरिस्टर, व्यापाऱ्यांची होती. आपले प्रारंभींचे काँग्रेस पुढारी काँग्रेस ही साऱ्या देशाची आहे असें म्हणत आणि तसें वागण्याचा प्रयत्न देखील करीत. तथापि नांव हिंदुस्थानच्या लोकांचें आणि गांव सुखवस्तु बडया हिंदी मध्यमवर्गाचें, असा खरा प्रकार आरंभीं कांहीं काळपर्यंत काँग्रेसच्या बाबतींत होता.

आर्थात् याबद्दल आपण आपल्या तेव्हांच्या वंदनीय पुढाऱ्यांना नांवें ठेवतां कामा नयेत. आजच्या काळाची तेव्हांच्या काळाशीं बरोबरी कशी करतां यईल ? त्या आरंभींच्या काळांत आपल्या त्या थोर पुढाऱ्यांनीं आपल्या माय-देशाला इंग्रजांच्या गुलामगिरींतून सोडविण्यासाठीं प्रयत्न आरंभिले त्याबद्दल आपण त्यांचे सदैव ऋणी राहिलें पाहिजे.

आपल्या काँग्रेसची कल्पना मूळ जशी एका थोर मनाच्या बड्या गोऱ्या सरकारी अधिकाऱ्याला सुचली, तशीच ती कल्पना देशांतील अनेक जातींच्या, अनेक धर्मांच्या व अनेक वृत्तींच्या थोर देशभक्तांच्या हातून वाढीला लागली. ह्यूमसाहेब हे काँग्रेसच्या मूळ कल्पनेचे जनक खरे. पण दादाभाई नौरोजी, वाच्छा, मेथा, गोखले, बद्रुद्दीन तय्यबजी, तेलंग, सुब्रम्हण्यम् अय्यर, मालवीय, लजपतराय, रानडे ह्या व अशा आणखी अनेक थोरांनीं काँग्रेसच्या वाढीला कोणीं अगदीं आरंभापासून तर कोणीं जरा नंतर पण कळकळीनें हात भार लावलेला आहे. ह्यूमसाहेबांना प्रथम सुचलेली काँग्रेसची कल्पना वट-बीजासारखी सूक्ष्म होती. त्या वटबीजाची जोपासून वाढ करून त्याचा विराट वटवृक्ष आरंभीं ज्यांनीं वाढविला ते देखील एका अर्थानें काँग्रेसचे जनकच होत.

काँग्रेस स्थापन झाल्यापासून आरंभींच्या वीस वर्षांत तिच्याकडून फारशी मोठी कामगिरी झाली नाहीं म्हटलें तरी चालेल. आरंभींचे काँग्रेसचे सारे थोर थोर पुरस्कर्ते राजनिष्ठापूर्वक व ठराव–अर्ज–विनंत्यांच्या रूपानें सरकार ला प्रसन्न करून देशाचें हित साधूं पाहणारे होते. हे सारे लोक सुशिक्षित, सुखवस्तु, पांढरपेशे अथवा पुढारलेले होते. त्यांची नजर स्वतःच्या वरच्या वर्गाच्या परीघापलीकडे फारशी गेली नाहीं, व जाणें शक्यही नव्हतें. तेव्हां आपला कष्टाळू हिंदी बहुजन समाज स्वतःचीं दुःखें बोलून दाखविण्याइतका सुशिक्षित, सुजाण व बोलका नव्हता. त्याच्या दुःखांना वाचा फुटणार ती अशा थोर पुढाऱ्यांच्या तोंडूनच फुटणार.

शेंकडों वर्षें दमल्याभागलेल्या, कष्टाळू हिंदी बहुजनसमाजाच्या दुःखांना काँग्रेसमध्यें आरंभीं मधून मधून वाचा फुटे; नाहीं असें नाहीं. हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश. त्या शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं आरंभापासून काँग्रेस आपल्या परीनें वेशीवर टांगीत असे. कायमधारा पद्धत, दुष्काळ, सारावाढ असे शेत-

कऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न तेव्हां काँग्रेसमधून पुढें आणले जात. त्यांवर चर्चा होई, ठराव पास होत, अर्ज-विनंत्या होत, आणि शेवटीं त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं म्हणून कंटाळून त्या ठरावांचा नाद सोडून दिला जाई. शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं, जंगलाचे कायदे, मीठ, अबकारी, पाणीपुरवठा असले कंठाळी ठराव तेव्हां काँग्रेसच्या अधिवेशनांतून मांडवशोभेसारखे सालोसाल पास होत व पुन्हा दुसऱ्या सालापावेतों दप्तरांत झोंप घेत स्वस्थ पडत. स्त्रीवर्ग, दलितवर्ग यांचा देखील आरंभींच्या काँग्रेसला विसर पडला नव्हता. पण ठराव आणि अर्ज-विनंत्या यापलीकडे अशा बाबतींत प्रारंभींच्या काँग्रेसनें फारसा पल्ला गाठला नाहीं. असें हें काँग्रेसचें राजनिष्ठापूर्वक ठराव–अर्ज–विनंत्यांचें राजकारण आरंभींच्या वीस वर्षांपावेतों चाललें होतें.

पण सन १९०५ सालीं तेव्हांचा करडा व्हॉईसरॉय व गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यानें हिंदुस्थानवर व काँग्रेसवर एक मोठा आघात केला. धड वेगळें आणि शीर वेगळें अशी बंगालची फाळणी त्यानें केली. त्या सरकारी भेद-नीतीसरशीं देशभर स्वदेशीचा पुरस्कार, परदेशी मालावर बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण अशा तिधारी चळवळीचा त्रिशूळ हातीं घेऊन हिंदी जनता देशभर खवळून उठली. पुढच्याच वर्षीं सन १९०६ मध्यें कलकत्त्याला काँग्रेसचें अधिवेशन भरलें हिंदुस्थानचे राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी हे आरंभा-पासून काँग्रेसची जोपासना करणारे एक महान् पुढारी होऊन गेले. काँग्रेसच्या जन्मापासून ते पुन्हा तिसऱ्या वेळीं काँग्रेसचे अध्यक्ष झाले. हिंदुस्थानला स्वराज्य पाहिजे अशी 'स्वराज्य' ह्या अमर शब्दाची घोषणा दादाभाईंच्याच मुखानें कलकत्त्याच्या काँग्रेसमध्यें प्रथम झाली.

बंगालच्या फाळणीची जी ठिणगी देशांत पडली, त्या ठिणगीनें साऱ्या देशभर निषेधाच्या सभा, मिरवणुकी, हरताळ यांचा मारे वणवा भडकवून दिला. चळवळ फोफावूं लागली तेव्हां त्या चळवळीला मारण्यासाठीं सरकारनें दडपशाही सुरू केली. पेटलेल्या आगींत तेल पडावें त्याप्रमाणें त्या दडप-शाहीनें चळवळ अधिकाधिक भडकूं लागली. मोर्ले-मिंटो सुधारणांचा राजकीय हक्कांचा पहिला हप्ता सन १९०६ सालीं म्हणजे बंगालची फाळणी झाली त्याच्या दुसऱ्या वर्षीं मिळाला. पण तो बहुतेक निरुपयोगीच ठरला. सरकार-ची दडपशाही वाढत गेली. तिचा तितक्याच अथवा त्याहूनही तीव्र उपायांनीं

रोखठोक निषेध करणारी दहशतवादी चळवळ देशांत सुरू झाली. बंगाल्यांत मुझफरपूर येथें खुदीराम बोस या देशभक्त तरुणानें केनेडी या गोऱ्या कुटुंबांतील बायांचा बाँब फेकून खून केला. स्वामी विवेकानंदाचे बंधु भूपेंद्र दत्त यांना 'युगांतर' हें ज्वलज्जहाल पत्र चालविल्याबद्दल मोठी शिक्षा झाली. बाबू अरविंद घोष 'वंदे मातरम्' पत्रांतील तेजस्वी लेखाबद्दल पकडले गेले. नाशिक येथें कलेक्टर जॅक्सन यांचा खून झाला. असली ही दहशतवादाची ज्वाला हिंदुस्थानाबाहेर विलायतेंतही जाऊन भडकली. तिकडे कर्नल वायली ह्या बड्या गोऱ्या अधिकाऱ्याला मदनलाल धिंग्रा या क्रांतिकारक तरुण हिंदी विद्यार्थ्यानें गोळी घालून ठार केलें.

ह्या चळवळीच्या भडक्यांतच लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली.

अखेर सरकारला सन १९११ मध्यें बंगालची ती कुप्रसिद्ध फाळणी रद्द करावी लागली. हिंदुस्थानला सरकारकडून प्रांतिक स्वायत्ततेचें वचन मिळालें. जनतेच्या राष्ट्रीय चळवळीचा विजय झाला.

पण बंगालच्या फाळणीच्या निमित्तानें सरकारनें हिंदु-मुसलमानांमधील दुहीचें जें विषबीज पेरलें तें रुजून त्याची वाढ व्हावयाची यामुळें कांहीं टळली नाहीं. किंबहुना हिंदु-मुसलमानांत फूट पाडून मुसलमान आपणाला हिंदूंपेक्षां अधिक जवळचे आहेत असें भासविण्यासाठींच सरकारनें ही बंगालची फाळणी केली होती. तेव्हांपासून मुसलमान समाज काँग्रेसशीं फटकून राष्ट्रीय चळवळींत परक्या त्रयस्थासारखा अंग चोरून वागूं लागला. नोकरशाहीवर मुसलमान समाजाचा विश्वास बसायला फाळणी हें एक नवें कारण घडलें.

पण बंगालची फाळणी रद्द झाल्यानंतर मुसलमान समाजाच्या ह्या सरकारधार्जिण्या वृत्तींत हळूहळू थोडा थोडा बदल होऊं लागला. हिंदू-मुसलमानांनीं एकमेकांशीं गोडीगुलाबीनेंच वागलें पाहिजे हें त्यांना पटूं लागलें. सन १९१३ सालीं काँग्रेसनें सरकारपाशीं साम्राज्यांतर्गत स्वराज्याची मागणी केली. त्या मागणीला मुसलमान समाजाचा पूर्ण पाठिंबा होता.

सन १९१४ सालीं लोकमान्य टिळक सहा वर्षांची शिक्षा भोगून सुटले. आणि लगच युरोपांत पहिलें महायुद्ध सुरू झालें.

• • •

# ३ राजकीय सुधारणांचा दुसरा हप्ता

लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे तीन थोर राष्ट्रपुरुष म्हणजे आपल्या काँग्रेसचें त्रिभुवन. लो. टिळक आपल्या ऐन तारुण्यांत सन १८९६ पासून काँग्रेसच्या राजकारणांत उगवत्या सूर्यासारखे चमकूं लागले. तोंपावेतों काँग्रेसचें राजकारण वरातींतल्या कोतवाली घोड्यासारखें डुलत डुलत रुबाबांत संथपणें चालू होतें. ना. गोखल्यांसारखे कांहीं थोर लोक सन १९१४ सालापूर्वीच्या काँग्रेसमध्यें तळमळीनें भरीव कार्य करतांना आपणाला दिसतात; पण ते देखील वृत्तीचे नेमस्त. ठराव-अर्ज–विनंत्यांच्या राजकारणाबाहेरील उग्र स्वरूपाचें राजकारण त्यांच्या काँग्रेसला तेव्हां मानवत नव्हतें.

अशा स्थितींत लो. टिळक काँग्रेसच्या क्षितिजावर सन १८९६ सालीं कलकत्त्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनांत उगवले तेव्हां काँग्रेसमध्यें खळबळीचें वातावरण निर्माण होऊं लागलें. सन १८९७ सालीं पुण्यांत पहिला प्लेग उद्‌भवला. त्याच सालीं पुणें-मुंबई येथें सरकारच्या अरेरावीच्या धोरणामुळें जनतेंत भयंकर असंतोष माजला होता. लो. टिळकांचा पक्ष जो पुढें जहाल अथवा राष्ट्रीय पक्ष म्हणून ओळखला गेला, तो त्या असंतोषांतच जन्म पावला पुण्यांत प्लेगचा बंदोबस्त करण्याच्या निमित्तानें रँडसाहेब व त्याचा सहकारी लेफ्ट. आयर्स्ट वगैरे अधिकाऱ्यांनीं लोकांचा अनेक परींनीं छळ केला. त्याचें प्रायश्चित्त त्या दोघांना खुनाच्या रूपानें मिळालें. चाफकरबंधू व सरदार नातू यांना त्या खुनाबद्दल पकडून विना–चौकशी अटकेंत ठेवण्यांत आलें. पुढें चाफेकरबंधू फांशी गेले.

या अत्याचाराबद्दल सरकारला लो. टिळक यांचा व त्यांच्या 'केसरी' पत्राचा वहीम येत होताच. तेवढ्यांत लो. टिळकांनीं शिवाजी उत्सवाची चळवळ सुरू केली. त्या चळवळीपायीं त्यांच्यावर खटला होऊन त्यांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. तथापि लोकमान्यांसारख्या थोर राष्ट्र–

पुरुषाला असलेल्या अपराधाचें निमित्त काढून तुरुंगांत डांबणाऱ्या सरकारचा देशांत व देशाबाहेरही तीव्र निषेध होऊं लागला. तेव्हां सरकारला टिळकांची सुटका करणें भाग पडलें.

पुन्हां लो. टिळक हिरीरीनें राष्ट्रकार्यांत लक्ष घालूं लागले. काँग्रेसच्या नेमस्त पुढारीपणाला तें कांहीं मानवेना. गोखले, मेथा वगैरेंचा नेमस्त ऊर्फ मवाळपक्ष आणि लो. टिळकांचा राष्ट्रीय ऊर्फ जहाल पक्ष यांच्यांतील मतभेद सन १९०७ सालीं सुरतेच्या काँग्रेसमध्यें अगदीं शिगेला पोहोंचले. दोघांची फाटाफूट झाली. राष्ट्रीय पक्ष काँग्रेसच्या बाहेर पडला व नेमस्त पक्ष काँग्रेस घेऊन बसला. ही परिस्थिति पुढील सालीं लो. टिळकांना राजद्रोहाबद्दल सहा वर्षांची शिक्षा झाली तेव्हां आणि ते सन १९१४ सालीं तुरुंगांतून सुटेपावेतों कायम होती.

लो. टिळक तुरुंगाबाहेर येतांच ते काँग्रेस आपल्या हातीं नाहीं म्हणून स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं होमरूल लीगची चळवळ नेटानें हातीं घेतली. पुढील वर्षी सन १९१५ सालीं मुंबईला काँग्रेसचें अधिवेशन भरलें तेव्हां त्यांनीं पुढाकार घेऊन काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांना जवळ आणलें, आणि स्वराज्याची योजना काँग्रेस व लीग या दोहोंनीं मिळून तयार करावी असें ठरलें.

लो. टिळकांची होमरूलची चळवळ एकसारखी वाढतच होती. सन १९१६ च्या एप्रिल महिन्यांत होमरूल लीगची रीतसर स्थापनाही झाली. हिंदू-मुसलमानांच्या एकीवर लो. टिळकांनीं तेव्हां विशेष भर दिला होता. कारण हिंदू-मुसलमानांत सरकार मतलबी डावपेचांनीं फाटाफूट करतें आणि ' फोडा व झोडा ' ह्या तत्त्वावर हिंदी लोकांच्या सर्व आशा–आकांक्षा पायाखालीं तुडवून राज्य करतें, हें लो. टिळकांनीं पुरें ओळखलें होतें. म्हणूनच सन १९१६ मध्यें लखनौला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं काँग्रेस व लीग यांच्या एकीवर विशेष भर दिला.

लो. टिळकांच्या एकीच्या ह्या प्रयत्नांना तेव्हां बरेंच यश आलें. होमरूलची ऊर्फ स्वराज्याची चळवळ देशांत जोरांत सुरू झाली. तितक्याच जोरांत ती चळवळ दडपून टाकण्यासाठीं सरकारनें दडपशाही सुरू केली.

अशा स्थितींत सन १९१७ साल उजाडलें. तेव्हांपासून महात्मा गांधी काँग्रेसच्या क्षितिजावर ठळकपणें उगवले. गांधीजींनीं काँग्रेसच्या मंदिरांत

पाऊल टाकलें तेंच स्वतःची सत्य–अहिंसेची व निःशस्त्र प्रतिकाराची उच्च विचारसरणी घेऊन. तोंपावेतों निःशस्त्र प्रतिकार हा शब्द देशाला किंवा काँग्रेसला माहीत नव्हता म्हटलें तरी चालेल. त्या सालीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटी आणि मुस्लीम लीग यांची संयुक्त सभा झाली व स्वराज्याची लढाई निःशस्त्र प्रतिकाराच्या साधनानें यापुढें लढावी असा विचारप्रवाह हिंदू-मुसलमानांत एकीच्या भूमिकेवरून प्रथम जोरानें वाहूं लागला.

परंतु एकंदरींत गांधीजींचा निःशस्त्र प्रतिकार तेव्हां काँग्रेस व लीग ह्या दोघांनाही मानवला नाहीं. काँग्रेसची आणि लीगची त्या गोष्टीचा विचार करण्यासाठीं पुन्हा संयुक्त सभा झाली. त्या सभेंत एकविचारानें ठरलें कीं गांधीजींचा निशस्त्र प्रतिकार आपल्या पचनीं पडणारा नसल्यामुळें तो बाजूला ठेवण्यांत यावा.

पण हिंदू-मुसलमानांना म्हणजेच काँग्रेसला व लीगला तेव्हां आपला उपदेश पटला नाहीं म्हणून गांधीजी रागावले नाहींत किंवा फाटाफुटीच्या राज–कारणाला बळी पडले नाहींत. ते या मुद्यावर काँग्रेसशीं व लीगशीं भांडत बसले नाहींत. त्यांना हिंदुस्थानच्या दरिद्री नारायणाची उपासना करून हिंदुस्थानचा उद्धार करायचा होता. ते मुकाटपणें उठले आणि चंपारण्यांतील मळेवाल्या शेतकऱ्यांचीं फारा दिवसाचीं खोळंबलेलीं गाऱ्हाणीं ऐकून घेऊन दूर करण्यासाठीं तिकडे निघून गेले.

चंपारण्यांतील शेतकऱ्यांच्या उद्धाराची चळवळ आपल्या निःशस्त्र प्रतिकाराच्या मार्गानें गांधीजींनीं यशस्वी केली व लगेच पुढील वर्षीं सन १९१८ सालीं ते गुजराथेंतील खेडा जिल्ह्यांत शेतकऱ्यांच्या हांकेला धांऊन गेले.

खेड्यांतील शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं गांधीजी दूर करून घेतात न घेतात तोंच त्यांना अहमदाबादेंतील गिरणी कामगारांचीं गाऱ्हाणीं ऐकून घ्यावीं लागलीं. अहमदाबाद हें हिंदुस्थानांतील कापड गिरण्यांचें मुंबईच्या खालोखाल माहेरघर होय. तिथें मोठमोठ्या अनेक कापडगिरण्या आहेत, मोठमोठे कोट्याधीश गिरणीमालकही आहेत. कामगारांचें कारखानदारांविरुद्ध गाऱ्हाणें पोटासाठींच असणार. अहमदाबादच्या कामगारांचें आपल्या गिरणी मालकांविरुद्ध गाऱ्हाणेंही पोटासाठींच होतें. सारा दिवस मरेमरेतों गिरणींत राबून आपलें आणि आपल्या बायकापोरांचें पोटही आपल्याला नीट भरतां

येत नाहीं म्हणून आपणाला केल्या कामाबद्दल मिळणारा पगार जास्त मिळावा अशी कामगारांची मागणी. कामगारांना, गांधीजींना, साऱ्या देशाला उघड दिसत होतें कीं हे मोठमोठे गिरणी–कारखाने आणि गिरणीमालकांच्या मोठमोठ्या हवेल्या, त्यांची कोटमाप संपत्ति कामगारांच्या निढळाच्या घामांतून निर्माण झाली आहे. पण म्हणून काय ती संपत्ति–तिचा थोडासा भाग तरी सुखासुखी कामगारांच्या मुखीं थोडाच लागतो ? तो तसा लागत नाहीं म्हणून तर कामगार विनवण्या, पायधरण्या, संप असे उपाय निरुपायानें अमलांत आणतात.

गांधीजींनी अहमदाबादेंत जाऊन ही परिस्थिति प्रत्यक्ष पाहिली. कलहाचें अर्थात् हिंसेचें गांधीजींना मूळपासूनच वावडें. कामगारवर्ग चुकतो आणि भांडवलदारवर्गच बरोबर आहे असें तेव्हां देखील गांधीजींना वाटलें नाहीं. पण कामगार आणि भांडवलदार यांच्यांतील हा लढा विकोपाला जाण्यांत फायदा नाहीं अशी गांधीजींची मूळपासून ठाम खात्री होती. सत्य–अहिंसाधर्म हें गांधीजींचें ब्रीदवाक्य. सत्याग्रह ही त्यांची उपाययोजना. ही उपाययोजना जनतेच्या झगड्यांत परिणामीं यशस्वी होतेच होते हा अनुभव त्यांच्या आफ्रिकेंतील सत्याग्रह चळवळीपासून त्यांना मिळाला होता. सत्याग्रहाचा अहिंसात्मक लढा देवाण–घेवाण अशा तडजोडीच्या भूमिकेवरूनच शेवटाला जातो हें गांधीजींनींच आपल्या आयुष्यभर आम्हांला शब्दानें व कृतीनें शिकविलें आहे.

अहमदाबादेंतील गिरणीकामगार आणि गिरणीमालक यांच्यांतील बेबनाव ही गांधीजींनीं याच सत्य–अहिंसाधर्माच्या पाळणुकींत तडजोडीनें मिटविला. नुसता लढा मिटविला इतकेंच नाहीं तर कामगार आणि गिरणीमालक या दोघांचेंही मित्रत्व मिळवून गुण्यागोविंदानें स्वतःच्या पुढारीपणाखालीं त्यांनीं तो लढा मिटविला.

तेव्हांचा तो लढा मिटला. त्या लढ्याच्या निमित्तानें गांधीजी जे कामगार आणि गिरणीमालक या दोघांचेही मित्र व नेते झाले तें मित्रत्व व नेतेपण कायम टिकलें, इतकेंच नव्हे तर वाढीला लागलें. पुन्हा जेव्हां जेव्हां कामगार व गिरणीमालक यांच्यांत कटकटीचे प्रसंग उत्पन्न होतील तेव्हां तेव्हां ते अशाच सत्य–अहिंसामय तडजोडीच्या मार्गानें मिटविले पाहिजेत हा

पहिला धडा गांधीजींनीं अहमदाबादेंत कामगार चळवळीला घालून दिला. त्यासाठीं मग लगेच कामगार व गिरणीमालक या दोघांचा मिळून मजूर-महाजन संघ स्थापन झाला.

याप्रमाणें गांधीजी हिंदुस्थानांतील शेतकरी-कामगार दरिद्री नारायणाच्या सेवेंत पूर्णपणें गढून गेले होते तोंच सरकारनें महायुद्धाच्या झळीपासून इंग्रजी साम्राज्याचा नीट बचाव करण्याचा उपाय म्हणून कीं काय हिंदुस्थानला राजकीय सुधारणांचा दुसरा हप्ता दिला. ह्या मँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा सन १९१८ च्या जून महिन्यांत जाहीर झाल्या.

ह्या राजकीय सुधारणा जाहीर व्हायला आणि चार वर्षें युरोप-आशियांत चाललेलें पहिलें महायुद्ध संपायला जवळ जवळ एक गांठ पडली. ता. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं युद्ध संपल्याची घोषणा झाली.

• • •

## ४ हिंदू-मुसलमानांची एकी

महायुद्ध संपलें. इंग्लंड, अमेरिका वगैरे दोस्त राष्ट्रें विजयी झालीं. हें महायुद्ध बळेंच उकरून काढणाऱ्या कायसरच्या जर्मनीचा पुरा पराभव झाला.

ह्या महायुद्धांत दोस्तराष्ट्रांना जो जय मिळाला त्यांत हिंदुस्थानचाही वांटा होता. हिंदुस्थाननें इंग्लंडला युद्धासाठीं पैसा पुरवला, सामानसुमान पुरवलें, सैनिक पुरवले, अशी पुष्कळ मदत केली. हिंदुस्थान जर दोस्त राष्ट्रांना मदत करायला अगदीं नाराज झाला असता तर पस्तीस कोटी हिंदी लोकांच्या विरोधाला इंग्रज राजकर्ते तरी कसें तोंड देऊं शकले असते? मग त्यांना मदत कुठून मिळाली असती ?

पण हिंदुस्थाननें तसें केलें नाहीं. लो. टिळकांची सुटका होण्याला आणि महायुद्ध सुरू होण्याला जवळ जवळ एक गांठ पडली. इंग्रजांवरील संकट

म्हणजे हिंदुस्थानला सुसंधी असे लो. टिळक वारंवार सांगत. इंग्लंडवर हें महायुद्धांचें संकट कोसळलेलें पाहतांच लोकमान्यांनीं त्या संधीचा हिंदुस्थान-साठीं स्वराज्य संपादनाच्या कामीं चतुरपणानें उपयोग करून घेण्याचें ठरविलें. त्यांनीं होमरूलची चळवळ चालविली व काँग्रेसलाही हलवून जागें करून जनतेंत राजकीय जागृति आरंभिली.

हिंदू विरुद्ध मुसलमान असा झगडा सतत चालू ठेऊन त्या दोघांच्या भांडणांत आपला लाभ साधण्याची इंग्रजी कुटिल नीति लोकमान्यांनीं पुरेपूर ओळखली होती. म्हणूनच त्यांनीं सन १९१४ सालीं तुरुंगांतून सुटून येतांच हिंदू–मुससमानांच्या अर्थात् काँग्रेस–लीगच्या एकीवर विशेष भर दिला. स्वराज्याची मागणी काँग्रेस–लीगनें एकमुखानें जोरानें मागण्याला सुरुवात केली. पण ही जागृति करीत असतांनाच लोकमान्यांनी इंग्रजांना युद्धकार्यांत सहाय्यही पुष्कळ केलें. हिंदी लोकांनीं सैन्यांत भरती व्हावें असा जोरदार प्रचारही त्यांनीं केला. एका बाजूनें सरकारला युद्धकार्यांत मदत करायची व दुसऱ्या बाजूनें त्याबरोबरच हिंदी जनतेच्या मागण्या पुढें मांडायच्या अशा प्रकारची लोकमान्यांची ती चळवळ दुधारी तरवारीसारखी प्रतियोगी सहकारितेची होती.

महात्मा गांधी देखील तेव्हां हिंदी राजकारणांत कळकळीनें लक्ष घालूं लागले होते. ते इंग्रज सरकारशीं युद्धकार्यांत बिनशर्त साहकारिता करण्याच्या मताचे होते. इंग्रजांच्या प्रामाणिकपणावर त्यांचा विश्वास होता. त्या काळीं सन १८९७ ते सन १८९९ च्या दरम्यान इंग्रजांनीं आफ्रिकेंत तिथल्या रहिवासी बोअर लोकांविरुद्ध चालविलेल्या बोअर–युद्धांत दलित अशा बोअर लोकांविरुद्ध त्यांनीं इंग्रजांना शुश्रूषा पथकें चालवून बहुमोल मदत केली होती. हें पहिलें महायुद्ध सुरू असतांना गांधीजींनीं हिंदुस्थानांत स्वतः सैन्य भरतीची मोहीम चालविली होती. लोकमान्यांप्रमाणें त्यांची या कामीं देवाण घेवाण अशी व्यापारी दृष्टी नव्हती.

परंतु लोकमान्य काय किंवा गांधीजी काय दोघेही ही जी सारी यातायात करीत होते ती इंग्रजांकडून हिंदुस्थानला स्वराज्य मिळावें म्हणून.

महायुद्ध संपलें. हिंदी सैन्याच्या रणांगणावरील कामगिरीची इंग्रजांनीं देखील खूप प्रशंसा केली. हिंदुस्थाननें ह्या युद्धांत आपल्या कुवतीप्रमाणें

सढळ हातानें जेवढी मदत करतां येण्यासारखी होती तेवढी केली होती. ती मदत बहुमोलाचीही ठरली होती. अर्थात् आतां युद्ध संपल्यावर विजयाच्या यशांत आपणाला दोस्त राष्ट्रांबरोबर योग्य वांटा मिळणार अशी रास्त अपेक्षा हिंदुस्थान करीत होता.

तुर्कस्तानला दोस्तांच्या बाजूनें ह्या युद्धांत भाग घ्यावा लागला. पण त्यामुळें आपण तुर्कस्तानची हानि होऊं देणार नाहीं असें इंग्रज सरकारनें पूर्वी वेळोवेळीं सांगितलें होतें. तुर्कस्तान ही मुसलमानांच्या खलीफाची गादी. त्या गादीची इभ्रत योग्य प्रकारें राखली गेली पाहिजे अशी धर्मनिष्ठ हिंदी मुसलमानांची मागणी. ती मागणी इंग्रजांनीं मान्य केली होती व त्यावर हिंदी मुसलमानांचा विश्वास होता. ह्या महायुद्धांत तुर्कस्थानची जी हानि झाली होती त्याची दाद इंग्रज सरकार पूर्वीं वेळोवेळीं वचन दिल्याप्रमाणें आतां योग्य प्रकारें घेईल, खलिफाच्या प्रतिष्ठेला जरा देखील धक्का लागूं नये इतकी खबरदारी सरकार घेईल, अशी हिंदी मुसलमानांची अपेक्षा होती. हिंदी स्वराज्याइतकाच आपल्या खलीफाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न हिंदी मुसलमानांना जिव्हाळ्याचा वाटत होता. महायुद्धांत आपल्या इंग्रज सरकारला विजय प्राप्त झाला; आतां सरकारकडून आपण पूर्वीं मिळालेल्या वचनाची संतोषानें पूर्तता करून घेऊं या आशेकडे हिंदी मुसलमान डोळे लाऊन बसले होते.

कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांची तेव्हां तात्पुरती एकी झाली होती. कॉंग्रेस लीगच्या एकमतानें स्वराज्याचा ठरावही लोकमान्य व महात्माजी यांच्या पुढारीपणाखालीं लखनौच्या कॉंग्रेसमध्यें पास करण्यांत आला होता. इंग्रज सरकारनें हिंदुस्थानला सन १९१८ सालीं देऊं केलेल्या मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा महायुद्धांतील विजयाच्या ह्या आनंदी आनंदाच्या भरांत आपण अधिक घासूनपुसून स्वच्छ करून सुधारून घेऊं, आणि मग स्वराज्याच्या पुढच्या हप्त्याची मागणी हिंदू-मुसलमानांच्या एकमुखानें करूं या सुखस्वप्नांत लो. टिळक, महात्मा गांधी व इतर सारे हिंदी पुढारी रंगून गेले होते.

पण महायुद्ध संपल्यावर हिंदुस्थानच्या अपेक्षेप्रमाणें असें कांहीं यश पदरीं

पडण्याचें बाजूलाच राहिलें. उलट भयंकर दडपशाही आणि जुलूम पदरीं पडण्याचीं दुश्चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं.

युद्धकाळांत हिंदुस्थानांतील क्रांतिकारक चळवळीला आळा घालून हिंदुस्थानचें संरक्षण करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें पूर्वी भारत संरक्षण कायदा केला होता. त्या कायद्याची मुदत आतां युद्ध बंद झाल्यावर सहा महिन्यांनीं संपणार होती. युद्ध बंद झाल्यामुळें त्या कायद्याची आवश्यकताही आतां राहिली नव्हती. तो कायदा व तसेच दडपशाहीचे इतर कायदे आतां रद्द झाले पाहिजेत व होणार अशी हिंदुस्थानची अपेक्षा होती. तशी मागणी देशांतून ठिकठिकाणीं होऊं लागली होती.

पण सरकारच्या मनांत तेव्हां दडपशाहीच्या नव्या बेतांचें काळेंबेरें पुष्कळ सांचलें होतें. भारत संरक्षण कायदा हें दडपशाहीचें प्रभावी शस्त्र युद्ध संपल्यानंतर आतां आपल्या हातून जाणार, तेव्हां हिंदुस्थानांतील चळवळ्या क्रांतिकारकांना दडपून टाकण्यासाठीं नवें दडपशाहीच्या कायद्याचें पाणीदार शस्त्र आपल्या हातीं पाहिजे ही सरकारची गुप्त कुटिल इच्छा. त्या इच्छेला अनुसरून सरकारनें आपणाला हिंदुस्थानच्या कल्याणाची काळजी लागल्याचा आव आणून सर सिडने रौलेट या एका आपल्या विश्वासांतील गोऱ्या विलायती कायदेपंडिताच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमलें होतें. ह्या कमिशननें केलेल्या शिफारसींनुसार सरकारनें दडपशाहीला उपयोगी पडणारीं विषारी पाणी पाजलेल्या पाणीदार शस्त्रांसारखीं दोन बिलें तयार केलीं. सन १९२० च्या फेब्रुवारी महिन्यांत सरकारनें वरिष्ठ कायदेमंडळापुढें हीं दोन बिलें मंजुरीसाठीं मांडलीं. त्यापैकीं पहिलें बिल कायदेमंडळांत मान्य झालें व दुसरें बिल गाळण्यांत आलें. एका बिलानेंच देशांतील चळवळ हवी तशी भयंकर उपायांनीं दडपून टाकायला पुरेशी सत्ता आपल्या हातीं आली आहे अशी सरकारची मनोमन खात्री होती. मग कायदेमंडळांतील हुकमी बहुमताच्या जोरावर लोकमताला थोडा मान दिल्याचें नाटक करून दाखवायला सरकारचें काय जातें ?

हीं जुलमी बिलें कायदेमंडळापुढें आलीं तेव्हांच साऱ्या हिंदी जनतेला व महात्मा गांधींसारख्या पुढाऱ्यांनाही पुढचें भविष्य कळून चुकलें. आपण स्वराज्याच्या आशेनें सरकारपुढें टाळा पसरून बसलों आहोंत; पण आपल्या

मुखीं स्वराज्याचा घांस पडण्याऐवजीं फोफाटयाची पसाभर जळजळीत राख पडणार अशी त्यांची खात्री झाली.

गांधीजींना सरकारकडून होणारा हा विश्वासघात सहन होणें शक्य नव्हतें. इंग्रज सरकारच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवणारा महात्मा गांधींइतका प्रामाणिक व श्रद्धावान् हिंद सुपुत्र दुसरा कोणीही नव्हता. पण त्या गांधीजींचाही इंग्रजांवरील विश्वास आतां ढळूं लागला. रौलेट बिलाच्या प्रभावी निषेधासाठीं त्यांनीं आपणाला सत्याग्रहाची चळवळ करावी लागेल असा गंभीर इषारा देत देशभर दौरा काढला.

महात्माजींच्या सत्याग्रहाच्या अभिनव कल्पनेचा साऱ्या देशानें मनापासून स्वीकार केला. ही चळवळ फैलावतां फैलावतां तिचा ओघ अचानक पंजाबकडे वळला. पंजाबचे गव्हर्नर सर मायकेल ओडवायर यांच्या जुलमी कारवायांमुळें त्या आगींत तेल ओतल्यासारखें झालें. पंजाब हा लढवय्या क्षत्रियांचा प्रांत. महायुद्धाच्या रणांगणांतून हिंदी सैन्य नुकतेंच विजयी होऊन माघारें आलें होतें. त्याला देशोदेशीं प्राप्त झालेल्या विजयामुळें आपल्या स्वसामर्थ्याची जाणीव झाली होती. त्या लढवय्ये लोकांच्या कानांत काँग्रेसच्या चळवळीचें वारें शिरलें तर ते बिथरतील या भयानें तेव्हां अमृतसरला भरणारी काँग्रेसची बैठक भरूंच द्यायची नाहीं असें सरकारनें मनावर घेतलें व त्या दिशेनें दडपशाहीचीं पावलें पडूं लागलीं.

त्या दडपशाहींतच ता. १३ एप्रील सन १९१९ रोजीं, वर्षप्रतिपदेच्या दिवशीं सरकारनें जालियनवाला बाग कत्तल घडवून आणली.

• • •

## ५ जालियनवालाबाग–कत्तल

जालियनवालाबाग कत्तल हा हिंदुस्थानांतील इंग्रजी राजवटीवरचा फार मोठा कलंक आहे. तो मानवी समाजाच्या जगाच्या इतिहासांतून कधींही पुसला जाणारा नाहीं.

जालियनवालाबाग ही जागा अमृतसर शहराच्या मध्यभागीं आहे. बागे-सभोंवार मोठमोठे वाडे आहेत. या जागेला बाटलीसारखें बारीक निमुळतें एकच तोंड आहे. बागेंत जायला अथवा बागेंतून बाहेर पडायला हा एवढा एकच मार्ग आहे.

गांधीजींनीं आरंभिलेली सविनय कायदेभंगाची चळवळ देशांत जागोजागीं चांगलेंच मूळ धरीत होती. जिथें दुःख तिथें उपचार या न्यायानें, पंजाबांत सरकारची दडपशाही थैमान घालूं लागली तेव्हां त्यावर उपचार म्हणून अमृतसरला काँग्रेसचें त्या वर्षीचें सन १९१९ चें अधिवेशन भरण्याचें ठरलें. काँग्रेस चिडली तसें सरकारही अधिक चिडलें आणि वाढत्या जोरानें दडप-शाहीचें थैमान घालूं लागलें. पंजाबांत इतर अनेक ठिकाणीं क्रूर लष्करी कायदा पुकारण्यांत आला.

अशा खळबळीच्या परिस्थितींत अमृतसर येथील त्या जालियनवालाबागेंत एक जंगी जाहीर सभा भरविण्यांत आली. वाढत्या दडपशाहीमुळें व विशेषतः डॉ. सत्यपाल, डॉ. किश्चलू या थोर काँग्रेस पुढाऱ्यांना पकडून ओडवायरच्या दंडुकेशाही सरकारनें अमृतसरच्या जनतेला एक प्रकारें आव्हानच दिलें होतें.

जालियनवालाबागेंत सभा चालू होती. इतक्यांत जनरल डायर लष्कर घेऊन तिथें आला. त्या बागेंतील वीस पंचवीस हजारांच्या प्रेक्षकांच्या जमावावर त्यानें अतिशय अमानुषपणें बेछूट गोळीबार केला. सरकारच्या म्हणण्याप्रमाणेंच चारशें लोक त्या गोळीबारांत ठार झाले व सुमारें दोन हजार जखमी झाले. तेव्हांचें हिंदुस्थानांतील गोऱ्या इंग्रजांचें सरकार जेव्हां निरुपायानें आपल्या अत्याचारांची कबूली देई, तेव्हां सगळा हत्ती झांकून ठेवून त्याची शेपूट तेवढी लोकांत दाखवीत असे हें आपणाला चांगलें माहीत आहे. यावरून जालियनवालाबाग गोळीबारांत खरोखर काय अनर्थ तेव्हां गुदरला असेल, किती निरपराधी ठार झाले असतील याची आपणाला सहज कल्पना करतां येते.

जालियनवालाबागेंतील गोळीबारानंतर पंजाबांत ठिकठिकाणीं लष्करी कायदा पुकारण्यांत आला. भयंकर दडपशाही सर्रास सुरू झाली. जनतेच्या

छळाला सीमा उरली नाहीं. कैक महिनेपावेतों असला सरकारचा राक्षसी दडपशाही कारभार पंजाबांत सुरू होता.

पंजाबांतील या अत्याचाराची चौकशी काँग्रेसनें आपलें चौकशीमंडळ नेमून केली. तेव्हां सरकारनेंही चौकशीसाठीं हंटर कमिशन नेमलें. जें सरकार असला अमानुष जुलूम करतें त्याच सरकारनें त्या जुलुमाच्या चौकशीसाठीं नेमलेलें कमिशन काय चौकशी करील व कसा अहवाल सादर करील हें काय सांगायला पाहिजे ? हंटर कमिशनचा अहवाल ता. २८ मे १९२० रोजीं प्रसिद्ध झाला, आणि लगेच दोन दिवसांनीं बनारसला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक भरली. देशांतील सारें वातावरण सरकारच्या अमानुष दडपशाहीमुळें अगदीं कुंद होऊन गेलें होतें. पण त्यांत निराशा मात्र नव्हती. गांधीजींनीं दिलेला आसहकारितेचा मंत्र हिंदी जनता आपापल्या शक्तीप्रमाणें मननपूर्वक पठण करीत होती व आचरणांत आणीत होती.

जशी काँग्रेस तशीच खिलापतीची चळवळही त्या मंत्रानें भारली गेली होती. बनारसच्या ऑल इंडिया कांग्रेस कमिटीच्या बैठकींत कांग्रेस—लीगच्या एकोप्याच्या भूमिकेवरून गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीचा व खिलापतीच्या चळवळीचा समान भूमिकेवरून विचार होणार हें उघड होतें.

ऑल इंडिया कांग्रेस कमिटीच्या बनारस येथील बैठकीच्या वेळेला लो. टिळक बनारसला होते. पण ते बैठकीला हजर राहिले नाहींत. कारण खिलापतीच्या चळवळीविषयीं त्यांचें मन फारसें प्रसन्न नव्हतें. असहकारितेच्या एकंदर चळवळीबाबतही लोकमान्यांचें धोरण जरी पूर्णतः प्रतिकूल नव्हतें. तरी फारसें अनुकूलही नव्हतें. महात्मा गांधींच्या शब्दांत सांगायचें तर लो. टिळक असहकारितेसंबंधानें गांधीजींपाशीं बोलले होते कीं हा कार्यक्रम आपणाला पसंत आहे; परंतु असहकारितेकरितां लागणारें त्यागाचें व्रत स्वीकारून देश आपल्यामागून येईल कीं नाहीं याबद्दल शंका वाटते. या चळवळीच्या कार्यक्रमाला अडथळा होईल असें कोणतेंही कृत्य आपण करणार नाहीं असेंही लोकमान्यांनीं गांधीजींना तेव्हां सांगितलें होतें व गांधीजींच्या कार्यांत पूर्ण यश चिंतिलें होतें. तसेंच गांधीजींना जर या चळवळीकडे जनमत आकर्षण करून घेतां आलें तर तिला उत्साहानें पाठिंबा देण्याचेंही लोकमान्यांनीं कबूल केलें होतें.

परंतु एकंदरींत या असहकारितेच्या चळवळीची कल्पना महात्मा गांधींना सुचली तेव्हांपासून गांधीजी आणि लोकमान्य यांचे राजकारणी विचारप्रवाह संगमापूर्वीच्या गंगा–यमुनांसारखे अलग अलग वाहूं लागले होते हें खरें.

त्या गंगा–यमुनांचा संगम कांहीं पुढें झाला नाहीं.

• • •

## ६ असहकारितेचा श्रीगणेशा

लो. टिळक सन १९१८ च्या आक्टोबरांत चिरोलवरील अब्रूनुकसानीच्या खटल्याच्या कामीं विलायतेला गेले, ते एका वर्षाहून अधिक काळानंतर नोव्हेंबर १९१९ मध्यें हिंदुस्थानांत परत आले. त्या दरम्यान हिंदुस्थानांतील काँग्रेसच्या राजकारणांत झपाट्यानें क्रांतिकारक बदल होत होते. महात्मा गांधींचें सत्य–अहिंसामय असहकारितेचें राजकारण काँग्रेसच्या अनुयायांना अधिकाधिक पटूं लागलें होतें. खिलाफतीच्या प्रश्नामुळें मुसलमानही सरकारवर चिडले होते व तेही गांधीजींच्या नेतृत्वाखालीं असहकारितेच्या कार्यक्रमाला वाहून घेण्याला उत्सुक होते. काँग्रेस आणि लीग या हिंदी जनतेच्या दोन्ही विराट प्रातिनिधिक संस्था तेव्हां समदुःखी होत्या.गांधीजींच्या नेतृत्वाकडे सारे हिंदु–मुसलमान मोठ्या आशेनें पाहूं लागले होते.

अशा स्थितीत डिसेंबरमध्यें अमृतसरला भरणाऱ्या काँग्रेसच्या अधिवेशनापूर्वींच थोडे दिवस हिंदुस्थानविषयींचा बादशाही जाहीरनामा फडकला. हिंदुस्थानला देण्यांत आलेल्या मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा या हिंदुस्थानांतील नवें युग निर्माण करतील अशी सदिच्छा बादशहांनीं त्या जाहीरनाम्यांत दर्शविली होती. देशांतील व विशेषतः पंजाबांतील अत्याचारांची व दडपशाहीची हिंदी जनतेच्या अंतःकरणाला झालेली भयंकर खोल जखम भरून यावी या हेतूनें, झालें गेलें सारें आपण विसरून जाऊं व नव्या उमेदीनें कार्याला लागूं

अशी साखरपेरही त्या जहीरनाम्यांत होती. चळवळीपायीं तुरुंगांत डांबण्यांत आलेल्या देशभक्तांच्या सुटकेविषयीं व्हॉइसरॉय योग्य तो विचार करतील असेंही त्या जाहीरनाम्यांत म्हटलें होतें.

लो. टिळक विलायतेंत असल्या वेळेपासूनच स्वाभिमान राखून सहकारितेचें राजकारण बोलूं लागले होते. ते अमृतसरच्या कॅांग्रेसला जात असतांना त्यांना बादशाही जाहीरनाम्याची बातमी मिळाली. त्याबरोबर त्यांनीं अर्ध्या वाटें-तूनच गंगापूर स्टेशनावरून बादशहांना हिंदी जनतेच्या वतीनें आभाराची व सहकारितेची तार पाठविली. कॅांग्रेसप्रेमी मंडळीला त्यांचें हें कृत्य रुचलें नाहीं. ती लोकमान्यांचीच तार होती म्हणून लोक दबकून गप्प बसले. पण त्या तारे-वरूनच मराठींत 'गंगापूर घाई' असा शब्दप्रयोग रूढ झाला. तो तेव्हांच्या लोकमताचा निःसंशय निदर्शक आहे.

अमृतसरच्या कॅांग्रेसच्या वेळीं अगोदर थोडे दिवस नेमस्त पक्ष कॅांग्रेसमधून फुटला. कॅांग्रेसमध्यें प्रभावी चुरस मांडून राहिलेला राष्ट्रीय पक्ष व गांधीजींना मानणारा पक्ष, या दोन्ही पक्षांचें राजकारण पूर्वींच्या नेमस्त वृत्तीच्या कॅांग्रेस पुढाऱ्यांना पचण्याजोगें नव्हतें. ठराव–अर्ज–विनंत्यांच्या आरामखुर्चींतील अथवा गाद्या–गिरद्यांतील राजकारणाचा काळ आतां संपला होता. अर्थात् त्या जुन्या काळांतील नेमस्त वृत्तीच्या पुढाऱ्यांचा कॅांग्रेसला आतां कांहीं उपयोग होण्याजोगा नव्हता. त्यामुळें नेमस्त पुढारी कॅांग्रेसबाहेर पडले हें एका परीनें योग्यच झालें.

अमृतसरचें कॅांग्रेसचें अधिवेशन फार महत्त्वाचें झालें. या अधिवेशनांत बॅ. चित्तरंजन दास हे बंगालमधील थोर राष्ट्रीय पुढारी सरकारनें देऊं केलेल्या राजकीय सुधारणा राबविण्याच्या पूर्णपणें विरुद्ध होते. पण महात्मा गांधी व पं. मालवीय हे त्यापेक्षां सौम्य वृत्तीनें सरकारशीं योग्य तेथें सह-कार्य करण्याच्या वृत्तीचे होते. शेवटीं गांधीजी आणि दासबाबू दोघेही एका भूमिकेवर आले. दासबाबूंनीं गांधीजींची सूचना मान्य केली. या अधिवेश-नाच्या वेळीं सन १९१४ सालापासून तुरुंगांत असलेले अलीबंधू सुटले व कॅांग्रेसच्या अधिवेशनाला हजर राहिले. त्यामुळें कॅांग्रेसच्या उत्साहांत आणखी र पडली. या कॅांग्रेसला जनतेचे प्रतिनिधि हजारोंनीं हजर होते. एकट्या शेतकरी कुळांचेच प्रतिनिधी बाराशें होते. गेल्या अनेक वर्षांपासून

काँग्रेस शेतकरी–कामकऱ्यांना जवळ जवळ विसरली होती. पण गांधीजींच्या शीतल छायेखालीं अमृतसरला ती पुन्हा जागी होऊन शेतकरी कामकरी दरिद्री-नारायणाचा कैवार घेऊं लागली. आगगाडींतील तिसऱ्या व इंटर वर्गाच्या उतारूंचे हाल तिच्या ध्यानीं आले. देशांतील दुभत्या गाई व वळू परदेशीं पाठविण्यांत देशांतील शेतीची व दूधदुभत्याचीही फार हानी होते हें ओळखून या निर्यातीला मनाई व्हावी असें तिनें ठरविलें. प्रांतांतील दारु–विक्रीला योग्य आळा, बकरी ईदच्या वेळीं गोवध करावयाचा नाहीं असें मुसलमानांनीं ठरविल्याबद्दल कृतज्ञता, कामगार वर्गाची राहणी सुधारणें, आयुर्वेद–युनानी वैद्यकाचा पुरस्कार, स्वदेशीला व प्राचीन वस्त्रकलेला उत्तेजन देण्यासाठीं चरख्याचा पुरस्कार असे देशांतील दरिद्री नारायणाच्या जीवनाशीं संबंध असलेले महत्त्वाचे ठराव अमृतसरच्या काँग्रेसमध्यें झाले.

पण या सर्व ठरावांपेक्षां पंजाबांतील अत्याचारासंबंधींच्या मुख्य ठरावांत गांधीजींच्या नवोदित सत्य-अहिंसामय पवित्र राजकारणाची कसोटी ठरण्याचा प्रसंग आला. गांधीजींचें राजकारण सत्य–अहिंसेवर आधारलेलें. त्या गांधीजींना अत्याचार कसे मानवतील ? पंजाबांतील अत्याचारांबद्दल थोर व पवित्र मनानें काँग्रेसनें दिलगिरी प्रदर्शित करावी या आशयाचा ठराव गांधीजींनीं काँग्रेसपुढें मांडला. तो त्यांनीं मांडला म्हणूनच पास होऊं शकला. अमृतसरला काँग्रेसमध्यें गांधीजी विजयी झाले.

अमृतसरला गांधीजींना काँग्रेसमध्यें मिळालेला विजय शुक्लपक्षांतील चंद्रासारखा वाढत होता. परंतु काँग्रेसची अवस्था तेव्हां स्वतःसभोंवार वेगानें फिरून त्या वेगवान भ्रमणांत आपणासभोंवार फिरणाऱ्या ग्रहमालेला जन्म देणाऱ्या सूर्यासारखी होती. काँग्रेसचें राजकारण दिवसेंदिवस तीव्र व प्रभावी होत होतें. सन १९०७ सालीं कराचीला काँग्रेसचें अधिवेशन भरलें त्या वेळीं काँग्रेसमध्यें राष्ट्रीय ऊर्फ जहाल आणि नेमस्त ऊर्फ मवाळ अशी फूट पडली. काँग्रेस तात्पुरती नेमस्तांच्या हातांत गेली. राष्ट्रीय पक्षाचे नेते लो. टिळक पुढें लवकरच सन १९०८ सालीं तुरुंगांत गेले. त्यामुळें त्यांच्या गैरहजेरींत त्यांचा राष्ट्रीय पक्ष काँग्रेसमध्यें व एकंदर राजकारणांत प्रमुखपणें गाजेनासा झाला.

लो. टिळक १९१४ सालीं सुटून आल्यावर राष्ट्रीय पक्षाच्या राजकार-

णाला पुन्हा जोर चढला. टिळकांनीं स्वराज्याच्या चळवळीसाठीं होमरूल लीगची चळवळ सुरू केली. त्यानंतर लवकरच डॉ. ॲनी बेझंट यांनीं देखील एक निराळी ऑल इंडिया होमरूल लीग काढून चळवळ चालविली. राष्ट्रीय पक्ष देशांत अधिकाधिक बलवान होऊं लागला. नेमस्तांचें राजकारण जनतेला शिळें व अळणी वाटूं लागलें.

तेवढ्यांत महात्मा गांधी संथपणानें काँग्रेसच्या क्षितिजावर आले. गांधीजींची सारी चळवळ सत्य–अहिंसेच्या पायावर आधारलेली, सोज्वळ व सात्त्विक जरी होती तरी ती खरें बोलायचें तर विस्तव जाळणाऱ्या पाण्यासारखी एक प्रकारें ती विस्तवापेक्षांही प्रखर अशी होती. हिंदी राजकारणांत गांधीजींनीं प्रवेश केला तो आपले गुरु ना. गोखले या नेमस्त पुढाऱ्याला वंदन करीत केला हें खरें. पण हें विस्तव जाळणारें पाणी नेमस्त राजकारणाचे निखारे विझविणारें व पिचवणारें ठरूं लागलें. लो. टिळकांचा राष्ट्रीय पक्ष देखील गांधीजींच्या पावलाबरोबर पाऊल टाकून राष्ट्राला बरोबर घेऊन पुढें जातां जातां दमूं भागूं लागला. गांधीजींचें असहकारितेचें राजकारण लोकमान्यांच्या राष्ट्रीय पक्षाला मनापासून पटेना व तें दूरही लोटतां येईना. त्यामुळें हळूहळू धुसफूस–घासाघीस सुरू झाली.

सन १९२० च्या आरंभीं नेमस्त पक्ष तर कांग्रेसपासून दूर जाऊन आकाशांतून तुटून पडणाऱ्या उल्केसारखा स्वतःचा सवतासुभा हिंदी राजकारणांत थाटूं लागला. कारण काँग्रेसच्या राजकारणांत त्या पक्षाला आतां प्रतिष्ठा उरली नव्हती. हिंदी जनता व तिची काँग्रेस झपाट्यानें पुढें चालली होती. नेमस्त फार मागें पडले होते.

लो. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षालाही गांधीजींचें राजकारण दिवसेंदिवस पचेनासें झालें. डॉ. ॲनी बेझंट यांनाही गांधीजींच्या राजकारणांतील पौर्णिमेच्या चंद्रासारख्या प्रभावामुळें कीं काय काढता पाय घ्यावा लागला. त्यांच्या ऑल इंडिया होमरूल लीगचे गांधीजी अध्यक्ष झाले. लगेच गांधीजींनीं होमरूल लीगचे अध्यक्ष या नात्यानें पत्रक काढून जाहीर केलें कीं ऑल इंडिया होमरूल लीग ही पक्षातीत संघटना आहे. गांधीजींमुळें राजकारणांत सत्य व प्रामाणिकपणा यांना पहिल्या प्रतीचें महत्त्व प्राप्त झालें. सत्य–अहिंसेची हिंदी राजकारणांत पूर्ण प्रतिष्ठा राखण्यासाठीं आपण प्राणपणानें झटूं असें

गांधीजींनीं जाहीर केलें. त्यांनीं हिंदू-मुसलमानांतील एकीवर विशेष भर दिला. खिलाफतीच्या चळवळीचा पुरस्कार चालविला. मुस्लीम लीगनेंही गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीचा मनापासून स्वीकार केला. हिंदू-मुसलमानांचीच काय पण साऱ्या हिंदी राष्ट्राची एकजूट करण्याच्या तयारीनें गांधीजींनीं राष्ट्रभाषेला महत्त्व दिलें व हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून प्रचार चालविला. राष्ट्रीय एकजुटीचा पाया प्रांतीय एकजुटीपासून पडला पाहिजे हें ओळखून गांधीजींनीं भाषावार प्रांतरचनेचा निष्ठापूर्वक पुरस्कार चालविला. गांधीजींच्या या सर्व चळवळीचा आत्मा असहकारिता हा होता.

अमृतसरच्या काँग्रेसपासून टिळक आणि गांधीजी यांच्या राजकारणांतील ध्येयामधील अंतर कमी न होतां हळूहळू वाढीला लागलें. लगेच थोड्या दिवसांत लो. टिळकांनीं काँग्रेसच्याच अंतर्गत असा निराळा काँग्रेस लोकशाही पक्ष स्थापन केला. त्या पक्षातर्फे लोकमान्यांनीं आपल्या कार्यक्रमाचा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहीरनाम्यांत हिंदी जनतेला आकर्षक आश्वासनें देण्यांत आलीं. शेतकरी-कामगारांचें हितही ध्यानीं घेतलें गेलें. काँग्रेस आतां दिवसेंदिवस बहुजनसमाजाची प्रतिनिधि बनूं लागली होती. अर्थात् काळाचें महत्त्व ओळखून पुढें येऊं पाहणाऱ्या कोणत्याही पक्षाला शेतकरी-कामकरी बहुजन समाजाची आठवण केल्याखेरीज पुढें पाऊल टाकतां येणेंच शक्य नव्हतें. दरिद्री नारायणांचे पुढारी म्हणून गांधीजी हिंदी राजकारणांत उदयाला आले होते. काँग्रेस आतां त्यांचा शब्द मानून चालूं लागली होती. मुस्लीम लीग देखील खिलाफत प्रकरणाच्या निमित्तानें त्यांचें पुढारीपण मानूं लागली होती. मुसलमान समाजाचे केवळ जीव कीं प्राण असे अल्लीबंधू त्यांचे जणूं डावे उजवे हातसे वागत होते. इतकें महत्त्व गांधीजींना राष्ट्रांत कां प्राप्त होत आहे याचा सावधान चित्तानें विचार करून लोकमान्यांच्या नव्या काँग्रेस लोकशाही पक्षाचा तो जाहीरनामा तयार करण्यांत आला होता. त्यांत दलित बहुजन समाजाविषयींची कळकळ होती व राष्ट्रभाषा प्रचाराचा आणि एकजुटीच्या भावनेचा पुरस्कारही होता. गांधीजींचा जाहीरनामा आणि हा कॉं. लो. पक्षाचा जाहीरनामा यांत मुख्य अंतर एकच होतें. तें हें कीं गांधीजींनीं राष्ट्राला नव्या राजकीय सुधारणा राबविण्याच्या बाबतींत सरकारशीं पूर्ण अनत्याचारी असहकारिता आचरण्याची विनंति केली होती, तर लोक-

मान्यांच्या काँ. लो. पक्षानें सरकारशीं सहकारिता करून सरकारनें देऊं केलेल्या राजकीय सुधारणा राबविण्याची शिफारस केली होती!

जनता रोज रोज नव्या उत्साहानें गांधीजींच्या असहकारितेच्या कार्यक्रमाकडे ओढ घेऊं लागली होती. पंजाबांतील अत्याचारांचें दुःख, खिलाफत प्रकरणाच्या बाबतींत सरकारनें चालविलेली मुसलमान समाजाची फसवणूक आणि अपुऱ्या व असमाधानकारक राजकीय सुधारणा अशा ह्या गंगा–यमुना-सरस्वतीचा त्रिवेणी संगम होऊन राष्ट्रीय चळवळीचा प्रवाह असहकारितेच्या दिशेनें दुथडी भरून धो धो वाहूं लागला होता. राष्ट्रांतील जनता चळवळीसाठीं अगदीं अधीर झाली होती. ही जततेची तयारी पाहून गांधीजींनीं ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं असहकारितेची चळवळ सुरू करण्याचें जाहीर केलें होतें.

याच सुमाराला लो. टिळक आजारी होते. त्यांनीं तारीख ३१ जुलै १९२० रोजीं रात्रौ मुंबईंत देह ठेवला. आणि उजाडत्या ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं गांधीजींनीं मुंबईंत चौपाटीवर सामुदायिक समुद्रस्नान करून असहकारितेच्या चळवळीचा संकल्प सोडला.

• • •

## ७ उजाडण्यापूर्वीचा काळोख

महात्मा गांधींनीं ऑगस्ट १९२० पासून हिंदी जनतेला आपल्या असहकारितेच्या चळवळीचें शिक्षण देण्यासाठीं साऱ्या हिंदुस्थानभर दौरा काढला. खिलापतीच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नामुळें महात्माजींकडे ओढले गेलेले थोर मुसलमान पुढारी अल्लीबंधू देखील त्या दौऱ्यांत सतत माहात्माजींबरोबर होते. खिलाफतीच्या गाऱ्हाण्याच्या निमित्तानें मुस्लीम लीग व काँग्रेस ह्या दोन्ही महान् संस्था तेव्हां जवळ जवळ आल्या

होत्या. खिलाफतीचा प्रश्न हा एकट्या मुसलमानांचा प्रश्न नसून साऱ्या हिंदुस्थानचा प्रश्न आहे अशा कळकळीनें गांधीजींनीं आपल्या कांग्रेसच्या चळवळींत त्या प्रश्नाला महत्त्वाची जागा दिली. हिंदू–मुसलमानांच्या एकीला त्यामुळें फार मोठी मदत होऊं लागली. गंगा-यमुनांच्या संगमानंतर त्या एकरूप प्रवाहांत गंगा कोणती व यमुना कोणती हें ओळखतां येत नाहीं. तशी गांधीजींनीं आरंभिलेली व काँग्रेसनें स्वीकारलेली असहकारितेची चळवळ आणि हिंदी मुसलमानांची खिलाफतीची चळवळ ह्या दोन्ही चळवळी संगमानंतरच्या गंगा-यमुनांच्या एकरूप प्रवाहाप्रमाणें तेव्हां कांहीं काळ अगदीं एकरूप झाल्या होत्या.

नंतर सन १९२० च्या सप्टेंबर मध्यें कलकत्त्याला काँग्रेसचें जादा अधिवेशन झालें. हें अधिवेशन बऱ्याच खळबळीचें झालें. कारण मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांचा नवा कायदा तेव्हां हिंदुस्थानवर लादण्यांत आला होता. त्या सुधारणा कायद्याप्रमाणें कायदेमंडळांच्या निवडणुका पार पाडून त्या सुधारणा राबविण्याची तयारी अनेक थोर हिंदी देशभक्तांनीं चालविली होती. अशा थोर पुढाऱ्यांपैकीं देशबंधू दास हे एक होते. गांधीजींनीं कायदेमंडळावर बहिष्कार घाला व असहकारितेच्या चळवळीला सिद्ध व्हा अशा धोरणानें देशाला जागें करण्याची चळवळ आरंभिली होती, ती मात्र दासबाबूंना मान्य नव्हती.

पण कलकत्त्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनांत अखेर गांधीजींचाच जय झाला. लोकांनीं सरकारी मानमतराब, पदव्या यांचा त्याग करावा, शाळा–कॉलेजांवर बहिष्कार घालावा, सरकारी कोर्टकचेऱ्यांवर बहिष्कार घालवा, गांवोगांवीं पंचायती स्थापन करून त्या पंचायतींमार्फत न्यायदान व्हावें सुधारणा कायद्याप्रमाणें होऊं घातलेल्या नव्या निवडणुकींत कोणी भाग घेऊं नये, मतदारांनीं मतें देऊं नयेत, परदेशी मालावर बहिष्कार घालावा, स्वदेशीला उत्तेजन देण्यासाठीं घरगुती उद्योगधंद्यांच्या वाढीकडे विशेष लक्ष द्यावें, चरख्याची व खादीची चळवळ जोरांत चालवावी, हातसुताचें व हातविणीचें कापड लोकांनीं वापरावें, अशी सर्वांगीण जागृति करणारा व असहकारितेच्या अनेक प्रकारच्या कार्यक्रमांना मान्यता देणारा ठराव कलकत्त्याच्या काँग्रेसमध्यें पास झाला. गांधीजींनीं त्या ठरावांत आरंभीं कायदे–

मंडळाच्या निवडणुकांबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही बहिष्कार घालावा असें म्हटलें होतें. पण मग अधिवेशनांतील लोकमताला मान देऊन त्यांनीं तसा आग्रह धरला नाहीं.

त्यानंतरचें काँग्रेसचें अधिवेशन सन १९२० अखेर नागपूरला झालें. त्या अधिवेशनांत गांधीजींना कलकत्त्यापेक्षांही जास्त जोराचें व कळकळीचें हिंदी जनतेचें पाठबळ मिळालें. गांधीजींनीं हिंदी राष्ट्राला आपल्या उद्धारासाठीं दाखवून दिलेला सत्य–अहिंसात्मक असहकारिता व कायदेभंगाचा मार्ग अगदीं नवीन होता. त्यामुळें हिंदी राष्ट्राच्या पुढाऱ्यांपैकीं पुष्कळांना निरनिराळ्या कारणांनीं तेव्हां बिचकल्यासारखें झालें. कधीं कालचे विरोधक आज असहकारितेचे अनुयायी होत तर कधीं कालचे अनुयायी आज सोडून जात. असा पुढारीपणांतील चढउतार गांधीजींच्या असहकारितेचा काँग्रेसमध्यें उदय झाल्यापासून एकसारखा सुरू होता. परंतु ह्या चढउतारांत देखील खरें पाहिलें तर काँग्रेसची नौका बहुजन समाजाला रोज रोज जास्त जास्त बरोबर घेऊन गांधीजींच्या नेतृत्वाखालीं अखंड प्रवास करूं लागली होती. काळाच्या व परिस्थितीच्या अथांग महासागरांतून प्रवास करतांना त्या नौकेला कधीं वादळांना तोंड द्यावें लागत होतें, कधीं भयंकर अपघातापासून सांभाळून वाट काढावी लागत होती. पण गांधीजी हे कुशल कर्णधार त्या नौकेला लाभले होते. त्यांनीं कधीं वेगानें तर कधीं मंद गतीनें, शक्य तों सरळ व जरूर तिथें अपघात टाळण्यासाठीं जरा वळण घेऊन पण ती नौका पुढेंच चालविली होती.

नागपूरच्या अधिवेशांत या काँग्रेसच्या नौकेचा मार्ग पूर्वीपेक्षांही अधिक सोपा झाला. आज आपणाला काँग्रेस जी हिंदी राष्ट्राची विशाल प्रातिनिधिक संस्था झालेली दिसते, त्या तिच्या खऱ्या विकासाला आरंभ प्रथम नागपूरलाच झाला. गांधीजींच्या काँग्रेसमधील उदयानें काँग्रेसमध्यें जो सर्वांत मोठा क्रांतिकारक फरक झाला तो हा कीं काँग्रेस ही खऱ्या खुऱ्या अर्थानें हिंदी जनतेची म्हणजेच बहुजन समाजाची होऊं लागली.

यापूर्वी काँग्रेसचा सारा कारभार व सारी चळवळ सुशिक्षित, सुखवस्तु व सरकार–दरबारीं मानमान्यता पावलेल्या थोर हिंदी लोकांच्या तंत्रानें चाले. तिला बहुजन समाजाजवळ आणून सोडण्याचें कार्य प्रथम लो. टिळकांनीं

आरंभिलें. परंतु तें कार्य पूर्ण यशस्वी होण्यापूर्वीच लो. टिळक आपणाला सोडून गेले. त्यानंतर महात्मा गांधींनींच काँग्रेस ही खऱ्या अर्थानें कोटमाप हिंदी जनतेची राष्ट्रीय संस्था म्हणून वाढविण्याचें कार्य आपल्या सत्य–अहिंसा धर्माला अनुसरून नेटानें पुढें चालविलें. ३५० निवडक काँग्रेस प्रतिनिधींची अखिल भारतीय काँग्रेस कमेटी व तिच्याही वरची मंत्रिमंडळासारखी पंधरा सभासदांची काँग्रेस वर्किंग कमेटी नागपूर काँग्रेसपासूनच अस्तित्वांत आली. त्यापूर्वी काँग्रेसचें अधिवेशन झालें कीं पुढच्या अधिवेशनापावेतों तिच्या कार्याला फारसा जोर नसे. इतर सर्वसाधारण संस्थांची जी गत तीच काँग्रेसचीही होती. पण गांधीजींच्या प्रभावानें काँग्रेसचें तें स्वरूप आमूलाग्र पालटलें. काँग्रेस ही नुसतें सालोसाल अधिवेशन भरवून पुढच्या अधिवेशनापावेतों स्वस्थ बसणारी संस्था उरली नाहीं. ती सतत वर्षभर संघटनात्मक कार्य करणारी संस्था झाली.

असें सतत वर्ष र संघटनात्मक कार्य करायचें तर त्यासाठीं तसे कळकळीचे कार्यकर्तेही पाहिजेत व त्या कार्यकर्त्यांना पोसण्यासाठीं आणि देशव्यापी चळवळीसाठीं पैसाही पाहिजे. हें ध्यानीं घेऊन महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाप्रमाणें काँग्रेसनें एक कोटी रुपयांचा टिळक स्वराज्य फंड गोळा करण्याचें ठरविलें. राष्ट्रकार्यासाठीं एवढा मोठा फंड जमविण्याचा हिंदुस्थानांतील हा पहिलाच प्रसंग होय असें म्हटलें तरी चालेल. लो. टिळकांनीं होमरूलच्या चळवळीसाठीं विलायतेला जाण्यापूर्वी दौरा काढून फंड जमविला होता. पण तो केवळ लाखाचा होता. काँग्रेसनें आरंभिलेला हा टिळक स्वराज्य फंड एक कोटीचा होता.

तथापि मौज ही कीं आपल्या गरीब हिंदी राष्ट्रानें हा टिळक स्वराज्यफंडाचा एक कोटी रुपयांचा संकल्प उत्साहानें पूर्ण केला. राष्ट्रानें हें एक कोटी रुपयांचें माप भरून नुसतेंच काँग्रेसच्या पदरीं ओतलें असें नाहीं, तर तें वर पंधरा लाखांची शीग लावून भरून पदरीं ओतलें. एक कोटीच्या टिळक स्वराज्य फंडातर्फे ठराविक मुदतींत एक कोटी पंधरा लाख रुपये जमा झाले. लो. टिळकांच्या नांवाची थोरवी, महात्मा गांधींच्या नेतृत्वावर असलेला कोटमाप हिंदी रयतेचा वाढता अढळ विश्वास, व हिंदी जनतेंतील खरीखुरी वाढीला लागलेली राष्ट्रीय जागृति याचें हें फळ होय.

काँग्रेस आतां अशी साऱ्या हिंदी जनतेची, हिंदुस्थानच्या कोटमाप दरिद्री नारायणाची प्रतिनिधि शोभूं लागली होती. वरच्या पुढारलेल्या वर्गांतील निवडक थोर लोकांत राजकीय मतभेदांचें वादळ माजलेलें दिसत असलें तरी जनता आतां त्या वादळाला भिऊन कच खाण्याइतकी अजाण उरली नव्हती. महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखालीं काँग्रेस दिवसेंदिवस अधिकाधिक नेटानें कोटमाप हिंदी जनतेच्या पाठीशीं उभी राहूं लागली होती. आणि तितक्याच नेटानें व निर्धारानें कोटमाप हिंदी जनताही कांग्रेस-चा पाठराखेपणा करूं लागली होती.

नागपूर कांग्रेसनंतर असहकारितेच्या कार्यक्रमानुसार मद्यपानबंदीची चळवळ देशांत जोरानें सुरू झाली. ह्या चळवळीला हिंदू-मुसलमानांचें कळकळीचें पाठबळ होतें. पुढें लौकरच ता. ८ जुलै १९२१ रोजीं कराचीला खिलाफत परिषद भरली. अल्लीबंधू हे खिलाफत चळवळीचे प्राण, ते पकडले गेले. त्यामुळें असहकारितेच्या चळवळीला अधिकच जोर चढला. मधून मधून तडजोडीच्या भाषेच्या वावड्या उडविल्या जात; पण त्यांचा कांहीं उपयोग होईना. चळवळ दिवसेंदिवस महापुराच्या वेगानें फोफावूं लागली. जागोजागीं स्वयंसेवक दलांची उभारणी झाली. तुरुंगांत जाण्याच्या व पड-तील त्या हालअपेष्टा भोगण्याच्या तयारीनें स्वयंसेवकांच्या झुंडीच्या झुंडी हिरीरीनें चळवळ करूं लागल्या. तितक्याच नेटानें सरकारनेंही दडपशाही सुरू केली. तुरुंग भरूं लागले. दडपशाहीमुळें चळवळ आगींत तेल ओतल्या-सारखी अधिकाधिक फोफावूं लागली.

या चळवळीचाच एक भाग म्हणून गुजराथेंत बारडोली येथील करबंदी-च्या चळवळीची योजना ता. १ फेब्रुवारी १९२२ रोजीं आंखण्यांत आली. परंतु ती योजना मूर्त स्वरूपांत येण्यापूर्वींच गुजराथेंत चौरीचोरा येथें असहकारिता चळवळीचे स्वयंसेवक व दडपशाही करणारे पोलीस यांच्यांतील वाढत्या घासाघाशींतून ठिणगी पडून ता. ५ फेब्रुवारी १९२२ रोजीं दंग्याचा वणवा पेटला. पोलीस अधिकारी व कांहीं पोलीस त्या दंग्यांत बळी पडले. दडपशाहीमुळें चिडलेल्या लोकांना महात्माजींच्या आज्ञेनुसार पूर्ण अहिंसेनें संयम राखतां आला नाहीं.

अशी असहकारितेची चळवळ सत्य-अहिंसा व्रत सोडून हिंसेच्या चुकीच्या

मार्गाकडे वळूं लागलेली गांधीजींनीं पाहिली आणि पुढील अतिरेक टाळण्यासाठीं चळवळ एकदम तहकूब केली. लगेच एका आठवड्यानें बारडोलीला अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटीची महत्त्वाची बैठक भरली. त्या बैठकींत कायदेभंग तहकूब करण्याचा ठराव आला. गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीला विरोध करणारी शक्ति मुख्यतः महाराष्ट्र व बंगाल या दोन प्रांतांत इतके दिवस दबत दबत टिकून होती. तिला तात्पुरता कांहींसा जोर चढला. बारडोलीला गांधीजींवर निंदाव्यंजक ठराव आणण्यापावेतों ह्या विरोधानें तीव्र स्वरूप धारण केलें असें.

देशाच्या राजकारणांत तेव्हां असें गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीविरुद्ध कांग्रेस पुढाऱ्यांच्या वरच्या थरांत मोठें वादळ निर्माण झालें. वादळच तें! तें वादळ कायम टिकणारें नव्हतें. तरी देखील यामुळें चळवळीला बरीच नुकसानी पोहोंचली. पुढाऱ्यांतील ह्या मतभेदांमुळें व देशांतील एकंदर परिस्थितिमुळें जनताही कांही काळ गोंधळांत पडल्यासारखी झाली.

धूर्त सरकारनें ह्या संधीचा अचुक फायदा घेतला. महात्मा गांधींना अटक झाली व त्यांच्यावर खटला होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली.

काळोख पडला. पण तो संपल्यावर उजाडणार होतेंच.

● ● ●

## ८ विषवेलीचे अंकुर

काँग्रेस आणि मुस्लीम लीग या दोन संस्थांचा हिंदुस्थानच्या राजकारणांत दिवसेंदिवस क्रमाक्रमानें बराच जवळचा संबंध येऊं लागलेला इथवर आपण पाहिला. पण यापुढें हा संबंध कारणपरत्वें हळू हळू दुरावत गेलेला आपणाला पाहावा लागणार आहे. आज आपल्या अखंड हिंदुस्थानचा जो दुखंड हिंदुस्थान झालेला आपणाला आढळतो, हा देखील त्या दुरावलेल्या संबंधाचाच खेदजनक परिणाम होय! अशा ह्या गुंतागुंतीच्या प्रश्नाची संगति लाव-

ण्यासाठीं आपणाला काँग्रेसप्रमाणेंच मुस्लीम लीगचीही नीट तोंडओळख असली पाहिजे.

आज आपण एका हिंदुस्थानचे हिंद आणि पाकिस्तान असे दोन तुकडे झालेले पाहात आहों. ही हिंदुस्थानची चिरफाड देखील सुखासमाधानानें होऊं शकली नाहीं. त्या चिरफाडीपूर्वीचा, त्या चिरफाडीचा आणि चिरफाडी नंतरचा आपल्या राष्ट्राचा आजवरचा इतिहास हिंदू–मुसलमानांच्या रक्तानें लाल झालेला आहे.

परंतु यावरून हिंदुस्थानांतील हिंदु–मुसलमान मूळपासूनच एकमेकांच्या रक्ताला इतक्या क्रूरपणानें तहानलेले होते असें मुळींच नव्हे. त्यांच्यांत मत-भेद होते. पण मतभेद म्हणजे कांहीं शत्रुत्व नव्हे. आपली काँग्रेस सन १८८५ सालीं स्थापन झाली तेव्हांपासून अनेक राष्ट्रीय बाण्याचे जाणते मुसलमान काँग्रेसबरोबर होते. काँग्रेस स्थापन झाल्यापासून तिसऱ्या वर्षी सन १८८७ सालीं मद्रासला काँग्रेसचें तिसरें अधिवेशन झालें. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष ब्रदुद्दिन तय्यबजी हे थोर मुसलमान गृहस्थ होते. तसेच नवाब सय्यद महंमद बहाद्दुर हे दुसरे मुसलमान गृहस्थ सन१९०० च्या पूर्वीपासून काँग्रेसचे एक निष्ठावंत कार्यकर्ते होते. सन १९०१ सालीं त्यांची ऑल इंडिया काँग्रेस कमेटीवर नेमणूक झाली होती. सन १९०३ मध्यें मद्रासला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते. सन १९१३ सालीं तर ते कराचीच्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. अशी काँग्रेस ही मूळपासूनच साऱ्या हिंदी राष्ट्राची होती व आजही साऱ्या हिंदी राष्ट्राची आहे. ती कोणत्याही एका जाती–जमातीची अथवा धर्माची पक्षपाती नव्हती व नाहीं.

हिंदू व मुसलमान थोर गृहस्थ काँग्रेसचे आरंभापासून अध्यक्ष होत आले आहेत. तसेच पारशी, ख्रिस्ती, गोरे लोकही अनेकदां काँग्रेसचे अध्यक्ष गांधी-युगापूर्वीही झाले आहेत. दादाभाई नौरोजी हे सन १८८६ मध्यें व त्यानंतरही दोनदां काँग्रेसचे अध्यक्ष होते. जॉर्ज यूल, सर वुइलियम वेडरबर्न, सर फेरोज-शहा मेथा, आल्फरेड वेब, रहिमतुल्ला सयानी, दिनशा वाच्छा, ॲनी बेझंट, सय्यद हसन इमाम, हकीम अजमलखान, मौलाना अबूल कलम आझाद, मौलाना महंमद अल्ली, अशी ही काँग्रेसच्या अध्यक्षांची गांधी युगापावेतोंची

परंपरा पाहिली तरी काँग्रेसच्या जाति–धर्मभेदरहित विशाल व उदात्त राष्ट्रीय स्वरूपाची ओळख पटते.

सन १९०५ सालीं मुस्लीम लीगची स्थापना झाली. आधींच हिंदुस्थानांतील मुसलमान जमात हिंदू जमातीपेक्षां मूळपासूनच अधिक मागासलेली आणि अधिक गरीब. अशा स्थितींत त्यांच्यांतील पुढारलेल्या नामवंत मुसलमान सद्गृहस्थांनीं पुढाकार घेऊन मुस्लीम लीगची स्थापना केली.

हिंदुस्थानांतील सर्व धर्मांची, जातींची आणि जमातींची योग्य काळजी घेण्यासाठीं झटणारी कँग्रेस ही महान् राष्ट्रीय संस्था असतांना हिंदुस्थानांत मुस्लीम लीगचा सवता सुभा स्थापन झाला. याच्या मुळाशीं मागासलेल्या कोटमाप मुस्लीम बांधवांचें कल्याणचें साधण्याचा लीगच्या पुढाऱ्यांचा हेतु असलाच पाहिजे. परंतु बोलून चालून आरंभीं बड्या बड्या सरदार, नबाब अशा मुसलमानांनीं स्थापन केलेली ही संस्था. काँग्रेसच्या आरंभींच्या पुढाऱ्यांचा देखील अर्ज–विनंत्या–ठरावांनीं सरकारचीं आर्जवें करून गोडी–गुलाबीनें काय पदरीं पडेल ते पाडून घेण्याचा मनसुबा होता. आणि मुसलमान समाज तर त्यापेक्षांही मागासलेला. त्यामुळें मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांचा आरंभापासूनच इंग्रजी नोकरशाहीवर विश्वास होता. तशांत लॉर्ड कर्झन या व्हाईसरॉयनें मुस्लीम लीगच्या स्थापनेच्या सुमाराला बंगाल इलाख्याची फाळणी करून भेदनीतीनें मुसलमानांना अधिकाधिक गोंजारायला सुरुवात केली. मग मुसलमानांनाही वाटूं लागलें कीं इंग्रज राज्यकर्त्यांना खूष ठेवूनच आपणाला मुसलमान समाजाचें अधिकांत अधिक कल्याण साधतां येईल. हा हेतु मनांत धरूनच मुस्लिम लीग बंगालच्या फाळणीच्या वेळीं काँग्रेसच्या व जनतेच्या चळवळीपासून मुद्दामच अलिप्त राहिली

ती बंगालची फाळणी पुढें रद्द झाली तरी देखील मुसलमानांना अधिक जवळचे मानून व वेळोवेळीं त्यांच्या नाकाला मधाचें बोट लावून त्यांना काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीच्या आंदोलनापासून अलग ठेवण्याची सरकारची कारवाई सुरूच होती.

सन १९१३ पावेतों इंग्रज सरकारची ही भेदनीति बरीच यशस्वी झाली. पण मग मुसलमानांना कळून येऊं लागलें कीं काँग्रेस आणि लीग अथवा हिंदु

आणि मुसलमान यांच्यांत बेबनाव कायम ठेवून व वाढवून फोडा-झोडा आणि राज्य करा असलें कुटिल कारस्थान सरकार यशस्वीपणें साधीत आहे.

तेव्हां कुठें मुसलमान जरा जागे झाले. राष्ट्राच्या स्वराज्याच्या मागणींत काँग्रेसच्या सुराशीं सूर भिडवून एकीनें वागण्याइतका बदल त्यांच्यांत झाला. तेवढ्यांत लो. टिळक तुरुंगांतून सुटून आले आणि तिकडे युरोपांत पहिलें महायुद्ध पेटलें. तुर्कस्तान हा मुसलमानांच्या धर्मश्रेष्ठीचा-खलीफाचा देश. त्या तुर्कस्तानची महायुद्धाच्या अरिष्टांत इंग्रज राज्यकर्त्यांकडून कुतरओढ होऊं लागली तेव्हां हिंदी मुसलमान आणखी सावध झाले. सन १९१६ सालीं हिंदुस्थानांत होमरूलची चळवळ जोरांत सुरू झाली तेव्हां हिंदु-मुसलमानांची एकी झाली व एकदिलानें दोघेही ती चळवळ यशस्वी करण्यासाठीं धडपडूं लागले. काँग्रेस आणि लीग यांच्या संयुक्त सभा होऊं लागल्या. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं हिंदु-मुसलमानांतील ऐक्याच्या भूमिकेवरून काँग्रेसनें खिलाफतीची चळवळ ही साऱ्या राष्ट्राची चळवळ म्हणून मुसलमान बांधवांशीं समरस होऊन आपुलकीनें व नेटानें चालविली. काँग्रेसनें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं असहकारितेची चळवळ व ही खिलाफतीची चळवळ या दोन्ही चळवळी तेव्हां अगदीं एकजीव होऊन जोमांत चालल्या होत्या मुस्लीमलीगनें असहकारितेच्या चळवळीला पूर्ण मान्यता दिली होती.

परंतु असहकारितेची चळवळ ही आपण मागें पाहिलें त्याप्रमाणें दीड वर्षांत सन १९२२ च्या आरंभापावेतों हळू हळू कांहींशी मंद झाली. तेवढ्यांत पहिलें महायुद्ध संपल्यावर इंग्रज सरकारनें तुर्कस्तानशीं करावयाच्या तहाची कलमें जाहीर करून आपलें भयंकर दगलबाज स्वरूप दाखविलें व मुसलमानांना निराश केलें. तेव्हां मुसलमान आरंभीं खूप चिडले. पण नुसतें चिडून पदरीं पडलेलें अपयश नाहींसें थोडेंच होतें ? तरीही काँग्रेसच्या बरोबरीनें स्वराज्यासाठीं लीगची थोडी फार खटपट पुढेंही कांहीं काळ चालू होती.

पण काँग्रेसची चळवळच अनेक अपरिहार्य अडचणींमुळें तेवढ्यापुरती तरी मंदावलेली दिसूं लागली. गांधीजींनीं चौरीचोऱ्याच्या अनर्थानंतर चळवळ मागें घेतली. लगेच त्यांच्यावर खटला होऊन तुरुंगवास त्यांच्या वांट्याला आला. अशी काँग्रेसच्या चळवळीला तेव्हां जी तात्पुरती ओहोटी लागली, त्या

ओहोटीबरोबरच काँग्रेस आणि लीग यांच्यांतील एकोप्याच्या भावनेलाही ओहोटी लागली.

असहकारितेच्या चळवळीची ओहोटी पुढें लौकरच संपली व गांधीजींच्या नेतृत्वाखालीं काँग्रेस स्वातंत्र्ययुद्धांत लढण्याकरितां पुन्हा नव्या जोमानें समर्थ झाली. पण काँग्रेस आणि लीग यांच्यांतील आपुलकीचे व एकोप्याचे संबंध जे एकदां दुरावूं लागले ते कांहीं पुन्हा जुळून आले नाहींत. उलट पुढच्याच वर्षापासून म्हणजे सन १९२३ सालापासून मुसलमानांना चिडवून जातीय दंग्यांचें विष लीगच्या छायेखालीं देशांत ठिकठिकाणीं सरकारी कारवायांनी देखील पेरलें जाऊं लागलें.

हिंदुस्थानाच्या जीवनांत जातीय वादाचें भयंकर वीष पेरण्याला कारण होणारी मुस्लीम लीग ही कांहीं एकटीच संस्था नव्हे. एका हातानें कधीं टाळी वाजत नाहीं. मुसलमानांच्या प्रतिगामी जातीय धोरणाला इंग्रज सरकार एकसारखें आडून चिथावणी देत होतें हें खरें. पण तशीच चिथावणी दुसऱ्या टोकानें देशांतल्या देशांत आमचे कांहीं जातीयतावादी हिंदू बांधवही जनतेला देत होते. मुस्लीम लीग ही जशी हिंदुस्थानांतील मुसलमानांची प्रतिगामी जातीय संस्था तशीच एका परीनें तिला तोडीस तोड म्हणून कीं काय हिंदूंची हिंदूमहासभा सन १९२५ सालीं पंजाबचे सिंह दे. भ. लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. कोणी कोणी म्हणतात कीं मुस्लीम लीग स्थापन झाली त्याच सुमाराला लागोपाठ सन १९०६ सालीं हिंदुमहासभा स्थापन झाली. तें कांहीं अंशी खरें मानलें तरी १९२५ सालापासूनच हिंदूमहासभेच्या प्रतिगामी जातीय धोरणाला बाळसें यायला सुरवात झाली.

चौरीचोऱ्याच्या दंग्यानंतर लगेच महात्मा गांधींनीं असहकारितेची चळवळ मागें घेतली व लगेच ते पकडले गेले. त्यांच्यावर खटला होऊन त्यांना फेब्रुवारी सन १९२९ मध्यें सहा वर्षांची शिक्षाही झाली तेव्हांच्या काळांत जी एक प्रकारें उदासीनतेची व त्या उदासीनतेमुळें फाटाफुटीची सावट राष्ट्रावर पडली, त्या सावटींतच हिंदुस्थानांत गांधीजींच्या सत्य–अहिंसेच्या तत्वज्ञानाला अपशकुनी विरोध करणारा दुष्ट जातीय वाद काँग्रेसमध्यें देखील चोरून डोकें वर काढूं लागला. हिंदूंचा अजाणपणें द्वेष करणारे प्रतिगामी जातीयवादी मुसलमान जसे लीगमध्यें होते तसेच मुसलमानांचा अजाणपणें द्वेष करून

जातीय वादाची जोपासना होऊं देणारे हिंदू पुढारी काँग्रेसमध्यें व काँग्रेसच्य आसपास होते. गांधीजीचें हिंदू-मुसलमानांच्या एकीसाठीं आखण्यांत आलेलें धोरण मूळपासूनच ह्या जातीय वादी हिंदूंना खरोखर मान्य नव्हतें. पण काँग्रेसच्या वाढत्या प्रभावामुळें हा हिंदूमधील जातीय वाद आरंभीं काँग्रेस-च्या राजकारणांत जोरदार मूळ धरूं शकला नाहीं.

पण महाराष्ट्रांत, बंगाल प्रांतांत, पंजावांत बऱ्याच दिवसांपासून राष्ट्रीयतेचें घनदाट धुकें जें काँग्रेसमधील व आसपासच्या पांढरपेशा हिंदु जगांत सांचलें होतें त्या धुक्यांत हीं जातीयतेचीं विषारी बिजें उबाऱ्यानें अंकुरत व उगवत होतीं. उघडया सामान्य नजरेला तीं उघड दिसत मात्र नव्हतीं. केवळ मुसल-मानांविरुद्धच हा जातीय वाद रुजत होता असें नव्हे. बंगालमध्यें हिंदूविरुद्ध मुसलमान तर महाराष्ट्र-मद्रास इकडे ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर तर पजाबांत हिंदू विरुद्ध मसलमान, मुसलमानांविरुद्ध शीख, शीखांविरुद्ध जाठ व त्यांतही आणखी जाठांतून धर्मांतरित झालेले-केलेले मुसलमान, शीख व हिंदू असा जातियतेचा गोंधळ होता. गोगलगाईसारखा तो दबत दवत वाढत होता. नदीला महापूर आला कीं नदींत खडकावर वाढलेलीं शेवाळें झांकून जातात व दिसेनाशीं होतात, तसा गांधीजींच्या सर्वोदयकारक शिकवणुकीच्या महापुरांत हा जातीय वाद दबला गेला-दिसेनासा झाला इतकेंच. सामान्यत: आपणाला पुढें असें दिसून येईल कीं फेरवादी पांढरपेशी विचारसरणी जी काँग्रेसमध्यें व त्यांतही विशेषत: महाराष्ट्रांत दिसून आली, तिच्यांतही परिक्षिति राजाला डसायला फळांतील किडीच्या रूपानें अंग चोरून जाणाऱ्या तक्षकासारखा हा जातीय वाद दवा धरून बसला होता. गांधीजींच्या हत्येला मारेकरी पांढरपेशा ब्राह्मणी महाराष्ट्रांतून मिळाला हा तरी त्या जातीय वादाचाच परिपाक होय. त्या जातीयवादाला सन १९२२ सालीं गांधीजींना अटक होऊन असह-कारितेची चळवळ जरा मागें पडल्यापासून वर डोकें काढायला संधी मिळाली.

मुसलमान तर खिलाफतीचा निकाल लागल्यापासून उघडपणें बिथरून लीगच्या झेंडयाखालीं काँग्रेसशीं बांकून वागूं लागले होते. गांधीजी मुसलमान-धार्जिणे आहेत या भावनेनें भारलेले काँग्रेसमधील हिंदु पुढारी जरी मुसल-

मानांइतके काँग्रेसशीं एकदम फटकून वागूं लागले नाहींत तरी त्यांची काँग्रेस-मधील गांधीविरोधी भूमिका हळू हळू बळकट होत होती हें खरें.

असहकारितेच्या कार्यक्रमावर व सत्य–अहिंसेवर पूर्ण विश्वास नसणारे काँग्रेसमधील लोक व गांधीजींच्या असहकारितेच्या कार्यक्रमावर पूर्ण विश्वास असलेले गांधीवादी लोक यांच्यांतील मतभेद फेरवादी काँग्रेसवाले व नाफेर-वादी काँग्रेसवाले अशा रूपानें उघड होऊं लागले. देशबंधु चित्तरंजन दास पं. मोतीलाल नेहरू वगैरे थोर काँग्रेस पुढारी तेव्हां तसे जातीय वादी नसूनही फेरवादी होते. त्यांनीं तेव्हां काँग्रेसमध्येंच सन १९२३–२४ मध्यें स्वराज्यपक्ष या नांवानें सवता सुभा उभारला व कायदेमंडळांतील निवडणुका लढविल्या. काँग्रेसमधील हिंदुमहासभावादी जातीय मनोवृत्ति ह्या स्वराज्य पक्षाच्या वळचणीचा अथवा असाच आणखी कुठें आडोसा मिळाला कीं त्याचा आश्रय घेऊन हळूहळू वाढत होती. प्रतिगामी सनातनी वृत्ति तिची साथ करीत होती.

मुस्लीम लोग जशी प्रतिगामी सरंजामशाही–भांडवलशाहीधार्जिण्या मुसलमान पुढाऱ्यांच्या आहारी जाऊन प्रतिगामी जातीय संस्था म्हणून फोफावत होती तशीच सन १९२५ सालीं स्थापन झालेली हिंदुमहासभाही लीगला तोडीस तोड शोभता येईल अशा डावपेचांनीं हळू हळू फोफावत होती.

हें आपण अखेरपावेतों ध्यानीं ठेवलें म्हणजे आपणाला कांग्रेसनें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं चालविलेल्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धाचा गांधीजीं-च्या हत्येपावेतोंचा अर्थ नीट समजून घेतां येतो.

• • •

# ९ ही विषवेल कशी वाढली ?

कांग्रेसच्या जन्मापूर्वीं हिंदु-मुसमानांमधील तेढ कालपरवांच्याइतकी विकोपाला गेली नव्हती. जातीय वाद राष्ट्रांत तेव्हां अगदींच नव्हता असें नाहीं.पण तो इतका तीव्र नव्हता. पण हिंदु–मुसलमानांत फाटाफूट इंग्रज राज्यकर्त्यांच्या फोडा झोडा आणि राज्य करा अशा कुटिल राजनीतीमुळें अधिक वाढली.

तरी पण या ठिकाणीं आपली एक शंका कायमच राहते. ती ही कीं महात्मा गांधींचा काँग्रेसच्या राजकारणांत उदय झाल्यापासून काँग्रेस हिंदी जनतेची खरीखुरी प्रतिनिधि होऊं लागली म्हणतात; हें काँग्रेसचें धोरण जर साऱ्या कोटमाप हिंदी जनतेचें कल्याण करणारें होतें तर काँग्रेसच्या वाढीबरोबरच हिंदी राष्ट्राला मारक ठरलेला जातीय वाद कसा फोफावला?

हा प्रश्न जबाबदारीनें विचार करण्यासारखा आहे खरा. आपण आरंभींच पाहिलें आहे कीं आपल्या कांग्रेसचा जन्म आणि आरंभींची जोपासना समाजांतील वरच्या वर्गांतील लोकांकडूनच झाली. कांग्रेसचा संबंध जसजसा कोटयावधि हिंदी जनतेच्या जीवनाशीं अधिक अधिक येऊं लागला तसतसा सभोंवारच्या एकंदर परिस्थितींत फरक होऊं लागला. त्या फरकाचीं प्रतिबिंबें काँग्रेसमध्येंच काय पण हिंदी राष्ट्राच्या साऱ्या जीवनांत उमटलेलीं दिसूं लागलीं. काँग्रेसचा जन्म झाला तेव्हांपासून काँग्रेसचें पुढारीपण बडया बडया सरकारमान्य सुखवस्तु हिंदी पुढाऱ्यांकडे आलें. पुढें बंगालच्या फाळणीनंतर हिंदी तरुणवर्ग खडबडून जागा झाला आणि काँग्रेसच्या अर्ज-विनंती-ठरावरूपी नेमस्त आरामशीर राजकारणाच्या गाडयाला धक्के देऊन तो गाडा पुढें रेटूं लागला. काँग्रेसच्या क्षितिजावर लो. टिळकांचा उदय झाल्यापासून काँग्रेसमधील मूठभर सुखवस्तु नेमस्तांच्या आरामशीर राजकारणाला ओहोटी लागली. बडे बडे जमीनदार, सरदार, जहागीरदार, बडे सरकारमान्य पुढारी व बडे सरकारी नोकर यांचें काँग्रेसमधील पूर्वीचें पुढारीपणाचें

आसन हळू हळू डळमळूं लागलें. बुद्धिजीवि मध्यमवर्ग राष्ट्रीय उर्फ जहाल बाण्यानें धडाघडीनें काँग्रेसचीं सूत्रें आपल्या हातीं घेऊं लागला. अर्थात् तेव्हां-पासून देशांतील बडी बडी व धनवान जबाबदार मंडळी–हा हिंदी धनवान वर्ग काँग्रेसवर थोडाथोडा नाराज होऊं लागला.

लो. टिळकांच्या काळांत बड्या बड्या धनवान सुखवस्तु नेमस्त वर्गाच्या हातून काँग्रेसचीं म्हणजे देशाच्या राजकारणाचीं सूत्रें बुद्धिजीवी मध्यम-वर्गाच्या हातीं आलीं. एथपावेतोंच काँग्रेसचें पुढें पाऊल पडलें.

त्यानंतर महात्मा गांधींचा काँग्रेसच्या क्षितिजावर उदय झाला. काँग्रेस ही देशांतील कोटमाप दरिद्री नारायणांची अर्थात् खऱ्या अर्थानें रंजल्या–गांजल्या कोटमाप हिंदी जनतेची काँग्रेस बनूं लागली. सुखवस्तु धनवान वर्गाची काँग्रेसमधील मिरास झपाट्यानें ढळूं लागली. धनवान वर्गांतील मतलबी लोकांना दिवसेंदिवस काँग्रेसमध्यें पूर्वीसारखा वाव मिळेनासा झाला. मुस्लीम लीग आणि हिंदु–महासभा या देशांतील दोन्ही परस्पर विरोधी सवत्या सुभ्यांत काँग्रेसविरुद्ध असंतोष व द्वेष जो शेवाळासारखा वाढूं लागला त्याचें हें मूळ कारण आहे.

ह्या वरच्या धनवान हिंदी वर्गाच्या असंतुष्टपणांतच हिंदू विरुद्ध मुसल-मान अशा दुहीची जोपासना होऊं लागली. आणि ह्या विरोधाचा विशेष हा कीं हिंदूंमधील काँग्रेसचे विरोधी लोक यांचा देखील एकमेकांशीं विरोध वाढीला लागला.

मुसलमान समाज हिंदु समाजापेक्षां एकंदरींत मागासलेला, अधिक अशिक्षित व अधिक गरीब आहे. त्या समाजाला आपल्यामागें विरोधी चळवळीच्या गाड्याला जुंपणें लीगच्या बड्या बड्या जमीनदार पुढाऱ्यांना सोपें गेलें. मुसलमान जनतेचें पुढारीपण हे बडे बडे मुसलमान हळू हळू लीगच्या झेंड्याखालीं आपल्या मुठींत आणण्याला समर्थ ठरले. जनता अजाण. जाब विचारणारा कोणी नाहीं. अशा स्थितींतच धनवान वर्गाला जनतेवर स्वार होऊन तिच्या मानगुटीवर बसायला संधी मिळते. मुसलमान जन-तेच्या नांवावर मुस्लीम लीग सरकारशीं व काँग्रेसशीं निरनिराळ्या वऱ्या वाईट सौद्याची भाषा बोलत होती ती यामुळेंच. काँग्रेसला मुसल-मानांचा विरोध सुरू होण्याचें मुख्य कारण महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं

जागा होऊन कामाला लागलेला हिंदी दरिद्री नारायण आतां लीगमधील काय किंवा काँग्रेसमधील काय, धनवान बडचा धेंडांचा आर्थिक सासुरवास सहन करायला तयार नव्हता.

मुसलमानांतील बडा धनवान जमीनदार वर्गच फक्त असा प्रतिगामी होता असें नाहीं. राष्ट्रांतील सारा जमीनदार वर्गच प्रतिगामी होता. त्याला वर्तमानकाळ ओळखतां येत नव्हता व भविष्यकाळ तर मुळींच कळत नव्हता. हिंदी धनिक भांडवलदार वर्ग मात्र काळाचीं पावलें ओळखून हात राखून तरी काँग्रेसबरोबर राहण्याचा शक्य तेवढा सुजाणपणा दाखवीत होता. विशेषतः महात्मा गांधींनीं आरंभिलेलें सत्य–अहिंसात्मक राजकारण ह्या भांडवलदार वर्गाला वरेंच पसंत पडलें याचें कारण गांधीजींची राजकारणाच्या लढ्यांतील अहिंसात्मक भूमिका वर्गसंघर्षाची नसून वर्गसमन्वयाची होती. राष्ट्रांतील कोटयाप जनता झपाट्यानें गांधीजींच्या हांकेसरशी त्यांच्या मागें उभी राहूं लागली होती. असा राष्ट्रांतील खऱ्याखुऱ्या विराट जनमताचा पाठिंबा गांधीजींना होता. हें ध्यानीं घेऊन हिंदी भांडवलदार वर्ग काँग्रेसच्या निशाणाखालीं हळू हळू जमूं लागला होता. इंग्रजांची हिंदुस्थानावरील सत्ता म्हणजे उघडउघड भांडवलशाही साम्राज्य सत्ता. ती इंग्रजी भांडवलशाही सत्ता हिंदी भांडवलशाहीच्या प्रगतीला आपमतलबीपणानें आडवळणांनीं अडथळा करीत होती. त्यापासून स्वतःचा बचाव करून पुढें पाऊल टाकण्यासाठीं हिंदी भांडवलदार वर्गाला इंग्रजी साम्राज्यशाहीविरोधी कांग्रेसच्या चळवळीला पाठिंबा देऊन कांग्रेसभक्त बनणें अवश्य व सोईचें होतें.

कांग्रेसही देशांत आतां एक देशव्यापी महाबलवान शक्तिशी शोभूं लागली होती. मुस्लीम लीग काँग्रेसशीं एकाकी प्रतिगामी विरोध मांडून टक्कर देण्यांत टिकणारी नव्हती. अशा स्थितींत मग लीग सरकारच्या हातांतील बाहुलें बनून काँग्रेसशीं विरोधाचें व फाटाफुटीचे डाव खेळूं लागली सरकारला तरी तेंच पाहिजे होतें. काँग्रेसविरुद्ध लीगला म्हणजेच हिंदूविरुद्ध मुसलमानांना गोंजारून सरकारला हिंदू–मुसलमानांत एकी होऊं द्यायवयाची नव्हती. तसेंच हिंदु–मुसलमान आणि हिंदुस्थानांतील इतर जाती देखील एक होत नाहींत

म्हणून हळहळीचें सोंग करीत हिंदुस्थानची पारतंत्र्यांतील पिळणूक अबाधित चालू ठेवावयाची होती.

• • •

## १० भाकरीऐवजीं धोंडा

महात्मा गांधींनीं सन १९२० च्या ऑगस्टमध्यें सुरू केलेली असहकारितेची चळवळ दीड वर्षानें सन १९२२ सालीं चौरीचोऱ्याच्या दंग्यानंतर एकाएकीं थांबविली. याचें कारण चळवळीचा लोंढा त्यांच्या अपेक्षेविरुद्ध शांततेच्या व अहिंसेच्या मर्यादा सोडून भलतीकडेच अहिंसेच्या वाटेनें वाहात जाऊं लागला. सत्य व अहिंसा हा गांधीजींच्या चळवळीचा आत्मा. तो आत्माच चळवळींत ठार होऊं लागला तर गांधीजींना तें कसें सहन होणार ?

गांधीजी तुरुंगांत असतांनाच आजारी पडले. त्यांना येरवड्याच्या तुरुं-गांत ठेवण्यांत आलें होतें. त्यांच्या आजारावर शस्त्रक्रिया करणें अवश्य झालें. शस्त्रक्रियेनंतर सरकारनें त्यांच्या प्रकृतीची जबाबदारी आपणावर नको म्हणून कीं काय, लगेच शिक्षेची मुदत संपण्यापूर्वींच सन १९२४ सालीं त्यांची सुटका केली.

ह्या दोन वर्षांच्या अवधींत काँग्रेसच्या चळवळींत पुष्कळच स्थित्यंतर झालें होतें. काँग्रेसमध्येंच फेरवादी आणि नाफेरवादी असा जो भेद मुख्यत: महाराष्टांत व बंगाल्यांत गांधीजी तुरुंगांत जाण्यापूर्वीं पडला होता तो या दोन वर्षांत पुष्कळच वाढला होता. नाफेरवादी ऊर्फ गांधीवादी पक्ष गांधी-जींनीं आंखून दिलेल्या कार्यक्रमाला चिकटून राहण्याची पराकाष्टा करीत होता. फेरवाला पक्ष–विशेषत: महाराष्ट्रांतील टिळकानुयायी कायदेमंडळां-तील निवडणुका लढवून सनदशीर नेमस्त राजकारणाच्या ठराविक चाकोरीं-तून काँग्रेसचा गाडा चालवूं पाहात होते. लो. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाची ही मंडळी. पण राष्ट्रीय हा शब्द भावनादर्शक आहे. राष्ट्रोद्धाराविषयींच्या

भावना जशा परिस्थितिनुसार बदलतात तसाच त्या शब्दाचा अर्थही बदलता तर तो शब्द जिवंत राहता. लो. टिळकांच्या आमदानींत राष्ट्रीयतेला मान होता याचें कारण तेव्हां राष्ट्रीय पक्ष पुरोगामी होता. गांधीयुगांत राष्ट्र पुरोगामी मार्गानें आणखी पुढचा पल्ला गांठूं लागलें. त्या पुरोगामी प्रवासांतील राष्ट्राचे–काँग्रेसचे सोबती म्हणून खरे पुरोगामी अथवा राष्ट्रीय पुढें चालूं लागले. जे काळाकडे व वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून लोकमान्यांच्या जुन्या गादीला चिकटून बसले, त्यांचा राष्ट्रीयपणा आतां ओघानेंच लोकमान्यांच्या वेळचा मवाळपणा ऊर्फ नेमस्तपणा ठरूं लागला. ह्या नेमस्तपणावर राष्ट्रीयतेचा मुलामा देण्यासाठीं ह्या लोकमान्यपंथी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रीय देशभक्तांना मग दास–नेहरू यांच्या स्वराज्यांत म्हणजे स्वराज्य पक्षांत जावें लागलें.

देशबंधु दास व पंडित मोतिलाल नेहरू यांनीं काँग्रेसमध्येंच पण निराळा असा स्वराज्य पक्ष स्थापन केला होता. त्याच्या पोटीं फेरवाला महाराष्ट्र शिरला होता. गांधीजींवर दास व नेहरू या दोघांची पूर्ण श्रद्धा असूनही गांधीजींची असहकारितेची चळवळ त्यांना पटत नव्हती. त्यामुळें गांधीजींना तुरुंगाबाहेर येतांच स्वराज्य पक्षाच्या विरोधाला तोंड देणें प्राप्त झालें असहकारितेची चळवळही बरीचशी सरकारच्या दडपशाहीमुळें अगदीं मंदावत चालली होती. ती चळवळ तिच्यांतील चुका दुरुस्त केल्याखेरीज पूर्वींच्या जोमानें हातीं घेतां येणें शक्य नव्हतें. त्यामुळें सन १९२४ सालापासून सन १९३० सालापावेतों आपल्या काँग्रेसला एका परीनें अज्ञातवासांतच दिवस कंठावे लागले. सनदशीर राजकारणाला बराच जोर चढला. कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. स्वराज्य पक्षानें त्या जोरानें लढविल्या. गांधीजींना जरीं ही सनदशीर राजकारणाची मनोवृत्ति मान्य नव्हती तरी काँग्रेसमधील अनेक वजनदार पुढाऱ्यांच्या व तात्कालिक बहुमताच्या ओघाकडे लक्ष देऊन त्यांनी तें मुकाटपणें सहन केलें. कारण त्यांना काँग्रेसमध्यें फूट पडूं द्यावयाची नव्हती.

स्वराज्य पक्षाला तेव्हांच्या कायदेमंडळाच्या निवडणुकींत बरेंच यश लाभलें. नंतर पं. मोतिलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांची एक सर्वपक्षीय परिषद भरविण्यांत आली. त्या

परिषदेंत स्वराज्याच्या मागणीचा योजनात्मक आराखडा तयार करण्यांत आला. कारण त्याच वेळीं हिंदुस्थानला स्वराज्याचा नवा हप्ता देण्याचा चौकशीपूर्वक विचार करण्याच्या कामगिरीवर सरकारनें नेमलेलें सायमन कमिशन हिंदुस्थानांत आलें होतें काँग्रेसनें सर्वपक्षीय परिषदेच्या नेहरू योजनेला एकदांची सशर्त मान्यता दिली होती. त्या योजनेंत स्पष्ट केल्याप्रमाणें एका वर्षांत जर वसाहतीचें स्वराज्य सरकारनें हिंदुस्थानच्या पदरांत टाकलें नाहीं तर लगेच काँग्रेस स्वातंत्र्य जाहीर करील असा इषारा काँग्रेसनें महात्मा गांधींच्या अनुमतीनें स्पष्टपणें सरकारला दिला होता.

ती मुदत टळली. पण सरकारनें हिंदुस्थानला काँग्रेसच्या मागणीप्रमाणें कांहींच दिलें नाहीं. अशा स्थितींत सन १९२९ सालीं लाहोर येथें पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं काँग्रेसचें अधिवेशन भरलें. आणि त्या महत्त्वाच्या अधिवेशनांत काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून पंडित जवाहरलाल नेहरूंनीं ता. ३१ डिसेंबर १९२९ च्या मध्यरात्रीं लाहोरांत रावी नदीच्या तीरावर काँग्रेसचा स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा फडकविला. मागच्या वर्षापावेतों देखील स्वातंत्र्याची तीव्र मागणी करण्यापेक्षां वसाहतीच्या स्वराज्यावर समाधान मानायला तयार असलेले शांतिब्रह्म गांधीजी देखील सरकारच्या लाजिरवाण्या निगरगट्टपणाला विटून स्वातंत्र्याच्या ठरावाला अनुकूल झाले. सर्वपक्षीय परिषदेंत पूर्वीं मान्य झालेली व मागील काँग्रेसनेंही सशर्त मान्य केलेली नेहरू योजना काँग्रेसनेंच रद्द ठरविली. कायदेमंडळांत गेलेल्या सर्व काँग्रेसजनांना राजीनामे देऊन बाहेर पडण्याचा आदेश देण्यांत आला. अशा सर्व शक्ति आगामी स्वातंत्र्ययुद्धासाठीं एकवटूं लागल्या.

हिंदुस्थानच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा तर काँग्रेसनें याप्रमाणें केली. महात्मा गांधी त्या अधिवेशनाला हजर होते. त्यांच्याच मार्गदर्शनाखालीं काँग्रेसनें पं. जवाहरलाल नेहरूंच्या मुखानें स्वातंत्र्य जाहीर केलें. अर्थात् आतां पुन्हा काँग्रेसच्या चळवळीची धुरा वाहून देश स्वतंत्र करण्याची जबाबदारी काँग्रेसच्या वतीनें गांधीजींच्यावर येऊन पडली. ती त्यांनीं तितक्याच तत्परतेनें स्वीकारली. राष्ट्रांत आतां पुन्हा हिमालयापासून कन्याकुमारीपावेतों व कराचीपासून कलकत्त्यापावेतों स्वातंत्र्यसंपादनाचें नवचैतन्य सळसळूं

लागलें. जो तो कॉंग्रेस–म्हणजे गांधीजी–स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केव्हां कशी व कोणती चळवळ सुरू करणार इकडे अनावर उत्सुकतेनें पाहूं लागला. सनदशीर राजकारणाचा खेळखंडोबा जनतेला आतां अगदीं नकोसा वाटूं लागला होता. आतां गांधीजी सांगतील तो नवा मार्ग गांधीजींच्या नेतृत्वाखालीं स्वीकारण्यासाठीं जनता अधीर झाली होती.

गांधीजींनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अजूनही शक्य तर लढ्याचा प्रसंग टाळण्यासाठीं सन्मान्य तडजोडीचा उपाय शोधून काढण्याकरितां सरकारशीं वाटाघाटींची शिकस्त केली. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांनीं व्हाईसरायला अगदीं नम्रपणें सांगून पाहिलें ' कीं निदान एवढें तरी करा ! पूर्ण मद्यपानबंदी करा. हुंडणावळीचा भाव रुपयाला १६ पेन्स करा. जमीनमहसूल निदान निम्मे कमी करून महसुलाची बाब कायदेमंडळाच्या अधिकाराखालीं आणा. मिठाचा कर रद्द करा.लष्करी खर्च सुरुवातीला निदान निम्मेवर उतरवा. वरिष्ठ जागांचे पगार निम्मे किंवा त्याहूनही कमी करून जमीनमहसुलाची भरपाई करा. परदेशी कापडावर संरक्षक जकात बसवा. किनाऱ्यावरील व्यापार ताब्यांत ठेवण्याविषयींचा कायदा मंजूर करा. खुनाबद्दल किंवा खुनाच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा झालेल्या कैद्यांशिवाय इतर सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता किंवा सामान्य न्यायमंदिरापुढें चवकशी तरी करा. तसेंच १२४ अ ( राजद्रोह ) कलमाचा व सन १८१८ च्या ३ ऱ्या रेग्युलेशनचा अंमल रद्द करून हद्दपार झालेल्या सर्व हिंदी इसमांना मायदेशांत परत येण्याला परवानगी द्या. गुप्त पोलिसांचें खातें रद्द करा किंवा लोकमताच्या नियंत्रणाखालीं आणा. सार्वजनिक हिताचें बंधन सांभाळून स्वसंरक्षणासाठीं दारूगोळ्याचीं हत्यारें वापरण्याची परवानगी द्या...कमींत कमी एवढ्या अकरा मागण्या तरी मान्य करा !

पण नाहीं ! – व्हॉइसरॉयनें त्रिवार निक्षून सांगितलें कीं नाहीं ! नाहीं ! ! नाहीं ! ! !

अखेर गांधीजींना व्हॉइसरॉयला हळहळत सांगावें लागलें कीं ' आपल्यापुढें गुडघे टेंकून मी भाकरीची याचना केली. पण आपण भाकरीऐवजीं धोंडा माझ्या पदरांत टाकला ! ... '

अखेर गांधीजींनीं सविनय कायदेभंगाच्या चळवळीची घोषणा केली.

त्या चळवळीला मिठाच्या सत्याग्रहानें तोंड पडणार हें निश्चित झालें. ही देशव्यापी चळवळ कशी करावी याविषयींच्या योजनांची आंखणीही झाली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मान्यतेचें शिक्कामोर्तबही चळवळीवर झालें.

पूर्ण तीन महिनेपावेतों याप्रमाणें चळवळीची सारी तयारी झाली. मग गांधीजींनीं मिठाच्या सत्याग्रहाचा गुजराथेंत दांडी येथें मुहूर्त करण्यासाठीं दांडी यात्रेची घोषणा केली.

● ● ●

# ११ दडपशाहीचा वणवा भडकला !

गांधीजींनीं देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरतां करावयाच्या चळवळींत सत्याग्रहासाठीं मीठच कां निवडलें ?

गांधीजींची प्रत्येक चळवळ बिंदूतून सिंधूची वाढ करणारी असते हें पुष्कळ लोकं जाणतात. समुद्राचें पाणी आणि सूर्याची उष्णता यांतून तयार होणारें मीठ ही निसर्गानें जगाला दिलेली फुकटची देणगी होय. ती जितकी विपुल तितकीच जीवनाला अत्यंत आवश्यक. अशा या आवश्यक वस्तूवर देखील सरकारनें जबरदस्त कर वसूल करावा आणि गरीब हिंदी रयतेचें मीठ तोडावें ही गोष्ट कोणत्याही सुधारलेल्या सरकारला लाजिरवाणीच वाटली पाहिजे. गांधीजींनीं मिठाचीच सत्याग्रहासाठीं निवड केली ती गोरगरीबांच्या दृष्टीनें योग्यच केली.

ता. ६।३।१९३० रोजीं गांधीजींनीं आपल्या निवडक ऐंशी सत्याग्रही स्वयंसेवकांसह आपला साबरमतीचा आश्रम सोडला आणि दांडी यात्रा सुरू केली. वाटेंत मजल दरमजल करीत ही सत्याग्रही सेना ता. ५–४–१९३० रोजीं दांडीला जाऊन पोहोंचली. आधींच गांधीजी साऱ्या राष्ट्राचे पंचप्राण. त्यांनीं आरंभिलेल्या दांडी यात्रेंत सत्याग्रहाच्या चळवळीचा केवढा तरी मोठा

प्रचार झाला. ते दांडीला गेले ते वाटेंतील व देशांतील जनतेचीं अंतःकरणें आपणाकडे आकर्षून घेत गेले. दांडीला पोहोंचतांच दुसऱ्याच दिवशीं त्यानीं समुद्रतीरावरील मीठ गोळा करून मिठाचा कायदा मोडला व सत्याग्रहाची मुहूर्तमेढ रोवली. त्याबरोबर देशांत ठिकठिकाणीं मिठाच्या सत्याग्रहाचे प्रतिध्वनि उमटूं लागले. लोक निर्भयपणें मिठाचा कायदेभंग करूं लागले. गांधोजींना पकडल्यास ही चळवळ अधिक भडकेल या भीतीनें आरंभीं सरकार-नें त्यांना पकडण्याची टाळाटाळ केली. पण चळवळ एकसारखी भडकत चालली. ती आणखी भडकूं नये म्हणून सरकारनें ता. ४।५।१९३० रोजीं गांधीजींना अटक केली. त्या अटकेमुळें तर चळवळीच्या भडकत्या आगींत तेल ओतल्यासारखें झालें. चळवळ पूर्वींच्या दुप्पट जोरानें भडकूं लागली.

देशभर अशी होळी पेटली असतांना, सरकारच्या त्या दडपशाहीच्या होळींत देशांतील हजारों लाखों सत्याग्रही होरपळून निघत असतांना मुंबई-च्या गिरणीवाल्या धनकुबेरांना मात्र त्या होळीवर आपली पोळी भाजून खाण्याचें सुचूं लागलें. परदेशी कापडावरील बहिष्काराच्या भयानें विलायतेंत लँकाशायरशीं व्यापारी करार मदार करण्याबद्दलच्या त्यांच्या घालमेली जोरांत चालू झाल्या. मुंबईकर गिरणीवाल्यांचा हा देशद्रोहीपणा काँग्रेस वर्किंग कमिटीच्या ध्यानीं आला. लगेच ता. १५ मे रोजीं प्रयागला वर्किंग कमिटीची बैठक भरली. त्या बैठकींत परदेशी कापडावर बहिष्कार पुकार-ण्यांत आला.

तोंच पावसाळा आला. आतां मिठाचा सत्याग्रह पावसामुळें थांबणार हें ध्यानीं घेऊन काँग्रेसच्या पुढाऱ्यांनीं कांहीं कांहीं प्रांतांना जिथें शक्य होतें तिथें जंगल सत्याग्रह व करबंदीची चळवळ करण्याची मोकळीक दिली. बेकायदा मीठ आणून अथवा तयार करून तें जाहीरपणें विकून अथवा वांटून कायदेभंग करण्याचा सपाटा ठिकठिकाणीं सुरू होताच. पण अमानुष सरकारच्या दडपशाहीचा व धरपकडीचा आणि तुरुंगभरतीचा वरवंटाही तितक्याच वेगानें फिरत होता. एकट्या महाराष्ट्रांतच पन्नास तरी संस्था ह्या चळवळींत भाग घेणाऱ्या म्हणून बेकायदा ठरविण्यांत आल्या.

असें हें सत्याग्रहाचें तुंबळ युद्ध देशभर चाललें होतें.

सरकार आणि काँग्रेस यांच्यामधील ह्या सत्याग्रहाच्या वाढत्या तेढींतून

समेटाचा कांहीं मार्ग सांपडला तर पहावा म्हणून सरकारनेंही डावपेंचांनीं खूप प्रयत्न करून पाहिले. पण ते सारे फसले. सरकार तोंडानें समेटाची मायावी भाषा बोलूं पाहात होतें. पण कृति मात्र सैतानी दडपशाहीची होती. पोटीं एक आणि ओठीं एक अशा त्या सरकारी कारवायांनीं काँग्रेस थोडीच फसते? देशांत सरकारची वटहुकुमी राजवट सुरू होती. पण बोलून चालून सतीचें वाण पत्करून पुढें चाललेली काँग्रेस अंग भाजतें म्हणून थोडीच माघार घेते?

सरकार समेटाची भाषा बोलून पाहात होतें याचें कारण हिंदुस्थानांतून सायमन कमिशन स्वदेशीं गेल्यावर राजकीय वाटाघाटींची धूळफेंक करण्यासाठीं सरकारनें एक गोलमेज परिषद भरविण्याचा घाट घातला होता. त्या परिषदेंत काँग्रेसनें भाग घेतला नाहीं तर परिषदेचा कारभार रामावांचून रामायण रचण्यासारखा होणार हें सरकार ओळखून होतें. पण काँग्रेस कांहीं सरकारच्या त्या मायावी उपायांना वश झाली नाहीं. मग सरकारनें काँग्रेसला वगळून खालसांतले डॉ. मुंजे, ना. शास्त्री वगैरे कोणी जातीयवादी राष्ट्रीय पण गांधीविरोधी तर कोणी नेमस्त असे सरकारमान्य सत्तावन पुढारी निवडले. हिंदी संस्थानांतूनही असेच सोळा हुकमी पुढारी निवडले. आणि त्यांत आपल्या तेरा निवडक विलायती प्रतिनिधींची भर घातली. पण असलें रामावाचून रामायण रचलेलें चऱ्हाट हिंदुस्थान थोडाच ऐकणार? अखेर परिषदेचा समारोप करतांना मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांना बोलून दाखवावें लागलें कीं हिंदुस्थानांत कायदेभंगाची चळवळ करणाऱ्यांचे अर्थात काँग्रेसचे सहकारी आपणाला या दुसऱ्या पुढच्या गोलमेज परिषदेंत पाहिजे आहेत.

पहिल्या गोलमेज परिषदेचें असें सूप वाजल्यावर लौकरच गांधीजी व त्यांचे सहकारी यांची तुरुंगांतून सुटका झाली. व्हॉइसरॉय लॉर्ड आर्यविन आतां समेटाची भाषा बोलूं लागले. त्यांनीं गांधीजींना सन्मानपूर्वक मुलाखतीला बोलावून महत्त्वाच्या वाटाघाटी केल्या. सरकारनें आपल्या पापांचें परिमार्जन करण्यासाठीं कमींत कमी एवढें करावें आणि काँग्रेसनें दुसऱ्या गोलमेज परिषदेंत भाग घ्यावा अशा अर्थाचा गांधी—आर्यविन करार ता. ५ मार्च १९३१ रोजीं एकदाचा झाला. देशांत चळवळीनें व दडपशाहीनें रखरखलेल्या वातावरणांत जरा गारवा आला. जनतेला जरा हायसें वाटूं

वा. क्र. ६९८३

लागलें. गांधी–आयर्विन कराराची अम्मलबजावणी शक्य तितक्या समजूतदारपणानें व्हावी अशी अवश्य ती दक्षता घेण्यांत सरकार चुकवाचुकव करीत होतें तरी काँग्रेस व गांधीजी यांनीं ती घेतली. अखेर त्या वर्षीच्या ऑगस्टच्या अखेरीला गांधीजी काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधि म्हणुन दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठीं विलायतेला गेले.

पण प्रत्यक्ष अनुभवानें काँग्रेसला लौकरच पटलें कीं सीताहरणासाठीं रावणानें मारीच दैत्याच्या सहाय्यानें कपटनाटक रचिलें तसलें कपटनाटक सरकार गांधी–आर्यविन करार व दुसरी गोलमेज परिषद असल्या मायावी फसवेगिरीनें वठवीत आहे. कारण गांधीजी विलायतेला गेले आणि लौकरच हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय बदलले. काँग्रेसशीं व गांधीजींशीं समंजसपणें वागणारे लॉर्ड आर्यविन गेले व त्यांच्या जागीं अस्मानी सुलतानी गाजवणारे लॉर्ड विलिंग्डन आले. गांधीजी गोलमेज परिषदेहून मायदेशीं माघारीं येण्यापूर्वीच हिंदुस्थानांत भयंकर दडपशाहीचें सत्र सुरू झालें होतें.

डिसेंबर महिन्यांत एकदांची ती अयशस्वी फसवी गोलमेज परिषद आटोपून गांधीजी माघारी वळले. ते हिंदुस्थानांत येऊन पाहतात तों देशांतील सारें वातावरण दडपशाहीच्या धुमसत्या आगीच्या धुरानें कुंद झालेलें त्यांना आढळलें. ही देशांतील परिस्थिति निवळण्याचा कांहीं उपाय योजण्याचें मनाशीं ठरवून गांधीजींनीं व्हॉइसरॉयची भेट घेण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण व्हॉइसरॉय त्यांना साधी भेट देण्यालाही कबूल होईना. गांधीजींचे सर्व उपाय हरले. इतकेंच नव्हे तर उलट लगेच गांधीजींना मुंबईंत ता. ३ जानेवारी १९३१ रोजीं पहांटेच्या वेळीं पकडण्यांत आलें.

पंडित जवाहरलाल नेहरूंना गांधीजींचे पाय हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागण्यापूर्वीच पकडण्यांत आलें होतें. गांधीजींना अटक झाली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं अलाहाबादच्या कोर्टानें जवाहरलालजींना दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली.

असा दडपशाहीचा वणवा वेगानें देशभर पेटूं लागला. त्याच्या ज्वाळा गगनाला भिडल्या. सारा देश त्या वणव्याच्या धुरानें धुमसूं लागला.

• • •

# १२ गोलमेज परिषदेचें मृगजळ

गांधीजी विलायतेंतून दुसऱ्या गोलमेज परिषदेहून माघारी परत आले ते अपयश पदरीं घेऊनच आले हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. गांधीजींना अपयश म्हणजेच काँग्रेसला अपयश. कारण गांधीजी हे दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेलेले काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधि होते.

बाकी, गांधीजींना विलायतेंत आलेलें अपयश हें पूर्वनियोजित व अपेक्षितच होतें. गोलमेज परिषद हा इंग्रजांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षांना कोंडून मारण्यासाठीं धूर्तपणें मयासुराच्या मायावी मयसभेसारखा उभारलेला सांपळा होता. किंबहुना काँग्रेसविरुद्ध रचलेल्या ह्या कटाचा पाया हिंदुस्थानच्या राजधानींत--सिमल्यांतूनच हिंदुस्थान व इंग्लंड ह्या दोन्ही ठिकाणीं रचिला गेला होता.

दुसऱ्या गोलमेज परिषदेला गेलेले युरोपियन व्यापारी प्रतिनिधि सर एडवर्ड बेंथॉल यांनीं तिकडून परत आल्यावर आपल्या साथीदारांसाठीं एक खासगी पत्रक काढलें. त्यावरून पूर्वोक्त कारस्थानावर चांगला प्रकाश पडतो. बेंथॉल त्या पत्रकांत म्हणतात, ' शक्य झालें तर कांहीं तरी तडजोड घडवून आणावी या निश्चयानें आम्हीं लंडनला गेलों होतों. पण त्याच वेळीं आर्थिक व व्यापारविषयक संरक्षक निर्बंध ठेवण्याच्या बाबतींत व युरोपियन ॲसोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स असोसिएशन या संस्थांनीं ठरविलेल्या सर्वसाधारण धोरणांत माघार घ्यावयाची नाहीं असाही आम्हीं निश्चय केला होता. कारण काँग्रेस, हिंदुमहासभा व इंडियन फेडरेटेड चेंबर ऑफ कॉमर्स यांचें संयुक्त बल पूर्वी सुचवण्यांत आलेल्या संरक्षक निर्बंधाची छाटाछाट करण्याच्या कामीं उपयोगांत आणलें जाईल ही गोष्ट आम्हांला उघड दिसत होती. या शेवटच्या अधिवेशनाच्या परिणामाकडे पाहतां असें दिसून येईल कीं गांधी व इंडियन फेडरेटेड चेंबर्सचे प्रतिनिधि सेंट जेम्स राज-

वाड्यांत जाऊन आले तरी येतांना ते ब्रिटिश सरकारकडून एखादी देखील सवलत संपादून आणूं शकले नाहींत.

'गांधी तिकडे गेले तसे रिकामे हात हालवीत हिंदुस्थानांत परत आले व जातीय प्रश्न सोडविण्याचें काम त्यांनीं हातीं घेतलें. पण त्यांतही सर्व जगापुढें त्यांची फजीती झाली. मुसलमानांचा भरभक्कम उत्साही गट तिथें हजर होता. अल्ली इमाम हे राष्ट्रीय मुसलमानही मुसलमानांत फूट पडायला कारण झाले नाहींत. पहिल्यापासून शेवटपर्यंत मुसलमान मोठ्या खुषीनें तेथें डाव खेळत होते. आम्हांला पाठिंबा देण्याचें त्यांनीं वचन दिलें व त्या वचनाला ते पूर्णपणें जागले. याचा मोबदला म्हणून त्यांनीं आम्हांला अशी विनंति केली कीं बंगालमधील मुसलमानांची हलाखीची आर्थिक स्थिति लक्षांत घ्या, त्यांना विसरूं नका. युरोपियन कंपन्यांतून किंवा कारखान्यांतून मुसलमानांना जागा द्या. एकंदरीनें मुसलमान समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिति सुधारण्याची त्यांना संधि द्या.

'... कॉंग्रेसशीं दोन हात करणें अगदीं अपरिहार्य आहे हें तर आम्ही आमच्या मनाशीं निश्चित केलेंच होतें. हा प्रसंग जितक्या लौकर येईल तितकें चांगलें असें आम्हांला वाटत होतें कॉंग्रेसवर पूर्ण विजय मिळवावयाचा असेल तर हिंदुस्थानांतून आलेले जे पुढारी आपल्याला मिळण्याचा संभव असेल त्या सर्वांना वश करून घेण्याचा आमचा निश्चय होता. मुसलमान तर खंबीर होतेच. अल्पमतवाल्यांसंबंधींचा करार (Minority Pact) व सरकारचें सामान्य धोरण आम्हांला अनुकूल होतें. संस्थानिक व अल्पसंख्याक लोक आमच्या बाजूला होते. सर्वसाधारण हिंदूंचे प्रतिनिधि म्हणून आलेले सप्रू, जयकर, पेट्रो व इतर कांहीं पुढारी यांना बगलेंत कसें मारतां येईल हा मात्र आमच्यापुढें महत्त्वाचा प्रश्न होता.

कॉंग्रेसविरुद्ध लढा चालविण्याला हे लोक आम्हांला मिळवतां आले नाहींत तरी निदान पक्षीं कॉंग्रेसला पाठिंबा देण्याला तरी ते तयार होणार नाहींत अशी खात्रीलायक परिस्थिति निर्माण करतां येण्याजोगी होती. प्रांतिक व फेडरल योजना सरकार एकत्र आणील अशी त्यांना हमी देतां आली तर तेवढ्यानेंही काम भागणार होतें. ... प्रांतिक स्वायत्तता हिंदुस्थानवर लादतां यावयाची नाहीं. कारण एकटे मुसलमान तिची अंमल-

बजावणी करूं शकणार नाहींत आणि काँग्रेसच्या प्रांतांत तर गंभीर स्वरूपाच्या अडचणी उत्पन्न होणार हें आम्हांला माहीत होतें. म्हणून आम्हीं निराळ्याच अपरिचित मित्रांशीं संगनमत केलें. त्यामुळें ही परिषद हिंदु राजकीय हिंदुस्थान आमच्या विरुद्ध गेल्यामुळें शेंकडा शंभर टक्के मोडून अयशस्वी होण्याऐवजीं शेंकडा नव्याण्णव टक्के सहकारितेचीं अभिवचनें मिळून समाप्त झाली. ह्या सहकारवाद्यांत पं. मालवीयही होते. मुसलमान मात्र युरोपियनांचे कट्टे दोस्त झाले. त्यांना जीं अभिवचनें मिळालीं होतीं तेवढ्यावरच ते खूष होते. ते आमच्या बरोबर काम करायला एका पायावर तयार झाले. . . .'

अशा प्रकारें ज्या आवळ्याची मोट कधींच बांधतां येणार नाहीं असे गणंग आंवळे वेंचून गोलमेज परिषदेंत घेतल्यावर तिथें एकमत कसलें आणि यश कसलें ? ह्या तेढीच्या वातावरणाचा अस्पृश्यांच्या बाबतींत आडमुठेपणानें व हट्टानें स्वतंत्र मतदार संघासाठीं अडून बसलेल्या डॉ. आंबेडकरांच्या हटवादी धोरणामुळें तर कळस झाला.

हिंदु आणि मुलसमान. हिंदूंतही स्पृश्य आणि अस्पृश्य. त्यांतही काँग्रेसवादी आणि काँग्रेसविरोधी. असल्या साऱ्या परस्परविरोधी शक्ति मुद्दाम वेंचून गोलमेज परिषदेचा शिमगा साजरा करण्यासाठीं सरकारनें नेल्या होत्या. त्यांचें जातीय बाबतींत कांहीं केल्या एकमत होईना. मग इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं खव्याकरितां भांडणाऱ्या दोन मांजरांचा न्याय करण्यासाठीं पुढें येणाऱ्या धूर्त वानराची भूमिका घेतली, आणि तुम्हां सर्वांचें एकमत होत नसेल तर आम्हांला लवाद म्हणून निवाडा द्यावा लागेल असें सर्व हिंदी प्रतिनिधींना सांगितलें. तें मुकाटपणें सर्वांना ऐकून घ्यावें लागलें.

गोलमेज परिषदेचा शिमगा संपला. पण कवित्व शिल्लक राहिलें तें हें ! हें अमंगळ कवित्व ऐकून घेण्याचें लगेच थोड्याच दिवसांत काँग्रेसच्या वांट्याला आलें. इंग्लंडच्या मुख्य प्रधानानें आपल्या दिल्या वचनाला जागून ता. २८ ऑगस्ट १९३२ रोजीं जातीय निवाडा दिला. बेडकांनीं राजा मागितला आणि देवानें साप राजा म्हणून पाठविला तशी त्या जातीय निवाड्याची गत होती. हा लवादाचा निवाडा म्हणून मुख्य प्रधानांनीं दिला.

पण वस्तुतः हा एक सरकारी वटहुकुम होता व तो हिंदुस्थानवर लादण्यांत आला होता. मुख्य प्रधान या बाबतींत लवाद म्हणून बळजबरीनें मिरविले. पण गोलमेज परिषदेंतील हिंदी प्रतिनिधींनीं त्यांना लवाद म्हणून मुळींच मान्य केलेलें नव्हतें,

विलायतेंत गोलमेज परिषदेच्या अधिवेशनांतच गांधीजींनीं सरकारला रोख ठोक बजावलें होतें कीं सरकारनें या जातीयतेच्या प्रश्नाला बळेंच अवास्तव महत्त्व देऊन त्याचा कांटयाचा नायटा व राईचा पर्वत केला आहे. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिल्यानें हिंदु जमातींत स्पृश्य आणि अस्पृश्य अशी फूट पाडली जाणार आहे. ही गोष्ट अस्पृश्यांच्या व संबंध हिंदु जमातीच्या आणि हिंदु धर्माच्या भयंकर तोटयाची आहे. या बाबतींत सरकारनें जर अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिला तर त्याच्याविरुद्ध मला प्राणांतिक उपोषण करावें लागेल असेंही त्यांनीं बजावलें होतें.

पण हा प्रसंग जो यावयाला नको होता तो अखेर आला. जातियतेच्या खडकावर परिषदेचें तारू आपटून फुटूं नये यासाठीं गांधीजींनीं केलेले सारे प्रयत्न फुकट वाया गेले. हिंदू–मुसलमानांत अशी फूट पडूं नये म्हणून गांधीजींनीं परिषदेंत मुसलमानांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी देखील मान्य केली होती. कारण मुसलमान हे धर्मानें व संस्कृतीनें हिंदूंपासून भिन्न होते. त्यांच्याशीं एकजुटीनें वागल्याखेरीज देशाच्या पदरीं स्वातंत्र्याचें फळ पडणें शक्य नव्हतें. पण तें ध्यानीं न घेतां जो उठला तो परिषदेंत आपल्या जातीला तेवढें जास्त प्रतिनिधित्व मिळण्यासाठीं कोत्या बुद्धीनें अथवा बेंथॉल यांच्या पत्रकांत पूर्वी ध्वनित झाल्याप्रमाणें फितुरी वृत्तीनें आपल्या जातीपुरतें आपमतलबीपणानें पाहूं लागला तर देशांत सर्वांची एकी कशी होणार ?

पं. नेहरूंनीं आपल्या आत्मचरित्रांत ह्या गोलमेज परिषदेच्या हिंदी सभासदांचें फार उद्बोधक वर्णन केलें आहे. ते म्हणतात, 'इकडे साऱ्या हिंदुस्थानभर वणवा भडकला होता व नर-नारींच्या आत्म्यांना त्या दिव्याच्या कसोटीला उतरावें लागत होतें. तेव्हां हिंदुस्थानची घटना तयार करण्यासाठीं हीं निवडक रत्नें दूर लंडनमध्यें एकत्र जमलीं होतीं. मग तिसरी गोलमेज परिषदही सन १९३२ मध्यें भरली. कितीतरी कमेटया बसल्या व

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे कितीतरी सभासद त्या कमेटचांत सभासदत्व मिळविण्यासाठीं धडपडत होते. हेतु हा कीं वैयक्तिक ऐषआराम आणि सार्वजनिक कर्तव्य यांचा गोड मिलाफ साधतां यावा. सार्वजनिक पैशाच्या जोरावर असे किती तरी लोक गेले. नंतर सन १९३३ मध्यें हिंदी सभासदांचा समावेश असलेली संयुक्त कमेटी आली, आणि पुन्हा त्या कमेटीसमोर साक्ष देण्याला जाणारांना उदारधी सरकारनें प्रवास खर्च दिला. असे अनेक लोक भारतमातेची सेवा करण्याच्या कळकळीनें सार्वजनिक पैशानें समुद्र ओलांडून गेले, व कांहींतर प्रवास खर्चाचा अधिक पैसा मिळावा म्हणून झटले-तंडले देखील! ...हिंदी जनतेच्या चळवळीच्या कार्यक्षमतेला भिऊन हे मायावी मतलबसाधूंचे ( Vested interests ) प्रतिनिधी इंग्रजी-साम्राज्यशाहीच्या ढालेआड लंडनमध्यें जमा झाले होते. यांत नवल वाटण्याजोगें कांहीं नव्हतें. पण आपली मायभू अशा जीवन–मरणाच्या झगडयांत गुंतली असतां कोणाही हिंदी माणसानें असें वागावें याचा आमच्या ठायींच्या राष्ट्रवादाला विषाद वाटे. तथापि एका परीनें आमच्यांतल्या अनेकांना हें बरेंही वाटलें. तें अशासाठीं कीं हिंदुस्थानांतील प्रतिगामी तत्त्व पुरोगामी तत्त्वापासून असें अनायासें अलग होऊन दिसलें. अर्थात् आमचा हा तेव्हांचा विचार चुकीचा होता असें मग दिसून आलें. हें पृथक्करण जनतेला राजकीय शिक्षण देण्याच्या कामीं उपयोगी पडेल व सर्व तत्संबंधीयांची खात्री पटवून द्यायला उपयोगी पडेल. तें असें कीं केवळ स्वातंत्र्य मिळाल्यानेंच आपण सामाजिक प्रश्न विचारांत घेऊं शकतों व जनतेच्या डोकीवरचा भार हलका करूं शकतों.'

गांधीजी जातीयतेच्या प्रश्नाला प्राणांतिक उपोषणाचें भयंकर मोल द्यावयाला देखील तयार होते. यांची हीं कारणें. मुख्य प्रधानांनीं अखेर तो जातीय निवाडा ता. १८।८।१९३२रोजीं दिलाच. गांधीजी तेव्हां येरवडयाच्या तुरुंगांत होते. इतर सारे थोर थोर कॉंग्रेस पुढारीही कुठच्या ना कुठच्या तुरुंगांत डांबून पडले होते. तुरुंगांतूनच गांधींजींनीं अस्पृश्यांवरील व साऱ्या हिंदु धर्मावरील या अन्यायाच्या परिमार्जनासाठीं प्राणांतिक उपवास करण्याचा घोर निर्धार जाहीर केला. सारें राष्ट्र त्या धक्क्यानें हादरलें.

• • •

# १३ हरिजनांसाठीं काँग्रेस व गांधीजी

हिंदुस्थानला अस्पृश्यता हा जणूं एक जिवंत शाप मिळालेला आहे. फार प्राचीन काळापासून अस्पृश्यतेचा हा महारोगापेक्षांही भयंकर महारोग हिंदुस्थानच्या अंगावर फुटलेला आहे. आणि त्यांत अतिशय वाईट वाटण्यासारखी गोष्ट ही कीं हिंदु धर्म व हिंदु समाज ह्या महारोगाची खंत वाटण्याइतका अजून जागा झालेला नाहीं !

काँग्रेस अगदीं आरंभापासून अस्पृश्यतेचा प्रश्न हाताळीत आली आहे. पण सन १९२० सालापावेतों अस्पृश्यतानिवारणासाठीं केवळ पोकळ कंठाळी ठराव पास करून दप्तरांत बांधून ठेवण्यापलीकडे काँग्रेसनेंही अस्पृश्यांसाठीं कांहीं सुद्धां केलें नाहीं.

महात्मा गांधींचा काँग्रेसच्या क्षितिजावर उदय झाल्यावर सन १९२० सालापासून काँग्रेस ह्या अस्पृश्यतेच्य प्रश्नाकडे खऱ्या कळकळीनें पाहूं लागली. या प्रश्नाविषयीं बेफिकीर व उदासीन असणारी सनातनी प्रतिगामी वृत्ति काँग्रेसमध्यें पूर्वीं होती ती यामुळें एकदम अजिबात नष्ट झाली असें नाहीं. परंतु सूर्योदय झाल्यावर अंधार लोपूं लागतो तशी गांधीजी काँग्रेसमध्यें आल्यापासून ती सनातनी वृत्ति हळूहळू मावळण्याच्या पंथाला लागली. गांधीजींनीं या अस्पृश्यतेचें वर्णन पुढील जळजळीत शब्दांत केलें आहे. 'घडाभर दूध आर्सेनिक विषाच्या एका थेंबानें नासतें त्याप्रमाणें अस्पृश्यतारूपी कलंकानें हिंदुधर्माचें सर्व शरीर दूषित होत चाललें आहे. . . . हा अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न स्वराज्यापेक्षांही जास्त महत्वाचा आहे. . . . अस्पृश्यता निवारण करून मला अस्पृश्यांची शुद्धि करावयाची नाहीं ; तर माझी स्वतःची व हिंदू धर्माची शुद्धि करावयाची आहे. . . . अस्पृश्यता ही हिंदुधर्माच्या मुळाशीं लागलेली कीड आहे. . . . अस्पृश्यता हें जातिधर्माचें अत्यंत तिरस्करणीय स्वरूप आहे. म्हणून आपणामधून अस्पृश्यतेचें उच्चाटन करा. अस्पृश्यता ही

शास्त्रसंमत नाहीं. तो सैतानी डाव आहे. . . . अस्पृश्यता हें हिंदुधर्म–वृक्षावरचें एक बांडगूळ आहे. . . . देवदासीची पद्धत किंवा देवीला बकरा बळी देण्याची पद्धत यासारखीच अस्पृश्यता ही हिंदुधर्मांतील टाकाऊ वस्तू आहे. . . . अस्पृश्यतेचा कलंक हिंदूंनीं आपल्या पवित्र धर्मावर कायम ठेवला तर ते स्वातंत्र्याला कधींच लायक ठरणार नाहींत. . . . अस्पृश्यता जिवंत राहील तर हिंदु धर्म मरण पावेल. अस्पृश्यता जिवंत राहिल्यानेंच हिंदु धर्म जगणार असेल तर तसला हिंदु धर्म मेलेला बरा.'

दुसऱ्या गोलमेज परिषदेंत अस्पृश्यांतर्फे सरकारनियुक्त प्रतिनिधि डॉ. आंबेडकर यांनीं सरकारचा पाठिंबा आपल्या अस्पृश्य जमातीला मिळविण्यासाठीं विभक्त मतदार संघाची मागणी केली. तेव्हां 'अस्पृश्यांचें हित अस्पृश्यालाच कळत नाहीं का ? ' असा प्रश्न टीकाकारांनीं गांधीजींना केला. तेव्हां आपण काँग्रेसच्या वतीनें अस्पृश्यांसाठीं देखील संयुक्त मतदार संघाची मागणी कां करतों हें समजावून सांगतांना गांधीजींनीं उद्‌गार काढले, 'प्रत्येक अस्पृश्याप्रमाणें डॉ. आंबेडकरांनाही माझ्या तोंडावर थुंकण्याचा अधिकार आहे व त्यांनीं तसें केलें तर मी हंसतच राहीन.'

इतका अस्पृश्यतानिवारणाचा व मतदानाचा प्रश्न गांधीजींच्या जिव्हाळ्याचा होऊन बसला होता. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देण्यांतील सरकारचें फोडा झोडा आणि राज्य करा हें धोरण गांधीजींना पूर्ण माहीत झालें होतें. त्यांनीं मुख्य प्रधानांचा जातीय निवाडा जाहीर झालेला पहातांच त्या अन्यायाचें निराकरण व्हावें या हेतूनें येरवडयाच्या तुरुंगांत असतांनाच प्राणांतिक उपोषण ता. २० सप्टेंबर १९३२ रोजीं सुरू केलें. त्या वेळीं त्यांनीं आपल्या उपोषणाचा हेतु पुन्हा एकवार स्पष्ट करून सांगितला, 'केवळ स्वतंत्र मतदार संघाविरुद्धच मी हा उपवास करीत आहें. अल्पसंख्याकांसाठीं कायदेशीर रीतीनें राखीव जागा ठेवाव्या याविरुद्ध माझा उपवास नाहीं. अस्पृश्यतेविरुद्ध मी चालविलेला लढा हा मानवी समाजांत जें जें अशुद्ध आहे त्याविरुद्ध चालविलेला लढा होय.'

गांधीजींचें प्राणांतिक उपोषण सुरू होतांच सर्व जनतेची भावना गदगदून हलूं लागली. देशांतील सर्व जबाबदार पुढाऱ्यांना धक्का बसला. केवळ काँग्रेसचे मानवंत पुढारीच नव्हेत तर सप्रू, जयकर, मालवीय, बिर्ला, टागोर

अशा देशांतील सर्व मतांच्या पुढाऱ्यांची ह्या प्रसंगांतून निभावण्यासाठीं कळकळीची तारांबळ उडाली. देशांतील या सर्व पुढाऱ्यांची परिषद या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं पुण्यांत भरली. डॉ. आंबेडकर यांना भेटून त्यांची परोपरीनें मनधरणी करून त्यांचें मन वळविण्याची सर्वांनीं अगदी पराकाष्टा केली. साऱ्या देशभर अस्पृश्यतानिवारणाची प्रचंड लाट उसळली. पुढाऱ्यांच्या परिषदेंत पांच दिवसपावेतों या प्रश्नावर वाटाघाटी झाल्या. आणि अखेर डॉ. आंबेडकरांनींही नमतें घेतलें. सर्वांच्या मतें मग या बाबतींत 'येरवडा करार' या नांवानें ओळखला जाणारा ऐतिहासिक करार झाला.

त्या कराराप्रमाणें सर्वानुमतें निर्णय घेण्यांत आले ते असे : स्वतंत्र मतदार संघाचें उच्चाटन व्हावें. संयुक्त मतदार संघ असावा व अस्पृश्यांसाठीं राखीव जागा ठेवण्यांत याव्या. अस्पृश्यानीं चार प्रतिनिधी आधीं निवडावे व त्या चारांतून एकाची निवड स्पृश्यास्पृश्य हिंदु समाजानें संयुक्त मतदार संघामार्फत करावी. मध्यवर्ति विधिमंडळाचा प्रश्न पुढें उत्पन्न होईल तेव्हां शेंकडा अठरा जागा अस्पृश्यांना द्याव्या. ही दुहेरी निवडणूक केव्हांही रद्द व्हावी. मात्र ती अधिकाधिक दहा वर्षांपुढें टिकूं नये.

याप्रमाणें एकदांच हा येरवडा करार झाला. गांधीजींनीं त्याच दिवशीं सायंकाळीं उपवास सोडला. गोलमेज परिषदेच्या समुद्रमंथनांतून सरकारच्या हातचलाखीनें निघालेलें हें जातीय निवाड्याचें हालाहल गांधीजींच्या मुखानें काँग्रेसनें असें पचविलें.

उपवास सोडल्यानंतर गांधीजींनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें व अस्पृश्यतानिवारणाची सर्व जबाबदारी स्पृश्य हिंदु समाजावर आहे असें स्पष्ट सांगितलें. 'ही जबाबदारी पार पाडण्यांत कसूर झाली तर मी पुन्हा प्राणांतिक उपोषण करीन. माझे प्राण मी हरिजनांकडे ओलीस ठेवले आहेत' असा संदेश त्यांनीं दिला. यापुढें 'अस्पृश्य' हें तुच्छतादर्शक नांव न वापरतां 'हरिजन' ही गौरवाची संज्ञा उपयोगांत आणावी असाही निश्चयपूर्वक संदेश त्यांनीं दिला.

तेव्हांपासून 'अस्पृश्य' ह्या शब्दाऐवजीं 'हरिजन' हा गौरवपर शब्द प्रचारांत आला.

• • •

# १४ दडपशाहींतील अज्ञातवास

लॉर्ड विलिंग्डन या हुकुमशहा व्हॉइसरॉयच्या दडपशाही कारकीर्दीचा वरवंटा हिंदुस्थानवर पूर्ण वेगानें फिरत होता. त्या दडपशाहीमुळें काँग्रेसच्या चळवळींत गुप्तपणा शिरला होता व चळवळ मंदावतही चालली होती. गांधीजींच्या उपासाच्या निमित्तानें पुण्यांत एकत्र जमलेल्या काँग्रेस पुढाऱ्यांनीं या परिस्थितीचाही शांतपणें विचार केला. सत्याग्रहाच्या चळवळींत कोणत्याही प्रकारचा गुप्तपणा असणें योग्य नाहीं असा गांधीजींचाही अभिप्राय होता व सर्व पुढाऱ्यांचें मतही तेंच होतें. ही चळवळ अशी गुप्तपणें सरकारच्या दडपशाहीला भिऊन चालविण्यांत येऊं नये असें ठरलें. काँग्रेस तेव्हां बेकायदा ठरली होती. एकामागून एक थोर थोर काँग्रेस पुढारी बेकायदा काँग्रेसचे सर्वाधिकारी अध्यक्ष होऊन तुरुंगांत डांबले गेले होते. सन १९३२ सालीं दिल्लीला काँग्रेसचें अधिवेशन सरकारच्या मनाईला न जुमानतां भरविण्यांत आलें होतें. काँग्रेसची चळवळ उघडपणें चालूं लागतांच सरकारची दडपशाहीही उघडपणें वाढूं लागली. सन १९३३ च्या आरंभापासून सरकारी दडपशाहीला चांगलाच जोर चढला. श्री. राजगोपालाचारी यांच्यामागून काँग्रेसचे अध्यक्ष नेमिले गेलेले बाबू राजेंद्रप्रसाद ता. ६–१–१९३३ रोजीं पकडले गेले.

दरम्यान गांधीजींनीं हरिजनांच्या उध्दारासाठीं व आत्मशुद्धिसाठीं येरवड्याच्या तुरुंगांत ता. ८–५–१९३३ रोजीं उपवास सुरू केला. आधींच गांधीजींची प्रकृति खालावलेली. त्यांत नुकतेच ते प्राणांतिक उपोषणांतून निभावले होते. त्यांच्या प्रकृतीवर ह्या नव्या उपासाचा विपरीत परिणाम होईल या भीतीनें सरकारला त्यांची सुटका करावी लागली.

सुटका झाल्यानंतर गांधीजींनीं देशांतील एकंदर परिस्थितीचा विचार करून सरकार व काँग्रेस या दोन पक्षांत तडजोडीची भूमिका निर्माण करण्याच्या

पवित्र हेतूनें कायदेभंगाची चळवळ सहा आठवडे बंद ठेवावी अशी तेव्हां नेमले गेलेले काँग्रेसचे अध्यक्ष श्री. बापूजी अणे यांना विनंति केली. त्याप्रमाणें अध्यक्षांनीं चळवळ सहा आठवडे बंद ठेवली.

पण सरकारचा दडपशाही ताठरपणा एवढ्यानेंही मुळींच कमी झाला नाहीं. काँग्रेसनें चळवळ नुसती तहकूब करणें म्हणजे ती हवी तेव्हां पुन्हा चालू करण्याची पूर्वतयारी करून ठेवणें होय असा त्याचा अर्थ धूर्त सरकारनें केला. सरकारला काँग्रेसनें चळवळ कायमची बंद करायला हवी होती.

ह्या प्राप्त परिस्थितीचा विचार करण्यासाठीं पुन्हा पुणें येथें ता. १२ जुलै १९३३ रोजीं काँग्रेस पुढाऱ्यांची परिषद भरली. त्या परिषदेंत देखील जे निर्णय घेण्यांत आले ते गुळमुळीत होते. धड कायदेभंग सुरू ठेवावा असेंही नाहीं आणि बंद ठेवावा असेंही नाहीं. काँग्रेसच्या इभ्रतीचा प्रश्न तेव्हां आड आला असावा. पण अखेर सामुदायिक कायदेभंग मागें घेण्यांत आला व कायदे-भंग युद्धाचे बालेकिल्ले असलेल्या सर्व काँग्रेससंस्था आणि युद्धमंडळें बंद करण्यांत आलीं. वैयक्तिक कायदेभंगाला मात्र मान्यता देण्यांत आली.

खुद्द महात्मा गांधींनीं ता. १–८–१९३३ रोजीं साबरमती आश्रमाचा त्याग करून वैयक्तिक कायदेभंगाला मुहूर्त करून दिला. त्यांना अटक होऊन एक वर्षाची शिक्षा झाली. तुरुंगांत त्यांनीं हरिजनोद्धाराचें कार्य करण्यासाठीं आपणाला पूर्वीच्या तुरुंगवासासारख्या सवलती मिळत नाहींत असें पाहून पुन्हा ता. २० ऑगस्ट १९३३ रोजीं उपवास सुरू केला. सरकारनें लगेच दोन दिवसांनीं त्यांची सुटका केली.

पण आपल्या शिक्षेंतील राहिलेली मुदत पूर्ण होईपावेतों गांधीजींनीं राज-कारणांत न पडण्याचा निर्बंध आपणावर घालून घेतला व हरिजनोद्धाराच्या कार्याला स्वतःला वाहून घेतलें. परंतु गांधीजींनीं जो वैयक्तिक कायदेभंगाच्या चळवळीचा मुहूर्त करून दिला, तेव्हापासून ती चळवळ देशभर चांगलीच फोंफावली. हजारोंनीं त्यांत भाग घेतला, हालअपेष्टा भोगल्या व तुरुंगवास पत्करला. पण हाय म्हटलें नाहीं; कच खाल्ली नाहीं.

सन १९३३ च्या सप्टेंबरमध्यें कलकत्त्याला काँग्रेसचें अधिवेशन भरलें. अर्थात् तें बेकायदा काँग्रेसचें अधिवेशन होतें. त्या अधिवेशनावर लाठीहल्ला झाला, धरपकड झाली, अनेकांना शिक्षा ठोठावून तुरुंगांत डांबण्यांत आलें.

तथापि त्या दडपशाहीला न जुमानतां काँग्रेसनें ठराव करून कायदेभंगाची चळवळ हें राष्ट्रीय स्वाभिमानाची भरपाई करण्याचें व राष्ट्रीय ध्येय साध्य करण्याचें न्याय्य साधन आहे असें ठरविलें. सरकारनें घोषित केलेली श्वेतपत्रिकेंतील स्वराज्ययोजना हिंदुस्थानच्या हितरक्षणाला विघातक असून हिंदुस्थानावरील परकीय सत्ता कायम ठेवण्याकरितां तयार करण्यांत आली आहे हें लक्षांत ठेवून हिंदुस्थानचे लोक या योजनेनें फसून जाणार नाहींत असा विश्वासही काँग्रेसनें प्रगट केला. तसेंच हिंदुस्थानांत चाललेल्या लष्करी कायद्याचा निष्ठुर दडपशाही कारभार जोंपावेतों चालू आहे तोंपावेतों इंग्रज सरकारनें तयार केलेली कोणतीही योजना विचार करण्यालायक अथवा स्वीकारण्यालायक आहे असें हिंदी लोक कधींही समजणार नाहींत असा निर्वाळा देऊन सरकारी श्वेतपत्रिकेची चुरगळलेल्या कागदाच्या चिठोऱ्याइतकी किंमत ठरविली. परदेशी कापडावर बहिष्कार पुकारण्यांत आला. विलायती मालावर-सर्व परदेशी मालावर नव्हे तर फक्त सर्व विलायती मालावर—बहिष्कार टाकण्यांत आला. कायदेभंगाच्या चळवळीला अधिक बळकटी आणावी व लोकांनीं ती चळवळ अधिक नेटानें चालवावी अशी काँग्रेसनें विनंति केली.

कायदेभंगाच्या चळवळींतील गुप्तपणा आतां दूर करण्यांत आला होता. अर्थात् उघड चळवळ करणें म्हणजे हालअपेष्टांची व तुरुंगवासाची जोड करणें होय हें उघड होतें. ज्या काँग्रेस सेवकाला तुरुंगांत जाणें कोणत्याही परिस्थितींत शक्य नसेल त्यानें कायदेभंगाच्या चळवळींत न पडतां हरिजनांच्या सेवेचें विधायक कार्य करावें असेंही सांगण्यांत आलें.

हरिजनांच्या उद्धारासाठीं गांधीजींनीं दहा महिनेपावेतों देशभर दौरा काढला. त्या दौऱ्यामुळें हरिजनांकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन पुष्कळच पालटला. इतके दिवस हरिजनांना प्रवेशबंदी असलेलीं अनेक देवमंदिरें हरिजनांसाठीं मोकळीं झालीं. अनेक विहिरी, तळीं, पाणवठे यांवर पाणी भरण्याला हरिजनांना मोकळीक मिळाली. अर्थात् हिंदु समाजाच्या अंगीं धर्माच्या व रूढीच्या नांवांवर हजारों वर्षें भिनलेला हरिजनांविषयीचा लाजिरवाणा हीनभाव गांधीजींच्या दौऱ्यांत साराच एकदम कमी होणें शक्य नव्हतें. पण तोंपावेतों आमच्यापैकीं पुष्कळजण हरिजनांना आमच्यासारखींच माणसें

मानायला जे तयार नव्हते त्यांना हरिजन हे देखील आपल्यासारखीं माणसेंच आहेत असें तरी पटूं लागलें हें काय थोडें झालें ?

गांधीजींच्या या हरिजन दौऱ्यांतील महत्त्वाचा महिना म्हणजे डिसेंबरचा. त्रावणकोरमधील गुरुवायुर मंदिराच्या विश्वस्तांना तेथील हरिजनसेवक केलापन यांनीं हरिजनांना मंदिरप्रवेश मिळण्यासाठीं तिन महिन्यांची नोटीस दिली होती. या प्रश्नाचा ता. १ जानेवारी १९३४ रोजीं अखेरचा सोक्षमोक्ष व्हावयाचा होता. ह्या दिवशीं कदाचित केलापन आणि गांधीजी ह्या दोघांवरही प्राणांतिक उपवास करण्याची पाळी आली असती.

परंतु त्या अडचणींतून एक उपाय निघाला. मंदिरांत जाऊन ईश्वराची पूजा करणाऱ्या लोकांची ह्या बाबतींत सार्वत्रिक मतमोजणी करून मंदिरप्रवेशाचा प्रश्न सोडवावयाचें सर्वानुमतें ठरलें. हिंदुस्थानांत या प्रकारचा हा पहिलाच प्रयोग होता. या मतमोजणीच्या वेळीं शेंकडा पाऊणशें लोकांनीं मंदिर प्रवेशाला अनुकूल मतें दिलीं. शेंकडा तेरा विरुद्ध मतें पडलीं आणि सुमारें शेंकडा दहा मतदार तटस्थ राहिले. ह्या सार्वजनिक मतमोजणींतील अतिशय महत्त्वाची व कौतुक करण्याची गोष्ट म्हणजे हरिजनांच्या मंदिर प्रवेशाला अनुकूल पडलेल्या एकूण पंधरा हजार पांचशें त्रेसष्ट मतांत आठ हजार स्त्रियांनीं अनूकूल मतें दिलीं होतीं !

ही गुरुवायुर मंदिराबाबतची गोष्ट गांधीजींच्या हरिजन दौऱ्याच्या इतिहासांत ज्याप्रमाणें सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी घडली, तशीच एक अपशकून करणारी गांधीजींच्या प्राणावर बेतणारी गोष्टही घडली. मद्राससारख्या कट्टर सनातनी प्रांतांत हरिजनविरोधकांनीं गांधीजींना काळीं निशाणें दाखविलीं यांत कांहीं नवल नाहीं. पण कोटयवधि हरिजनांना म्हणजे आपल्याच हिंदु बांधवांना माणसांसारखें जगूं देण्याचा मार्ग मोकळा करून देण्यासाठीं इतक्या म्हातारपणीं स्वतःच्या जीविताची देखील पर्वा न करतां झटणाऱ्या गांधीजींचा जीव घेण्याचा प्रयत्न एका माणसाकडून व्हावा हें विशेष.

आणि योगायोगही असा विचित्र कीं पुढें ज्या पुण्यांत गांधीजींना ठार मारणारा मारेकरी ब्राह्मण राहात होता त्याच पुण्यांत गांधीजींना ठार करण्याचा हा पहिला प्रयत्न झाला ! अगदीं आरंभापासून गांधीजींच्या राजकारणाचे पाय मागें ओढण्याचे प्रयत्न या पुण्यांतूनच झाले. ता. २५ जून १९३४ रोजीं

गांधीजी आपल्या दौऱ्यांत पुण्याला आले. तेव्हां त्यांना मानपत्र देण्याचें नगरपालिकेनें ठरविलें. त्या समारंभासाठीं गांधीजी संध्याकाळीं पांच वाजतां मोटारींतून नगरभवनाकडे निघाले. त्यापूर्वीं कांहीं पळें ल. ब. भोपटकर यांची मोटार नगरभवनाकडे गेली. तीच गांधीजींची मोटार असें समजून ती नगरपालिकेच्या इमारतीसमोर जातांच तिच्यावर बाँब फेंकण्यांत आला. सुदैवानें ही बाँबफेक अनर्थकारक ठरली नाहीं. गांधीजी अर्थात सुखरूपपणें आपल्या मोटारींतून उतरून आंत गेले आणि त्यांनीं मानमत्र स्वीकारलें. तो बाँबफेक्या गुन्हेगार मात्र सरकारनें त्याला पकडून देणाराला चांगलें बक्षीस लाऊनही पकडतां आला नाहीं. पुण्यानें तो लपवून ठेवला.

आणखी कांहीं काळानें ता. १६ जानेवारी १९३४ रोजीं बिहारमध्यें भयंकर धरणीकम्प झाला. गांधीजी व पं. नेहरू तेव्हां नुकतेच पांच महिन्यांपूर्वीं कारागृहांतून सुटून मोकळे होते ते जातीनें धरणीकंपपीडितांच्या सहाय्याला धांवून गेले. जनतेला देवाप्रमाणें वंद्य असलेले हे दोन पुढारी पीडितांच्या सेवेला झटूं लागल्यामुळें पीडानिवारणाचें काम पुष्कळच सुलभ झालें.

बिहारमधून नेहरू कलकत्त्याला गेले. तेथें त्यांचीं दोन भाषणें झालीं, व ते अलाहाबादला आपल्या घरीं माघारें आले. तोंच त्यांना त्या भाषणाबद्दल पकडून कलकत्त्याला नेण्यांत आलें व शिक्षा ठोठावण्यांत आली.

# १५ कायदे मंडळाच्या वाटेवर काँग्रेस

पुणें येथें जुलै १९३३ मध्यें जी काँग्रेसच्या व इतर पुढाऱ्यांची परिषद् झाली त्या परिषदेपासूनच कौन्सिल प्रवेशाची भाषा निघूं लागली. बहुतेक काँग्रेस पुढाऱ्यांना देखील आतां वाटूं लागलें होतें कीं कायदेभंगाच्या चळवळींत सरकारच्या अमानुष दडपशाहीमुळें होणाऱ्या कुचंबणेंतून बाहेर पडण्या-

साठीं कायदेमंडळांत प्रवेश करणें अवश्य आहे. काँग्रेसकार्यकर्त्यांची काँग्रेस-वरील व कायदेभंगावरील श्रद्धा जरी अढळ होती तरी सरकारच्या भयंकर दडपशाहीला तोंड देत कायदेभंगाची मोहीम तशीच नेटानें पुढें चालविण्या-इतकें त्राण त्यांच्या अंगीं उरलें नव्हतें. त्यामुळें काँग्रेसनें फेरविचार करून नवें धोरण स्वीकारावें अशी विचारसरणी काँग्रेस कार्यकर्त्यांत दिवसेंदिवस बळावत चालली होती.

अखेर ता. ३१ मार्च १९३४ रोजीं दिल्लीला डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्ष-तेखालीं ठळक ठळक काँग्रेसकार्यकर्त्यांची सभा होऊन नव्या धोरणाविषयीं विचारविनिमय झाला. बऱ्याच कांग्रेसजनांच्या मताचा वारा कौन्सिलप्रवेशा-च्या दिशेनें वाहू लागला आहे असें त्या सभेंतही उघडपणें दिसून आलें. अर्थात् आतां कॉंग्रेसच्या धोरणाचा त्या दृष्टीनें फेरविचार करणें प्राप्त झालें. जे काँग्रेसजन कौन्सिलांत प्रवेश करण्याला उत्सुक असतील त्यांना मदत करावी असें त्या सभेंत ठरलें व लौकरच होणाऱ्या मध्यवर्ति कायदे मंडळाच्या निवडणुकींत भाग घेण्याला परवानगी देण्यांत आली. आपण काँग्रेसचें धोरण कायदेमंडळांतही पाळूं हें नैतिक बंधन मात्र कायदेमंडळांत जाणाऱ्या काँग्रेस-जनांनीं पाळावयाचें असें ठरलें. असहकारितेच्या आरंभींच्या काळांत कायदे-मंडळावर विश्वास ठेवणारा जो स्वराज्य पक्ष स्थापन झाला होता व त्यानंतर जो आजवर अगदीं गारठला होता त्याला पुनर्जीवन द्यावें असेंही ठरलें.

गांधीजी तेव्हां बिहारांत धरणीकंपपीडितांची सेवा करण्यांत गुंतले होते. त्यांना हा दिल्लीला घेण्यांत आलेला निर्णय मान्यतेसाठीं डॉ. अन्सारी, भुलाभाई देसाई व डॉ. बिधनचंद्र रॉय या शिष्टमंडळामार्फत कळविण्यांत आला.

गांधीजींचा कायदेमंडळावर व असल्या सनदशीर चळवळीवर विश्वास नाहीं ही गोष्ट सन १९२० सालीं असहकारितेची मोहीम सुरू होतांनाच उघड झाली होती. तरी देखील गांधीजी काँग्रेसमध्यें आपलेंच म्हणणें खरें असें म्हणणारे हट्टाग्रही हुकुमशहा नव्हते. त्यांनीं एकंदर परिस्थितीचा सूक्ष्म विचार केला व स्वराज्य पक्षाच्या पुनरुज्जीवनाचें स्वागत करून निवड-णुकीला मान्यता दिली. जे कायदेमंडळांत भाग घेत नव्हते व ज्यांचा कायदे-मंडळावर विश्वास होता अशा काँग्रेसजनांना स्वतःच्या विश्वासाप्रमाणें वाग-

ण्याचा हक्क आहे हें गांधीजींनीं डॉ. अन्सारींना पाठविलेल्या पत्रांत मनमोकळेपणानें मान्य केलें व या मंडळीला आपली मदत आहे असेंही कळविलें.

त्याच दिवशीं गांधीजींनीं काँग्रेसमधील व देशांतील एकंदर गोंधळलेल्या परिस्थितीबद्दल जनतेला जाणीव करून देऊन मार्गदर्शन करणारें पत्रक प्रसिद्ध केलें. त्या पत्रकांत त्यांनीं कायदेभंगाच्या चळवळीच्या अपयशाची कळवळून फोड केली. सामान्य जनतेला सत्याग्रहाचा संदेश भेसळीच्या स्वरूपांत दिला गेला यामुळें सत्याग्रहाचें पूर्ण व सत्य स्वरूप जनतेला कळलें नाहीं हें त्यांनीं कबूल केलें. स्वराज्याकरितां चालू असलेला कायदेभंग तहकूब करण्याची वेळ प्राप्त झाली आहे हेंही त्यांनीं आत्मनिरिक्षण करून ओळखलें. कायदेभंग करण्याचा अधिकार कायदेभंगाचा निर्माता व विधाता या नात्यानें यापुढें एकट्या आपणालाच असावा असें त्यांनीं सुचविलें. यापुढें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीतीनें पूर्ण स्वराज्याकरितां कायदेभंग करण्याला प्रवृत्त झालेल्या सर्व लोकांनीं त्यापासून परावृत्त व्हावें हाच मार्ग हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धांत यश मिळविण्याच्या दृष्टीनें योग्य आहे अशी आपली खात्री असल्याचें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. दहशहतवादी म्हणविणारे लोकही गांधीजींच्या अहिंसात्मक प्रयत्नाला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं पूर्ण वाव मिळावा म्हणून आपली दशहतवादी चळवळ थोपवून तूर्त स्वस्थ बसले होते. पण त्यांचा दहशतादावरचा विश्वास पूर्ण उडाला होता असा त्याचा अर्थ नव्हे. या दहशतवादी लोकांचा व सर्व देशाला नामर्द बनवून त्यांचा नायनाट करूं पाहाणाऱ्या राज्यकर्त्यांचा हृदयपालट घडवून आणणारें अंतःकरण हलवून सोडणारें सत्याग्रह हें अमोघ शस्त्र होतें खरें; पण तें शस्त्र ज्याला पेलतां येईल त्याला त्याचा उपयोग. पुष्कळ लोकांनीं निष्काळजीपणें व बेजबाबदारीनें त्या शस्त्राचा उपयोग केला त्यामुळें त्याचे परिणाम वरवर दिसायला जरी भव्य दिसत असले तरी त्यांचा दहशतवाद्यांच्या अथवा सरकारी वर्गाच्या अंतःकरणावर कांहींच परिणाम झालेला दिसेना. ही गोष्ट गांधीजींनीं नजरेआड केली नाहीं. म्हणूनच त्यांनीं काँग्रेसकार्यकर्त्यांची कुवत व अधिकार ओळखून वरच्यासारखा निर्णय दिला.

याप्रमाणें कायदेभंगाच्या चळवळीबाबतच्या आपल्या जबाबदारींतून मुक्त झालेल्या पण कायदेभंग मान्य असणाऱ्या मंडळींनीं पुढें काय करावें हा प्रश्न

आतां ओघानेंच उत्पन्न झाला. त्यांना गांधीजींनीं सांगितलें कीं ' राष्ट्राकडून ज्या ज्या वेळीं सत्याग्रहाची आज्ञा मिळेल त्या त्या वेळीं तयार राहाण्यासाठीं या कलेचा सतत पूर्ण अभ्यास करा. अहंकाररहित बुद्धीनें व स्वखुषीनें पत्करलेल्या दरिद्रतेंत किती मौज आहे याचा अनुभव घ्या. राष्ट्राची वाढ करणाऱ्या चळवळींत भाग घ्या. स्वतः सूत कांता, खादी विणा व देशभर खादीचा प्रचार करा. जातीजातींत सलोखा नांदावा यासाठीं अंतःकरणापासून खटपट करा. कोणत्याही स्वरूपांत समाजांत यापुढें अस्पृश्यता राहतां कामा नये यासाठीं मनापासून झटा. दारू व इतर मादक वस्तु यांना पूर्ण आळा घालण्याचा प्रयत्न करा ...'

गांधीजींनीं कायदेभंगवादी मंडळींना असेंही समजावून सांगितलें कीं ज्या लोकांना कायदा व अधिकार यांना स्वखुषीनें मान देणें हें आपलें कर्तव्य आहे असें कळतें त्यांच्यासाठींच कायदेभंग आहे.

गांधीजींच्या या पत्रकाचा फार चांगला परिणाम झाला. सामुदायिक चळवळ या दृष्टीनें कायदेभंग तहकूब ठेवण्यांत आला. कौन्सिलप्रवेशाच्या कार्यक्रमावर काँग्रेसची नौका आदळून फुटते कीं काय अशी जी भीति उत्पन्न झाली होती ती नष्ट झाली. ज्या कौन्सिलप्रवेशासारख्या सनदशीर चळवळीच्या बुद्धिवान कैवाऱ्यांना काँग्रेसच्या कार्यांत उदासीनता वाटत होती त्यांना त्यांच्या बुद्धीप्रमाणें कार्य करून पाहण्याची संधी मिळाली. आपला पूर्वींचा स्वराज्य पक्ष पुन्हा जिवंत करण्यासाठीं काय उपाय योजावे याचा विचार करण्याकरितां रांची येथें मे १९३४ च्या आरंभीं एक परिषद बोलावण्यांत आली. गांधीजींचो कौन्सिलप्रवेशाला मान्यता मिळाली खरी. पण गांधीजी म्हणजे काँग्रेस हें जरी खरें असलें तरी कायदेभंगावर प्रामाणिक निष्ठा असलेले सुजाण काँग्रेसपुढारी अगदींच थोडे नव्हते. हें ध्यानीं घेऊन गांधीजींच्या योजनेला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचा पाठिंबा मिळावा हाही रांचीच्या परिषदेंतील एक मुख्य हेतु होता. रांचीच्या परिषदेंत कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठीं कार्यक्रम निश्चित करण्यांत आला. राष्ट्राच्या वाढीला आड येणारे व पूर्ण स्वराज्यप्राप्तीच्या कामीं अडथळा आणणारे सर्व कायदे रद्द करावे, सर्व राजकीय कैद्यांच्या मुक्ततेचा प्रयत्न करावा, देशाची पिळणूक करणारे कायदे व ठराव कायदेमंडळापुढें येतील

त्यांना विरोध करावा, ग्रामसंघटना करावी, चलन, हुंडणावळ, शेतकी या बाबतींत सुधारणा घडवून आणावी व काँग्रेसचा विधायक कार्यक्रम अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा असें ठरलें.

या प्रमाणें काँग्रेसच्या चळवळीची गाडी कायदेभंग व कायदेमंडळांतील सनदशीर राजकारण या सांध्यावरून कायदेमंडळाच्या दिशेनें चालवायला सुरुवात झाली.

• • •

# १६ गांधीजी काँग्रेस सोडणार !

रांची येथील स्वराज्य पक्षाच्या पूर्वोक्त परिषदेनंतर लौकरच मे १९३४ मध्यें पाटणा येथें काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. त्या बैठकींत सविनय कायदेभंगाची चळवळ तहकूब करण्यांत आली व कौन्सिल प्रवेशाला मान्यता देण्यांत आली.

हा निर्णय घेतांना वर्किंग कमिटींत कडाक्याचे वादविवाद झाले. सविनय कायदेभंगाची चळवळ बंद ठेवूं नये व टाकाऊ सनदशीर राजकारणाकडे वळूं नये या मताचे नाफेरवादी सभासद जे वर्किंग कमिटींत होते त्यांना हा बदललेला पवित्रा मुळींच मान्य नव्हता. तसेंच स्वराज्य पक्षीयांखेरीज समाजवादी विचारसरणीचे सभासदही वर्किंग कमिटींत होते. त्यांचा कौन्सिलप्रवेशाला जसा विरोध होता तसाच गांधीवादी विचारसरणीलाही विरोध होता. गांधीवादी विचारसरणीनुसार काँग्रेसमध्यें आघाडीला कार्य करतां करतां जगांतील घडामोडींकडे व इतिहासाकडे पाहून त्यांना जें ज्ञान झालें होतें त्यांतूनच काँग्रेसमध्येंही समाजवादी विचारसरणी जन्म पावली होती.

पण नाफेरवाले गांधीवादी काय, फेरवाले स्वराज्यपक्षीय काय, अथवा समाजवादी काय, सारे एकाच काँग्रेसच्या कल्पवृक्षाखालीं वाढून लहानाचे मोठे झालेले. गांधीजी ही सन १९२० सालापासून त्या कल्पवृक्षाची जीवन-

शक्ति होती. त्यामुळें त्यांच्यांत आपसांत मतभेद झाले, वादविवाद झाले, तरी शेवटीं गांधीजींनीं घालून दिलेली काँग्रेसमधील प्रसंगप्राप्त औचित्याची मर्यादा कोणींही ओलांडली नाहीं.

पाटणा ठरावानंतर काँग्रेस चळवळीच्या कार्यक्रमाचा केंद्रबिंदु अजिबात बदलला. सविनय कायदेभंग गेला आणि कौन्सिलप्रवेश आला. सनिनय कायदेभंगाचा सर्वाधिकार एकटया गांधीजींना राहिला. सरकारनें सुधारणा योजनेची श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली होती तीसह जातीय निवाडा ही देणगी काँग्रेसनें अगदीं टाकाऊ ठरविली व त्या ऐवजीं घटनासमितीची मागणी केली. घटना समितींत प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क अल्पसंख्याकांना असावा व ते प्रतिनिधी अल्पसंख्याकांनींच निवडलेले असावे असें ठरलें.

पण एकंदरींत काँग्रेसचें या निर्णयांतील धोरण अनेकांना डळमळीत आहेसें वाटलें. जातीय निवाडयाचा प्रश्न त्यांतील विषारीपणामुळें जनतेच्या जिव्हाळयाचा बनला होता. पंडित मालवीय, अणे वगैरे थोर मंडळींची अपेक्षा अशी होती कीं काँग्रेसनें जातीय निवाडयाविषयीं स्पष्ट मतप्रदर्शन करावें. परंतु तसें झालें नाहीं. जातीय निवाडा धड पसंत आहे असेंही सांगण्यांत आले नाहीं व धड नापसंत आहे असेंही सांगण्यांत आलें नाहीं. तो नुसता टाकावू आहे हा डळमळीत अभिप्राय कुणालाही पटण्याजोगा नव्हता. पण काँग्रेसच्या नेत्यांना देखील तो एक अवघड पेंचच होता. त्या निवाडयावर तेव्हांच्या सर्वस्वी प्रतिकुल परिस्थितींत सडेतोड अभिप्राय देणें जातीयतेच्या दृष्टीनें अनिष्ट ठरलें असतें. मुस्लिम लीग पूर्णपणें त्या निवाडयाला अनुकूल होती. अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर येरवडा करारानें काँग्रेसच्या जरा जवळ आले असले तरी एकंदरींत तो त्यांचा जुलुमाचा रामराम होता. स्वराज्य पक्ष देखील काँग्रेसशीं समरस नव्हता. अशा स्थितींत सर्वांची एकी टिकवून धरणें हें फार अवघड पण तितकेंच महत्त्वाचें कार्य होतें. त्यासाठीं काँग्रेस व गांधीजी सौम्यपणानें झटत होते.

कायदेभंगाची चळवळ काँग्रेस वर्किंग कमिटीनें बिनशर्त मागें घेतली. त्यांत शायलॉकी सरकारला पाहिजे होतें तें काँग्रेसचें एक पौंड मांस मिळालें. त्यामुळें सरकारी दडपशाहीचा पीळ सुटूं लागला. काँग्रेसजनांच्या भराभर सुटका होऊं लागल्या. काँग्रेस संस्थांवरचीं बंधनेंही उठूं लागलीं.

भूत फरक इतक्या वर्षांत विरळ न होतां अधिकाधिक ठळक होऊं लागले होते. चरखा हें श्रीकृष्णाच्या सुदर्शनचक्रासारखें गांधीजींचें सत्याग्रह युद्धांतील प्रभावी शस्त्र होय. काँग्रेसनेंही चरखा व खादी आदरपूर्वक मान्य केली होती. खादी वस्त्रावर रंगविलेल्या काँग्रेसच्या तिरंगी झेंड्यावरही चरख्याचें मानचिन्ह चित्रित करण्यांत आलें होतें. असें असतां सामान्य काँग्रेसजनांचा तर राहोच पण जबाबदार काँग्रेस–सभासदांचाही चरखा–टकळी–सूत कातण्यावर विश्वास नसावा, व त्यांनीं सूत कातणें सोडून द्यावें, ह्या टाळाटाळीचा आणि भोंदूपणाचा गांधीजींना फार उद्वेग वाटूं लागला होता. ह्या भोंदूपणाला व टाळाटाळीला आपणच जबाबदार आहों असें त्यांना सूक्ष्म आत्मनिरिक्षणाअंतीं वाटूं लागलें होतें. काँग्रेसला सत्य-अहिंसाधर्माची दीक्षा त्यांनींच दिली, आणि त्या सत्य-अहिंसेचें पालन आपल्या अपेक्षेप्रमाणें काँग्रेसजनांकडून होतें कीं नाहीं हें पाहतांना कशाही कारणांमुळें असो पण फसवणूक त्यांचीच झाली ! लोकांचा चरख्यावर विश्वास नसतां त्यांनीं विश्वास आहे असें दाखवावें याला आपलें काँग्रेसमधील व राष्ट्रांतील असाधारण व्यक्तिमत्व कारण आहे याची गांधीजींना अनुभवानें दिवसेंदिवस अधिकाधिक जाणीव होऊं लागली होती. कारण असें कीं गांधीजींना विरोध करण्यासाठीं जो कोणी पुढें येतो तो नामशेष होतो हें कटु सत्य होतें. म्हणूनच लोक नामशेष होण्याच्या भीतीनें चरखा-खादी–हातसुताच्या बाबतींत टाळाटाळी करून भोंदूपणा पत्करीत. हें मर्म गांधीजींनीं आतां ओळखलें होतें. आपला विरोधक आपणापुढें–तो विरोध इष्ट असो वा नसो–अगतिक होतो ही गोष्ट आपणासारख्या लोकशाहीच्या पुरस्कर्त्याला शोभत नाहीं ही स्वतःची उणीव गांधीजींनीं स्वतःच हुडकून काढली.

अस्पृश्यतानिवारणाच्या प्रश्नाचीही तीच गत होती. काँग्रेस आरंभापासून सालोसाल ठराव करून अस्पृश्यतानिवारणाचा पाठपुरावा करीत होती. सन १९२० सालापासून तर काँग्रेसनें हा प्रश्न खंबीरपणें हातीं घेतला होता. हा प्रश्न सोडविण्यासाठींच गांधीजींना आपले प्राण धोक्यांत घालून उपोषणें करावीं लागलीं. येरवडा करारानें या प्रश्नाचा उलगडा बराच सोपा केला. स्वतः गांधीजींनीं हा प्रश्न गुण्यागोविंदानें कायमचा सुटावा यासाठीं इतक्या म्हातारपणीं कष्ट घेऊन दौरा काढला. त्यांनीं जसें कांहीं आपलें जीवन-

सर्वस्व या अस्पृश्यतानिवारणासाठीं पणाला लावलें होतें. देशांतही त्यांना लोकमताच्या सहानुभूतीची साथ मिळत होती. पण इतकें होऊनही अस्पृश्यता-निवारणासारख्या परम पवित्र कार्यालासुद्धां विरोध होताच. काँग्रेसबाहेरची गोष्ट तर दूरच राहो. पण काँग्रेसमध्येंही सनातनी वृत्तीचे वर्ण-जाति-धर्म-कैवारी लोक होते. आपण गांधीजींना विरोध करावा तर आपणावर नामशेष होण्याची पाळी येणार या भीतीनें ते लोक आपला विरोध तोंडानें बोलून दाखवीत नव्हते इतकेंच. गांधीजींनीं इतक्या दिवसांत स्वानुभवानें हें कटु सत्य पडताळून पाहिलें होतें.

हिंदी संस्थानांच्या बाबतींतही काँग्रेसमधील अनेक जबाबदार पुढाऱ्यांचें देखील धोरण गांधीजींना अमान्य होतें.

अनत्याचाराविषयींही तेंच. अनत्याचार गांधीजींच्या जीवनाशीं त्यांच्या श्वासोच्छ्वासाइतका निकटचा व एकरूप होता. त्यांना तें जीवनांतील आदितत्त्व असें वाटे. त्यांच्या उपदेशाप्रमाणें काँग्रेसनेंही अनत्याचाराचा अंगीकार केला होता. पण तो त्यांच्या भावनेनें मात्र नव्हे. काँग्रेसमधील बहुतेक थोर पुढाऱ्यांना अनत्याचार मान्य होता तो ध्येय म्हणून नव्हे, तर धोरण म्हणून. तत्त्व कबूल पण तपशील नाकबूल अशा प्रकारचा दुटप्पीपणा यांतून गांधीजींना काँग्रेसमध्यें दिसून येऊं लागला. त्याचें त्यांना फार दुःख झालें. त्यांना वाटूं लागलें आपण ज्या सत्यशोधनासाठीं म्हणून राजकारणाकडे वळलों तें सत्य या ठिकाणीं प्रचीतीला येत नाहीं. अशी ही देवावांचून देवळासारखी कांग्रेस गांधीजींना निवासासाठीं निर्भय व सत्पात्र वाटेनाशी झाली असेल अथवा ह्या उणेपणाला परिणामीं आपणच कारण आहों असेंही त्यांच्या मनानें घेतलें असेल.

आपल्या मार्गदर्शनाखालीं कॉंग्रेसनें जो कार्यक्रम स्वीकारला तो स्वतः गांधीजींच्या मतें निर्दोष होता. पण तो यशस्वी तर झाला नाहीं. असें कां व्हावें? गांधीजींनीं स्वतःच्या अंतःकरणांत सूक्ष्म निरीक्षण करून पाहिलें तेव्हां त्यांना आढळून आलें कीं काँग्रेसजनांनीं त्या कार्यक्रमावर स्वतःचा विश्वास नसतां त्याला संमति दिली म्हणून तो अयशस्वी झाला. गांधीजींना विरोध करणारा नामशेष होतो ह्या भीतीमुळें लोकांनीं आपल्या कार्यक्रमावर विश्वास आहे असें दाखविलें असें गांधीजींना ओघानेंच वाटलें.

ह्या व अशाच मूलभूत कारणांसाठीं गांधीजींनीं काँग्रेसपासून स्वतः दूर होण्याचा निर्णय घेतला. ही आपली भूमिका विशद करून सांगणारें त्यांचें पत्रक वर्धागंजहून ता. १७ सप्टेंबर १९३४ रोजीं प्रसिद्ध झालें.

तथापि गांधीजींनीं काँग्रेसचा सर्वकाल निर्धारानें त्याग करण्याचा निर्णय घेतला होता असें मात्र नाहीं. काँग्रेसचें पुनरुज्जीवन झालें, शुद्धिकरण झालें, तर त्या सेवाधर्म आचारणाऱ्या नव्या काँग्रेसचें नेतेपण पत्करण्याला ते नाकबूल झाले असते असें थोडेंच होतें ?

काँग्रेस सोडून जाण्याचा निर्णय बोलून दाखवितांना देखील त्यांनीं काँग्रेस-जनांच्या भावना पारखून घेण्यासाठीं काँग्रेसच्या ध्येयांत व घटनेंत आपल्या पत्रकांतून कांहीं बदल सुचविले. ( १ ) काँग्रेसच्या ब्रीदवाक्यांतील 'न्याय्य व शांतताप्रधान' या शब्दांऐवजीं 'सत्यमय व अनत्याचारी' हे शब्द घालावे. ( २ ) प्रतिनिधींची संख्या सहा हजार आहे, तो काँग्रेस संस्थेवर अनावर बोजाच झाला आहे. यास्तव प्रतिनिधींची संख्या एक हजारापावेतों मर्यादित करावी. प्रत्येक हजार मतदारांना एक प्रतिनिधि असावा. ही प्रतिनिधींची संख्या पूर्ण करण्यासाठीं दहा लाख मतदार लागतील. एकतीस कोटी पन्नास लाख लोकसंख्येच्या देशांत हे दहा लाख मतदार असावेत ही कांहीं असंभाव्य आशा नाहीं. ( ३ ) मताधिकारासाठीं चार आणे वार्षिक वर्गणीची अट आहे त्याऐवजीं प्रत्येक सभासदानें दर महिन्याला चांगलें पीळदार असें दोन हजार वार स्वतः कांतलेलें पंधरा नंबरचें सूत काँग्रेस कचेरींत द्यावें अशी अट असावी. ( ४ ) ज्या सभासदाचें नांव काँग्रेसच्या नोंदणीपुस्तकांत कमींत कमी सतत सहा महिनेपावेतों नाहीं, आणि त्या काळांत ज्यानें निरपवादपणें खादी सतत वापरली नाहीं, त्याला काँग्रेसच्या कोणत्याही निवडणुकींत मतदानाचा अधिकार नसावा.

गांधीजींनीं काँग्रेसच्या घटनेंत आपल्या पत्रकांतून ह्या ज्या महत्त्वाच्या सुधारणा सुचविल्या होत्या त्यांचा मुंबईच्या अधिवेशनांत अत्यंत आस्थेनें विचार झाला व त्यांना अनुसरून काँग्रेस–श्रेष्ठींच्या सोईप्रमाणें फरक मान्य झाले. ते असे. ( १ ) काँग्रेसच्या ब्रीदवाक्यांतील 'न्याय्य व शांतताप्रधान' या शब्दांऐवजीं 'सत्यमय व अनत्याचारी' हे शब्द घालावे कीं काय या गांधीजींच्या सूचनेवर प्रांतोप्रांतींचीं मतें घेऊन पुढें सन १९३६ च्या अधि–

वेशनांत याचा निर्णय करावा. [ हाच प्रयत्न पूर्वी सन १९२९ मध्यें लाहोर-च्या काँग्रेस अधिवेशनांत झाला होता व तो अयशस्वी ठरला होता.] ( २ ) प्रतिनिधींची संख्या दोन हजार ठेवावी. त्यांत चौदाशें एकूणनव्वद प्रतिनिधी खेड्यांतून व राहिलेले पांचशें अकरा प्रतिनिधी शहरांतून घ्यावे. ( ३ ) काँग्रेसच्या निवडणुकींत उमेदवार म्हणून उभा राहणारा माणूस सतत सहा महिने तरी सूत कांतणारा व खादी वापरणारा असला पाहिजे व प्रत्येक मतदारानें वार्षिक चार आणे वर्गणी देण्याऐवजीं दरमहा पंधरा नंबरचें दोन हजार वार सूत काँग्रेस कमिटीला दिलें पाहिजे. (४) तो मतदार निदान सतत सहा महिने तरी काँग्रेसचा सभासद असून सतत खादीधारी असला पाहिजे.

गांधीजींच्या सूचना काँग्रेसनें अशा एकंदरींत थोड्या फरकानें मान्य केल्या. दरमहा पंधरा नंबरच्या दोन हजार वार सुताऐवजीं दहा नंबरचें पांचशें वार सूत अथवा सुताऐवजीं प्रांतिक काँग्रेस कमेटी व अखिलभारतीय ग्रामोद्योग संघ यांच्या संमतीनें वर्किंग कमेटी मान्य ठरवील तें कोणत्याही स्वरूपाचें श्रम अशी श्रमाधिष्ठित मताधिकाराची अट काँग्रेसनें मान्य केली.

गांधीजी काँग्रेसमधून बाहेर पडणार याबद्दल सर्वांनाच पराकाष्टेचें वाईट वाटलें. पण त्याला इलाज नव्हता. तथापि गांधीजींनीं आपल्या निश्चयाचा फिरून एकदां फेरविचार करावा अशी त्यांना विनंति करण्यांत आली. पण गांधीजींनीं निश्चय बदलला नाहीं. अखेर काँग्रेसनें अत्यंत दुःखानें त्या निर्णयाचा स्वीकार केला; आणि त्यांनीं केलेल्या अपूर्व राष्ट्रसेवेचा आदर–पूर्वक उल्लेख करून काँग्रेसला पुढें देखील जरूर तेव्हां मार्गदर्शन करण्याच्या त्यांच्या अश्वासनाबद्दल कृतज्ञतापूर्वक संतोष व्यक्त करण्यांत आला.

या प्रमाणें मुंबईचें काँग्रेसचें अधिवेशन आटोपलें. आणि लगेच देशभर असेंब्लीच्या निवडणुकांची धांदल सुरू झाली.

● ● ●

# १८ सन १९३५ च्या सुधारणा आल्या !

काँग्रेसनें सेंट्रल लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या सर्व जागांकरितां आपले उमेदवार उभे केले. प्रचारासाठीं देशभर प्रचंड दौरा काढला. जनता आतां जागी झाली होती. आपणाला आतां काँग्रेसच्या छायेखालीं पुन्हा नव्या उमेदीनें स्वातंत्र्य-संग्राम लढावयाचा आहे व त्या लढ्याचें रणक्षेत्र आतां काँग्रेसनें तूर्त कायदे-मंडळें हें निश्चित केलें आहे हें जनतेनें सावधान चित्तानें ध्यानीं घेतलें; आणि आपल्या काँग्रेसच्या उमेदवारानांच मतें देऊन प्रचंड यश काँग्रेसच्या म्हणजे आपल्या पदरीं पाडून घेतलें.

असेंब्लीच्या पहिल्या अधिवेशनांत सरकारच्या टाकावू श्वेतपत्रिकेवर निषेधार्थी ठराव येणार हें तर उघडच होतें. काँग्रेसनें जशी सरकारशीं कायदेमंडळाच्या रणक्षेत्रावर लढा देण्याची तयारी केली होती तशीच तयारी उलटपक्षीं सरकारनेंही केली होती. कायदेमंडळाच्या सर्व सरकारी सभासदांनीं काँग्रेसविरोधी मतांच्या पारड्यांत आपल्या मताचा ओझेदगड टाकून काँग्रेसविरुद्ध बहुमत करावयाचें व काँग्रेसचे खटचाळ ठराव हाणून पाडावयाचे असा सरकारचा बेत अगाऊच ठरला होता. असेंब्लींतील काँग्रेसविरोधी मुसलमान सभासद बॅ. जीनांच्या पुढारीपणाखालीं काँग्रेसला कसून विरोध करणार, आणि मुस्लीम लीग व सरकार यांची घनदाट मैत्री असल्यामुळें सरकारी सभासद असेंब्लींत जीनांचे हात बळकट करणार हें उघड होतें. पण काँग्रेस तरी असेंब्लींत खरेंखुरें लोककल्याण साधण्यासाठीं विधायक कार्य करण्याकरितां थोडीच गेली होती ? अशा विधायक कार्याला जीनांसारख्या राष्ट्रविन्मुख व लोकविन्मुख सज्जनांमुळें तत्वतः सरकार-जमा बनलेल्या असेंब्लींत वाव नाहीं हें काँग्रेसलाही माहीत होतें. बोलून चालून तो संग्राम होता.

श्वेतपत्रिकेच्या आधारें सरकारनें देऊ केलेली राजकीय हक्कांची योजना

टाकावू असल्यामुळें या योजनेच्या आधारें कायदे करण्याचें काम बंद करावें अशा आशयाचा निषेधपर ठराव असेंब्लीपुढें काँग्रेस पक्षाकडून माडण्यांत आला. त्या ठरावाविरुद्ध सरकार दंड थोपटून पुढें येण्यापूर्वीच सरकारचे कैवारी जीना पुढें आले ! भारतीय युद्धांत भीष्मावर निर्दयपणें पण भ्याड-पणें बाण सोडणाऱ्या शिखंडीची आठवण करण्याची वेळ आली. जीनांनीं काँग्रेस पक्षाच्या ठरावाला उपसूचना मांडून श्वेतपत्रिकेचा पुरस्कार केला व काँग्रेसनें इतके दिवस अट्टाहासानें जनतेच्या आकांक्षानुसार टाकावू ठरविलेला जातीय निवाडा स्वीकारावा असें सांगितलें ! असेंब्लींतील मुसलमान सभासद व सरकारी सभासद ह्यांचा अमंगळ संयोग झाला व बहुमत जीनांच्या उपसूचनेला अनुकूल ठरलें. जीनांची दुसरी उपसूचना, जातीय ऐक्य होईतों सरकारनें दिलेला जातीय निवाडा मान्य करावा अशी होती. अर्थात् तीही मुसलमान व सरकारी सभासद यांच्या अमंगळ युतीमुळें मान्य झाली. ह्या दोन्ही उपसूचनांवरील मतदानाच्या वेळीं काँग्रेसचे सभासद तटस्थ राहिले.

जीनांच्या उपसूचनेंतील दुसऱ्या व तिसऱ्या भागावर मतें देण्याच्या वेळीं मात्र मतदानाचें पारडें फिरलें. हा उपसूचनेचा दुसरा भाग श्वेतपत्रिकेंतील प्रांतिक सरकारविषयींची योजना अत्यंत असमाधानकारक व निराशाजनक आहे असें सांगणारा होता. आणि तिसरा भाग मध्यवर्ति सरकार अथवा ऑल इंडिया फेडरेशन असें नांव असलेल्या श्वेतपत्रिकेंतील योजनेला अग्राह्य ठरविणारा होता.

उपसूचनेच्या दुसऱ्या भागांत जीनांनी सरकारी योजनेंतील प्रांतिक सरकारांविषयींची बाब असमाधानकारक व निराशाजनक ठरविली. काँग्रेसनेंही ती योजना टाकाऊ आहे असे प्रथमच सांगितलें होतें. या प्रमाणें काँग्रेस व लीग या दोहोंचेंही या मुद्यावर एकमत झालें खरें. पण त्या एकमतामागील दोन्हींच्या भूमिकेंत जमीन-अस्मानाइतकें अंतर होतें. काँग्रेसला प्रांतिक सरकारविषयक योजना जी व्यापक दृष्टीनें टाकावू वाटत होती, ती व्यापक दृष्टि जीनांच्या ठायीं मुळींच नव्हती. दुसऱ्या गोलमेज परिषदेला काँग्रेसच्या वतीनें गांधीजी जाण्य पूर्वीच या गोष्टीचा जीना व काँग्रेसविरोधी इतर मंडळी यांच्यांत खल झाला असावा असें आपण

मागें पाहिलेल्या बेंथॉल यांच्या पत्रकावरून उघड दिसतें. त्या पत्रकांत बेंथॉल यांनीं प्रांतिक सरकारांत हिंदी जनतेला सत्ता देण्याविरुद्ध नाक मुरडतांना अशी भीति व्यक्त केली होती कीं एकटे मुसलमान कांहीं प्रांतिक सरकारें चालवूं शकणार नाहींत; आणि काँग्रेस कायदेमंडळांत बहुमतानें निवडून आली कीं आपल्या प्रांतोप्रांतीं सरकारचें नाक दाबून तोंड उघडण्याचा पवित्रा मांडणार. जीनांच्या मनांतील भीति व शब्दांतील नापसंती याच अर्थाची होती.

आपल्या उपसूचनेच्या तिसऱ्या भागांत जीनांनीं मध्यवर्ति सरकार-विषयींच्या ऑल इंडिया फेडरेशनच्या योजनेला विरोध केला त्याच्या मुळाशींही त्यांचा असाच सरकारधार्जिणा व प्रतिगामी हेतु होता. त्या योजनेचें स्वरूप त्याज्य आहे व हिंदुस्थानांतील ब्रिटिश प्रजाजनांना ही योजना मुळींच मान्य नाहीं या कारणासाठीं या योजनेनुसार कायदे न करण्याचा सल्ला हिंदुस्थान सरकारमार्फत बादशाही सरकारला जीना देऊं पाहात होते ब्रिटिश हिंदुस्थानांत खरी जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याविषयीं अत्यंत कसोशीनें व तांतडीनें प्रयत्न व्हावे आणि त्यासाठीं आज हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या सर्व पक्षांची सल्लामसलत घेऊन सर्व परिस्थितीचा पुन्हा आढावा घ्यावा अशी ही जीनांची मानभावी काळकाढू मतलबी मागणी होती.

पण जीनांच्या उपसूचनेंतील ह्या दुसऱ्या व तिसऱ्या भागाचा सरकारनें अगदीं निराळ्या दृष्टीनें विचार केला. त्या सूचना पूर्वीच्या योजनेऐवजीं एक स्वतंत्र योजना सुचविणाऱ्या आहेत असें सरकारनें प्रतिपादन केलें. आणि आपल्या कायदेमंत्र्यांच्या तोंडून असें वदविलें कीं ह्या दोन्ही सूचना जॉइंट पार्लमेंटरी कमिटीच्या रिपोर्टाला नकार देणाऱ्या आहेत. काँग्रेसच्या वतीनें भुलाभाई देसाई यांनीं प्रामाणिकपणें प्रत्यक्ष आघाडीवरच हल्ला केला, आणि जीनाही किंचित् आड पडद्यानें तेंच करीत आहेत, तथापि दोहोंचा हेतु एकच आहे, असें म्हणून सरकारनें काँग्रेस पुढाऱ्यांचा विरोध आणि जीनांचा विरोध यांत कांहींच अंतर नाहीं असें सांगितलें.

जीनांच्या ह्या दोन सूचनांवर काँग्रेसनें अनुकूल मतें दिलीं व सरकार पक्षानें विरुद्ध मतें दिलीं. परंतु काँग्रेस, व लीग म्हणजेच जीना यांच्या संयुक्त मतांचें पारडें सरकार व सरकारजमा जोहुकूम सभासद यांच्या पारड्या-

पेक्षां जड ठरलें. चौऱ्याहत्तर विरुद्ध अठ्ठावन मतांनीं जीनांच्या सूचना पास झाल्या.

असेंब्लींत याप्रमाणें कॉंग्रेस सनदशीर संग्राम लढत होती, त्याप्रमाणेंच बाहेर देखील विधायक कार्याविषयींचा कॉंग्रेसचा प्रचार व प्रयत्न सुरू होते. कायदेभंगाच्या चळवळीच्या ऐन भरांत विलायती कापडावरील बहिष्कार यशस्वी करण्यासाठीं कॉंग्रेसनें हिंदी कापड–गिरणीवाल्यांना वेसण घालून त्यांच्याकडून प्रतिज्ञा लिहून घेतल्या होत्या व त्यांना योग्य ते परवाने देऊन बहिष्कार परिणामकारक केला होता. परंतु कापड–गिरणीवाले प्रतिज्ञाभंग करून आपल्या व्यापारी दानतीचा काळा बाजार करीत आहेत असें कॉंग्रेसच्या नजरेला आलें. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभेंत यावर उपाय म्हणून यापुढें परवाने देणें बंद करण्यांत आलें व खऱ्या कॉंग्रेसभक्तांसाठीं खादीची शिफारस करण्यांत आली.

कॉंग्रेस आणि लीग यांच्यांतील तेढ मिटवून एकोपा होणें स्वराज्य-संपादनाच्या दृष्टीनें अगदीं अवश्य होतें. त्यासाठीं कॉंग्रेसचे तेव्हांचे अध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं सन १९३५ च्या जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत जीनांशीं वाटाघाटी करून समेट करण्याची शिकस्त केली. परंतु जीनांच्या धोरणाचें अडेल तट्टू मुळीं सरळ चालेनाच. वाटाघाटी फोल ठरल्या.

खालसा हिंदुस्थानांत याप्रमाणें स्वातंत्र्याची चळवळ संकटें टाळीत पुढें जात असतांना हिंदी संस्थानांत मात्र अजून उजाडलें नव्हतें. हिंदी संस्थानें हे हिंदुस्थानच्या राजकारणाचा डाव खेळतांना प्रतिपक्षावर डाव उलटविण्या-साठीं सरकारनें हातीं राखून ठेवलेले हुकमी पत्ते होत. पण सारा देश असा जागा झाला असतांना संस्थानी मुलूख तेवढा मागासलेपणाच्या झोंपेंत राहूं देणें कॉंग्रेसला इष्ट वाटत नव्हतें. सरकार संस्थानिकांचें पाठीराखें आहे व सरकारच्या जिवावर संस्थानांत बेबंदशाही कारभार चालतो हें सूर्यचंद्रइतकें स्पष्ट होतें. हें ध्यानीं घेऊनच कॉंग्रेसनें संस्थानी प्रजेला आपल्या जबाबदारी-वर प्रातिनिधिक जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यासाठीं चळवळ करण्याचा प्रोत्साहनपर आदेश दिला.

कॉंग्रेस व सरकार यांचा डावाला प्रतिडाव असा झगडा हिंदुस्थानांत सुरू असतांनाच विलायतेंत 'सन १९३५ चा सुधारणा कायदा' या नांवानें ओळखला जाणारा गव्हन्मेंट ऑफ इंडिया अॅक्ट मंजूर झाला.

• • •

# १९ फैजपूरची शेतकरी कॉंग्रेस

सन १९३६ सालीं खानदेशांतील फैजपूर खेड्यांत कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. पं. जवाहरलाल नेहरू हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. आज दुसऱ्या वेळीं ते पुन्हा कांग्रेसचे अध्यक्ष झाले होते. सन १९२९ सालीं लाहोरला रावी नदीच्या तीरीं स्वातंत्र्याचें तिरंगी निशाण फडकविणारी कॉंग्रेस पं. जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालींच भरली होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें निशाण त्यांच्याच हस्तें त्या ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीं उजाडत्या उगवत्या नवसंवत्सराच्या जन्मवेळीं फडकविण्यांत आलें होतें. पं. नेहरू हे गांधीजींचेच थोर शिष्य. पण त्या दिवशीं गांधीजींनींच हिंदुस्थानला व साऱ्या जगाला नुसत्या शब्दांनीं नव्हे तर कृतीनें जाहीर केलें कीं आज नवा स्वतंत्र हिंदुस्थान पं. नेहरूंच्या तरुण पुढारीपणाच्या छायेखालीं जन्माला आला आहे.

गांधीजी कॉंग्रेसच्या बाहेर गेल्यानंतर हें पहिलेंच कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें. गांधीजींनीं कॉंग्रेस सोडली पण कॉंग्रेसनें गांधीजींना सोडलें नव्हतें. आणि गांधीजींनीं कॉंग्रेस सोडली म्हणजे तरी काय? तर कॉंग्रेसजनांना आपापल्या कुवतीप्रमाणें कॉंग्रेसचें बळ वाढवितां यावें व मायदेशाच्या स्वातंत्र्याचा लढा निःसंकोचपणें नीट लढतां यावा या हेतूनें ते कॉंग्रेसपासून दूर झाले होते.

परंतु सूर्य पृथ्वीपासून लक्षावधि मैल दूर असला तरी सृष्टीचा जीवन-व्यापार सुखानें चालावा म्हणून तो प्रकाश देतच असतो. गांधीजींचें देखील तसेंच होतें. कॉंग्रेसपासून दूर जातांना त्यांनीं आपलें नवें कार्यक्षेत्र आंखलें

होतें. हिंदुस्थान हा साडेसात लाख खेड्यांचा देश. खरा हिंदुस्थान खेड्यांत राहतो, शहरांत नाहीं. हें ध्यानीं घेऊन गांधीजींनीं अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ ह्या नव्या भारतीय ग्राममहासंस्थेचें उद्‌घाटन केलें होतें. त्या संस्थेमार्फत खेड्यापाड्यांतील जीवन सुखी, शुद्ध व समृद्ध करण्याचें विधायक कार्य जोमानें सुरू झालें होतें.

'खेड्याकडे चला' हा गांधीजींचा आदेश आतां सर्व काँग्रेसजनांच्या कानीं घुमूं लागला होता. काँग्रेसची नजरही खेडेगांवाकडे वळली होती. म्हणूनच हें काँग्रेसचें नवें अधिवेशन फैजपूरसारख्या एका बाजूच्या खेड्यांत भरविलें गेलें. पण खेड्यांत हें अधिवेशन भरविलें गेलें तरी तें पूर्वींच्या अधिवेशनांइतकेंच नव्हे तर त्यांच्या पेक्षांही सर्वतोपरी अधिक यशस्वी झालें. हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश; त्या शेतकऱ्यांची काँग्रेस फैजपूरला प्रथम सर्वांना दिसली. जिकडे तिकडे ग्रामीण साधेपणा. पण कोणत्याही प्रकारची कसलीच उणीव फैजपूरच्या काँग्रेस अधिवेशनांत उरली नव्हती

काँग्रेसच्या चळवळींत हें खरेंखुरें खेडेगांवी नवचैतन्य ओतून खेडुतांच्या खऱ्या पाठिंब्यानें काँग्रेसला बलशाली करण्याचा हा मान लो. टिळकांच्या महाराष्ट्राला मिळाला. फैजपूरच्या काँग्रेसपुढें आगामी निवडणुका हाच महत्त्वाचा प्रश्न होता. कौन्सिलप्रवेश काँग्रेसनें मान्य केला होता. त्याला अनुसरून काँग्रेसचें तपशीलवार धोरण फैजपूरलाच ठरणार होतें. काँग्रेसनें जाहीरनामा काढून आपलें धोरण तेव्हां स्पष्ट केलें. विलायतेंत नवा राजा गादीवर बसणार त्याच्या राज्यारोहण समारंभासाठीं तयारीची धामधूम सुरू होती. ह्या समारंभांत काँग्रेसजनांनीं कोणत्याही प्रकारचा भाग घेऊं नये असें ठरलें. पुढ येऊं घातलेल्या फेडरेशनला व नुकत्याच आलेल्या सुधारणा–कायद्याला कसून विरोध करावा आणि हिंदी जनतेची घटना सभा बोलावून त्या सभेनें स्वतंत्र हिंदुस्थानची घटना ठरवावी असें निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत जाहीर करण्यांत आलें. हें कार्य कांहीं सोपें नव्हतें. तें काँग्रेसजनांच्या हातून नीट पार पडावें म्हणून कडक शिस्तींचीं बंधनें घालणें अवश्यच होतें.

काँग्रेसचें अधिवेशन संपल्यावर लगेच यथाकालीं प्रांतिक कायदेमंडळांच्या निवणुका झाल्या. त्या निवडणुकांत काँग्रेसला पूर्ण यश मिळालें. मद्रास, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत बिहार व ओरिसा ह्या पांच प्रांतांत तर निर्विवाद

बहुमत मिळालें. मुंबई, बंगाल, आसाम,व वायव्य सरहद्दप्रांत ह्या चार प्रांतांत निवडून आलेल्या राजकीय पक्षांत काँग्रेस पक्ष सर्वांत मोठा होता. राहिलेल्या सिंध व पंजाब ह्या दोन मुसलमानप्रधान प्रांतांत मात्र बहुमत काँग्रेसला मिळालें नाहीं. आणि तें मिळणें शक्यही नव्हतें. मुसलमान बहुवस्तीचे ते प्रांत, आणि अजाण मुसलमानी जनतेचीं मतें जिनांसारख्या त्यांच्या थोर पुढाऱ्यांनीं आपल्या विशिष्ट धर्म-जातीयवादी राजकारण पद्धतीनें सरकारकडे गहाण टाकलेलीं. मग अशा ठिकाणीं काँग्रेसला बहुमत मिळणार कसें ?

निवडणुका पार पडल्यावर काँग्रेसनें आपल्या निवडून आलेल्या सभासदांना मार्गदर्शन करण्यासाठीं काँग्रेसचें पुढील धोरण खुलासेवार जाहीर केलें.

'पूर्ण स्वातंत्र्य हें काँग्रेसचें ध्येय होय. वयांत आलेल्या मतदारांनीं निवडलेल्या घटना समितीनें ह्या स्वातंत्र्याची योजना ठरवावी. सरकारनें दिलेल्या घटनेशीं झगडावें. तिच्यांतील फेडरेशनचा मध्यवर्ती सत्तेबाबतचा भाग अमलांत आणण्याच्या कामीं कसून विरोध करावा. कायदेमंडळाबाहेर सुरू असलेल्या जनतेच्या चळवळीला सर्वतोपरी मदत करावी. इंग्रजी साम्राज्यशाहीच्या भरभराटीला उपयोग होईल अशा कोणत्याही सार्वजनिक समारंभांत भाग घेऊं नये. सरकारनें दिलेल्या पदव्या घेऊं नयेत. प्रांतिक कायदेमंडळांत पक्षाची शिस्त पूर्णपणें पाळावी. पुढाऱ्यांनीं देखील पक्षाचे प्रतिनिधी म्हणून वागावें; सरकारशीं कोणताही व्यक्तिशः संबंध ठेऊं नये. सभासदांनीं खादी वापरावी. रजा घेतल्याखेरीज कायदेमंडळांत गैरहजर राहूं नये. काँग्रेस वर्किंग कमेटीच्या परवानगीखेरीज असेंब्लींतील इतर पक्षांशीं सख्य करावयाचें नाहीं. जे स्वतंत्र सभासद काँग्रेसचा कायदेमंडळांतील कार्यक्रम मान्य करतील त्यांना मान्यता देऊन कांग्रेस पक्षांत घ्यावें. मात्र शिस्तभंगाबद्दल ज्यांना शासन झालें असेल त्यांना वर्किंग कमिटीच्या परवानगी खेरीज पक्षांत घेऊं नये. निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत अभिवचनें दिल्याप्रमाणें शेतकरी वर्गाच्या उद्धारासाठीं झटावें. शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणाची कायद्यानें सोय व्हावी. कराच्या व खंडाच्या थकबाकीचें शेतकऱ्यांच्या मस्तकावरील ओझें हलकें करावें. जुलमी कायद्यांची उचलबांगडी करावी. राजकीय कैदी व स्थानबद्ध यांची मुक्तता करावी. कायदेभंगांत जप्त झालेल्या जमिनी व इस्टेटी ज्यांच्या त्यांना परत द्याव्या. कामगारांसाठीं आठ तासांचा दिवस ठरवावा;

परंतु यामुळें त्यांच्या पगारांत कपात होऊं नये. त्यांना जीवनवेतन मिळावें. दारूबंदी करावी. देशांतील बेकारांच्या पोटापाण्याची सोय करावी. सरकारी कारभारांत व सरकारी नोकरांच्या भारी पगारांत काटकसर करावी. कॉंग्रेसच्या धोरणाप्रमाणें कामकाज करतांना पेंचप्रसंग निर्माण होण्याची वेळ आली तर ती टाळूं नये. लष्कर कपात, सनदी नोकर कपात, व्यापार, जकात व नाणें यांवर पूर्ण नियंत्रण, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, संचारस्वातंत्र्य या मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंतील बाबींचा वेळोवेळीं पाठपुरावा करावा.'

याप्रमाणें कॉंग्रेस सभासदांनीं वागावें व आपली वागणूक लोकमतानुवर्ती आहे असें जनतेला पटून जनतेचा पाठिंबा मिळेल इकडे लक्ष द्यावें असें निश्चित मार्गदर्शन फैजपूरच्या कॉंग्रेसनें केलें. पुढें कायदेमंडळांत ज्या लोकमतानुवर्ति व लोकहितकारी घडामोडी कॉंग्रेस घडवून आणणार होती व देशांतील साडेसात लाख खेड्यांमधील दरिद्री नारायणांना चांगले दिवस दाखवून स्वातंत्र्यसंपादनासाठीं लढणार होती, त्या स्वातंत्र्ययुद्धाची अशी भरभक्कम तयारी फैजपूरला झाली.

• • •

## २० आमचीं पहिलीं कॉंग्रेस मंत्रिमंडळें

बाबू सुभाषचंद्र बोस पांच वर्षांच्या बंदिवासानंतर बिनशर्त सुटले. लगेच ता. १७ मार्च १९३७ रोजीं दिल्लीला ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरली. सुभाषबाबूंच्या सुटकेमुळें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांत स्वातंत्र्ययुद्धाचे वारे नव्या लढावू वेगानें वाहूं लागले. कारण गांधीजींनीं राष्ट्राला दाखवून दिलेले व मान्य केलेले नव्या स्वातंत्र्ययुगाचे नेते पं. जवाहरलाल नेहरू हे आतां कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. पं. मोतीलाल नेहरूंच्या सर्वपक्षीय परिषदेंतील राजकीय योजनेला ती अपुरी म्हणून सुरुंग

लावणारांत पं. नेहरू व सुभाषबाबू हे दोन खंदे तरुण वीर होते. तशा प्रकारच्या काँग्रेसमधील नेमस्त वृत्तीशीं झगडण्यासाठीं तेव्हां त्याचा भारतीय स्वातंत्र्य संघ ( इंडिपेंडन्स ऑफ इंडिया लीग ) स्थापन झाला होता. हिंदी स्वातंत्र्य संघाचीं नेहरू आणि बोस हीं दोन फुप्फुसें होतीं. त्या आपल्या सुभाषबाबूंची या ऐन वेळीं सुटका झाली असें पाहतांच काँग्रेसजनांना आणि नेहरूंनाही आनंदीआनंद कसा वाटणार नाहीं ?

तोंच निवडणुकींत निवडून आलेल्या काँग्रेस सभासदांचें संमेलन ( कन्व्हेन्शन ) भरविण्यांत आलें. त्या संमेलनांत सभासदांच्या प्रतिज्ञापूर्वक शपथविधीचा देखावा म्हणजे जणू राष्ट्रीय स्फूर्तीचा व स्वातंत्र्यप्रीतीच्या वर्षाकालीं गर्जणारा वैभवशाली महासागर होता. तेव्हां शपथ आपल्या राष्ट्रीय भाषेंत–हिंदींत घेण्यांत आली. ती अशी.

' मी ह्या अखिल भारतीय संमेलनाचा सभासद अशी शपथ घेतों कीं मी कायदेमंडळांत आणि कायदेमंडळाच्या बाहेरही हिंदुस्थानची निष्ठापूर्वक सेवा करीन. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं व हिंदुस्थानची होत असलेली पिळणूक निवारून जनतेचें दारिद्र्य दूर करण्यासाठीं झटेन. मी अशीही शपथ घेतों कीं मी काँग्रेसची शिस्त पाळून काँग्रेसचीं ध्येयें आणि उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं झटेन. त्याप्रमाणेंच हिंदुस्थान बंधमुक्त होऊन स्वतंत्र व्हावा आणि कोट्यावधि हिंदी जनता दुःखांच्या जड ओझ्यापासून मुक्त व्हावी यासाठीं झटेन. '

त्याच संमेलनांत वरील शपथेला अनुसरून राष्ट्रीय मागण्याही स्पष्ट करण्यांत आल्या. तात्पर्य, काँग्रेसचे हे जे सेनानी कायदेमंडळांत गेले होते त्यांना कायदेमंडळांतून व बाहेरून देखील मायदेशाचें स्वातंत्र्य हा आपला उद्देश साध्य करण्यासाठीं गांधीजींच्या उपदेशाला स्मरून कसें युद्ध करावें हें माहीत करून देण्यांत आलें होतें.

मार्च १९३७ महिन्याच्या शेवटच्या दिवसाच्या शेवटच्या क्षणीं हिंदुस्थानांतील जुन्या युगाचाही शेवट होणार होता. १ एप्रील १९३७ पासून सन १९३५ चा नवा सुधारणा कायदा अंमलांत येणार होता व हिंदुस्थानच्या जीवनांत नवयुग सुरू होणार होतें. काँग्रेस देखील ( सरकारला वाटे त्या अर्थानें नव्हे; अगदीं निराळ्या तेजस्वी अर्थानें ) हिंदुस्थानांत नवयुगाला आरंभ करण्या-

साठीं उत्सुक होतो. जुन्या युगांतील परंपरेचीं, संकोचाचीं, दडपणाचीं, बेशिस्तीचीं सारीं लक्तरें फेंकून देऊन राष्ट्राला नवजागृतीच्या दिव्य वसनानें नटवून जागृत करण्याचा काँग्रेसचा जणूं पण झाला होता. वास्तविक बहुतेक प्रांतांत काँग्रेस अधिकारग्रहण करण्याला निर्विवादपणें पात्र ठरण्याइतकी बहुमतानें निवडून आली होती. कायदेमंडळांत ज्या पक्षाला असें बहुमत असतें त्या पक्षालाच मंत्रिमंडळ बनवून अधिकार स्वीकार करण्याचें आमंत्रण गव्हर्नरकडून देण्यांत येणार. पण काँग्रेस हा बहुमतवादी पक्ष म्हणून बहुतेक प्रांतिक कायदेमंडळांत निवडून आला असतांनासुद्धां सरकारच्या कानाला गोड लागेल अशी अधिकारग्रहणाची भाषा तो मुळींच बोलेना !

पुढें वर्धा येथें काँग्रेस वर्किंग कमिटीची सभा भरली. तिथें गांधीजी मार्गदर्शन करणारे होते. गांधीजींचें मत अधिकारस्वीकाराला अनुकूल होतें. पण मुख्य अडचण होती ती मंत्रिमंडळाच्या कारभारांत गव्हर्नर ढवळाढवळ करूं लागल्यास तें कसें सहन करतां येईल याची. कायद्यानें गव्हर्नरला आणीबाणीच्या प्रसंगीं वापरण्यासाठीं कांहीं विशेष अधिकार देण्यांत आले होते खरे. पण ज्या वेळीं गव्हर्नरला मंत्रिमंडळाच्या कारभारांत ढवळाढवळ करावीशी वाटेल ती वेळ आणिबाणीची आहे किंवा नाहीं हें ठरविणाराही गव्हर्नरच ! अशा प्रकारचें भय नष्ट व्हावें यासाठीं काँग्रेसला सरकारकडून स्पष्ट अभिवचनें पाहिजे होतीं. आणि सरकार तर तीं अभिवचनें द्यायला तयार नव्हतें. बरें ; ता. १ एप्रील १९३७ पासून जुन्या मंत्रिमंडळाचा जुना कारभार संपुष्टांत येत होता. अर्थात् राज्यकारभार चालविण्यासाठीं मंत्रिमंडळ तर पाहिजे. नव्या युगाच्या पहिल्याच दिवसापासून जनतेनें धिक्कारलेला प्रांताचा कारभार पाहण्याचा प्रसंग गव्हर्नरवर येणें ही गोष्ट सरकारलाच नामुष्कीची होती.

ती नामुष्की टाळण्यासाठीं प्रांतोप्रांतींच्या गव्हर्नरांनीं शिकस्त केली. प्रत्येक कायदेमंडळांत कांहीं कांहीं खास सरकारजमा जोहुकूम बाण्याचे लोक होतेच. अर्थात् काँग्रेसशीं त्यांचा कांहींच संबंध नव्हता. नाहीं म्हणायला विरोधाचा व मत्सराचा मात्र संबंध होता. परंतु काँग्रेसला आणि जनतेला जे लोक नावडते ते सरकारला आवडते असणार हें ठरलेलेंच. असे आवडते लोक आरंभींच एकामागून एक पांच प्रांतांत तरी भेटले. त्यांचाच मग त्या त्या

प्रांताच्या गव्हर्नरांनी मंत्रिमंडळें बनविण्याच्या कामीं उपयोग करून घेतला. मुंबई इलाख्यांत खानबहाद्दूर कूपर, मद्रासेंत सर कूर्म रेड्डी, संयुक्त प्रांतांत छतारीचे नबाब, बिहारमध्यें सर महंमद यूनस व ओरिसामध्यें पार्लकिमेडीचे महाराज हे मंत्री होण्याला हौसेनें उत्सुक झालेले लोक सरकारला आयते मिळाले. त्यांनाच मग त्या त्या प्रांताच्या गव्हर्नरांनीं मंत्रिमंडळें बनवण्याला पाचारण केलें. त्यांनीं मंत्रिमंडळें बनवलींही. अधिकार सुरू झाला, हजारों रुपयांचे लठ्ठ लठ्ठ पगार सुरू झाले. पण खरा सुराज्यकारभार अशानें कसा सुरू होणार ? कायदेमंडळांतील काँग्रेससारख्या सुसंघटित बहुमताला डावलून हे लोक मारे गुडघ्याला बाशिंग बांधून मंत्री म्हणून मिरवूं लागले तरी त्यांचा कसा पल्ला येणार ? कायदेमंडळाचें अधिवेशन भरलें कीं ही कुंभाराची सून उकिरड्यावर आपोआपच येणार होती. न येऊन काय करणार ? बरें, जनता याचा जाब विचारील या भीतीनें पुढें यावयाचें नाहीं, तर कायदेमंडळाचें अधिवेशन न भरवितां राज्यकर्तेपणाचा असला बेजबाबदार लांडा कारभार किती दिवस शोभवून नेतां येणार ?

अखेर सरकारच वळणीला आलें. काँग्रेसला पाहिजे होतीं तीं अभिवचनें सरकारकडून मिळालीं. मग ता. ७ जुलै १९३७ रोजीं वर्किंग कमिटीची सभा होऊन त्या सभेंत मंत्रिपदस्वीकाराचा ठराव झाला. सूर्य उगवतांच अंधारानें काळें करावें त्याप्रमाणें काँग्रेस अधिकारस्वीकारासाठीं पुढें येतांच हंगामी मंत्रिमंडळांना मुकाट्यानें नाक मुठींत घेऊन गाशा गुंडाळावा लागला.

ता. १७ जुलै १९३७ रोजीं सात प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळाचा अंमल सुरू होतांच काँग्रेसनें पहिल्या सपाट्याला राजबंद्यांचा मुक्ततेचा प्रश्न सोडविण्यासाठीं हातीं घेतला. कांहीं प्रांतांतील गव्हर्नरांना यांत कांहीं वावगें वाटलें नाहीं. पण बिहार आणि संयुक्त प्रांत येथें ह्या मुद्यावरच काँग्रेस मंत्रिमंडळाचा गव्हर्नराशीं खटका उडून पेंचप्रसंग निर्माण होण्याची वेळ आली. त्यासरसे बिहारचे मुख्य प्रधान श्रीकृष्णसिंह व संयुक्त प्रांताचे मुख्य प्रधान पं. गोविंद वल्लभ पंत हे राजीनामे गव्हर्नराच्या तोंडावर फेंकून मोकळे झाले.

त्याच सुमाराला हरिपुरा येथें काँग्रेसचें अधिवेशन सुरू होतें. मुख्य मंत्र्याचा राजीनामा दिलेले श्रीकृष्णसिंह व पंत हरिपुरा अधिवेशनाला हजर राहिले. तिथें मग जबाबदार काँग्रेसश्रेष्ठींच्या मेळाव्यांत बिहार व संयुक्तप्रांत येथील

मंत्रिमंडळांतील पेंचप्रसंगाचा पूर्ण साधकबाधक विचार झाला, आणि काँग्रेसनें आपल्या सर्वच काँग्रेस मंत्रिमंडळांना राजीनामा देण्याचा आदेश देऊं केला. हें चौदावें रत्न पाहतांच मात्र सरकार नमलें. विहार व संयुक्त प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळें पुन्हा कारभार पाहूं लागलीं.

मुंबई प्रांतानें प्रथमच दारूबंदीचा प्रश्न हिरीरीनें हातीं घेतला. काँग्रेसच्या इतर प्रांतांतूनही योग्यायोग्य पाहून कुठें कमी तर कुठें अधिक प्रमाणांत पण दारूबंदी सुरू झाली. मद्रासला दारूबंदीबरोबरच मंत्रिमंडळानें शिक्षणप्रसाराचें कार्य हातीं घेतलें. बौद्धिक शिक्षणाबरोबरच राष्ट्राच्या बालपिढीला हस्तव्यवसायाचें शिक्षण देऊन त्यांना खरेखुरे माणूस म्हणजेच राष्ट्राचे खरेखुरे नागरिक तयार करण्याचा प्रश्न गांधीजींचे उजवे हात चक्रवर्ती राजगोपाळाचारी ( आजचे आपले हिंदचे पहिले हिंदी गव्हर्नर जनरल ) यांच्या मद्रासेंतील काँग्रेस पंतप्रधानकीच्या कारकीर्दींत यशस्वीपणें सोडविला जाऊं लागला. हरिजनांचा उद्धार करण्याचें कार्य देखील राष्ट्रांत ठिकठिकाणीं नेटानें व उत्साहानें होऊं लागलें. तसेंच शेतकऱ्यांचेंही. हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश. त्या शेतकरी दरिद्री नारायणाच्या कल्याणासाठीं गांधीजींच्या मार्गदर्शनाप्रमाणें झटणारी कांग्रेस शेतकऱ्याला कशी विसरेल ?

पण शेळी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड तसा कांहींसा प्रकार जनतेंत अनेक बऱ्या वाईट व खऱ्या खोट्या अपवादांनीं कांग्रेसमंत्रिमंडळाच्या कारभाराविषयीं होऊं लागला. हें सांगून कुणाला खरें तरी वाटेल ?

• • •

## २१ आमच्या मंत्रिमंडळांची कामगिरी

'अभाग्याच्या घरीं कामधेनु आली आणि अभाग्यानें तिला ओढा म्हणून परतून लावली' असें एक संतवचन आहे. त्याप्रमाणेंच जनतेचा बुद्धिभेद करणाऱ्या थोड्या प्रतिगामी वृत्तीच्या मतलबी लोकांना काँग्रेस-

मंत्रिमंडळांच्या कारभाराकडे पाहून नापसंतीनें नाकें मुरडावीशीं वाटलीं. हिंदुस्थानांतील दरिद्री नारायण जनतेचें जीवन कांहींसें सुखाचें व्हावें म्हणून काँगेस सरकारांनी दारू बंदीची मोहीम हातीं घेतली, तें पाहून पार्शी जमातींतील दारू मक्तेदार नाराज झाले व काँग्रेसच्या नांवानें बोटें मोडूं लागले. दारूच्या व्यापारावर खोऱ्यानें पैसा ओढून हां हां म्हणतां श्रीमंत होण्याला व त्या श्रीमंतींत मनसोक्त ऐषआराम भोगायला सोकावलेले हे दारूव्यापारी. काँग्रेस सरकारांनीं दारूबंदी सुरु केली; आतां आपला दारूचा व्यापार बुडणार आणि आपली चंगळ थांबणार असें पाहतांच त्यांना चीड आली. ते काँग्रेस सरकारांना पाण्यांत पाहूं लागले.

गांधीजींनी अनेकवार आपले प्राण पणाला लावून हरिजनांचा उद्धार करण्याच्या प्रश्नाला उभ्या देशांत व काँग्रेसमध्येंही चालना दिली. अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील व हिंदु जमातीवरील महारोगापेक्षांही भयंकर असा कलंक काँग्रेस सरकारें पुसून टाकूं लागलीं. त्यामळें हिंदु धर्माभिमानी सनातन्यांचें पित्त भडकलें. हिंदु धर्म बुडाला रे बुडाला अशी त्यांची ओरड सुरूं झाली. हजारों वर्षांपासून चालत आलेल्या रुढींतील आणि धर्मांतील रानटी, राक्षसी बंधनांचा हा परिणाम खरा. धर्म म्हणून हें उच्च नीच व स्पृश्यास्पृश्य जातिधर्माचें विष जें साऱ्या हिंदु समाजाला पाजण्यांत आलें होतें व येत होतें त्याचा हा परिणाम होय. ह्या परंपरेवर सनातनी हिंदूंचा किती जबरा व अजाणपणाचा विश्वास होता हें शब्दांनी बोलून दाखवितां येणें कठीण! पुण्यांत गांधीजींवर हरिजन दौऱ्याच्या वेळीं बॉम्ब फेकण्याचा प्रयत्न झाला तें तरी ह्या विषारी प्रतिगामी सनातनी विचारसरणीचेंच फळ होय. सर्व सनातनी लोक जसे गांधीजींवर रागावले होते तसेच हरिजनांच्या उद्धारासाठीं झटणाऱ्या काँग्रेस सरकारांवरही रागावले. ते काँग्रेस सरकारांच्या नांवानें बोटें मोडूं लागले.

काँग्रेस सरकारांनीं शेतकऱ्यांच्या कल्याणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं हातीं घेतला म्हणून जमीनदार आणि सावकार काँग्रेसवर रुष्ट होऊं लागले. कुळांच्या हितसंरक्षणासाठीं काँग्रेस सरकारें उपाययोजना करूं लागलीं म्हणून जमीनदार नाखूष आणि शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणापासून सोडविणारे कायदे काँग्रेस सरकारें करूं लागलीं म्हणून सावकार नाखूष. गुजराथेंत

तर ही सावकारी नाखुषी व त्याबरोबरच जमीनदार–सावकारधार्जिण्या सरकारचीही नाखुषी मुंबई प्रांतांतील काँग्रेस सरकारला सहन करावी लागली. गांधीजींची असहकारितेची चळवळ सुरू झाली तेव्हांपासून गांधीजींचे बळकट उजवे हात सरदार वल्लभभाई पटेल व त्यांचे सहकारी यांनीं गुजराथेंतील खेडा, बार्डोली अशा ठिकठिकाणीं शेतकऱ्यांना खडबडून जागें केलें होतें. करबंदीची व बेसुमार शेतसाऱ्याच्या सप्रमाण निषेधाची चळवळ गुजराथेंतील शेतकऱ्यांनीं सरदारजींच्या नेतृत्वाखालीं चांगलीच यशस्वी करून दाखविली होती. त्या चळवळीपायीं कितीतरी शेतकरी आपला जमीनजुमला गमावून बसले होते. तेव्हांच्या दांडगेशाही सरकारनें काँग्रेसची ही चळवळ मुळांतच दडपून टाकण्यासाठीं जरा कांहीं निमित्त सांपडतांच भराभर शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त केल्या. शिकें तुटलें व बोक्याची धन झाली या न्यायानें सरकारच्या मर्जीतील मतलबी सावकारांनीं त्या जमिनी मातीमोलानें लिलावांत विकत घेऊन घशांत टाकल्या. काँग्रेसच्या चळवळींत ज्यांच्या जमिनी जातील त्यांना काँग्रेस अधिकारावर येतांच परत मिळवून देईल असें काँग्रेसनें शेतकरी वर्गाला वेळींच वचन दिलें होतें. त्या वचनाची पूर्तता काँग्रेस सरकार करू लागलें, तेव्हां त्या जमिनी घशांत टाकणाऱ्या सावकारांची आणि सावकारांच्या घशांत जमिनी लोटणाऱ्या सरकारची म्हणजेच काँग्रेस सरकारवर सासूपणा गाजवण्यासाठीं टपून बसलेल्या गव्हर्नरसारख्यांची खळबळ सुरू झाली. पण काँग्रेस सरकार त्यांना थोडेंच भितें ? बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर, लोकहिताच्या अवश्य त्या गोष्टी करण्याच्या आड तुम्ही आलांत तर आम्ही मंत्रीपदावर लाथ मारून चालते होऊं, अशा पेचांत काँग्रेसनें गव्हर्नरला टाकल्यावर त्याला तरी आपला हट्ट थोडाच चालवितां येतो ? त्याला शेवटीं कबुली द्यावीच लागली. मातीमोलानें ज्यांच्या ज्यांच्या जमिनी सावकारांनीं लिलावांत विकत घेऊन घशांत टाकल्या होत्या त्यांना त्यांना तें दिलेलें मातीमोल परत घेऊन जमिनी सोडाव्या लागल्या. आणि त्या मग शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांना परत मिळाल्या.

या खेरीज अशिक्षित हिंदी जनतेंत साक्षरता प्रसार करण्याचें कार्य काँग्रेस सरकारांनीं झपाट्यानें हातीं घेतलें. लो. टिळकांच्या वेळेपासून

मंत्रिमंडळांच्या कारभाराकडे पाहून नापसंतीनें नाकें मुरडावीशीं वाटलीं. हिंदुस्थानांतील दरिद्री नारायण जनतेचें जीवन कांहींसें सुखाचें व्हावें म्हणून काँगेस सरकारांनी दारू बंदीची मोहीम हातीं घेतली, तें पाहून पार्शी जमातींतील दारू मक्तेदार नाराज झाले व काँग्रेसच्या नांवानें बोटें मोडूं लागले. दारूच्या व्यापारावर खोऱ्यानें पैसा ओढून हां हां म्हणतां श्रीमंत होण्याला व त्या श्रीमंतींत मनसोक्त ऐषआराम भोगायला सोकावलेले हे दारूव्यापारी. काँग्रेस सरकारांनीं दारूबंदी सुरु केली; आतां आपला दारूचा व्यापार बुडणार आणि आपली चंगळ थांबणार असें पाहतांच त्यांना चीड आली. ते काँग्रेस सरकारांना पाण्यांत पाहूं लागले.

गांधीजींनी अनेकवार आपले प्राण पणाला लावून हरिजनांचा उद्धार करण्याच्या प्रश्नाला उभ्या देशांत व काँग्रेसध्येंही चालना दिली. अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील व हिंदु जमातीवरील महारोगापेक्षांही भयंकर असा कलंक काँग्रेस सरकारें पुसून टाकूं लागलीं. त्यामळें हिंदु धर्माभिमानी सनातन्यांचें पित्त भडकलें. हिंदु धर्म बुडाला रे बुडाला अशी त्यांची ओरड सुरूं झाली. हजारों वर्षांपासून चालत आलेल्या रुढींतील आणि धर्मांतील रानटी, राक्षसी बंधनांचा हा परिणाम खरा. धर्म म्हणून हें उच्च नीच व स्पृश्यास्पृश्य जातिधर्माचें विष जें साऱ्या हिंदु समाजाला पाजण्यांत आलें होतें व येत होतें त्याचा हा परिणाम होय. ह्या परंपरेवर सनातनी हिंदूंचा किती जबरा व अजाणपणाचा विश्वास होता हें शब्दांनी बोलून दाखवितां येणें कठीण! पुण्यांत गांधीजींवर हरिजन दौऱ्याच्या वेळीं बॉम्ब फेकण्याचा प्रयत्न झाला तें तरी ह्या विषारी प्रतिगामी सनातनी विचारसरणीचेंच फळ होय. सर्व सनातनी लोक जसे गांधीजींवर रागावले होते तसेच हरिजनांच्या उद्धारासाठीं झटणाऱ्या काँग्रेस सरकारांवरही रागावले. ते काँग्रेस सरकारांच्या नांवानें बोटें मोडूं लागले.

काँग्रेस सरकारांनीं शेतकऱ्यांच्या कल्याणाचा प्रश्न सोडविण्यासाठीं हातीं घेतला म्हणून जमीनदार आणि सावकार काँग्रेसवर रुष्ट होऊं लागले. कुळांच्या हितसंरक्षणासाठीं काँग्रेस सरकारें उपाययोजना करूं लागलीं म्हणून जमीनदार नाखूष आणि शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणापासून सोडविणारे कायदे काँग्रेस सरकारें करूं लागलीं म्हणून सावकार नाखूष. गुजराथेंत

तर ही सावकारी नाखुषी व त्याबरोबरच जमीनदार–सावकारधार्जिण्या सरकारचीही नाखुषी मुंबई प्रांतांतील काँग्रेस सरकारला सहन करावी लागली. गांधीजींची असहकारितेची चळवळ सुरू झाली तेव्हांपासून गांधीजींचे बळकट उजवे हात सरदार वल्लभभाई पटेल व त्यांचे सहकारी यांनीं गुजराथेंतील खेडा, बार्डोली अशा ठिकठिकाणीं शेतकऱ्यांना खडबडून जागें केलें होतें. करबंदीची व बेसुमार शेतसाऱ्याच्या सप्रमाण निषेधाची चळवळ गुजराथेंतील शेतकऱ्यांनीं सरदारजींच्या नेतृत्वाखालीं चांगलीच यशस्वी करून दाखविली होती. त्या चळवळीपायीं कितीतरी शेतकरी आपला जमीनजुमला गमावून बसले होते. तेव्हांच्या दांडगेशाही सरकारनें काँग्रेसची ही चळवळ मुळांतच दडपून टाकण्यासाठीं जरा कांहीं निमित्त सांपडतांच भराभर शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त केल्या. शिंकें तुटलें व बोक्याची धन झाली या न्यायानें सरकारच्या मर्जीतील मतलबी सावकारांनीं त्या जमिनी मातीमोलानें लिलावांत विकत घेऊन घशांत टाकल्या. काँग्रेसच्या चळवळींत ज्यांच्या जमिनी जातील त्यांना काँग्रेस अधिकारावर येतांच परत मिळवून देईल असें काँग्रेसनें शेतकरी वर्गाला वेळींच वचन दिलें होतें. त्या वचनाची पूर्तता काँग्रेस सरकार करू लागलें, तेव्हां त्या जमिनी घशांत टाकणाऱ्या सावकारांची आणि सावकारांच्या घशांत जमिनी लोटणाऱ्या सरकारची म्हणजेच काँग्रेस सरकारवर सासूपणा गाजवण्यासाठीं टपून बसलेल्या गव्हर्नरसारख्यांची खळबळ सुरू झाली. पण काँग्रेस सरकार त्यांना थोडेंच भितें ? बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर, लोकहिताच्या अवश्य त्या गोष्टी करण्याच्या आड तुम्ही आलांत तर आम्ही मंत्रीपदावर लाथ मारून चालते होऊं, अशा पेचांत काँग्रेसनें गव्हर्नरला टाकल्यावर त्याला तरी आपला हट्ट थोडाच चालवितां येतो ? त्याला शेवटीं कबुली द्यावीच लागली. मातीमोलानें ज्यांच्या ज्यांच्या जमिनी सावकारांनीं लिलावांत विकत घेऊन घशांत टाकल्या होत्या त्यांना त्यांना तें दिलेलें मातीमोल परत घेऊन जमिनी सोडाव्या लागल्या. आणि त्या मग शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांना परत मिळाल्या.

या खेरीज अशिक्षित हिंदी जनतेंत साक्षरता प्रसार करण्याचें कार्य काँग्रेस सरकारांनीं झपाट्यानें हातीं घेतलें. लो. टिळकांच्या वेळेपासून

सरकारनें राष्ट्रीय शिक्षणाची गळेचेपी चालविली होती; तें जिवंत राष्ट्रीय शिक्षण जनतेला आतां मिळूं लागलें. कांहीं तरी भलत्याच संशयानें नसतीं कारणें उकरून काढून सरकारनें किती तरी बहुमोल वाङमय पूर्वीं जप्त केलें होतें. काँग्रेस सरकारनें ह्या जप्त वाङमयाची पाहाणी करून त्यांवरील बंदी भराभर उठविली. लो. टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त ता. १ ऑगस्टची व गांधी जयंतीनिमित्त ता. २ ऑक्टोबरची सार्वत्रिक सुट्टी जाहीर झाली.

काँग्रेसनें म्हणजेच काँग्रेसच्या हिंदी जनतेनें आतांपावेतों ज्या हालअपेष्टा भोगल्या त्या हातीं काँग्रेसचा तिरंगी झेंडा घेऊन धैर्यानें, संयमानें व अभिमानानें भोगल्या. ह्या तिरंगी झेंड्याची प्रतिष्ठा राखण्यासाठीं लक्षावधि हिंद-संतानांनीं अनन्वित हाल भोगले, हरताळ पाळले, कायदेभंग केले, सत्याग्रह केले, तुरुंगवास पत्करला, लाठीमार व गोळीबार सहन केला, तुरुंगांत फटक्यांची अमानुष शिक्षा देखील भोगली. आपले काँग्रेसचे आजचे एक थोर पुढारी श्री. शंकरराव देव यांच्यासारख्या थोर लोकांनाही या कायदेभंगाच्या चळवळीपायीं तुरुंगांत फटक्यांची अमानुष शिक्षा भोगावी लागली. अशा ह्या आपणाला प्राणाहूनही प्यार असलेल्या काँग्रेसच्या तिरंगी झेंड्याची प्रतिष्ठा काँग्रेसनें स्वतः सरकार बनतांच सर्व प्रकारें वाढविली व जनतेचे धन्यवाद घेतले. कांहीं चुकाही काँग्रेस सरकारच्या हातून झाल्या असतील. कांहीं ठिकाणीं लोकहित साधतांना इतर अडचणींमुळें त्यांची कुचंबणाही झाली असेल. पण म्हणून काय आपणाला चंद्रावरच्या डागामुळें चंद्र टाकून देतां येईल ?

अशीं आपलीं काँग्रेस सरकारें शक्य तों लोकहितासाठीं मनोभावानें झटत होतीं. राज्यकारभाराची साफसफाई करून तीं एकेक पाऊल टाकीत होतीं. त्यांचा प्रवास देशांतील वाढत्या खळबळजनक परिस्थितीमुळें दिवसेंदिवस अडचणीचा होत होता. या सर्व अडचणींतून काँग्रेसला पार पाडण्यासाठीं गांधीजी काँग्रेसच्या बाहेर राहूनही काँग्रेसच्या पाठीशीं उभे होते.

जुनी पिढी व नवी पिढी यांच्या मनोवृत्ती कधीं स्वभावतः एका पातळीवर नसतात. काँग्रेसचें संथ पद्धतीचें राजकारण व विधायक कार्यक्रम देशांतील सर्वच तरुण पिढीचें मन पूर्णपणें आकर्षण करून घेऊं शकेना. ह्या विधायक कार्यक्रमापेक्षां जवळचा स्वातंत्र्याचा मार्ग शोधून काढण्यासाठीं

कांहीं तरुणवर्ग उतावळा होऊं लागला होता. किसान आणि जमीनदार यांच्यांतील झगडेही वा ूं पाहात होते. समाजवाद हळूहळू अधिकाधिक फैलावूं लागला होता. समाजवादी लोक गांधीवादापासून एकेक पाऊल दूर व कम्युनिझमच्या वाटेकडे वळूं लागल्याचें दिसत होतें. या बिकट परिस्थितींत देखील आशेचा एक किरण दिसूं लागला होता. दहशतवादी चळवळीपायीं अंदमानच्या तुरुंगांत डांबून पडलेल्या राजकीय कैद्यांना त्यांचा हिंसामय मार्ग चुकीचा आहे असें पटूं लागलें होतें. ते गांधीजींच्या अहिंसामार्गावर आपला विश्वास प्रगट करूं लागले होतें. देशांतल्या देशांतही दहशतवादी राजबंद्यांच्या मनोवृत्तींत हळू हळू अहिंसेकडे नेणारा इष्ट फरक दिसूं लागला होता.

काँग्रेसचे दोन महान् नेते गांधीजी आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे दोघे राष्ट्राला हाताशीं धरून धिमेपणानें प्रगतिपथानें चालवीत होते. गांधीजी काँग्रेसबाहेर राहूनही काँग्रेसचेच होते. त्यांच्या दूरदर्शी प्रोत्साहनानेंच आज लागोपाठ दोन वर्षे काँग्रेसचे अध्यक्ष या नात्यानें राष्ट्राचें धुरीणत्व पंडित जवाहरलाल नेहरूंकडे आलें होतें. नहरू हे राष्ट्राचा त्यांतल्या त्यांत तरुण पिढीचा जीव कीं प्राण होते.

अशा स्थितींत सन १९३८ साल उजाडलें व पंडित जवाहरलाल नेहरूंचा काँग्रेसमधील राष्ट्रकार्याचा अध्यक्षीय भार हलका करण्यासाठीं बाबू सुभाषचंद्र बोस यांना राष्ट्रानें पुढें आणून उभें केलें.

• • •

## २२ नेहरूंनंतर बोस

पं. जवाहरलाल नेहरू आणि बाबू सुभाषचंद्र बोस हे दोघे तरुण हिंदुस्थानचे तेव्हांपासूनचे अत्यंत लाडके पुढारी होत. पं. नेहरूंनीं सन १९२९ सालीं लखनौ काँग्रेसचें अध्यक्षपद भूषित केलें तेव्हां सुभाषबाबूंना काँग्रेस अधिवेशनासाठीं गौरवपूर्वक पाचारण केलें होतें. त्यापूर्वीं काँग्रेसच्या अधिवेशनांत पं.

मोतीलाल नेहरूंनीं पुरस्कार केलेल्या स्वराज्य योजनेवर असमाधानकारक-पणाचा शिक्का मारून स्वातंत्र्याची धडाडीनें घोषणा करण्यांत नेहरू आणि बोसबाबू हे दोघे पराक्रमी वीर राम-लक्ष्मणांसारखे बंधुभावानें चमकले होते. त्यानंतर सुभाषबाबू युरोपांत गेले. ते माघारे हिंदुस्थानांत येतात न येतात तोंच लखनौ काँग्रेस उजाडली. पण नेहरूंचें आमंत्रण स्वीकारून त्या अधिवेशनाला हजर राहण्याची संधी सरकारनें सुभाषबाबूंना दिली नाहीं. हिंदुस्थानच्या किनाऱ्याला त्यांचे पाय लागले आणि सरकारनें त्यांना पकडलें. ते सन १९३७ सालीं मार्च महिन्यांत तुरुंगांतून सुटले आणि पुढील वर्षी हरिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या कंठीं पडली.

अध्यक्षपदावर निवडणूक होतांच सुभाषबाबूंनीं आपलें धोरण स्पष्टपणें जाहीर केलें. सन १९३५ च्या सुधारणा कायद्यांतील फेडरेशन आतांपावेतों काँग्रेस टाकाऊ ठरवून लाथाडीत आली होतीच. सुभाषबाबूंनीं तर फेडरेशन सर्वतोपरी त्याज्य ठरवून फेंकून देण्याची स्पष्ट घोषणा केली. त्यांचा मुख्य भर राष्ट्रीय ऐक्यावर होता. जगाच्या आकाशांत दुसऱ्या महायुद्धाचे ढग हळू हळू जमूं लागले होते. हिंदुस्थानसारखा खंडप्राय देश आगामी महायुद्धांत कोणती बाजू घेईल अथवा काय धोरण ठेवील याची साम्राज्य सरकारला चिंता वाटणें साहजिक होतें. आणि आतां तर सुभाषबाबू काँग्रेसचे अध्यक्ष होते. गांधी-नेहरू पुरवले पण सुभाषबाबू नकोत असें सरकारला वाटण्याइतकी सुभाषबाबूंची आजपावेतोंची राष्ट्रीय कामगिरी उज्वल व प्रखर होती.

हरिपुरा काँग्रेसमध्यें सुभाषबाबूंनीं काँग्रेसच्या एकंदर धोरणाची जी स्पष्ट फोड केली तिच्यावरून काँग्रेस आपणाला सुभाषबाबूंच्या अध्यक्षीय राजवटींत योग्य प्रकारें चौदावें रत्न दाखविण्याला समर्थपणें उभी राहात आहे एवढें सरकारला ओळखतां येण्याजोगें होतें.

हरिपुरा काँग्रेसनंतर पुढील सालचें काँग्रेस अधिवेशन सन १९३९ मार्च महिन्यांत त्रिपुरीला भरलें. त्या अध्यक्षपदाची माळही राष्ट्रानें सुभाषबाबूंच्याच कंठीं घातली. पण त्यामुळें काँग्रेसमध्यें एक भीषण वादळ निर्माण झालें. अध्यक्षपदासाठीं त्या वर्षीं सुभाषबाबू व डॉ. पट्टाभिसीतारामय्या असे दोघे खंदे वीर निवडणुकीला उभे होते. डॉ. पट्टाभींना गांधीजींचा पाठिंबा होता.

आतांपावेतोंची वहिवाट अशी कीं काँग्रेसच्या अध्यक्षाची निवड बिनविरोध व्हावी. पण सुभाषबाबूंनी ती वहिवाट मोडली. याचें कारण त्यांना फेडरेशनची योजना हाणून पाडावयाची होती व ती हाणून पाडण्याच्या कामीं कणखर काँग्रेसाध्यक्ष या नात्यानें आपला जास्त उपयोग होईल असें त्यांना वाटलें. गांधीजींना व सरदार वल्लभभाई वगैरे इतर थोर काँग्रेस पुढाऱ्यांना सुभाषबाबूंचें पुन्हा अध्यक्षपदासाठीं उभें राहणें मान्य नव्हतें. पण तरी देखील सुभाषबाबूंनीं निवडणूक लढविली व निवडणुकींत ते विजयीही झाले. याचें कारण त्यांची पल्लेदार तेजस्वी धडाडी व तरुण काँग्रेस जनांतील लोकप्रियता होय.

तथापि सुभाषबाबूंचा तो विजय परिणामीं विस्मयकारक ठरला. काँग्रेसश्रेष्ठींत गांधीवादी बहुमत होतें. झपाट्यानें बदलणाऱ्या गुंतागुंतीच्या देश–काल–परिस्थितीला अनुसरून काँग्रेसची नौका या खळाळलेल्या समुद्रांतून सुखरूप चालविण्याला कांहीं विशेष कारणासाठीं सुभाषबाबूंपेक्षां डॉ. पट्टाभि हे अधिक सावध व अधिक अनुभवी कर्णधार आहेत असें तेव्हां गांधीजींचें मत होतें. डॉ. पट्टाभींचा पराजय हा गांधीजींना आपला पराजयसा वाटला व त्यांनीं तसें जाहीर बोलूनही दाखविलें. त्यामुळें काँग्रेसजनांना हळहळ वाटली. त्याचा परिणाम म्हणजे त्रिपुरी अधिवेशनातच सुभाषबाबूंसभोंवार विरोधी वातावरण दाटलें. तो विरोध तीव्र होतां होतां अखेर सुभाषबाबूंना काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. सुभाषबाबू आणि काँग्रेसश्रेष्ठी यांच्यांतील ही मतभेदाची फट यापुढें दुर्दैवानें न बुजतां रुंदावतच गेली. सुभाषबाबू म्हणजे बंगालचे पंचप्राण. काँगेसश्रेष्ठींनी जरी सुभाषबाबूंचा पाठपुरावा केला नाहीं तरी बंगालनें सुभाषबाबूंनाच पाठिंबा दिला. सुभाषबाबू बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले. सुभाषबाबू म्हणजेच बंगाल प्रांतिक काँगेस कमिटी अशी स्थिति तेव्हां होती. काँगेसश्रेष्ठींना बंगाल प्रांतिक काँगेस कमिटींत चाललेल्या आव्हानाच्या स्वरूपाच्या शिस्तभंगाकडे कानाडोळा करतां आला नाहीं. काँगेसनें सुभाषबाबूंकडे त्या शिस्तभंगाबद्दल खुलासा मागितला.

सुभाषबाबूंच्या या शिस्तभंगाच्या प्रकरणासारखेंच पण जरा निराळ्या रंगरूपाचें शिस्तभंग प्रकरण मध्यप्रांताचे तेव्हांचे काँग्रेस-पंतप्रधान डॉ. खरे

यांच्यामुळें निर्माण झालें होतें. मंत्रिमंडळ काँग्रेसचें. तें वास्तविक काँग्रेसला व मतदार संघाला जबाबदार राहावयाला हवें. पण डॉ. खरे मतदार संघाला आणि काँग्रेसला न जुमानतां प्रांताच्या गव्हर्नरला जबाबदार राहून कारभार करूं लागले. वाढतां वाढतां मध्यप्रांत मंत्रिमंडळांतील हा गोंधळ इतका वाढला कीं शेवटीं काँग्रेस वर्किंग कमिटीला तें प्रकरण हातीं घ्यावें लागलें. काँग्रेसच्या शिस्तीच्या व व्यापक राष्ट्रीय बाण्याच्या दृष्टीनें डॉ. खऱ्यांचें वर्तन मुळींच समर्थन करतां येण्याजोगें नव्हतें. म्हणून अखेर त्यांनीं आपल्या पंतप्रधानकीचा राजीनामा पाठविला. पण तो कुणाकडे? काँग्रेसच्या अध्यक्षाकडे नव्हे. तर प्रांताच्या गव्हर्नराकडे! गव्हर्नरनें डॉ. खरे यांनाच मग पुन्हा मंत्रिमंडळ बनवायला सांगितलें. त्यापूर्वी खरे मंत्रिमंडळांतील ज्या तिघां काँग्रेसवादी मंत्र्यांनीं डॉ. खऱ्यांच्या आदेशानुसार गव्हर्नरकडे राजीनामे पाठविले होते त्यांना गव्हर्नरनें पंतप्रधान डॉ. खरे यांचा सल्ला ऐकून बडतर्फ केलें होतें आणि आपणाला व डॉ. खऱ्यांना अनुकूल असे नवे मंत्री डॉ. खऱ्यांच्या गरजेप्रमाणें मंत्रिमंडळांत घेतले होते.

पण डॉ. खरे यांची ही बंडखोरी त्यांना पचली नाहीं. काँग्रेस वर्किंग कमिटीनें त्यांना ह्या प्रमादाचा जाब विचारला. तेव्हां डॉ. खरे वर्ध्याला गांधीजींकडे धांवत गेले. त्यांनीं गांधीजींपाशीं आपला अपराध कबूल केला व मंत्रीपदाचा राजीनामाही दिला. दोन वर्षेंपावेतों त्यांचें काँग्रेससभासदत्व शासन म्हणून रद्द झालें.

आपण चूक कबूल केली कीं गांधीजी आपणाला पुन्हा प्रधान मंत्रीपदावर कायम ठेवा असें काँग्रेस श्रेष्ठींना म्हणतील असें तेव्हां डॉ. खऱ्यांना वाटलें असेल. पण त्यांचे डावपेंच गांधीजींवर देखील असलें अनाठायीं वजन पाडण्याच्या कामीं फोल ठरले. गांधीजींसभोंवारच्या सत्य-अहिंसेच्या पवित्र यज्ञकुंडांत डॉ. खरे यांचें मायावी राजकारण आपोआपच जळून खाक झालें. 'फासिझमच्या राजवटींत डॉ. खऱ्यांच्या हातून हा अपराध घडला असता तर त्यांचा शिरच्छेद झाला असता' असें गांधीजी तेव्हां उद्गारले होते म्हणतात. यावरून डॉ. खरे यांचा आपराध किती घोर होता याची कल्पना करतां येते.

तेव्हांपासून डॉ. खरे गांधीजींवर व काँग्रेसवर सापासारखे उलटले. हिंदु-

महासभेनें त्यांना जवळ केलें. लगेच कालचा हा काँग्रेसनिष्ठ खादीधारी देशभक्त व गांधीजींचा कट्टा अनुयायी आज काँग्रेसचा आणि गांधीजींचा पट्टीचा निंदक बनून काँग्रेसविरुद्ध व गांधीजींविरुद्ध भयंकर गरळ ओकूं लागला !

काँग्रेसचा शत्रु आणि काँग्रेसच्या शत्रूंचा मित्र तो सरकारचा जिवलग मित्र हें तर ठरलेलेंच. डॉ. खरे आतां सरकारचे जिवलग मित्र बनले. व्हाइसरॉयनें त्यांना आपल्या कार्यकारी मंडळाचे नामदार सभासद नेमिलें !

काँग्रेसनें ' आगस्ट ' आंदोलनानंतर मध्यवर्ति सरकारांत पुन्हां अधिकार–स्वीकार केल्यावर डॉ. खऱ्यांसारख्या सरकारजमा व बेशिस्त लोकांनी त्यांत अर्थात्‌च स्थान उरलें नाहीं. पण पुढें ते आपल्या जातिनिष्ठ हिंदु-महासभावादी उग्र धोरणाच्या बळावर उग्र हिंदुत्ववादी अलवार संस्थानचे दिवाण झाले. गांधीजींच्या हत्येनंतर त्या हत्येला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कारण होणारीं कृष्णकारस्थानें अलवारांत चालत होतीं असें पुढें उजेडांत येऊं लागलें व त्यापायीं डॉ. खऱ्यांना अलवारचे दिवाणपद सोडावें लागलें. अलवार सोडावें लागलें आणि काँग्रेस सरकारच्या हुकमतींत नागपूरला आपल्या घरीं येऊन स्वस्थ बसावें लागलें.

सुभाषबाबू काँग्रेसचे अध्यक्ष असतांनाच काँग्रेसमधील हे डॉ. खऱ्यांचें बंड उत्पन्न झालें व मोडलें गेलें. सुभाषबाबूंचा विशुद्ध कणखरपणा या कामीं कसोटीला लागला. पुढें स्वतः त्यांच्यावरही काँग्रेसच्या शिस्तभंगाबद्दल ऑगस्ट १९३९ पासून तीन वर्षेपावेतों आपलें काँग्रेस सभासदत्व रद्द करून घेण्याचा प्रसंग आला. याप्रमाणें सुभाषबाबू देखील जरी अपरिहार्य कारणामुळें काँग्रेसपासून दूर लोटले गेले तरी ते डॉ. खऱ्यांसारखे काँग्रेसच्या शत्रूंच्या आहारीं मुळींच गेले नाहींत. दुसऱ्या महायुद्धाच्या ऐन रणधुमाळींत त्यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं केलेले भगीरथ प्रयत्न आज हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत सुवर्णाच्या अक्षरांनीं लिहून ठेवले जात आहेत. काँग्रेसच्या थोर कार्याच्या दृष्टीनें लो. टिळकांसारखे सुभाषबाबूही अमर आहेत. असो.

● ● ●

# २३ कॉंग्रेसचा अधिकारत्याग

सुभाषबाबू कॉंग्रेसमधून दुरावले गेले. त्या पुढील सालचें सन १९४० चें कॉंग्रेसचें अधिवेशन मार्च १९४० मध्यें रामगडला दुसऱ्या महायुद्धाच्या काळ्याकुट्ट छायेखालीं भरलें.

वस्तुत: मे १९३९ पासूनच आकाशांत दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमूं लागले होते. आतां लौकरच महायुद्धाचा वणवा पेटणार हें ओळखून हिंदुस्थानांतील प्रांतिक सरकारांकडील विशेष अधिकार व्हाइसरॉयच्या हातीं सुपूर्त करणारें बिल पार्लमेंटांत मंजूर झालें. अर्थात् कॉंग्रेस मंत्रिमंडळांवर मोठा आणीबाणीचा प्रसंग आला. युद्धजन्य परिस्थितीच्या तरतुदीसाठीं व्हाइसरॉयच्या अधिकारछत्राखालीं प्रत्येक प्रांताचा गव्हर्नर हुकूमशहा बनला आणि मंत्रिमंडळें हे गव्हर्नरच्या हुकुमाची तामिली करणारे भारवाहक ठरण्याचा प्रसंग आला.

तोंच युरोपांत ता. १ सप्टेंबर १९३९ रोजीं महायुद्धाचा वणवा भडकला. लगेच दोन दिवसांनी ब्रिटननें आणि हिंदुस्थाननें जर्मनीशीं युद्ध जाहीर केलें. युद्धाचा प्रत्यक्ष वणवा भडकण्यापूर्वीं आठवडाभर सोव्हिएट रशिया व जर्मनी यांचा तह होऊन दोघेही मित्र बनले होते. हिंदुस्थाननें इंग्लंडबरोबर महायुद्धांत पदार्पण केलें याचा अर्थ इंग्रज सरकारनें हिंदुस्थानची मानगुटी पकडून त्याला आपणाबरोबर युद्धांत ओढून नेलें हाच. एरव्ही हिंदुस्थानच्या मताला कोण विचारतो ? व्हाइसरॉयचें मत तें हिंदुस्थानचें मत ! कॉंग्रेसच्या आणि कॉंग्रेस मंत्रिमंडळांच्या मताला कसली किंमत ?

अशा स्थितींत कॉंग्रेस मंत्रिमंडळांना राज्य कारभार करतां येणें शक्यच नव्हतें. सवादोन वर्षांच्या तुटपुंज्या कारकीर्दींत देखील शक्य तितक्या प्रकारांनीं लोककल्याणाचें सोनें जिथें आपण वेंचलें तिथें अमानुष हिंसेच्या बळावर फोंफावणाऱ्या युद्धकार्यांतील सहकारितेच्या गोंवऱ्या वेंचण्याचें वांट्याला आलें तें कॉंग्रेसला कसें सहन व्हावें ?

अखेर ता. २२ आक्टोबर १९३९ रोजीं कॉंग्रेसनें आपल्या प्रांतोप्रांतींच्या मंत्रिमंडळांना राजीनामे देऊन बाहेर पडण्याचा आदेश दिला. तो आदेश कानीं पडतांच मंत्रिपदाचीं वस्त्रें फेंकून देऊन कॉंग्रेसमातेच्या हांकेला धांवून जाणारे पहिले थोर हिंदपुत्र आपले तेव्हांचे मद्रासचे पंतप्रधान व आजचे हिंदचे गव्हर्नर जनरल चक्रवर्ति राजगोपालाचारी हे होत. त्यांच्या मागोमाग बाकीच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीही दिवाळीपावेतों आपले राजीनामे सादर केले. अशी एकूण आठ प्रांतांत गेलीं दोन अडीच वर्षें चाललेली कॉंग्रेसची राजवट संपुष्टांत आली. या आठ प्रांतांतील हिंदुस्थानची बावीस कोटी प्रजा ह्या दोन अडीच वर्षांच्या विसाव्यानंतर पुन्हां गव्हर्नरांच्या एकतंत्री अंमलाच्या तापल्या तव्यावर उभी राहण्याच्या दिव्याच्या तयारीला लागली.

सरकारला कॉंग्रेसचा हा निर्णय अनपेक्षित मुळींच वाटला नाहीं. आपण सांगूं त्याप्रमाणें आपल्या तालावर नाचायला कॉंग्रेस ही कांहीं सरकारजमा मुस्लीम लीग नव्हे हें सरकारही ओळखीत होतें. कॉंग्रेसनें अवघ्या दोन अडीच वर्षांच्या कारकीर्दींत इतका चोख राज्यकारभार केला होता कीं व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांना देखील त्या कारभाराची मुक्त कंठानें स्तुति करणें भाग पडलें.

• • •

## २४ व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत वाढ

कॉंग्रेस तर अधिकाराचीं वस्त्रें फेंकून देऊन बाहेर पडली. पण पुढें काय ? हा प्रश्न सुटण्याची मात्र अजून अनुकूल वेळ आली नव्हती. परिस्थिति तुम्हांला काय पाहिजे असें विचारीत दातृत्वाच्या भावनेनें समोर उभी होती. पण आम्हांला काय पाहिजे हें सांगण्याइतकी एकी आमच्यांत कुठें होती ? हिंदुस्थानला अमुक पाहिजे असें ठासून सांगणारी एकमुखी मागणी हिंदुस्थानपाशीं नव्हती. मागणी होती; पण तिला अनेक डेळेफांटे फुटलेले होते. कॉंग्रेसचा

कल्पवृक्ष समोर उभा होता. पण त्या कल्पवृक्षाची छाया कुणाला मानवे तर कुणाला मानवत नसे. राष्ट्रांतील बहुजनसमाज कॉंग्रेसच्या पाठीशीं होता हें खरें. पण त्या बहुजनसमाजाला मार्गदर्शन करणारी एकटीच कॉंग्रेस नव्हती. जनतेला कळून वा नकळून वाटेनें अथवा आडवाटेनें नेणारे निरनिराळे राजकीय पक्ष तेव्हां हिंदुस्थानांत उदय पावले होते. हिंदुस्थानांतच नव्हे तर प्रत्यक्ष कॉंग्रेसच्या परिसरांतच अशा कांहीं पक्षांचा जन्म झाला होता. कॉंग्रेस समाजवादी पक्ष सन १९३४ सालीं स्थापन झाला. तो फैजपूरच्या कॉंग्रेसपासून अधिकाधिक प्रकाशांत येत होता. कॉंग्रेसवर ह्या पक्षाची निष्ठा होती. पण गांधीवादाचें त्याला वावडें होतें. सामान्यतः या पक्षाचे डोळे तेव्हां सोव्हिएट रशियाकडे बरेच वेधले गेले होते. या पक्षाचा जसा गांधीवादाला विरोध तसाच युद्धांत सहाय्य करण्यालाही विरोध होता. तथापि कॉंग्रेसमधील हा प्रगतिपर पक्ष म्हणून तेव्हां ओळखला जात असे.

हिंदी कम्युनिस्ट पक्ष हा कॉंग्रेस समाजवादी पक्षापेक्षां जास्त ठाम भूमिका घेणारा, मार्क्स–लेनिन यांनीं शिकविलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रातिनिधिक अनुयायी असा पक्ष होता. सोव्हिएट रशियांतील अधिकृत कम्युनिझमचा हा पक्ष सच्चा अनुयायी होता. या पक्षाचे लोक तेव्हां गनिमी काव्यानें कॉंग्रेसमध्येंही होते. पण ते कॉंग्रेसचे अथवा गांधीवादी म्हणून नव्हते. गांधीवादाला या पक्षाचा मूलभूत विरोध होता. गेल्या वीस वर्षांच्या काळांत हिंदी कामगार वर्गांत या पक्षाचें बरेंच वजन वाढलेलें होतें. आपल्या इंग्रजी साम्राज्यशाहीला हा धोका आहे असें पाहून सरकारनें हा पक्ष पूर्वींच बेकायदेशीर ठरविला होता.

किसानांची चळवळही आतां दिवसेंदिवस विशेषतः मध्यप्रांत, बिहार व बंगालचा कांहीं भाग, संयुक्तप्रांत या टापूंत फोफावूं लागली होती. पण ही चळवळ कॉंग्रेसची नसली तरी अगदीं स्वतंत्र अशी नव्हती.* कॉंग्रेस, समाजवादी आणि कम्युनिस्ट या दोघांचाही त्या चळवळींत बराचसा हात होता. त्यांतल्या त्यांत ती चळवळ तेव्हां बहुतेक कम्युनिस्टांच्याच हातीं होती. हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचा देश खरा, व हिंदी शेतकऱ्यांचें कल्याण करण्यासाठीं कॉंग्रेस झटत होती हेंही खरें. पण ही किसानांची

* या लेखकाची कादंबरीमय आंग्लशाही मालेची 'भारतमाते, ऊठ !' ही पहिली कादंबरी पाहा.

चळवळ काँग्रेसच्या नेतृत्वाखालीं चालली होती असें मात्र नाहीं. * काँग्रेस समाजवादी व कम्युनिस्ट हे काँग्रेसमध्यें राहूनच किसानांना जागृत करीत होते. पण ते काँग्रेसशीं पूर्ण सहमत होते असें मात्र नव्हे.

काँग्रेसनें मोठ्या दु:खानें शिस्तभंगाबद्दल शासन करून दूर लोटलेल्या सुभाषबाबूंचा फॉर्वर्ड ब्लॉक अथवा पुरोगामी पक्ष आतां नव्यानेंच जन्माला आलेला होता. हा पक्ष काँग्रेसला विरोध करणारा म्हणून स्थापन झाला नव्हता. परंतु काँग्रेसपेक्षां वेगवान गतीनें स्वातंत्र्यसंपादनासाठीं धांवून जाऊं पाहणारा आणि म्हणूनच सुभाषबाबूंप्रमाणेंच काँग्रेसच्या पावलावर पाऊल टाकून चालायला असमर्थ ठरलेला असा हा पक्ष होता.

हे डावे पक्ष व पंथ तत्त्वत: एकाच युद्धविरोधी भूमिकेवरून बोलणारे होते. पण एकमुखी मागणी करणारे मात्र नव्हते. त्यांची एकी करण्याचा प्रयत्न तेव्हां सुभाषबाबूंनीं करून पाहिला. पण यश आलें नाहीं.

मुस्लीम लीग हा मुसलमानांच्या पुढारीपणाचा दावा सांगून काँग्रेसशीं उघड उघड स्पर्धा करणारा व सरकारजमा झालेला मोठा व जुना पक्ष होता. तसाच भाई रॉय यांचाही एक अहंविशिष्ट बहुधा कागदी सवता सुभा काँग्रेसच्या कल्पवृक्षाखालीं पण अगदीं अंगचोरपणानें उभारला जात होता. हा पक्ष युद्धकाळीं फासिस्टविरोधी भूमिकेवरून दोस्त राष्ट्रांना सर्व प्रकारें युद्धसहाय्य करण्यासाठीं अतिशय उतावळा झाला होता. युद्धसहाय्य करण्याजोगें सामर्थ्य त्या पक्षाच्या अंगीं नव्हतें व हिंदी जनताही त्या पक्षाच्या पाठीशीं नव्हती ही गोष्ट निराळी. पण जे लोकांना अप्रिय ते सरकारला प्रिय हटकून असतात. त्यांतले भाई रॉय हे होते.

अशी ही आंवळ्याची मोट काँग्रेसला बांधावयाची होती. त्याखेरीज राष्ट्राचें पुढें पाऊल पडणार नव्हतें. काँग्रेसच्याच छायेखालीं वाढणारा काँग्रेस समाजवादी पक्ष व बेकायदा ठरलेला हिंदी कम्युनिस्ट पक्ष या दोन पक्षांच्या आधारानें वाढीला लागलेली किसानांची चळवळ तसाच सुभाषबाबूंचा पुरोगामी पक्ष यांची फारशी चिंता करण्याचें काँग्रेसला कारण नव्हतें. हीं भांडणें असलीं तरी तीं घरचीं भांडणें होतीं. रॉय पक्षाचें स्वरूप मात्र अडचण म्हणण्यापेक्षां ओंगळ अडगळीसारखें होतें. पण ती अडगळही काँग्रेसला फारशी नडणारी नव्हती. प्रश्न होता काय तो मुस्लीम लीगचा. मुस्लीम लीग काँग्रेस-

* पं. जवाहरलाल नेहरू यांचें आत्मचरित्र पाहा.

विरोधी भूमिकेवरून मतलबसाधूप्रमाणें युद्धसहाय्य करणारी होती. स्वातंत्र्याची एकमुखी मागणी करण्याच्या कामीं काँग्रेसला खरी आड येणारी हीच एक मोठी अडचण होती. हिंदुस्थानची मागणी एकमुखी नाहीं या सबबीवर सरकार ती मागणी पूर्ण करण्याच्या कामीं नेहमींच धूर्तपणानें कानावर हात ठेवीत असे. गांधीजींनीं व त्यांच्या नेतृत्वाखालीं काँग्रेसनें हें वर्म ओळखलें होतें. म्हणून गांधीजींनीं व काँग्रेसनें सतत हिंदु–मुसलमानांच्या एकीवर भर दिला. पण ती एकी होऊं द्यावयाची नाहीं असे डाव सरकार आंतून खेळत होतें. व काँग्रेसच्या विरुद्ध धोरण ठेवल्यानें आपल्या पदरीं सरकारकडून अनायासें राष्ट्राच्या मागणीतील मोठा वांटा पडेल ह्या आशेनें मुस्लीम लीगचे धूर्त पाताळयंत्री पुढारी बॅ. जीना इंग्रजधार्जिणेंपणानें राजकारणाचा कुटिल डाव खेळत होते.

अशा स्थितींत सप्टेंबर १९३९ मध्यें वर्धा येथें प्राप्त परिस्थितीचा विचार करण्यासाठीं काँग्रेस वर्किंग कमिटीची सभा भरली. साऱ्या राष्ट्राचा प्रश्न सोडवायचा आहे हें ध्यानीं घेऊन वर्किंग कमिटीनें जीनांनाही आमंत्रण दिलें होतें. पण अगोदरच इतर कांहीं कामें करावयाचीं ठरलीं आहेत व वेळ नाहीं या सबबीवर जीनांनीं वर्ध्याला जाण्याचें टाळलें. त्यापूर्वी गांधीजींची सिमल्याला व्हाइसरॉयशीं मुलाखत झाली. गांधीजींनीं इंग्लंडविषयीं गाढ सहानुभूति व्यक्त केली. भूतदयेच्या उदात्त भावनेनें त्यांचें अंतःकरण युद्धांत होणाऱ्या अमानुष हत्येसाठीं कळवळलें. त्यांना इंग्लंडचा युद्धाच्या पेटत्या खाईंत नाश झालेला मुळींच पाहवला नसता. पण सरकारला हा कळवळा नको होता. नुसती सहानुभूति नको होती. प्रत्यक्ष युद्धसहाय्य पाहिजे होतें. आणि सत्य–अहिंसावादी गांधीजींचा तर असल्या हिंसामय युद्धाला मूलभूत विरोध होता !

पं. जवाहरलाल नेहरू तेव्हां जनरल चँग कै शेकला भेट देण्यासाठीं चीनमध्यें गेले होते. ते तिकडून परत आले. त्यांना देखील युद्धांत होणारी हिंसा मानवणारी नव्हती. त्यांनीं येतांक्षणीं जाहीर केलें कीं इंग्लंड संकटांत आहे; या संकटांत स्वातंत्र्याचा सौदा ठरवीत बसून अशा संकटाचा फायदा काँग्रेस घेणार नाहीं.

पण काँग्रेस वर्किंग कमिटीनें गांधीजी व नेहरू यांच्यापेक्षां जास्त व्यवहार-

६१३३ ६६८३

वादी भूमिका घेतली. तिनें जाहीर केलें कीं सहकार्य दोन समान पक्षांत होत असतें. काँग्रेस लोकशाहीच्या-स्वातंत्र्याच्या बाजूचीच आहे. पण आमचें स्वातंत्र्य जोंपावेतों इकडे हिरावून घेतलें जात आहे, नाकारलें जात आहे, तोंपावेतों काँग्रेस ह्या युद्धांत भाग घेऊं शकणार नाहीं. सरकारचे युद्धहेतु अगोदर जाहीर झाले पाहिजेत ; मग काँग्रेस काय करावयाचें तें पाहील.

पण काँग्रेसच्या ह्या स्पष्ट सवालाला सरकारकडून हिंदुस्थानांत आणि विलायतेंतही उडवाउडवीचीं उत्तरें मिळालीं. पेंचप्रसंग सुटण्याला त्यांची कांहीं मदत होईना.

पुढें लौकरच आक्टोबरअखेर गांधीजींसह निरनिराळे निवडक पन्नास पुढारी प्राप्त परिस्थितीचा विचार करण्यासाठीं व्हाइसरॉयनें भेटीला बोलावले. त्यांत जीनाही होते. एवढा पुढाऱ्यांच्या भेटीचा गाजावजा होऊन शेवटीं या पोखरलेल्या डोंगरांतून उंदीर निघाला. व्हाइसरॉयनें आपल्या कार्यकारी मंडळाची वाढ करण्याची तेवढी तयारी दर्शविली. पण स्वातंत्र्याचें नुसतें नांव देखील उच्चारलें नाहीं.

कुणालाही चीड येण्याजोगें व्हाइसरॉयचें हें कृत्य होतें. गांधीजींना हें पाहून वाईट वाटलें. मुस्लीम लीग इतकी सरकारजमा ना, पण तिनेंही चिडून सरकारशीं असहकारिता पुकारली.

देशाच्या स्वातंत्र्ययुद्धांत बाजूला कुठें तरी खबदाडांत निवाऱ्याच्या जागीं दडी मारून बसलेली क्रियाशून्य मतलबसाधू हिंदुमहासभा मात्र नेमकी यावेळीं सरकारला युद्धसहाय्य करण्यासाठीं पुढें आली ! मुस्लीम लीगचा ( आणि काँग्रेसचाही ) असहकार त्या अर्थीं आपला सहकार अशी ती हिंदुमहासभेची नेहमींची भूमिका होती. तिनें पाहिलें कीं काँग्रेस राजी नाहीं, लीग राजी नाहीं, अशा स्थितींत सरकारला हिंदुमहासभेखेरीज दुसऱ्या कुणाचा आधार आहे ? हिंदुस्थान हिंदूंचा. आम्ही हिंदू बहुसंख्य. सरकारला खिंडींत गांठून अनायासें हिंदुराज्याची प्राणप्रतिष्ठा करण्याची सोन्याची संधी लाभली आहे ती कां दवडा ?

भाई रॉय व डॉ. आंबेडकर हे देखील हिंदुमहासभेच्याच उत्साहानें सरकारला युद्धसहाय्य करण्याच्या हौसेनें पुढें आले. बेकायदा असलेला हिंदी कम्युनिस्ट पक्ष देखील जो आरंभीं हें साम्राज्यशाही युद्ध आहे असें

म्हणून युद्धविरोधी भूमिका घेत होता तो जर्मनीनें रशियावर चढाई केल्यावर बऱ्याच महिन्यांनीं अज्ञातवासांतून जागा होतांच, हें लोकयुद्ध आहे असे सोव्हिएट रशियाच्या नादलहरींतून आलेले पोपटपंची बोल बोलूं लागला व दोस्तराष्ट्रांना ह्या युद्धांत मदत करण्यासाठीं उभा राहिला.

पण सरकार ह्या साऱ्या बोलक्या शंखांच्या आवाजांतील पोकळ आवेश ओळखून होतें. सरकारनें त्या फालतू आश्वासनांना फारशी किंमत दिली नाहीं. व्हाइसरॉयनें पूर्व संकल्पाप्रमाणें कांहीं होयबांना हातीं धरून त्यांना कार्यकारी सभासदत्वाचा शेंदूर फासून ता. १६ आक्टोबर १९३९ रोजीं आपल्या कार्यकारीमंडळांत वाढ केल्याची घोषणा केली. आणि पुन्हा सभा-समित्या, मुलाखती यांचें नेहमींचें मानभावी फसवें एरंडाचें गुऱ्हाळ सुरू केलें.

• • •

## २५ स्मशान-शांतता

खरें पाहिलें तर सरकारचें युद्धसहाय्यासाठीं काय अडलें होतें ? हिंदी संस्थानिक सर्व प्रकारें युद्धसहाय्याच्या गोण्या हौसेनें आपल्या पाठीवरून नेऊन सरकारच्या दारीं टाकीत होते. पंजाब हें लढावू सैनिकांचें आगर, त्या पंजाबांतून भरपूर सैन्यपुरवठा होत होता. अन्नाला महाग झालेले, भुकेलेले पंजाबी व इतर लढवय्ये पोटासाठीं भराभर सैन्यांत भरती होत होते. पोटां-तील पेटत्या भुकेच्या आगीपुढें कुठचा देश आणि कुठचा परदेश ! सरकार ह्या उपाशी लढवय्या तरुणांना लष्करांत भरती करीत होतें व रणांगणावर जाऊन मरण्यासाठीं पोसून वाढवीत होतें. मुस्लीम लीगचा विरोध होता; पण तो केवळ कागदी-बोलक्या शंखांचा विरोध तो. त्या विरोधाला सरकार थोडेंच जुमानतें ! पंजाबांत व इतरत्रही लीगचा विरोध जो आधीं मुळांतच

नकर्तेपणाच्या रुसव्यासारखा होता, तो अरण्यरुदनासारखा आणखी फोल ठरला होता.

सरकारला इतर कशाचीही पर्वा नव्हती. मुख्यतः काँग्रेसचा नैतिक पाठिंबा सरकारला हवा होता. हिंदुस्थानला सरकारनें बळेंच युद्धांत ओढलें होतें. हिंदुस्थानची सारी जनता म्हणजेच जनतेची प्रतिनिधि काँग्रेस ह्या आपल्या सरकारी हिंदुस्थानच्या पाठीशीं आहे असें सरकार जगाला भासवूं पाहात होतें. कारण काँग्रेसच्या म्हणजेच गांधीजींच्या नैतिक पाठिंब्याला जगांत फार मोल होतें. ती मोलाची शाल मिळवून आपल्या साम्राज्यशाही डावपेचांच्या पायांवर पांघरूण घालण्यासाठीं सरकारची सारी धडपड होती.

असे दिवसामागून दिवस जाऊं लागले. पण सरकार आणि काँग्रेस यांच्यामध्यें निर्माण झालेला पेंचप्रसंग सुटण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. व्हाइसरॉयनें आपल्या कार्यकारी मंडळाची वाढ केली. अणे, आंबेडकर यांसारखे एरव्हीं खरे थोर लोक कार्यकारी मंडळाचे सभासद झाले. पण म्हणून काय असल्या बेगडी उपायांनीं सरकारची पत वाढते थोडीच ?

अशा स्थितींत मार्च १९४० मध्यें रामगड येथें मौलाना अबुल कलम आझाद यांच्या अध्यक्षतेखालीं काँग्रेसचें अधिवेशन भरलें. या अधिवेशनांत राष्ट्रानें एकमुखानें सरकारच्या पोकळ बोलघेवडेपणाचा व नकर्तेपणाचा धिक्कार केला.

पण सरकारनें त्या धिक्कारालाही जुमानलें नाहीं. पेंचप्रसंग पूर्ववत् चालूच होता. पुढें जुलै १९४० मध्यें पुणें येथें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा भरली व सरकारशीं जुळतें घेण्यासाठीं काँग्रेस आणखी कांहीं पायऱ्या खालीं उतरली. मुख्य प्रश्न परचक्रापासून स्वदेशाचें रक्षण कसें करावें हा. ती हमी देण्याला काँग्रेस तयार झाली. परचक्र आलें तर युद्ध करावें लागणार, शस्त्रास्त्रें वापरावीं लागणार, हिंसा करावी लागणार. हें सर्व ध्यानीं घेऊन जरूर तर हिंसायुक्त साधनांनीं देखील आपण स्वदेशाचें रक्षण करूं असें काँग्रेसनें जाहीर केलें आणि देशरक्षणासाठीं राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याला आपली तयारी दर्शविली.

राहिला प्रश्न काय तो गांधीजींचा. गांधीजींना कोणत्याच प्रकारची हिंसा

मान्य नव्हती. व युद्ध म्हणजे मूर्तिमंत हिंसेची पेटती खायी. म्हणून युद्धही मान्य नव्हतें. सरकारनें गांधीजींच्या अहिंसेला बिचकून आपणाला नकार देऊं नये म्हणून काँग्रेसनें आपल्या ह्या बदललेल्या पवित्र्यानुसार काँग्रेसमधून गांधीजींची उच्च अहिंसेचें पालन करण्यासाठीं जड अंतःकरणानें मुक्तता केली.

तरी देखोल सरकार दाद देईना. काँग्रेसनें राष्ट्रीय सरकार मागितलें; व्हाइसरॉयनें राजा उदार झाला व भोपळा दान दिला या न्यायानें युद्धसल्लागार मंडळाची योजना जाहीर केली. देशांतील राजकीय पक्षांच्या प्रमुखांचें हें युद्ध सल्लागार मंडळ व्हाइसरॉयला बनवावयाचें होतें.

गांधीजी जरी काँग्रेस–नेतृत्वाच्या जबाबदारीपासून मुक्त झाले तरी देखील आपण पुन्हा सत्याग्रहाची चळवळ सुरू करूं व सरकारची अडवणूक करूं असें सरकारला भय वाटत असेल हें त्यांनीं ध्यानीं घेतलें. या भयामुळें युद्धकार्यांत आपला अडथळा उत्पन्न होईल म्हणून सरकार काँग्रेसच्या मागण्या मान्य करण्याला कचरत असेल तर ती देखील अडचण दूर करावी म्हणून गांधीजींनीं स्पष्टपणें जाहीर केलें कीं आपण युद्धसमाप्तीपावेतों सत्याग्रहाची चळवळ करणार नाहीं व सरकारची अडवणूकही करणार नाहीं.

तथापि काँग्रेसच्या व गांधीजींच्या विधायक सूचनांचा सरकारवर कांहीं देखील परिणाम होत नाहीं हें जेव्हां ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें पाहिलें, तेव्हां मात्र काँग्रेसचा नाइलाज झाला. लौकरच सप्टेंबर १९४० मध्यें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा झाली. त्या सभेंत देशांतील एकंदर परिस्थितीचा सर्व बाजूंनीं विचार झाला. विचाराअंतीं काँग्रेसनें पुन्हा रामगड काँग्रेसच्या ठरावानुसार कणखर पवित्रा टाकण्याचा निर्णय घेतला. इंग्रज सरकारनें हिंदुस्थानला न विचारतां साम्राज्यशाही युद्धांत बळेंच ओढलें, हा हिंदी राष्ट्राचा धडधडीत अपमान होय, व असल्या बळजबरीनें काँग्रेस चालू युद्धाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवणार नाहीं, असें सरकारला रोखठोक बजावण्यांत आलें.

अर्थात् आतां काँग्रेसपुढें राहिलेला दुसरा मार्ग म्हणजे सत्याग्रह. युद्धाशीं संबंध ठेवणार नाहीं असें ठरल्यावर युद्धासाठीं सैनिक व पैसा या प्रकारें कोणतेंही सहाय्य करावयाचें नाहीं हें ओघानेंच आलें. साम्राज्य सरकारनें जें युद्ध हिंदुस्थानावर बळेंच दंडेलीनें लादलें होतें, त्या युद्धाला विरोध

करण्याचा हिंदुस्थानला हक्कच आहे असा गांधीजींचा दावा होता. पण सरकारची तर कोणत्याही युद्धविरोधी कृत्याला दडपशाहीच्या वटहुकुमी कायद्यांनीं पुर्ण बंदी होती. म्हणून गांधीजींनीं सरकारपाशीं भाषणस्वातंत्र्याची मागणी केली. आपणावर बळेंच लादलेल्या युद्धाचा निषेध करण्यासाठीं युद्धविरोधी घोषणा करण्याचें भाषणस्वातंत्र्य आपणाला पाहिजे असें गांधीजींनीं स्पष्ट सांगितलें.

पण सरकार कधींतरी असें उघडया डोळयांनीं मरण पत्करायला तयार होईल? गांधीजींची युद्धविरोधी धोरणाची चळवळ सुरू होऊं देणें म्हणजे शंकराचा विश्वसंहारकारक तृतीय नेत्र आपणावर उघडून घेणें होय हें सरकारला चांगलें कळत होतें. सरकारनें गांधीजींना भाषणस्वातंत्र्य तर दिलें नाहींच. पण या निमित्तानें देशांत पुन्हा सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली तर तिला तोंड देण्यासाठीं दडपशाहीची जय्यत तयारी मात्र केली.

सरकारकडून भाषणस्वातंत्र्य मिळत नाहीं अशी खात्री होतांच गांधीजींनीं अत्यंत मर्यादित स्वरूपांत युद्धविरोधी घोषणांचा सत्याग्रह आरंभिला. डिसेंबर १९४० अखेर पावेतों गांधीजींच्या कसोटीला उतरलेले देशांतील पांचशें सहाशें निवडक स्त्री–पुरुष सत्याग्रही युद्धविरोधी घोषणांचा सत्याग्रह करून तुरुंगांत गेले. पण याचाही सरकारवर कांहीं परिणाम होईना तेव्हां गांधीजींनीं व काँग्रेसनें एप्रिल १९४१ मध्यें प्रातिनिधिक सत्याग्रहाची चळवळ घोषित करून त्या चळवळींत भाग घेण्यासाठीं काँग्रेसच्या सर्व अनुयायांना हांक दिली. साऱ्या देशभर जोराचें सत्याग्रही आंदोलन सुरू झालें. वीस हजारांहून जास्त सत्याग्रही ह्या सत्याग्रहयुद्धांत सैनिक म्हणून लढले. ते पकडले गेले. देशांतील तुरुंग सत्याग्रह्यांनीं भरून गेले. आधींच जनता सरकारच्या आडमुठ्या प्रतिगामी धोरणामुळें चिडून सरकारची सत्याग्रही अडवणूक करण्यासाठीं चंग बांधून तयार होती. त्या आगींत सरकार वाढत्या आडमुठेपणाचें व दडपशाहीचें तेल ओतूं लागलें. त्यामुळें चळवळ अधिक पेटूं लागली. याचा परिणाम विपरीत होणार, सरकारला यामुळें अतिशय उपद्रव होणार आहे हें काँग्रेसनें व गांधीजींनीं पाहिलें. तशी सरकारची अडवणूक आपण युद्धसमाप्तीपावेतों करणार नाहीं असें गांधीजींनीं सरकारला वचन दिलें. आणि चालू सत्याग्रहाच्या चळवळीचे

सरकारला उपद्रवकारक होणारे परिणाम ध्यानीं घेऊन सत्याग्रहाची चळवळ मागें घेतली.

देशांत पुन्हा स्मशान-शांतता नांदूं लागली.

## २६ क्रिप्स शिष्टाई

हिंदुस्थानांत याप्रमाणें स्मशानशांतता राखण्यासाठीं सरकारच्या वटहुकुमी राजवटीचा वरवंटा देशभर फिरत होता. तसेंच तिकडे हिंदुस्थानबाहेर दुसरें महायुद्ध प्रळयकाळासारखें दिवसेंदिवस अधिकाधिक भडकत होतें. तेव्हांचे इंग्लंडचे मुख्य प्रधान चर्चिल आणि अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांचें या युद्धांतून निर्माण होणाऱ्या इंग्लंड-अमेरिकेच्या व साऱ्या जगाच्या भवितव्याविषयीं अटलांटिक महासागरांतील एका गुप्त जागीं महत्त्वाचें गुप्त खलबत झालें. ह्या युद्धांत आजवर जगांतील अनेक राष्ट्रें गोवलीं गेलीं होतीं व जाणार होतीं. कांहीं राष्ट्रें वसाहती होतीं तर कांहीं सर्वथा परतंत्र होतीं. ह्या जगांतील राष्ट्रांच्या मनांत आपल्या युद्धहेतूविषयीं संशय राहू नये, आपल्या स्वतंत्रतेला व स्वयंनिर्णयाच्या हक्कांना ह्या युद्धांत दोस्तराष्ट्रांचा जय झाल्यामुळें कोणत्याही प्रकारें बाध येणार नाहीं अशी खात्री पटावी, यासाठीं चर्चिल व रुझवेल्ट यांच्या एकमतानें अशा राष्ट्रांकरितां अटलांटिक सनद या नांवाची एक सनद घोषित करण्यांत आली.

काँग्रेसनें ती वार्ता ऐकून हिंदुस्थानचा देखील या सनदेंत समावेश होतो का अशी पृच्छा केली. ही चर्चा बरीचशी होऊन अखेर विलायतेंत पार्लमेंटांतही तिचा प्रतिध्वनि उमटला. तेव्हां इंग्लंड व अमेरिका ह्या प्रधान मित्रराष्ट्रांनीं जगाला दिलेली ही अटलांटिक सनद हिंदुस्थानला देखील लागू आहे काय या प्रश्नाला चर्चिलनें सडेतोडपणें नकारात्मक उत्तर दिलें,

" नाहीं ! नाहीं ! मी इंग्लंडच्या बादशहाचा मुख्य प्रधान झालों आहें तो बादशहांचें साम्राज्य असें वितळवून टाकण्यासाठीं झालेला नाहीं. "

दुःखावर डागण्या दिल्यासारखे साम्राज्यसरकारच्या मुख्य प्रधानाचे हे बोल हिंदुस्थानच्या जिव्हारीं झोंबले. पण तें दुःख शांतपणें सहन करणें हिंदुस्थानला भाग होतें. गांधीजी व काँग्रेस यांनीं सरकारला परोपरीनें समजावून सांगितलें कीं, आम्हांला राष्ट्रीय सरकार स्थापन करूं द्या. सरकारला भीति वाटत असेल तर आम्ही आश्वासन देतों कीं राष्ट्रीय सरकार आम्हांला मिळालें तरी आम्हीं सरकारच्या लष्करी हालचालींत कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ करणार नाहीं. आमची एवढी मागणी मान्य झाली कीं आमचें राष्ट्रीय सरकार मग युद्ध जिंकण्याच्या दृष्टीनें मित्रराष्ट्रांशीं योग्य तो तहनामा करील.

हिंदुस्थानांत अशी पेंचप्रसंगाची कोंडी कायम ठेवून सरकार हिंदुस्थानची सर्वतोपरी कुचंबणा करीत होतें व आपणाला युद्धकार्यासाठीं हवा तसा राज्यकारभार हाकीत होतें, म्हणून कांहीं जगांत वाहणारे युद्धाचे वारे थंड पडले होते असें नाहीं. जर्मनी, इटली, जपान वगैरे हुकुमशाही फॅसिस्ट शत्रुराष्ट्रांचा जोर सारखा वाढत होता. युद्धाच्या आरंभीं जर्मनीचा मित्र बनलेला सोव्हिएट रशिया देखील हिटलरनें विश्वासघात करून त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारल्यापासून मित्रराष्ट्रांत समाविष्ट झाला होता. किंबहुना सारें जगच फासिस्ट राष्ट्रें व फासिस्टविरोधी राष्ट्रें अशा दोन भागांत विभागलें गेलें होतें. फासिझमचें संकट हें साऱ्या जगांतील जनतेवर ओढवलेलें संकट होतें. त्या संकटाचा प्रतिकार करण्यासाठीं जगांतील जनतेचा विश्वास व सहानुभूति मिळविणें इंग्लंडला व अमेरिकेलाही भाग होतें. तेव्हां तरी शत्रुपक्षाची सर्वत्र सरशी होत असलेली दिसत होती. आशिया खंडांतील लष्करशाही जपानही इतरत्र मित्रराष्ट्रांची एकसारखी तारांबळ उडूं लागलेली पाहून वाढते विरोधी पवित्रे टाकूं लागला होता. जपाननें पूर्व आशियांत हिटलरी धुमाकूळ मांडला होता. डिसेंबर १९४१ मध्यें जपानचा अमेरिकेच्या पर्ल बंदरावर अचानक भयंकर हल्ला झाला. तेव्हां इंग्लंड–अमेरिकेचें डोळे उघडले कीं हा भस्मासूर आतां आपल्या मस्तकावर हात ठेवून आपलेंच भस्म करणार. पर्ल बंदराचा चुराडा केल्यावर जपानची धाड सिंगापूरवर आली. आरमारी ठाणें या दृष्टीनें इंग्रज सरकारच्या मतें

अजिंक्य असलेलें सिंगापूर फुंकरीसरसें पडलें. तिथून ही टोळधाड पसरत पसरत रंगूनवर आली व रंगूनही पडलें. पुराणांत तीन पावलांत त्रिभुवन ग्रासून टाकणाऱ्या बटु वामनाप्रमाणें जपाननें अवघ्या तीन महिन्यांच्या अवधींत पूर्व आशिया ग्रासून टाकला व आतां ब्रह्मदेशांतून ती जपानी मुसंडी हिंदुस्थानावर कोसळणार अशीं स्पष्ट दुश्चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां मात्र इंग्रज सरकार घाबरलें. असंतुष्ट हिंदुस्थान अशा ऐन आणीबाणीच्या वेळीं जर जपानच्या आहारीं गेला तर आपल्या साम्राज्याची वावटळींत सांपडलेल्या पत्त्याच्या बंगल्याइतकीही धडगत नाहीं. अशी सरकारची खात्री पटूं लागली. म्हणून ब्रिटिश मंत्रिमंडळानें ह्या हिंदी नागाला भुलवून फसवून पोतडींत भरण्याचा कावा रचून आपल्यांतलाच एक मंत्री सर स्टॅफोर्ड क्रिप्स हा कुशल गारुडी हिंदुस्थानांत पाठविला.

मार्च १९४२ च्या अखेरीला क्रिप्स हिंदुस्थानांत आले. येतांच ते आपल्या मायावी सौजन्याचें मोहजाल अनेक परींनीं हिंदुस्थानवर पसरूं लागले. काँग्रेसच्या पुढाऱ्यांशीं त्यांच्या रसभरित वाटाघाटी सुरू झाल्या. तशाच वाटाघाटी मुस्लीम लीगशीं, इतर पक्षांशीं व तशाच इतर शेलक्या एकांड्या शिलेदारांशींही सुरू झाल्या. हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापन व्हावें ही जी काँग्रेसची मागणी, त्या मागणीच्या आधारें क्रिप्स साहेबांनीं बरेच दिवस एरंडाचें काळकाढू गुऱ्हाळ चालविलें. अशा वाटा-घाटींत कांहीं काळ निघून गेला. इतक्यांत जपान हिंदुस्थानवर स्वारी करीत नाहीं हें निश्चतपणें आढळून आलें. अर्थात् आतां हिंदी नागाला डोल-वण्यासाठीं नागसूर वाजवीत बसण्याचें गारुड्याला कांहीं कारण उरलें नाहीं. त्यानें नागसूर आवरता घेण्याला सुरुवात केली. वाटाघाटीचा पवित्रा एक-दम बदलला. काँग्रेसला इतके दिवस वाटाघाटींतून देऊं करण्यांत आलेलें राष्ट्रीय सरकार आतां अडचणीमुळें इतक्यांतच देतां येणार नाहीं अशा अर्थाचा अडचणींचा पाढा वाचायला क्रिप्ससाहेबांनीं सुरुवात केली. तोंडानें नाहीं म्हणण्याऐवजीं हातानें नाहीं म्हणावें या हिकमतीनें त्यांनीं पाणी घालून वाढविलेल्या ताकासारखें पूर्वीच्याहूनही पांचट व बेचव असें राष्ट्रीय सरकार देण्याची मानभावी भाषा सुरू केली.

धर्मराजाप्रमाणें सत्याला व धर्माला जागणारे महात्मा गांधींचे पट्टशिष्य

पं. जवाहरलाल नेहरू क्रिप्ससाहेबांची ही या बोटावरची थुंकी त्या बोटावर करण्याची करामत पाहून चिडले. त्यांनीं क्रिप्ससाहेबांवर उघडपणें वचनभंगाचा आरोप केला. पण क्रिप्ससाहेबांना आपल्या साम्राज्य सरकारच्यावतीनें आतां फक्त न ना चा हिकमतीपाढा वाचावयाचा होता. त्या दुष्कर्मांत त्यांना मुस्लीम लीगचेंही चांगलेंच सहाय्य झालें. त्यांनीं राष्ट्रीय सरकार स्थापण्याला युद्धकाल ही अडचण म्हणून तर पुढें केलीच पण तिच्या जोडीला लीगशीं काँग्रेसचे असलेले मतभेद ही अशी कांहीं डोंगरासारखी प्रचंड धोंड काँग्रेसच्या वाटेंत उभी केली कीं ती कुणाला ओलांडतांच येऊ नये. लीग काँग्रेसशीं मुळींच मतैक्य करीना आणि काँग्रेस–लीग मधील ह्या आपसांतील मतभेदामुळें त्या अडचणीच्या युद्धकालांत साम्राज्य सरकार हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापायला तयार होईना !

अशा प्रकारें क्रिप्स आले आणि गेले. लोकांना वाटलें कीं क्रिप्सशिष्टाई अयशस्वी झाल. पण खरें पाहतां क्रिप्सशिष्टाई पूर्ण यशस्वी झाली. साम्राज्य सरकारनें कुटिल नीतीनें हिंदुस्थानांत योजिलेलें कार्य सफल झालें.

• • •

## २७ ' ऑगस्ट ' ज्वाळा भडकल्या !

इंग्रज सरकारच्या हेतूविषयींचा गांधीजींचा व काँग्रेसचा ग्रह क्रिप्सच्या येण्याजाण्यामुळें बदलण्याचें फारसें कारण नव्हतें. आणि तो फारसा बदललाही नाहीं. परंतु मुस्लीम लीगचें हिडीस सरकारधार्जिणें धोरण पाहून मात्र गांधीजींचें मतपरिवर्तन झालें. इतके दिवस हिंदु–मुसलमानांची एकी हा प्रश्न गांधीजींना जीवाभावाच्या मोलाचा वाटत होता. काँग्रेस देखील लीगची इतके दिवस स्थानीं व अस्थानींही बूज राखीत आली ती केवळ गांधीजींसाठीं. पूर्वीं गोलमेज परिषदेंत गांधीजींनीं काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधि या नात्यानें लीगला कोरा चेक दिला होता. त्याबद्दल त्यांनीं अनेकांचा रोषही

सहन केला होता. याचें कारण त्यांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला हिंदु–मुसलमानांची एकी अवश्यच काय पण अपरिहार्य वाटत होती. परंतु जोंवर हिंदु–मुसलमानांना एकमेकांशीं झुंजवणारा तिसरा पक्ष अर्थात् हा सरकार-पक्ष हिंदुस्थानांत आहे तोंपर्यंत हिंदु–मुसलमानांची एकी होणें शक्य नाहीं हें गांधीजींनीं आतां पुरेपुर ओळखलें. हा तिसरा पक्ष येथून गेल्यावर व स्वातंत्र्य-प्राप्ति झाल्यावर हिंदु–मुसलमान हिंदुस्थानांत एकोप्यानें नांदूं लागतील असें त्यांनीं आपलें स्पष्ट मत जाहीर केलें. त्यावेळीं अनेकांना वाटलें कीं गांधीजींनी आपलें मुसलमानांविषयींचें मत पालटलें. कुणाला त्यांत आनंद वाटला तर बेकायदा हिंदी कम्युनिस्ट पक्षासारख्या कुणाला वाईट वाटलें. गांधीजींच्या ह्या मतपरिवर्तनाचा हिंदी कम्युनिस्टांनीं फारच विपर्यास केला.

परंतु गांधीजी मुसलमानांच्या बाबतींत अखेर या निर्णयाला आले. त्या निर्णयाच्या औचित्याला आजपावेतोंच्या मुस्लीम लीगच्या बऱ्यावाईट करणीचा इतिहास साक्ष होता.

हा इतिहास पूर्वी आपण थोडासा नजरेखालीं घातलाच आहे. सन १८९२ सालीं इंडिया कौन्सिल ॲक्ट पसार करण्यांत आला, त्या वेळीं लॉर्ड डफरीननें गुप्त सूचना–पत्रकाच्या रूपानें हें स्वतंत्र मतदार संघाचें सापाचें पिल्लू भारतमातेच्या उशाला प्रथम आणून सोडलें. नंतर मोर्ले–मिंटो सुधारणांच्या वेळीं आक्टोबर १९०६ मध्यें आगाखान हे व्हाइसरॉय मिंटो यांच्याकडे स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करायला गेले; आणि त्याच सालीं मुस्लीम लीगची स्थापना झाली. ही गोष्ट ध्यानीं घेण्याजोगी आहे. सन १९१९ मध्यें मॉंटफोर्ड सुधारणांत मुसलमानांना उघड स्वतंत्र मतदारसंघ मिळाला. सन १९२७ सालीं सायमन कमिशनचें हिंदुस्थानांत आगमन झालें तेव्हां जीनांनीं आपल्या इतिहासप्रसिद्ध चवदा मागण्या पुढें करून लीगला आणखी ऐसपैस हातपाय पसरायला जागा करून घेतली. सन १९३२ सालीं तेव्हांचे इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं जो जातीय निवाडा दिला त्यांत मुसलमानांना स्वतंत्र मतदार संघ तर दिलाच व त्याखेरीज सूचनापत्रकाच्या गुप्त मसुद्यांत मुसलमानांसाठीं मंत्रिमंडळांत व सरकारी नोकऱ्यांत तिसरा हिस्सा बहाल करून शेषाधिकार गव्हर्नर जनरलकडे ठेवले.

अखंड हिंदुस्थानचा द्विखंड हिंदुस्थान होऊन त्याच्या बऱ्याच मोठ्या लचक्याचें पाकिस्तान हें अलग राष्ट्र स्थापन झालेलें आज आपणाला दिसतें. ही पाकिस्तानची मूर्त कल्पना प्रथम सन १९३० सालीं लीगच्या लखनौ एथील अधिवेशनांत त्या अधिवेशनाचे अध्यक्ष सर महंमद इक्बाल यांच्या मुखांतून जन्माला आली. सन १९४० सालीं लाहोरला लीगचें अधिवेशन भरलें. त्या अधिवेशनांत एका ठरावाच्या रूपानें पाकिस्तान हें मुस्लीम लीगचें अंतिम उद्दिष्ट असल्याची अधिकृत घोषणा करण्यांत आली.

अगदीं आरंभापासून लीग ही मतलबसाधूपणानें सरकारच्या हातांतील कळसूत्री बाहुल्यासारखी वेळोंवेळीं कशी वागत आली हें आपण ध्यानीं आणलें म्हणजे गांधीजींना हिंदु–मुसलमान ऐक्याच्या बाबतींत अखेर आपला निर्णय कां बदलावा लागला याचा उलगडा होतो.

राष्ट्राची युद्धजन्य परिस्थितींत सर्वतोपरी कुचंबणा होत आहे, दारिद्र्य, अन्नान्न दशा, लष्करी अत्याचार व त्यांच्या जोडीला सरकारची रावणशाही वटहुकुमी कारकीर्द यामुळें जनतेला जगण्यापेक्षां मरण बरें वाटण्याइतकी दारुण परिस्थिति निर्माण झाली आहे, हें भीषण दृश्य गांधीजींना डोळ्यां-समोर मूर्तिमंत दिसत होतें. कांहींही करून ह्या कुचंबणेंतून राष्ट्रासाठीं मार्ग काढलाच पाहिजे अशी असह्य तळमळ त्यांना लागून राहिली होती. ह्या कुचंबणेंतून बाहेर पडायला मार्ग कसा व कोणता शोधावा याविषयीं त्यांनीं नेहरू व आझाद यांच्याशीं जून महिन्यांत आठवडाभर विचारविनिमय केला व ब्रिटिश लष्करानें 'सुवेळीं व सुव्यवस्थित माघार' घ्यावी ही आपली घोषणाही मागें घेतली. सैन्याला हिंदुस्थानांत युद्ध संपेपावेतों राहण्याला त्यांनीं संमति दिली. ( अर्थात् सैन्यानें राहावयाचें तें मालक म्हणून नव्हे तर संमतीनें व मित्रत्वानें राहावयाचें. ) इंग्रज सरकारनें सत्तात्याग केल्या-नंतर खरेंखुरें राष्ट्रीय सरकार स्थापन होईल व तें घटना समिति बोलावील; ती घटना समिति मग सर्वांच्या संमतीनें योग्य ती घटना आंखील, असें गांधीजींनीं आपल्या योजनेचें साफल्य समजावून सांगितलें.

पण क्रिप्ससाहेबांना तें कसें पटणार ? व कां पटणार ? त्यांचा कार्यभाग झाला होता. हिंदुस्थानच्या तोंडाला बेमालूम पानें पुसून पसार व्हावयाचें तेवढें बाकी राहिलें होतें. अनेक सबबी सांगून उद्यांच्या वायद्याची साखर-

घोळ भाषा बोलून क्रिप्ससाहेब जसे आले तसे एके दिवशीं माघारे गेले. हिंदुस्थान मात्र होता तिथेंच कुचंबत राहिला.

परंतु अशी कोंडी कायम राहून फार दिवस पल्ला येण्याजोगा नव्हता. काँग्रेसला या अडचणींतून राष्ट्रासाठीं निश्चित मार्ग आंखणें अवश्यच होतें. तो मार्ग आंखण्यासाठीं अर्थात् निर्वाणीचा परिणामकारक उपाय शोधून काढण्यासाठीं मुंबईला तारीख ७ ऑगस्ट १९४२ रोजीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचें अधिवेशन भरलें. काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनाचें जें वैभव व जो उत्साह तें वैभव तो उत्साह या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनांत कांठोकांठ उचंबळत होता. आपण आतां योग्य ती कृति करणार व ती करतां करतां मरावें लागलें तरी मरणार पण स्वस्थ बसणार नाहीं व माघार घेणार नाहीं अशा निर्धारानें साऱ्या राष्ट्राचे डोळे मुंबईच्या त्या अधिवेशनाकडे लागले होते. कान काँग्रेसकडून संग्रामाची आज्ञा ऐकण्यासाठीं उत्सुकतेनें टवकारून तिकडे ओढ घेत होते. काँग्रेसच्य आज्ञेनें सारें राष्ट्र आज सीमोल्लंघन करून स्वातंत्र्यसंग्रामांत उतरणार होतें.

काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना अबुल कलम आझाद यांनीं अधिवेशनाच्या आरंभीं महत्त्वपूर्ण भाषण केलें. त्यांनीं सांगितलें, " इंग्रजी सत्ता इथून गेली पाहिजे. हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें हिंदी माणसांच्याच हातीं आलीं पाहिजेत. राज्यसत्ता काँग्रेसच्या हातीं द्या असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं जनतेचें प्रातिनिधिक सरकार स्थापन करा आणि त्या सरकारच्या हातीं राज्यसूत्रें देऊन इंग्रजी सत्ता इथून जाऊं दे. "

त्या अधिवेशनांतील महत्त्वाचा ठराव पं. जवाहरलाल नेहरू यांनीं मांडला. ते उद्गारले, " माझे देशबांधव गरिबींत-भयंकर गरिबींत काळ कंठीत आहेत. हें माणुसकीचें हिडीस स्वरूप पाहिलें कीं मला संताप आवरेनासा होतो. चितेनें आणि संतापानें मला रात्रींच्या रात्री जागून काढाव्या लागतात. मला सत्ता नाहीं माझ्या हातीं शस्त्र नाहीं. अशा असहाय्य स्थितींत जपान स्वारी करून आला तर काय करूं ? काय करूं मी ? "

गांधीजींनीं त्या सभेंत भाषण केलें. तें कोणा देवदूताच्या संदेशासारखें सर्वांच्या हृदयाला जाऊन भिडलें. त्यांनीं विद्यार्थी, कामगार, संस्थानिक, मुसलमान अशा सर्वांना अमोल राष्ट्रीय स्वातंत्र्याची आठवण करून दिली.

आजपासून मी स्वतंत्र आहें असें मानून प्रत्येकानें वागावें असें सांगून शेवटीं त्यांनीं आदेश दिला, '.करीन तरी किंवा मरेन तरी' अशा निर्धारानें वागा.

मात्र हा निर्वाणींचा आदेश देतांनाही गांधीजी संपूर्ण अहिंसेचें पालन आपणाला करावयाचें आहे ही आठवण सर्वांना द्यावयाला विसरले नाहींत. तसेंच ही निर्वाणीची भाषा बोलतांनाहीं अखेरच्या क्षणापावेतों देखील आपण तडजोडीला तयार आहों हें त्यांनी स्पष्ट केलें. या काँग्रेस अधिवेशनांत काँग्रेसनें गांधीजींना आगामी देशव्यापी लढ्याचे सर्वाधिकारी नेमले होते. गांधीजी आतां ह्या लढ्यासाठीं साऱ्या राष्ट्राचे सेनापति झाले होते.

शेवटीं 'चले जाव 'चा संस्मरणीय ऐतिहासिक ठराव अधिवेशनांत रात्रीं दहा वाजतां पसार झाला. त्या ठरावाची अंमलबजावणी सेनापति आज्ञा करतील तेव्हां व आज्ञा करतील तशी व्हावयाची होती. दरम्यान गांध जी व्हाइसरॉयला भेटणार होते; आपल्या नेहमींच्या सत्याग्रही तंत्राप्रमाणें अगदीं अखेरच्या क्षणापावेतों सन्म न्य तडजोडीचा प्रयत्न करणार होते.

पण सरकारला तितका धीर मुळींच नव्हता. आसुरी दडपशाहीची सरकारची सर्व जय्यत तयारी होती. 'चले जाव'चा ठराव संमत करून काँग्रेसचे प्रतिनिधी आपापल्या ठिकाणीं जाऊन झोंपतात न झोंपतात तोंच तिकडे सरक.री दडपशाहीचीं चक्रें जोरानें फिरुं लागलीं. तो रविवार होता. त्या दिवशीं पहांटे चार वाजतां बिर्लाभवनांत गांधीजी व त्यांच्या बरोबर महादेवभाई देसाई आणि मिराबेन यांना अटक करून अज्ञात स्थळीं नेण्यांत आलें. आझाद, जवाहरलाल वगैरे वर्किंग कमिटीचे सभासदही असेच पकडून नेण्यांत आले आणखी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे कितीतरी सभासद व देशांत ठिकठिकाणचे काँग्रसचे कार्यकर्ते उजाडेपावेतों व उजाडल्यावर कोण कुठें व किती पकडले गेले याचा पत्ता नाहीं.

गांधीजींना पकडलें. जवाहरलाल, आझाद अशा काँग्रेसच्या श्रेष्ठ पुढाऱ्यांना पकडलें. आणि देशभर हा धरपकडीचा वणवा झंझावातानें फुलविल्यासारखा भडकला. तेव्हा जनतेचा संतापही अनावर होऊन तसाच भडकला.

भडकलेला वणवा सारासार विचाराच्या मर्यादेंत न राहातां जें मार्गांत येईल तें जाळीत सुटतो. सारा देश त्या वणव्यानें पेटला. मुंबई, पुणें अशा शहरोशहरीं, गांवोगांवीं, खेडोपाडीं त्या वणव्याच्या ज्वाला भडकल्या. तशाच रोज रोज अधिकाधीक भडकूं लागल्या.

• • •

## २८ गांधीजी सुटले

गांधीजी व इतर महान् काँग्रेस पुढारी बंदीशालेंत कोंडले गेले म्हणून तिथें तरी त्यांना स्वस्थता थोडीच मिळते ? ज्याचा त्याचा जीव काळजीच्या टांगणीला लागलेला. हा राजकीय पेंचप्रसंग कसा सुटेल ? जपान हिंदुस्थानावर आक्रमण करतो कीं काय ही भीति एकसारखी भेडसावीत होती—जपाननें माझ्या मायदेशावर आक्रमण केलें तर ? बंगाल हा वास्तविक अन्नानें समृद्ध असलेला प्रांत. पण ज्या शेतकऱ्यांनीं अन्न, पिकवावें त्यांचीच अन्नाचें सोनें पिकवून देखील उपासमार होऊं लागली. बंगालभर दुष्काळ पडला. पण तो दुष्काळ निसर्गदेवतेच्या कोपामुळें पडलेला नव्हे, तर आपल्या निष्ठुर करणीनें माणुसकीला लांछन लावणाऱ्या गडगंज धनकुबेर व्यापाऱ्यांनीं भरमसाट नफ्याच्या आशेनें मुद्दाम पाडलेला. आणि सरकारला देखील एक प्रकारें तो दुष्काळ हवाच होता. इतकी अन्नान्न दशा झाल्यावर तरी लोक वठणीवर येतील अशी सरकारला वेडी आशा होती.

देशांत ठिकठिकाणीं अन्नासाठीं लुटालूट होऊं लागली. उदरीं भडकलेली अन्नाची भूक माणसाच्या हातून कोणतें साहस करवणार नाहीं ? बरें; लोकांना नुसतें खायला अन्नच नाहीं असें नाहीं; तर अंग झाकायला धड वस्त्र नाहीं, दिवा जाळायला रॉकेल नाहीं, कांहीं नाहीं. मग लोक जिवावर उदार होऊन लुटालूट न करतील तर काय करतील ?

सरकारच्या बेदरकार हलगर्जीपणामुळें व अमानुष दडपशाहीमुळें जनतेला हे

हाल भोगावे लागत होते. जनता लुटालुटीसारख्या अन्यायाकडे ओढली जात होती. पण सरकारनें त्या भुकेनें वखवखलेल्या, अन्न–वस्त्राला व प्रकाशालाही महाग झालेल्या दीन-दुबळ्या रंजल्यागांजल्या जनतेला काय दिलें? अन्न? नाहीं. वस्त्र? नाहीं. रॉकेल तेल? नाहीं. दिला लाठीमार आणि गोळीबार!

एवढ्या भयंकर दिव्यांतून राष्ट्र कुचंबत पडलें असतांना ती मुस्लीम लीग काय करीत होती? ती हिंदुमहासभा काय करीत होती? हिंदु आणि मुसलमान या दोघांनाही वरच्या प्रश्नाचें उत्तर देतांना शरमेनें खालीं माना घालाव्या लागत होत्या.

देशांत चळवळीच्या निमित्तानें अत्याचार झाले याचें गांधीजींना फार वाईट वाटलें. त्यांनीं ताबडतोब ता. १४ ऑगस्ट १९४२ रोजीं सरकारला तुरुंगांतून पत्र पाठवून त्या अत्याचारांचा निषेध केला. पण सरकारनें तो निषेध कांहीं काळ मुद्दाम लपवून ठेवला. कां? गांधीजींनीं केलेला निषेध जर खवळलेल्या जनतेच्या कानापर्यन्त गेला असता तर अत्याचाराला खास आळा बसला असता. पण सरकारला तेंच तर नको होतें. अत्याचार थांबले असते तर स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या तेजस्वी जनतेचीं हाडें नरम करण्यासाठीं सरकारला तिची दडपशाहीनें लांडगेतोड कशी करतां आली असती?

गांधीजींनी तुरुंगांतून व्हाइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो यांना पत्रांवर पत्रें पाठवून न्याय मागितला. पण सरकारपाशीं न्याय नव्हताच. मग व्हाइसरॉय तरी न्याय कुठून देणार? अखेर गांधीजींना न्याय मिळविण्यासाठीं ता. १० फेब्रुवारी १९४३ रोजीं एकवीस दिवसांचें उग्र उपोषण आरंभावें लागलें. त्या उपोषणाच्या मुदतींत सारें राष्ट्र, सारें जग चिंता करीत होतें कीं हा जराजर्जर महात्मा ह्या उपोषणांतून वांचेल का?

गांधीजी स्थानबद्ध होते. जनता त्यांच्या पावेतों पोंहोचूं शकत नव्हती. सरकार अगदीं बेदरकार होतें. तरी देखील गांधीजी त्या उपोषणांतून निभावले. ता. २ मार्च १९४३ रोजीं पूर्ण एकवीस दिवसांनंतर त्यांचें उपोषण सुटलें.

पण उपोषण सुटलें तरी पेंचप्रसंग सुटला नाहीं. तो सोडविण्याचा प्रयत्न करून पाहण्यासाठीं सप्रू, जयकर वगैरे पुढाऱ्यांची ता. १० मार्च १९४३ रोजीं

मुंबईत एक सभा झाली. पण सरकार त्या पुढाऱ्यांना तुरुंगांत गांधीजींची नुसती भेट देखील घेऊं द्यायला तयार नाहीं. मग पेंचप्रसंग कसा सुटणार ?

पण आशा अमर असते म्हणतात. पेंचप्रसंग सुटण्याच्या आशेला आलेल्या भोळ्या लोकांना वाटलें कीं सरकार आपल्या विश्वासांतील जीनांना तरी गांधीजींची भेट घेण्याला मनाई करणार नाहीं. त्यांनीं जीनांची आळवणी केली. तेव्हां जीनांनीं गर्जून सांगितलें कीं ' मला भेटण्याची गांधींची इच्छा असेल तर तशा आशयाचें पत्र त्यांनीं मला पाठवावें. ते अडवून धरण्याची छाती सरकारला नाहीं. '

गांधीजींनी नाम्रपणें ' मी आहें तसा माझा स्वीकार करा ' असें जीनांना भेटीचें पत्र पाठविलें. पण तें जीनांना सरकारकडून पोहोंचूंही शकलें नाहीं. जीनांचे दर्पोक्तीचे बोल फोल झाले.

थोड्या दिवसांनीं लॉर्ड लिन्‌लिथगो गेले व त्यांच्या जागीं लॉर्ड वेव्हेल हे नवे व्हाइसरॉय आले. पण व्हाइसरॉय बदलला तरी व्हाइसरॉयचें धोरण बदललें नाहीं. गांधीजींनी वेव्हेलपाशीं मुलाखतीची मागणी केली. तेव्हां त्यांना पूर्वीचेंच उत्तर मिळालें. ' देशांतील दंग्याधोप्यांना काँग्रेस जबाबदार आहे. आठ ऑगस्टचा ठराव चुकीचा आहे. तो अगोदर मागें घ्या, मग पुढच्या गोष्टी. '

गांधीजींना त्या जुलमी अटी व ते कांगावखोर आरोप मुळींच मान्य नव्हते. मग ते त्यांना कबुली कशी देणार ?

अखेर गांधीजी तुरुंगांत फारच आजारी पडले. तेव्हां मात्र सरकारचा निरुपाय झाला. सरकारला ता. ६ मे १९४४ रोजीं गांधीजींची येरवड्यांतून सुटका करणें भाग पडलें. महादेवभाई व पूज्य कस्तुरबा यांची तुरुंगांतून मृत्यूनें त्यापूर्वींच सुटका केली होती !

सुटका होतांच गांधीजींनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें, व ऑगस्टचा ठराव आतां अस्तित्वांत नाहीं असें सांगून मागें घेतला. नंतर थोडे दिवस देशाची एकंदर हालहवाल पाहून शक्य तें स्थिरस्थावर केल्यानंतर त्यांनीं जीनांना पत्र लिहून भेटीची इच्छा दर्शविली. या भेटीची पार्श्वभूमि राजाजींनीं पूर्वींच तयार करून ठेवली होती. ' राजाजी योजना ' म्हणून पुढें प्रकाशांत आलेल्या एका काँग्रेस–लीग एकीच्या योजनेवर गांधीजींच्या उपोषणकालीं राजाजींनीं

त्यांची सही घेऊन ठेवली होती. त्यामुळें आरंभापुरता तरी गांधी जीना भेटीचा मार्ग कांहींसा मोकळा झाला होता.

त्या योजनेचीं मुख्य कलमें अशीं— (१) युद्ध संपतांच हिंदुस्थानच्या वायव्य आणि ईशान्य कोपऱ्यांत ज्या ठिकाणीं मुसलमान बहुसंख्याक असतील असा सलग मुलूख आंखण्यास कमिशन नेमावें. त्या भागांतील रहिवाशांनीं फाळणी करावी कीं नाहीं याचा निर्णय द्यावा. बहुमतानें हिंदुस्थानपासून अलग असें स्वतंत्र राज्य तेथें स्थापावें असा निर्णय दिल्यास तो अमलांत आणावा. मात्र या भागाच्या सरहद्दीवरील जिल्ह्यांना हिंदुस्थानांत राहावयाचें कीं स्वतंत्र राज्यांत सामील व्हावयाचें हें ठरविण्याचा अधिकार असावा. (२) सार्वत्रिक मतदानापूर्वी सर्व पक्षांना आपलीं मतें मांडण्याची मोकळीक राहावी (३) देशाची फाळणी करण्याचें ठरल्यास संरक्षण, व्यापार, दळणवळण चीं साधनें इत्यादि महत्त्वाच्या बाबींसंबंधीं अस्तित्वांत येणाऱ्या सत्तेचा व हिंदुस्थानचा करार व्हावा. (४) दोन्ही राज्यांतील लोकसंख्येची देवघेव केवळ ऐच्छिक भूमिकेवरूनच व्हावी. (५) ब्रिटन संपूर्ण सत्तात्याग करण्यास सिद्ध झालें तरच वरील शर्ती बंधनकारक समजण्यांत याव्या. (६) स्वतंत्र हिंदुस्थानच्या घटनेंत वर ग्रंथित केलेल्या योजनेचा अंतर्भाव करण्याचें आश्वासन मिळतांच हिंदी स्वातंत्र्याच्या मागणीचा पुरस्कार करून सत्तासंक्रमणाच्या काळांतील तात्पुरत्या सरकारांत मुस्लीम लीगनें काँग्रेसबरोबर सहकार्य करावें.

पण व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल हे तेव्हां देखील परंपरेच्या सरकारी कपटनीतीच्या ब्रीदाला जागले. त्यांनीं तेवढ्यांत गांधीजींना एक आगळावें पत्र पाठवून गांधी–जीना भेटीला अपशकून केला. त्या पत्रांत त्यांनीं स्पष्ट कळविलें कीं ‘ नुसती हिंदु व मुसलमान या दोन प्रमुख समाजांची एकी झाली कीं सर्व कार्य झालें असें समजूं नका. इतर सर्व अल्पसंख्य जमातींचीही एकी घडवून आणा. संस्थानिकांचे करारनामेही ध्यानीं घ्या. आणि मगच राजकीय समेटाची तुमची योजना माझ्यापुढें मांडा.’

पण जिथें गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणें हिंदु व मुसलमान यांचीच एकी झाली नाहीं, तिथें बाकीच्या अल्पसंख्य जमाती आणि संस्थानिक हा कुठच्या झाडाचा पाला ?

ही गांधी–जीना भेट वाळूचें तेल काढण्यासारखी निष्फळ ठरली.

● ● ●

# २९ हे जीना आणि ही त्यांची लीग !

काँग्रेसचा नाश करायला टपलेलें सरकार व लीग यांसारखे विरोधी अथवा सरकारजमा पक्ष या सर्वांनीं स्वातंत्र्यसंपादनाच्या काँग्रेसच्या मार्गांत पसरलेले कांटे वेंचून मार्ग बेणा करण्याचें काम गांधीजी तुरुंगांतून सुटल्यापासून रात्रंदिवस करीत होते. त्यांनीं सरकारच्या छातींत रामबाणाप्रमाणें घुसलेला आठ ऑगस्टचा ठरावही मागें घेतला. हिंदु-मुसलमानांच्या एकीसाठीं जीनांची मनधरणी केली. सरकारच्या चुकांमुळें देशांत माजूं लागलेली बेबंदशाही थांबावी म्हणून पराकाष्ठेचे प्रयत्न केले. चळवळीमुळें खरोखर वठणीला आलेल्या सरकारचीही खात्री पटली कीं गांधीजी किंवा काँग्रेस कांहीं आतां पुन्हा सत्याग्रहाच्या चळवळीचा देशभर वणवा पेटवून सरकारला सतावूं इच्छीत नाहींत. लोकांच्या विश्वासांतील हंगामी सरकार स्थापन करून पुढील मार्ग अधिक मोकळा करण्याची हीच वेळ होती.

पण देशांतील पेंचप्रसंगाचें अवघड कोडें सोडवायला काँग्रेस समर्थ असली तरी ती अज्ञातवासांत होती. गांधीजी एक सुटले तरी काँग्रेस वर्किंग कमिटीचे सर्व सभासद अजून नगरच्या किल्ल्यांत स्थानबद्ध म्हणून कोंडलेले होते. ते मोकळे होणार तेव्हां काँग्रेस कोणतःही निर्णय घ्यायला समर्थ होणार. हें ध्यानीं घेऊन सरकारनें ता. १६ जून १९४५ रोजीं वर्किंग कमिटीची सुटका केली. आणि काँग्रेसच्या अधिकृत विधायक कार्याला पुन्हा जोरानें चालना मिळाली.

तें वर्ष तसेंच जुळवाजुळवींत गेलें. पुढच्या वर्षीं सन १९४६ चें काँग्रेसचें अधिवेशन ता. १३ नोव्हेंबर रोजीं मीरतला भरलें. आचार्य कृपलानी हे त्या काँग्रेसचे अध्यक्ष होते.

देशाचे हितशत्रू त्या वेळीं देखील स्वस्थ बसले नाहींत. काँग्रेसला अपशकून करण्यासाठीं त्यांनीं मीरतमध्यें ऐन अधिवेशनाच्या सुमाराला दंगा घडवून आणला. पण काँग्रेसचा राष्ट्रीय बाण्याचा हत्ती धिमेपणानें आपल्या

वाटेनें पुढें चालला. वाटेंत आजूबाजूच्या वळचणींतून आपणावर भुंकणाऱ्या कुत्र्यांकडे त्यानें लक्ष दिलें नाहीं.

मीरत काँग्रेसमध्यें घटनासमिति विषयींचा महत्त्वाचा ठराव मान्य करण्यांत आला व स्वतंत्र सार्वभौम लोकराज्य (इंडिपेंडंट सॉव्हरिन रिपब्लिक) हें काँग्रेसचें ध्येय घोषित करण्यांत आलें. त्यापूर्वीं थोडे दिवस दिल्लीला भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत हंगामी सरकारांत भाग घेण्याविषयींचा ठराव झाला होता. त्याला मान्यता देण्यांत आली. हिंदी संस्थानांविषयींही महत्त्वाचा ठराव करण्यांत आला. सन १९३९ सालीं हरिपुरा काँग्रेसमध्यें देखील संस्थानिकांविषयीं एक ठराव झाला होता. तो संस्थानिकांच्या बेदाद हुकूमशाहीविरुद्ध होता. बेजबाबदार संस्थानी राजवटीविषयीं संस्थानांतील प्रजेला वाटणारा तीव्र तिरस्कार त्या ठरावांत प्रतिबिंबित झाला होता. पण मीरतच्या या ठरावांतील निषेधाचा रोख संस्थानिकांपेक्षां राजकीय खात्याच्या पडद्यामागील कारवायांवर होता. ऑगस्ट चळवळीच्या काळांत संस्थानांतून भयंकर जुलूम व जनतेचा अमानुष छळवाद झाला खरा. पण त्या दडपशाहीला सरकारच कारण होतें. हें त्या ठरावानें स्पष्ट केलें.

काँग्रेसच्या जुन्या घटनेप्रमाणें मीरतचें अधिवेशन हें अखेरचेंच ठरलें. आतां नवी घटना येऊं घातली होती. स्वातंत्र्याचें नवें युग सुरू होणार होतें. पण मीरतचें महत्त्व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्याच चळवळींत फार मोठें आहे. सन १८५७ ची पहिली गोळी मीरतलाच झाडली गेली. स्वातंत्र्ययुद्धाचा तो श्रीगणेशा होता. त्या पहिल्या युद्धानंतर हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल हा व्हाइसरॉय ऊर्फ राजप्रतिनिधि झाला. आणि ह्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाची समाप्ति करण्याची घोषणाही मीरतलाच झाली. मीरतच्या प्रळयानंतर पहिल्या परतंत्र हिंदुस्थानच्या मानगुटीला बसलेला व्हाइसरॉय ह्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धानंतर कायमचा अदृश्य होणार ही शुभवार्ताही मीरतनेंच घोषित केली.

पुढें लौकरच मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका होऊं घातल्या होत्या. तोंच देशगौरव सुभाषबाबूंच्या हिंदी राष्ट्रीय सेनेचा चिरस्मरणीय महत्त्वाचा खटला दिल्लीच्या लाल किल्यांत

सुरू झाला. सुभाषबाबू हे कांहीं अपरिहार्य तांत्रिक कारणासाठीं काँग्रेसपासून जरा दूर केले गेले होते, तरी ते काँग्रेसचे होते व काँग्रेस त्यांची होती. महायुद्धाची नामी संधी साधून आपल्या मायदेशाला स्वतंत्र करण्याचे असे लष्करी क्रांतिकारक प्रयत्न त्यांनीं आरंभिले, ते देखील काँग्रेसचें स्मरण करूनच आरंभिले. हिंदी राष्ट्रीय सेना ही हिंदी देशभक्तांची होती. ते कांहीं केवळ पोटार्थी लष्करी बाजारबुणगे नव्हते. हिंदुस्थानांतील इंग्रजी राजवटीचा नायनाट करून इंग्रजांच्या गुलामगिरींतून भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठीं सुभाषबाबूंची हिंदी राष्ट्रीय सेना प्राणपणानें लढली. त्या सेनेच्या कर्नल शहानवाज, कॅप्टन सहगल व लेफ्टनंट धिलन या तीन देशभक्त सेनापतींवर सरकारनें भयंकर खटला उभारला. अशा वेळीं काँग्रेस स्वस्थ कशी बसेल ? काँग्रेसनें हिंदी राष्ट्रीय सेनेला अभिमानानें पाठीशीं घातलें. हिंदी राष्ट्रीय सेनेवरील खटला पुढारीपणानें चालविला, आणि हिंदी राष्ट्रीय सेनेच्या सेनापतींना सरकारच्या लष्करी न्यायालयरूपी दाढांखालून सुखरूपपणें बाहेर ओढून काढलें. ती सुवार्ता ऐकून साऱ्या देशांत आनंदीआनंदाच्या नौबती झडूं लागल्या.

नंतर प्रांतिक कायदेमंडळांच्याही निवडणुका झाल्या, व लीगचे प्रांत सोडून बाकीच्या सर्व प्रांतांत काँग्रेस प्रचंड बहुमतानें जवळ जवळ बिनविरोध निवडून आली. त्या त्या प्रांतीं काँग्रेस मंत्रिमंडळें अधिकारारूढ होऊन कारभार पाहूं लागलीं.

हिंदुस्थानला स्वातंत्र्याचा मार्ग अधिक मोकळा करून देण्यासाठीं मार्च १९४६ मध्यें भारतमंत्रि लॉर्ड पेथिक लॉरेन्स, एच. व्ही. अलेक्झांडर व सर स्टॅफोर्ड क्रिप्स या तिघां कॅबिनेट मंत्र्यांचें कॅबिनेट मिशन हिंदुस्थानांत आलें. त्याचें हिंदुस्थानांत तीन महिने वास्तव्य होतें. तेवढ्या वेळांत घटना समितीच्या निवडणुकीचा भरपूर खल झाला आणि घटना समितीच्या निवडणुका जून १९४६ मध्यें पार पडल्या. तिथेंही घटनासमिति अस्तित्वांत आल्यावर व येतांना जीनांचा अडेलतट्टू नकर्तेपणा नेहमींप्रमाणें आडवा आलाच. तो त्रास देऊं शकला, घटना समितीचें कार्य कांहीं काळ आडवूं शकला, पण कायमची अडवणूक करूं शकला नाहीं. काँग्रेस मात्र कलह टाळण्यासाठीं शक्य तितकी समंजसपणें वागत होती.

काँग्रेस याप्रमाणें स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यांत मग्न असतांना मुस्लीम लीग आपल्या नेहमींच्या स्वभावानुसार काँग्रेसची बदनामी करण्याच्या नव्या नव्या उपायांचें संशोधन करीत होती. नुकत्याच गाजून गेलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळांच्या कारकीर्दींत काँग्रेस प्रांतांतील मुसलमानांवर फारच जुलूम झाला असा कांगावा लीगनें देशांतच नव्हे तर परदेशीं देखील युरोप-अमेरिकेंत आपले प्रतिनिधी पाठवून चालविला होता. काँग्रेस सरकार हें फासिस्टांचें सरकार होतें व काँग्रेस मंत्रिमंडळाच्या कारकीर्दींत जातीय दंगे फार वाढले असले भयंकर खोडसाळपणाचे आरोप काँग्रेसवर करण्यांत येऊं लागले. तेव्हां अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनीं हा खरा प्रकार आहे तरी काय याची चौकशी करून अहवाल सादर करावा असें आपले हिंदुस्थानांतील प्रतिनिधि वुइल्यम फिलिप्स् यांना सांगितलें. या प्रतिनिधींनीं पूर्ण चौकशी करून अमेरिकेच्या अध्यक्षांना अहवाल सादर केला. त्यांत स्पष्टपणें सांगितलें कीं, 'काँग्रेस फासिस्ट असल्याचा आरोप अगदीं खोटा आहे. स्वातंत्र्य-संपादनासाठीं, देशाचा एकोपा साधण्याकरितां काँग्रेसनें पराकाष्ठेचे प्रयत्न केले आहेत व करीत आहे. काँग्रेस मंत्रिमंडळांच्या कारकीर्दींत जातीय दंगे वाढले हा आरोपही खोटा आहे. उलट खरें पाहिलें तर लीग मंत्रिमंडळांच्या कारकीर्दींत बंगाल, पंजाब ह्या लीगच्या प्रांतांतच जास्त जातीय दंगे झाले. पण मुसलमान बहुजनसमाजांत गैरसमजुतींचा भडका उडविणाऱ्या ह्या जातीय प्रचाराला देखील लौकरच आपोआप आळा बसेल. बहुसंख्य मुसलमान लौकरच आपण देखील शेतकरी–कामकरी आहों हें जाणूं लागून सर्व हिंदुस्थानांतील शेतकऱ्या–कामकऱ्यांशीं समरस होतील.'

मुस्लीम लीगचा पोटशूळ नेमका याच वेळीं इतक्या जोरानें कां चाळवला याला देखील कारणें होतीं. मध्यवर्ति हंगामी सरकार स्थापन होण्याची योजना आतां बहुतेक सफल होत आली होती. मध्यवर्ति हंगामी सरकारांत कार्यकारी सभासदांची निवड करण्यासाठीं प्रांतिक मंत्रिमंडळांनीं आपल्या-वतीनें नांवें कळवावयाचीं व त्यांतून व्हाइसरॉयनें कार्यकारी सभासदांची निवड करावयाची असें ठरलें होतें. हा नियम काँग्रेस आणि लीग या दोहों-नांही सारखाच लागू होता. पण जीनांना मुळांतच हंगामी सरकार नको होतें. कारण हिंदुस्थानच्या अकरा प्रांतिक मंत्रिमंडळांतून नांवें सुचविलीं जाणार

व त्यांतून व्हाइसरॉय कार्यकारी सभासदांची निवड करणार. काँग्रेसचीं मंत्रिमंडळें व लीग मंत्रिमंडळें या दोघांनाही ही सारखीच संधि मिळाली होती. काँग्रेसला त्यांत कांहींच अवघड वाटण्याजोगें नव्हतें. प्रत्येक प्रांतानें आपल्या खात्रीचे व राष्ट्राच्या विश्वासाला पात्र असे दोन तीन सभासद निवडून त्यांचीं नांवें व्हाइसरॉयला कळविलीं कीं त्या नांवांतून व्हाइसरॉय कोणाची कां निवड करीना? काँग्रेसला भिण्याचें कांहीं कारण नव्हतें. कारण जनता काँग्रेसची होती व काँग्रेस जनतेची होती. पण लीगचा मार्ग काँग्रेसच्याइतका सोपा नव्हता. मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतांतील मंत्रिमंडळें म्हणजे कांहीं केवळ लीगचीं अथवा लीगधार्जिणीं मंत्रिमंडळें नव्हेत. त्यांनीं ज्या प्रतिनिधींचीं नांवें कळवावीं ते लीगचेच असतील कशावरून? आणि त्या नांवांतून व्हाइसरॉय कार्यकारी सभासदांची निवड करणार! व्हाइसरॉय विलायतेची दुसरी वारी करून सप्टेंबर महिन्यांत माघारे आले तेव्हां त्यांनीं स्पष्ट जाहीर खुलासा केला होता कीं ज्या सभासदांना प्रमुख राजकीय पक्षांचा पाठिंबा असेल अशाच सभासदांची निवड करून आपण आपलें कार्यकारी मंडळ निवडणार.

अशा स्थितींत लीगचें बूड या हंगामी मंत्रिमंडळांत मुळींच जड होऊं शकणार नाहीं हें ओळखूनच जीना हंगामी सरकार नको म्हणत होते!

काँग्रेस अतिशय सावधपणानें हिंदवी स्वतंत्र्याची नौका खवळत्या समुद्रांतून किनाऱ्याकडे वल्हवीत नेत होती. मार्गांत अनेक खडक होते, अनेक भोंवरे होते. ते सर्व अडथळे टाळून काँग्रेसला नौका किनाऱ्याकडे न्यावयाची होती. पण गांधीजी त्या नौकेचे कर्णधार होते. म्हणून चिंता नव्हती.

हंगामी मध्यवर्ति मंत्रीमंडळ नेमण्याच्या प्रश्नावर मोठी अवघड परिस्थिति प्राप्त झाली. काँग्रेस सर्व राष्ट्राची होती. आझाद, असफअल्ली असे अनेक मान्यवर राष्ट्रीय मुसलमान व इतरही बराच राष्ट्रीय बाण्याचा मुसलमान समाज काँग्रेसच्या झेंड्याखालीं उभा होता. आपल्या प्रांतांतून अशा थोर राष्ट्रीय मुसलमानाचें नांव हंगामी मंत्रिमंळासाटीं सुचविण्याचा काँग्रेसला हक्क होता. तें शल्य लीगच्या डोळ्यांत सलत होतें. कारण काँग्रेस मुसलमानांची मुळींच प्रतिनिधि नाहीं हा लीगचा दावा त्यामुळें लंगडा पडत होता. तसेंच अस्पृश्यांना अल्पसंख्याकांत ओढून कार्यकारी मंडळांत अल्पसंख्याकांना मिळणाऱ्या तीन

जागांत अस्पृश्यांची आणखी एक भर घालावी व काँग्रेस ही अस्पृश्यांची प्रतिनिधि नसून फक्त स्पृश्य हिंदूंची पुढारी, लीगसारखीच जातीय संस्था ठरावी हा जीनांचा जुनाट मुरलेला मनकवडा मानस होता. पण तो साध्य झाला नाहीं. म्हणून जीना नाराज होते. तो मानस साध्य झाला असता तर एकंदर चौदा सभासदांत चार अल्पसंख्याकांसाठीं गेल्यावर राहिलेल्या दहांत लीगला काँग्रेसच्या बरोबरीनें निम्या म्हणजे पांच जागा मिळाल्या असत्या.

जीना हंगामी मंत्रिमंडळाच्या योजनेवर रुसले, फुगले, अडले ! म्हणून कांहीं स्वस्थ मात्र बसले नाहींत मध्यवर्ति हंगामी सरकारांत लीगनें भाग घ्यावयाचा नाहीं असें तर ठरलेंच. पण कोणत्याही सरळ मार्गानीं आपलें सर्वग्रासी उद्दिष्ट साधत नाहींसें पाहतांच त्यांनीं कोणत्या वाममार्गानें लीगला व आपल्या अजाण मुसलमान समाजाला न्यावयाचें मनांत योजिलें तें त्यांचें ते जाणोत. त्याचें दृश्य फल प्रत्यक्ष–कृतिदिनाच्या ( डायरेक्ट ॲक्शन डे ) घोषणेनें दिसलें. ता. १६ ऑगस्ट १९४६ रोजीं मुसलमानांनीं हा दिवस साजरा करावा अशी लीगची शाही घोषणा झाली.

हा 'प्रत्यक्ष–कृति दिन' कसा साजरा झाला, याला कलकत्त्याची साक्ष– माणुसकीच्या तोंडाला काळें फांसून पशूंनाही लाजविणारा जातीय दंगा जिथें भडकला त्या कलकत्त्याची साक्ष आहे.

● ● ●

## ३० भारतमाता स्वतंत्र झाली !

कलकत्त्याच्या दंग्यांत बळी पडलेल्या देशबांधवांच्या सुतकांतच व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या मुखानें ता. २५ ऑगस्ट १९४६ रोजीं हंगामी मंत्रिमंडळाची घोषणा झाली. मुस्लीम लीग अडून बाहेरच राहिली होती त्याबद्दल व्हाइसरॉयनीं हळहळ व्यक्त केली. तथापि आज ना उद्यां मुस्लीम लीग जेव्हां केव्हां हंगामी मंत्रिमंडळांत भाग घेण्याचें ठरवील तेव्हां तिला

दरवाजा सन्मानपूर्वक मोकळा असल्याचेंही व्हाइसरॉयनीं स्वतःच्या आणि हंगामी मंत्रिमंडळाच्या वतीनें आश्वासन दिलें.

अधिकारग्रहणानंतर सहा दिवसांनीं ता. ७ सप्टेंबर १९४६ रोजीं हंगामी सरकारचे मुख्य मंत्रि पं. जवाहरलाल नेहरू यांनीं नभोवाणीवरून भाषण केलें :

'मित्र हो आणि सहकारी बांधव हो, जयहिंद !

सहा दिवसांपूर्वीं मी आणि माझे सहकारी हिंदुस्थान सरकारच्या कचेरींतल ह्या उच्चासनावर बसलों. आपल्या ह्या पुरातन भूमींत आज नवीन सरकार अस्तित्वांत येत आहे. आपल्या हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्या-कडे नेणारी ही पहिली पायरी होय. आम्हांला आज हिंदुस्थानच्या कोना-कोपऱ्यांतून आणि जगाच्या प्रत्येक भागांतून हजारों अभिनंदनपर व सदिच्छा-दर्शक संदेश आले आहेत. तरी देखील आम्ही आजचा हा ऐतिहासिक प्रसंग समारंभानें साजरा केला नाहीं आणि आमच्या लोकांच्या उत्साहाचा कोंडमारा झाला. कारण आम्हांला त्यांना जाणीव करून द्यावयाची होती कीं आपण अद्याप मोहिमेवर आहों. आपणाला आपलें संकल्पित ध्येय अजून गांठावयाचें आहे. आमच्या मार्गांत अनेक अडचणी आणि अडथळे होते व आमच्या प्रवासाचा अखेरचा मुक्काम लोकांना वाटतो तितका जवळचा नव्हता. अशा वेळीं थोडासा देखील दुबळेपणा व लाघवीपणा आपल्या कार्याला विघातक झाला असता.

शिवाय कलकत्त्याच्या दुःखदायक घटनांमुळेंही आमचीं अंतःकरणें भाराव-लेलीं होतीं. भावानें भावाविरुद्ध वेडेपणानें शस्त्र उचलावें व नरडीला झोंबावें तशांतला तो प्रकार होता. आतांपावेतों पिढ्यान् पिढ्या आपण ज्या स्वातंत्र्या-साठीं कष्ट केले आणि हाल अपेष्टा भोगल्या, त्या हिंदुस्थानच्या आम जनतेच्या स्वातंत्र्यासाठींच होत. कोणा एका गटाच्या, एका वर्गाच्या अथवा एका धर्माच्या अनुयायांसाठीं नव्हेत. ... आम्ही सत्तालोभाच्या (Power Politics) राजकारणापासून शक्य तोंवर दूर राहूं इच्छितों. ह्या सत्तालोभाच्या राज-कारणामुळेंच महायुद्ध ओढवलें व पुन्हा त्याहीपेक्षां भयंकर संकट ओढवणें संभवनीय आहे. शांतता आणि स्वातंत्र्य हीं एकमेकांपासून अलग न करतां येण्याइतकीं एकजीव आहेत. एका ठिकाणीं स्वातंत्र्याला नकार दिला कीं

तो दुसऱ्या ठिकाणाचें स्वातंत्र्य धोक्यांत आणून तंटेभांडणें व युद्ध यांत पर्यवसान पावतो अशी आमची खात्री आहे. हें जग चुरस, मत्सर व अंतर्गत कटकटी यांनीं व्यापिलेलें असूनही दिवसेंदिवस अधिक निकटवर्ति सहकारितेकडे जात आहे व जाणार हें अपरिहार्य आहे. अशा त्या जगासाठीं-ज्या जगांत परस्पर सहकारिता स्वतंत्र लोकांत मोकळेपणानें वसत आहे व जिथें एक गट दुसऱ्या गटाची पिळणूक करीत नाहीं, अशा जगासाठीं-स्वतंत्र हिंदुस्थान सर्वतोपरी झटेल ... मी आमच्या घरच्या राजकारणाविषयीं कांहीं बोललों नाहीं व आज कांहीं बोलणारही नाहीं. तथापि इतकीं वर्षें आम्ही ज्या तत्त्वनिष्ठेनें वागलों त्याच तत्त्वनिष्ठेनें आपणाला आपलें धोरण पुढें ठरवावें लागेल. उपेक्षित अशा सामान्य हिंदी जनांकडे आम्ही अवश्य लक्ष देऊं त्यांचें जीवनमान वाढेल व त्यांना सुखाचे दिवस येतील यासाठीं झटूं. आम्ही अस्पृश्यता अथवा कोणत्याही अन्य प्रकारची बळेंच लादण्यांत आलेली विषमता यांच्या विरुद्ध सतत लढूं. विशेषत: जे आर्थिक दृष्टीनें अथवा अन्य करणानें मागासलेले आहेत त्यांना अवश्य सहाय्य करूं. आज लाखों लोकांना खायला अन्न नाहीं, ल्यायला वस्त्र नाहीं, डोकें टेकायला निवाऱ्याची जागा नाहीं असे आपले कितीतरी बांधव आज उपासमारीच्या जबड्यांत सांपडण्याचीं लक्षणें दिसत आहेत. ही तांतडीची गरज भागविणें हें अत्यंत निकडीचें व अत्यंत अवघड कार्य आहे. ह्या कार्यांत इतर देश आम्हांला अन्नधान्यादि साहित्य पाठवून मदत करतील अशी आम्हांला आशा आहे. ... हिंदुस्थानाबाहेरील बेबनावाच्या वृत्तीला जिंकणें हेंही तितकेंच महत्त्वाचें कार्य आहे. आपसांत झगडत बसल्यानें आपण इतके दिवस जीं गोड स्वप्नें पाहात होतों तें भारताचें स्वातंत्र्यसदन आपणाला बांधतां येणार नाहीं. या देशांत आपणां सर्वांना एकत्र राहावयाचें आहे. एकत्र कार्य करावयाचें आहे. राजकीय घडामोडी कशाही कां चालेनात ? मत्सर आणि हिंसा त्या मूलभूत सत्याला कांहीं बदलूं शकणार नाहींत, अथवा हिंदुस्थानांत जो कायापालट घडून येत आहे त्यालाही ते अडवूं शकणार नाहींत. .... हिंदुस्थान पुढें जात आहे. जीर्ण युगांतून नवयुगांत प्रवेश करीत आहे. आपण दीर्घकाळपावेतों क्रियाहीन बघे होतों; इतरांचीं खेळणीं होऊन बसलों होतों. पण आतां पुढाकार घेण्याची व आपणाला हवा तसा इतिहास घडविण्याची आपली पाळी आली आहे. अशा वेळीं आपण सर्व एकोप्यानें ह्या

महान् कार्याला वाहून घेऊं आणि आपल्या ह्या प्रिय भारतभूमीला शांतता व प्रगति प्रस्थापित करण्याच्या कलेंत सर्व थोर राष्ट्रांपेक्षांही थोर ठरूं.... महाद्वार मोकळें आहे. भवितव्य सर्वांनाच खुणावून बोलावीत आहे. यांत जिंकतो कोण आणि हरतो कोण हा प्रश्नच नाहीं. कारण आपणां सर्वांनाच बंधुभावानें एकमेकांच्या हातांत हात घालून पुढें जावयाचें आहे. आपण जिंकलों तरी सर्वजण एकत्र जिंकूं; हरलों तरीं सर्वजण हरूं. परन्तु अपयशाला त्या ठिकाणीं जागाच नाहीं, आपण यशाकडे जात आहों. स्वातंत्र्याकडे व चाळीस कोटी जनतेच्या सुखसमृद्धीकडे आपण जात आहों. जय हिंद. !"

हंगामी मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर कांहीं दिवसांनीं मुस्लीम लीग देखील एकदांची त्या मंत्रिमंडळांत गेली. परंतु तिथें देखील कटकटी आणि फुटीर-पणा लीगच्या पांचवीला पुजलेला होता. काँग्रेसमंत्र्यांचे पाय मागें ओढण्याचे डावपेंच एकसारखे सुरू होते.

असाही कांहीं काळ गेला. मग ता. २० फेब्रुवारी १९४७ रोजीं इंग्लंडचे पंतप्रधान मेजर अॅटली यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें शुभदर्शन घडविणारी घोषणा केली :

'हिंदुस्थानची राज्यघटना नियोजित घटना समितीनें ठरवावी. आपसांतील मतभेद मिटवावेत. आणि सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याची तयारी करावी. बादशहांचें सरकार जून १९४८ पूर्वी हिंदुस्थानची सर्व सत्ता सर्व पक्षांना मान्य असलेल्या अधिकाऱ्यांकडे सोंपविणार आहे. तें शक्य न झाल्यास जबाबदार हिंदी पुढाऱ्यांच्या हातीं सर्व सत्ता सोंपविण्यांत येणार आहे. हें कार्य पार पाडण्यासाठीं सध्यांचे व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल हे स्वगृहीं जाऊन त्यांच्या जागीं लॉर्ड मौंटबॅटन हे तावडतोब व्हाइसरॉय म्हणून येणार आहेत.'

त्याप्रमाणें लॉर्ड मौंटबॅटन मार्च १९४७ मध्यें हिंदुस्थानचे व्हाइसरॉय झाले, आणि सत्तादानाच्या तयारीला लागले. खरी कसोटीची वेळ ती आतांच होती. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याची काल–मर्यादा आतां निश्चित झाली होती. आतां प्रश्न एवढाच होता कीं हिंदुस्थान जो स्वतंत्र होणार तो अखंड राहून कीं विभागाला जाऊन ?

**पण सर्वंकष काळानें ह्या प्रश्नचिन्हाचें उद्गार चिन्ह करून सोडलें !**

परोपरीचे पेचप्रसंग, रोज रोज नव्या नव्या अडचणी, नवीं नवीं संकटें, मनांतून शब्दांत व शब्दांतून क्रूर निर्दय कृतींत उतरणाऱ्या नव्या नव्या धमक्या अशा सर्व प्रकारच्या तामसी आयुधांसह जातीय राक्षसीच्या विध्वंसक विषकन्या आपापली विषारी प्रजा घेऊन यादवी माजविण्याला सज्ज होत्या. एक म्हणे हिंदुस्थान हिंदूंचा, त्याची खांडोळीं करूं देणार नाहीं. दुसरी म्हणे हिंदुस्थानचीं खांडोळीं करून पाकिस्तान स्वतंत्र तोडून घेणारच घेणार. नवे व्हाइसरॉय आणि काँग्रेस ही यादवी वाढू नये व गुण्यागोविंदानें सर्व व्यवहार चालावेत म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. सारा देश, सारी काँग्रेसनिष्ट हिंदी जनता निक्षून सांगत होती कीं काय वाटेल तें झालें तरी माझ्या प्रिय भारतभूची चिरफाड होतां कामा नये. आम्ही हिंदु–मुसलमान भाऊभाऊ एका घरांत प्रेमानें व सुखासमाधानानें राहूं.

पण शेवटीं लीगची स्वतंत्र पाकिस्तानची मागणी काँग्रेसला निरुपायानें मान्य करावी लागली. गांधीजी देखील जरी मूळपासून हिंदुस्थानची अशी फाळणी करण्याच्या विरुद्ध होते तरी त्यांना देखील अखेर फाळणी आपद्धर्म म्हणून निरुपायानें मान्य करावी लागली. बंगालचे पूर्व बंगाल आणि पश्चिम बंगाल असे दोन तुकडे झाले. पूर्ण बंगाल हा मुसलमान बहुसंख्येचा प्रांत म्हणून तो लीगचा ठरला. पंजाबचीही चिरफाड होऊन पश्चिम पंजाब लीगचा ठरला. वायव्य सरहद्द प्रांत, सिंध व बलुचिस्तान हे तर मुळांतच मुसलमान बहुसंख्येचे प्रांत. ते अर्थातच लीगचे ठरले. राहतां राहिलीं संस्थानें. तो प्रश्न मात्र इतकाही सोपा नव्हता. नियोजित वेळीं इंग्रज सरकारनें हिंदुस्थानच्या मानेवरून आपल्या साम्राज्यशाही सार्वभौम सत्तेचें अवजड पोलादी जोखड काढून घेतलें कीं मग तो प्रश्न धसाला लागणार होता. तो देखील कटकटीखेरीज सुटणार नाहीं हें सर्वजण ओळखून होते.

तथापि हीं निमित्तें पुढें करून पूर्ववत् आपला शब्द मागें घेण्याला आतां इंग्रज सरकार असमर्थ होतें म्हणून तयार नव्हतें. सरकारनें हिंदुस्थानांतील ह्या अंतर्गत कटकटींकडे विशेष लक्ष न देतां ता. १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस स्वातंत्र्यदानासाठीं निश्चित केला. फाळणीनें निर्माण केलेल्या हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशा दोन स्वतंत्र राष्ट्रांना आतां हें सत्तादान व्हावयाचें होतें.

तो मंगल दिवस उजाडला. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं रात्रीं बारा वाजतां हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याची यथाविधि घोषणा कॉंग्रेसच्या तिरंगी झेंडचाला साक्ष ठेवून करण्यांत आली.

हिंदुस्थान स्वतंत्र झाला. सन १८५७ नंतर हिंदुस्थानच्या राशीला राज्य-कर्ता म्हणून आलेला व्हाइसरॉय ऊर्फ बादशहांचा प्रतिनिधि हिंदुस्थानच्या ह्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धांत आपल्या साम्राज्य सरकारच्या वतीनें मान-सन्मानपूर्वक माघार घेऊन निघून गेला. आतां हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल तेवढा बाकी राहिला.

पण तो गव्हर्नर जनरल देखील गोरा इंग्रजच असला पाहिजे असें साम्राज्य सरकारला आतां म्हणावयाचें नव्हतें, व म्हणतां येणारही नव्हतें. स्वातंत्र्यदानानंतर आतां हिंदुस्थान व पाकिस्तान ह्या दोन साम्राज्यांतर्गत स्वतंत्र राष्ट्रांवर बादशहाच्या वतीनें नेमले जाणारे गव्हर्नर जनरल त्या त्या राष्ट्रांतील लोक-सरकारांच्या संमतीनें नेमले जावयाचे होते. त्याला अनुसरून आपल्या हिंदच्या घटना-समितीच्या आगाऊ संमतीनें बादशहांनीं हिंदुस्थानचे अखेरचे मावळते व्हाइसरॉय लॉर्ड मौंटबॅटन यांची हिंदचे गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक करण्याचें अगोदरच ठरविलें होतें.

ता. १५ ऑगस्ट १९४७ ची मध्यरात्र उलटतांच हिंदुस्थान यथाविधि आपल्या कॉंग्रेसच्या तिरंगी झेंडचाला आदरपूर्वक प्रणाम करून स्वतंत्र झाला. स्वतंत्र हिंदच्या घटना समितीचें संस्मरणीय प्रासंगिक अधिवेशन त्या रात्रीं भरलें व सत्ताग्रहणाचा ठराव एकमुखानें संमत झाला. स्वतंत्र हिंदचे गव्ह-र्नर जनरल म्हणून लॉर्ड मौंटबॅटन यांना एकमतानें मान्यता देण्यांत आली. व त्याच रात्रीं समारंभपूर्वक हिंद सरकारच्या परमश्रेष्ठ नेत्यांनीं लॉर्ड मौंट-बॅटन यांना तो शुभसंदेश कळवून त्यांचें हार्दिक अभिनंदन केलें.

लॉर्ड मौंटबॅटन हे देखील गोरे इंग्रज गृहस्थ खरे. पण आज ते जे स्वतंत्र हिंदचे गव्हर्नर जनरल झाले ते साम्राज्यसरकारनें हिंदुस्थानवर लादलेले गव्हर्नर जनरल नव्हते. ते आम हिंद जनतेच्या वतीनें स्वतंत्र हिंदच्या घटना समितीनें बादशहांकडून नेमून घेतलेले गव्हर्नर जनरल होते. इतका स्वतंत्र हिंदचा व स्वतंत्र हिंदराष्ट्राचे पूज्य पिताजी महात्मा गांधी आणि पं. जवा-हरलाल यांचा व कॉंग्रेसजनांचा विश्वास व आदर त्यांनीं संपादन केला होता.

आणि उजाडत्या दिवशीं हिंद सरकारच्या ह्या नव्या सर्वश्रेष्ठ सेवकाचें दिल्लींतील लाखों नगरवासीयांनीं राजगृहाच्या प्रांगणांत पंडित नेहरूंच्या बरोबरीनें वात्सल्यपूर्ण स्वागत केलें. तें देखील लॉर्ड मौंटबॅटनचें नव्हे, तर पंडित मौंटबॅटनचें स्वागत केलें. आम जनता त्या मंगल दिनीं आपल्या स्वतंत्र सरकारच्या ह्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्याचें जयजयकारपूर्वक स्वागत करीत होती, ' पंडित जवाहरलाल नेहरू की जय !' ' पंडित मौंटबॅटन की जय !'

• • •

## ३१ कल्पवृक्ष तोडला ?....तो अमर आहे !

हिंदुस्थान स्वतंत्र झाला. पण अखंड हिंदुस्थानचा द्विखंड हिंदुस्थान झाला ! मूर्तिभंजकांनीं आपल्या प्रिय भारतमातेच्या मूर्तीचीं हिंदुस्थान आणि पाकिस्तान अशीं दोन शकलें केलीं. स्वतंत्र पण भंगलेला हिंदुस्थान ही आपल्या भारतमातेची भंगलेली मूर्ति आपणाला आपल्या स्वातंत्र्यमंदिरांत स्थापन करावी लागली

परंतु त्या खंडित भारतमातेच्या मस्तकावर कल्पवृक्षाची छाया होती. त्या भंगलेल्या मूर्तींत पुन्हा नवजीवन ओतून तिला सांधून सामर्थवान व वैभवशाली करण्याचें सामर्थ त्या कल्पवृक्षाच्या ठायीं होतें. कॉंग्रेस एथपावेतों जी वाढली, वैभवशाली झाली, व सत्य-अहिंसा धर्माच्या पालनानें आंतराष्ट्रीय कीर्ति संपादन करूं शकली ती केवळ महात्मा गांधींच्या मार्गदर्शनामुळेंच. हिंदराष्ट्र कॉंग्रेसचें होतें. कॉंग्रेस गांधीजींची होती, तसेच गांधीजी कॉंग्रेसचे होते. खंडित भारतमातेच्या भंगलेल्या मूर्तीवरील जखमा नाहींशा करून भारतमातेला सर्व-वैभव-संपन्न करण्याचें अमोघ सामर्थ्य तिच्यावर वत्सलतेची अमृत-वर्षावकारी मंगल छाया पांखरणाऱ्या कल्पवृक्षाच्या ठायीं होतें. गांधीजी तो कल्पवृक्ष होत.

ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थान स्वतंत्र झाला, तरी देखील अंतर्गत कटकटी तेवढ्यानें मिटल्या असें नाहीं. उलट त्या एकसारख्या वाढत होत्या. जातीयवादी मूर्तिभंजकांच्या घोर पातकांचीं विषारीं फळें हिंदी जनतेला अगतिकपणें चाखावीं लागत होतीं. हिंसामय जातीय दुरभिमान ही ह्या मूर्तिभंजकांची माता–राक्षसी. त्या राक्षसीच्या ठायीं हा हिंदु आणि हा मुसलमान असा भेदभाव मुळींच नव्हता. जातीय दुरभिमानाच्या अमानुषतेचे विषकुंभ भरभरून ती राक्षसी आपल्या हिंदु–मुसलमान संतानांना अगदीं तत्परतेनें पाजीत होती. तें विषमय मातृदुग्ध पिऊन वाढलेले मूर्तिभंजक एकट्या मुसलमानांतच होते असें नाहीं. हिंदूंत देखील तसेच व तितकेच कठोर, अविवेकी व उग्र मूर्तिभंजक निर्माण झाले होते, होत होते. मुस्लीम लीग आणि हिंदुमहासभा ह्या तरी त्या राक्षसीच्या जातिदुरभिमानी, धर्मदुरभिमानी व संस्कृतिदुरभिमानी अशा जुळ्या राक्षसकन्या होत. भारतमातेवर शस्त्र टाकणाऱ्या हिंसक मूर्तिभंजकांचे वंशवृक्ष हे असें विषवृक्ष होते.

ह्या विषवृक्षाला खतपाणी कोणी परके दूरदेशी घालीत होते असें नाहीं. देशांतल्या देशांतच ह्या विषवृक्षाची निगा राखणारे होते. हिंदी संस्थानिक होते, हिंदी जमीनदार होते, हिंदी भांडवलदार होते. ज्यांना ज्यांना लोकशाहीचें वावडें अशा प्रतिगामी सनातनी सत्ता व मत्ता, अशा विषवृक्षांच्या वाढीला ही भूमि अगदीं अनुकूल होती. असले नापाक जातीयवादी विषवृक्ष हिंदमध्येंच होते असें नाहीं, तर लीगनें म्हणजेच मुसलमानांनीं हिंदुस्थानची चिरफाड करून नवीनच स्वतःसाठीं मिळविलेल्या पाकदेशांतही होते. ते हिंदूंत होते, मुसलमानांत होते, शीखांत होते, कुणा एका धर्म–जाती–जमातीनें दुसऱ्या धर्म–जाती–जमातीला नांवें ठेवण्याचें कारण नव्हतें.

आपले तेव्हांचे हिंदु, शीख, मुसलमान, संस्थानिक, राजे रजवाडे, सरदार, नबाब, निजाम, खान व पुंजीपति पाहा. त्यांच्या किळसवाण्या कारवायांचा कोळसा उगाळावा तितका काळा. काँग्रेसवर ह्या लोकांचा राग अशासाठीं कीं काँग्रेस गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार चालते, व गांधीजी देश, देव, धर्म असला भेद ध्यानीं न आणतां माणुसकीला जागावें असें काँग्रेसला सांगतात. सत्य–अहिंसा हा गांधीजींचा देव व धर्म, माणुसकी ही त्या धर्माची कसोटी.

गांधीजी देशांतील कोटमाप दरिद्री नारायणांचा कैवार घेणारे व त्या अनाथांना हात देणारे. काँग्रेसलाही त्यांनीं इतकीं उणीं पुरीं तीस वर्षें रात्रंदिवस तेंच शिकवलें होतें. आणि तेंच तर राजे-रजवाडे-सरदारांना आणि नबाब-निजाम-खानांना नको होतें. ते हिंदु असोत कीं मुसलमान असोत, शीख असोत कीं आणखी कोणी असोत ते पुंजीपति व धरणीपति आपसांत एकमेकांना परस्परविरोधी वैर भावानें पाण्यांत पाहात असले तरी ते सारे स्वतःच्या मतलबाला धक्का लागतो असे पाहतांच गांधीजींचा व त्यांच्या उपदेशाप्रमाणें वागणाऱ्या काँग्रेसचा मत्सर करण्यांत आपापल्या परीनें तत्पर होते. गांधीजी बेजबाबदार हम् करे सो कायदा एकतंत्री अंमल रयतेवर गाजवून गरीब रयतेला छळूं नका असें कानीं कपाळीं ओरडून सांगणारे. पिढीजाद आयतखाऊ ऐषआरामी राजेपणाला सोकावलेल्या बेबंद-राजा-महाराजांना व नबाब-निजामांना तें कसें रुचावें ? कष्टाळू दरिद्री नारायणांच्या कष्टाच्या घामांतून निर्माण झालेली संपदा भांडवलदार त्या दरिद्री नारायणांना निर्वाहापुरत्या अन्न-वस्त्र-निवाऱ्यापुरतीही मिळूं न देतां स्वतः पिळून घेतात म्हणून खेद मानणारे व त्यांना दोष देणारे गांधीजी भांडवलदारांना मनांतून कसे रुचावे ? तीच गत जमीनदारांची व व्यापाऱ्यांची. कम्युनिस्ट अथवा समाजवादी अगदीं उघड उघड भांडवलदारी-जमीनदारी-राजेशाहीविरुद्ध बोलणारे, त्यापेक्षां गांधीजी दगडाहून वीट मऊ इतकेंच.

त्यांतही राजे-रजवाडे, जमीनदार यांची गोष्ट भांडवलदार व्यापाऱ्यांहून कांहींशी निराळी. राजे-रजवाडे, जमीनदार हे इंग्रजी राजवटीचे खरे आधारस्तंभ. त्यांना आपली बेदाद राजवट टिकविण्याच्या दृष्टीनें गांधीजींच्या काँग्रेसपेक्षां इंग्रज सरकारच जास्त जवळचें वाटे. इंग्रजी साम्राज्यशाहीच्या मगरमिठींतून मायदेशाला सोडविण्यासाठीं हिंदी जनता कांहीं धडपड करूं लागली कीं तिला जागोजागीं पायबंद घालण्याचीं सरकारचीं खात्रीचीं ठिकाणें अशा ह्या हिंदी संस्थानी राजवटी. साम्राज्य सरकारच्या पाळीव शिकारी कुत्र्यांप्रमाणें चळवळचा देशबांधवांना डसून नामोहरम करण्याची कामगिरी संस्थानिकानें बजावली कीं आपल्या अंतर्गत कारभारांत हवा तसा सावळा गोंधळ घालायला त्याला पूर्ण मोकळीक. असली मोकळीक आपणाला गांधीजी व काँग्रेस मिळूं देणार नाहींत, ते जेव्हां तेव्हां

कोटमाप कष्टाळू दरिद्री नारायणांना आपल्या दारीं नम्रतापूर्वक पण निग्रहानें धरणें धरायला लावून आपली कुचंबणा करतील, या भयाची तरवार संस्थानिकांच्या मानेवर सदाची लटकत असलेली. त्यांना नको ही काँग्रेस आणि नको हे गांधीजी असें वाटणें अगदीं स्वाभाविक होते.

हिंदी भांडवलदार व व्यापारी यांची गोष्ट तशी नव्हती, एक तर ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी म्हणतात त्याप्रमाणें, भांडवली व्यापारी पिळणूक हेंच हिंदी भांडवलदार व्यापाऱ्यांचें जीवन होतें आणि हिंदुस्थानवर साम्राज्यसत्ता गाजवून हिंदुस्थानची परोपरीनें पिळणूक करण्याला दोन अडीचशें वर्षें सोकावलेलें सरकारही भांडवली साम्राज्यशाहीचें ! तें हिंदुस्थानची पिळणूक करायला हिंदी भांडवलदारांना तरी मोकळें रान थोडेंच सोडणार !

ही इंग्रजी साम्राज्यशाहीची पीडा केव्हां एकदां इथून जाईल व आपल्या भांडवली भरभराटीचा मार्ग देशांतल्या देशांत केव्हां एकदां मोकळा होईल याची हिंदी भांडवलदार व्यापारी वर्ग वाट पहात होता. गांधीजी व काँग्रेस यांच्या चळवळीच्या सफलतेंत ह्या वर्गाचा हेतु आपोआपच सफल होणार होता. बरें; कम्युनिस्ट काय अथवा हिंदी समाजवादी काय, भांडवलदार वर्गाला निष्ठूरपणें तरवारीच्या धारेवर धरून त्याची अगदींच उचलबांगडी करायला टपलेले. त्यापेक्षां गांधीजी भांडवलदार पुंजीपतींना जनतेचे विश्वस्त ( trusty ) म्हणून तरी मानीत होते, व त्या मर्यादेंत सुख–समाधानपूर्वक जगूं द्यायला तरी तयार होते. हें हिंदी भांडवलदार वर्गाच्या दृष्टीनें किती चांगलें होतें. गांधीजींना व काँग्रेसला हिंदी भांडवलदार वर्गाचा जो पाठिंबा होता त्याचें एक मुख्य कारण हें असें होतें.

पण ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं देश स्वतंत्र झाला व इंग्रजी भांडवली साम्राज्यसत्तेचें हिंदुस्थानांतील आसन ढळलें. तेव्हां परिस्थिति पालटली. इंग्रजी भांडवलशाही सरकार गेलें व त्याच्याऐवजीं हिंदी जनतेचें स्वतःचें काँग्रेसचें सरकार आलें. तें सरकार गांधीजींचा दयामय सत्य–अहिंसा धर्म पाळणारें. तें कांहीं जनतेची पिळणूक करणारें अथवा कोणा पुंजीपतींना पिळणूक करूं देणारें सरकार नव्हे. या सरकारांत भरमसाट नफेबाजीला वाव नाहीं. काळाबाजार व लांडीलबाडी करायची सोय नाहीं. लांचलुचपतीच्या

उपायांचाही कांहीं उपयोग नाहीं. अशा सरकारच्या राजवटींत शेतकरी-कामगारांना पिळणाऱ्या जमीनदार--सरंजामदारांची व भांडवलदार पुंजी-पतींची कुचंबणा होणारच.

तशांत हिंदी भांडवलदारांची ही कुचंबणा हिंदुस्थानच्या चिरफाडींतून जन्माला आलेल्या पाकिस्तानी हलकल्लोळामुळें अधिक भीषण झाली. बंगाल व पंजाब यांच्या फाळणीमुळें, त्याप्रमाणेंच पाकिस्तानी कारवायांतून काश्मीर-वर आकाशच्या कुऱ्हाडीप्रमाणें अकस्मात् कोसळलेल्या युद्धामुळें त्या त्या प्रांतांतील कितीतरी धनवान पुंजीपति होरपळून गेले. कितिएक साफ रसा-तळाला गेले. व्यापारधंद्याला देशांतील अशांततेमुळें व गोंधळामुळें जोराची ओहोटी लागली. हजारों कुटुंबें रसातळाला गेलीं. हालअपेष्टांना सीमा उरली नाहीं. गरीब आणि श्रीमंत ह्या अरिष्टांत सारखेच होरपळून निघाले.

ह्या साऱ्या अनर्थाचें अनेकांना वरवर पाहतां कारण दिसलें तें पाकिस्तान! '–अखंड हिंदुस्थानच्या फाळणीला काँग्रेसनें संमति दिली, मुस्लीम लीगची पाकिस्तानची मागणी मान्य केली, म्हणून दंगेधोपे, खून, मारामाऱ्या, अत्या-चार, लूटमार, छळ, उपासमार, बेकारी असें चोहीकडून अशांततेचें खांडववन पेटलें. त्या अनर्थाला काँग्रेस जबाबदार ! पं. जवाहरलाल नेहरू हे मध्यवर्ति सरकारचे पंतप्रधान व काँग्रेसचे श्रेष्ठ पुढारी म्हणून ते जबाबदार ! आणि गांधीजी काँग्रेसचे महान नेते व जवाहरलालजींचे आणि राष्ट्राचे पितृतुल्य मार्गदर्शक म्हणून तेही जबाबदार !' मूर्तिभंजक सांगू लागले.

वस्तुत: पं. नेहरू काय, सरदार पटेल काय, हिंदच्या ह्या महान नेत्यांनीं हिंदुस्थानच्या फाळणीला जी संमति दिली, ती देतांना त्यांच्या अंत:करणाला किती सर्प विंचू डसल्यासारख्या असह्य वेदना झाल्या असतील तें दु:ख त्यांनीं म्हणूनच सहन केलें. आपल्या प्रिय भारतभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं काँग्रेस आजवर प्राणपणानें झगडली. आपला अखंड हिंदुस्थान आहे तसा अखंड स्वतंत्र व्हावा ही त्यांची अगदीं निग्रहाची मनीषा होती. असें असतां त्यांना हिंदुस्थानच्या हिंद व पाकिस्तान अशा फाळणीला अखेर मान्यता द्यावी लागली. कारण एरव्हीं साराच पट उधळला जाणार होता व काँग्रेसच्या इतक्या वर्षांच्या खडतर अरण्यवासांतील तपश्चर्येवर बोळा फिरून ती तपश्चर्या विफल होणार होती. पाकिस्तानला संमति दिल्याखेरीज हिंदुस्थान

अखंड तर राहिला नसताच पण स्वतंत्रही झाला नसता. परंतु याची जाणीव कोणाला ? जो जबाबदारीनें व देशहितैक सम्यक् दृष्टि ठेवून नीट विचार करील त्याला !

ही जाणीव वर सांगितलेल्या मूर्तिभंजकांच्या ठायीं कुठून असायला ? गांधीजींनी ह्या मूर्तिभंजकांच्या अत्याचारांपासून हिंद आणि पाकिस्तान ह्या दोन्ही नवोदित राष्ट्रांचें रक्षण व्हावें यासाठीं भगीरथ प्रयत्न आरंभिले होते. रणांगणावर क्रुद्ध सैनिकांच्या भीषण तांडवामुळें धुळीचे लोळ उठूं लागले कीं त्या भाऊगर्दींत कांहीं दिसेनासें होतें. अशावेळीं वार कुणीं कुणावर केला, हत्या कुणीं कुणाची केली, बरोबर कोण आणि चूक कोण, वाटेचा आडवाटेला कोण गेला, याचा निर्णय करीत बसणें सोपें नव्हतें. पण सत्य तें सत्य, असत्य तें असत्य.

तथापि आतां आपण स्वतंत्र झालों होतों. आपला हिंद देश स्वतंत्र झाला होता. ज्या कल्पवृक्षाच्या छायेखालीं गेलीं अडीच तपें आपल्या भारतमातेचा सर्वांगीण उद्धार होत होता, तो कल्पवृक्ष आतां आपला होता. आपल्या भारतमातेच्या अंगणांतील वृन्दावनांत उभा असलेला तो कल्पवृक्ष पूर्ववत् अमृतमय फलपुष्पसमृद्धीनें बहरत होता. एकट्या हिंद देशालाच नव्हे तर साऱ्या जगाला अमृतमय ज्ञानक्षीर पाजून जगाला खऱ्या मानवतेच्या अर्थानें अमर करण्याचें चिरंतन सामर्थ्य त्या कल्पवृक्षाच्या ठायीं होतें.

पण आपण इतके अभागी कीं आपण त्या कल्पवृक्षापासून अमृताचीं फुलें फळें घेतां घेतां—अविचारानें असो, द्वेषभावनेनें असो, अथवा अन्य कोणत्याही मूढमतीमुळें असो पण त्या कल्पवृक्षावर कुऱ्हाड घातली ! आपल्यांतल्याच एका मूर्तिभंजकानें ता. ३० जानेवारी १९४८ रोजीं मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून स्वतंत्र हिंदच्या राजधानी दिल्लींत तो कल्पवृक्ष तोडला ! आपल्या परमपूज्य राष्ट्रपित्याचा—महात्मा गांधींचा खून केला ! जगाच्या आजवरच्या इतिहासांत स्वतःला मानव म्हणविणाऱ्या प्राणिजातीनें मानवतेलाच नव्हे तर पशुतेलाही लाजविणारा एवढा वज्रलेप कलंक आपण आपल्या हातानें आपल्या तोंडाला फांसून घेतल्याचें दुसरें उदाहरण सांपडणार नाहीं.

परन्तु कल्पवृक्ष असा मारून मारतां येत नसतो. प्रत्येकाला—मग तो सुष्ट असो कीं दुष्ट असो, काळा असो कीं गोरा असो, हिंदु असो कीं मुसलमान

असो, बालक असो कीं वृद्ध असो, स्त्री असो कीं पुरुष असो, प्रत्येकाला त्याच्या इच्छेनुसार यश देण्याचें व अमरपद देखील प्राप्त करून देण्याचें अमोघ सामर्थ्य ज्या कल्पवृक्षाच्या ठायीं आहे, अशा त्या मृतांनाही अमरपद देणाऱ्या कल्पवृक्षाला कोण कसा मारणार !

आज गांधीजी देहानें आपल्यांतून निघून गेले आहेत. पण देह क्षणभंगुर असतो, आत्मा अमर असतो. गांधीजींचा अमर आत्मा अमर कल्पवृक्षासारखा चिरंतन सत्य-अहिंसेच्या अमृतमय उपदेशाची पांखरछाया आपल्या मस्तकावर धरून अहर्निश तिष्ठत उभा आहे.

त्या कल्पवृक्षाला आपले कोटिशः प्रणाम !

• • •

## ३२ हिंदुस्थानांत फॅसिझमचा जन्म

आपली काँग्रेस सन १८८५ सालीं जन्माला आली. त्यावेळीं काँग्रेसचें ध्येय आजच्या ध्येयसिद्धीकडे पाहतां इतकें स्पष्ट नव्हतें हें खरें. परंतु हिंदुस्थानची उन्नति ज्या उपायांनीं होईल, हिंदुस्थानची कोटमाप जनता ज्या उपायांनीं स्वतंत्र व सुखी होईल, अशी उपाययोजना करण्याच्या पवित्र उद्देशानें काँग्रेस जन्माला आली. तो उद्देश आरंभींच्या अस्पष्ट कल्पनेपेक्षां किती तरी स्पष्ट व उदात्त स्वरूपांत आज सिद्धीला गेलेला आपणाला दिसतो आहे. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं आपला हिंदुस्थान स्वतंत्र झाला आहे. काँग्रेस आपल्या प्रिय भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं बद्धपरिकर झाली होती. तें कार्य काँग्रेसच्या हातून त्या दिवशीं पूर्ण झालें आहे. काँग्रेसनें जन्मापासून आजपावेतोंच्या त्रेसष्ट वर्षांच्या काळांत हा फारच मोठा टप्पा गांठला.

एवढा मोठा स्वातंत्र्याचा टप्पा गांठण्याला काँग्रेस इतक्या थोड्या काळांत इतकी बलशाली कशी झाली याचें शेवटीं पुन्हा एकदां विहंगमावलोकन करणें

अप्रस्तुत होणार नाहीं. प्रथम सन १८८५ सालीं काँग्रेसचा जन्म झाला, तो ह्यूमसारख्या बड्या सनदी गोऱ्या अधिकाऱ्यांच्या व त्याच्या सहकाऱ्यांच्या प्रोत्साहनानें झाला. बडे बडे धनवान व उच्च पदवीपदस्थ हिंदी लोकही काँग्रेसच्या स्थापनेच्या कामीं सहभागी होते. आरंभींची काँग्रेस ही अशी एकंदरींत वरच्या बड्या हिंदी वर्गाची होती.

त्यानंतर लो. टिळकांचा काँग्रेसच्या क्षितिजावर उदय झाला, व काँग्रेस पूर्वीपेक्षां लोकाभिमुख बनूं लागली. ती तेव्हांपासून पुढें केवळ बड्याबड्या राजमान्य सुखवस्तूंची मिरास उरली नाहीं. गरीब हिंदी मध्यम वर्गाकडे तिची दृष्टि वळली.

लो. टिळकांचें अवसान आणि महात्मा गांधींचा काँग्रेसच्या क्षितिजावर उदय ह्या गोष्टी जवळ जवळ एकाच वेळीं घडल्या. महात्मा गांधी हे हिंदुस्थानांतील कोटमाप दरिद्रिनारायणांचे कैवारी व सत्य–अहिंसा धर्माचे प्रणेते होत. त्यांनीं काँग्रेसला केवळ पूर्ण जनताभिमुख केलें इतकेंच नव्हे तर सत्य-अहिंसा धर्माच्या उदात्त आरचणाचा दिव्य संदेश काँग्रेसला व कोटमाप हिंदी जनतेला दिला. त्या संदेशांत एकट्या हिंदुस्थानचाच नव्हे तर साऱ्या जगांतील मानव जातीचा उद्धार सांठवला होता व आहे. हिंदुस्थान हा शेतकरी-कामकरी लोकांचा देश आहे. परोपरींच्या संकटांनीं पिळून निघालेला हा कोटमाप हिंदी दरिद्री नारायण पुन्हा आपल्या पायावर उभा राहावा व खऱ्याखुऱ्या माणुसकीचें जिणें जगूं लागावा इतकी सर्वोदयकारी पात्रता हिंदी जनतेच्या ठायीं गांधीजींनीं सत्य–अहिंसा धर्माच्या शिकवणीनें व आचार–विचार–उच्चारानें निर्माण केली.

हें महान कार्य गांधीजींच्या नेतृत्वाखालीं पार पाडतांना काँग्रेसच्या मार्गांत वेळोवेळीं परोपरीनें प्रतिगामी, व परिणामीं कळून वा न कळून देश-विघातक विचारसरणीचीं पर्वतप्राय संकटें आलीं. पण तीं संकटें काँग्रेसचा स्वातंत्र्यसंपादनाचा मार्ग अडवूं शकलीं नाहींत. मुस्लीम लीग व हिंदुमहासभा हीं तीं पहिलीं दोन संकटें होत.

हिंदुस्थान हा जसा कोटमाप हिंदु जमातीचा देश आहे तसाच हिंदूंहून अल्पसंख्य पण कोटमाप मुसलमान जमातीचाही देश आहे. आणि दुर्दैवाची

गोष्ट ही कीं ह्या दोन जमातींतील संघर्षांनीं आजवर हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान केलें आहे.

एका हातानें टाळी वाजत नाहीं या न्यायानें या संघर्षांना ह्या दोन्ही जमाती मुख्यत्वेंकरून जबाबदार आहेत. वस्तुतः हिंदुस्थानचा सर्वसामान्य दरिद्री नारायण नागरिक हा प्रथम गरीब शेतकरी—कामकरी, व हिंदु अथवा मुसलमान त्यानंतर. पण ही बहुसंख्य जनता शिक्षणाच्या अभावीं अजाण व 'मुकी बिचारी कुणी हका' अशी मेंढरांसारखी परावलंबी गरीब होती, तोंपावेतों हिंदु व मुसलमान या व इतरही लहानसहान जमातींतील मतलबी श्रेष्ठींनीं आपापल्या स्वार्थसाधनाकडे या जनतेचा मन मानेल तसा उपयोग करून घेतला. मुस्लीम लीग सन १९०६ सालीं स्थापन झाली ती बड्या मुसलमान श्रेष्ठींच्या याच मतलबसाधु वृत्तीनें. त्यानंतर सन १९२५ सालीं हिंदुमहासभा रीतसर स्थापन झाली. तिचेही उद्देश मुस्लीम लीगइतकेच जातीय, प्रतिगामी व जनहितविघातक होते. काँग्रेसला देशांतल्या देशांत प्रथमपासून ह्या दोन प्रतिगामी शक्तींशीं सतत झगडावें लागलें.

परंतु मुस्लीम लीग आणि हिंदुमहासभा यांच्या उद्घोषित उद्देशांत व ध्येयांत जमीन—अस्मानाइतकें अंतर वरवर दिसायला तरी होतें. मुस्लीम लीग केवळ मुसलमान जमातीच्या हिताकडे पाहणारी होती, व हिंदुस्थानांतील कोटमाप हिंदु जनतेच्या हितसंरक्षणासाठीं आपण जपतों असा हिंदु महासभेचा आरंभापासून मुस्लीम लीगच्या अगदीं विरोधी दावा आहे.

काँग्रेस ही कोणचाही धर्मभेद, जातिभेद अथवा वर्गभेद ध्यानीं न आणतां अलम हिंदी जनतेच्या सर्वांगीण व चिरंतन उन्नतीसाठीं झटणारी साऱ्या हिंदी राष्ट्राची विराट प्रातिनिधिक संस्था होय. मुस्लीम लीगचा सवता सुभा अजाण अशिक्षित मुसलमान समाजाला काँग्रेसच्या पुढारीपणापासून चकवून आडमार्गाला नेऊं शकला. त्याचा परिणाम शेवटीं अखंड हिंदुस्थानचा द्विखंड हिंदुस्थान होऊन हिंदुस्थानांतून पाकिस्तान हें स्वतंत्र मुसलमान राष्ट्र म्हणून फुटून निघण्यांत झाला. हिंदुस्थानची अशी चिरफाड व्हावी अशी काँग्रेसश्रेष्ठींची व गांधीजींचीही मुळींच इच्छा नव्हती. तरी देखील हिंदुस्थान पारतंत्र्यांत डांबलेला राहावा, अथवा हिंदुस्थान द्विखंड होऊन का होईन पण स्वतंत्र व्हावा, ह्या दोन वाईट गोष्टींत त्यांतल्या त्यांत दुसरी गोष्ट कमी वाईट व

अपरिहार्य म्हणून काँग्रेसला मान्य करावी लागली. त्या वाईटांतून तिला पुन्हा चांगलें निर्माण करावयाचें आहे.

हिंद आणि पाकिस्तान हीं दोन राष्ट्रें हिंदुस्थानच्या फाळणीनें अलग झाल्या-वर हिंदुमहासभेच्या राष्ट्रहितकारी दृष्टीपुढें जर मुसलमानी संकट एवढें एकच साधार भय असतें, तर तें भय १५ ऑगस्ट १९४७ रोजीं दूर झालें होतें. देश स्वतंत्र झाला होता. राजसत्ता हिंदी जनतेच्या हातीं आली होती. पाकिस्तानांत जाऊन शिल्लक राहिलेली कांहींशी मुसलमान जमात जरी हिंदमध्यें होती तरी ती आतां आक्रमक स्वरूप धारण करण्याला असमर्थ होती. अल्पसंख्य जमात या नात्यानें मागें राहिलेल्या या मुसल-मानांना आतां हिंद हाच आपला मायदेश व आपण हिंदचे राजनिष्ठ नागरिक या नात्यानें हिंदु जमातीशीं खेळीमेळीनें, गुण्यागोविंदानें नांदण्याचा मार्ग मोकळा होता. जे कोणी हिंदशीं निष्ठेनें वागणार नाहींत त्यांना हिंद-मध्यें थारा मिळणार नाहीं हेंही उघड होतें. अशा कोणालाही हिंदविरोधी कारवाया हिंद राष्ट्रांत राहून करण्याला पूर्वीसारखें मोकळें रान आतां उरलेलें नव्हतें. हिंदुमहासभेला मुसलमान जमातीविषयीं पूर्वीप्रमाणें खऱ्या खोटया कारणांसाठीं संशय, द्वेष व मत्सर मनांत बाळगण्याचें त्यानंतर सुतराम कारण नव्हतें केवळ आपल्या पुरातन मातृभूमीचा व थोर संस्कृतीचा विधायक अभिमान हा उद्देश जो हिंदुमहासभेच्या तेथवरच्या घोषणांतून ऐकूं येत होता तो जर निर्भेळ खरा असता, तर तें हिंदुमहासभेचें ध्येय आतां निष्कंटकपणें परिपूर्णतेच्या शिगेला येऊं घातलें होतें. हिंदुमहा-सभेच्या कसल्याही कार्यक्षमतेचा वा त्यागाचा त्या यशांत कांहीं वांटा नव्हता.

हिंदुमहासभेचा हिंदु राष्ट्राच्या प्रतिनिधित्वाचा दावा पाण्यावरच्या बुड-बुड्यापेक्षांही पोकळ होता. माणुसकीची चाड व जाणीव असलेलें 'हिन्दु' राष्ट्र नव्हे तर हिंदी राष्ट्र काँग्रेसच्या मागें होतें. म्हणून तर मुस्लीम लीगचे हुकुम-शहा पुढारी बॅ. महंमदअल्ली जीना यांचा एकसारखा अट्टाहास चालला होता कीं काँग्रेस ही हिंदु जमातीची पुढारी आहे, व गांधीजींनीं आपण हिंदु जमातीचे पुढारी आहों असें मान्य करून मुसलमान जमातीच्या प्रातिनिधिक लीगशीं हिंदुस्थानच्या भवितव्याविषयीं बोलणीं करावीं. जीनांच्या ह्या दाव्यांत अर्ध-सत्य होतें. काँग्रेस ही राष्ट्रांतील बहुसंख्य हिंदूंची प्रातिनिधिक पुढारी होती

हें तर खरेंच. पण ती त्याबरोबरच हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही मोठ्या अथवा लहान जमातीच्या हितासाठीं व सर्वांगीण उन्नतीसाठीं देखील तितक्याच एकात्मीयतेनें व तत्परतेनें ती अहर्निश झटत होती. काँग्रेस ही मुळांतच जातिसंस्था नव्हती; राष्ट्रसंस्था होती. आणि काँग्रेसनें इतकीं दिव्यें करून, इतके कष्ट सोसून इतक्या दीर्घकालपावेतों सत्य-अहिंसात्मक तुंबळ स्वातंत्र्ययुद्ध लढून स्वातंत्र्य मिळविलें तें कोणत्या एका जमातीसाठीं नव्हे, साऱ्या राष्ट्रासाठीं. काँग्रेसच्या ह्या प्रदीर्घ व उग्र तपश्चर्येंत वांटा जातीयवादी मुस्लीमलीगचाही नव्हता, व जातीयवादी हिंदुमहासभेचा तर मुळींच नव्हता. तर-तमभावानें कांटेकोरपणानें व सम्यक् दृष्टीनें पाहिलें तर गांधीयुगाच्या प्रथम चरणांत खिलाफतीच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नामुळें कां होईना पण लीग काँग्रेसच्या खांद्यांला खांदा भिडवून भाऊ भाऊ या नात्यानें स्वातंत्र्ययुद्धांत लढली. परंतु हिंदुमहासभेनें तिचे कांहीं पुढारी महासभा सन १९०६ सालीं जन्माला आली इतकी वयानें वडीलधारी असल्याचा दावा सांगतात तो त्यांच्या समाधानासाठीं आपण घटकाभर खरा धरून चाललों तरी त्या सन १९०६ सालापासून आजवर काँग्रेसच्या खांद्याला खांदा भिडवून हिंदुस्थानचें स्वातंत्र्ययुद्ध लढण्यासाठीं कधीं रणांगणांत पाऊल देखील टाकलें नाहीं. उलट तिनें काँग्रेसला हें राष्ट्रीय स्वातंत्र्ययुद्ध लढतांना कधीं चोरटा तर कधीं उघड विरोधच केला. सत्य असलें तरी तें कटुसत्य असल्यानें बोलावयाचें नाहीं म्हणून आपण त्याला देशद्रोहीपणा म्हणावयाचें नाहीं इतकेंच.

'हिंदुस्थान हिंदूंचा' हा आयत्या बिळांतील नागोबाला शोभणारा हिंदुमहासभेचा विकृत अभिनिवेश खरा मानला तरी हा 'हिंदूंचा हिंदुस्थान' आरंभापासून निष्ठेनें व तत्परतेनें, स्वातंत्र्यलालसेच्या पोटतिडिकेनें काँग्रेसच्याच पाठीशीं उभा होता. सन १९३० सालीं, पुढें सन १९४० सालीं, व अखेर ऑगस्ट १९४२ सालीं अहिंसात्मक पण तुंबळ स्वातंत्र्ययुद्ध काँग्रेस राष्ट्राच्या वतीनें लढली, ती मुसलमानेतर व मुख्यतः हिंदु जमातीच्याच जोरावर. आणि ता. १५ ऑगस्ट १९४७ नंतर हिंदसरकार म्हणून उच्च पदाधिष्ठित झालेले आपले नेहरू-पटेलादि परमश्रेष्ठ जितके पुढारीही व्यापक अर्थानें हिंदी आहेत तितकेच अक्षरशः खऱ्या अर्थानें हिंदूच आहेत. हा काँग्रेसनिष्ठ 'हिंदूंचा हिंदुस्थान' आजच्या हिंदराष्ट्रामधून वजा केला तर

हिंदुमहासभेच्या वांटणीला आणखी कुठचा हिंदु, आणि हिंदु वीरांना ' हिंदु राष्ट्रपति ' म्हणून मिरवायला कुठचें हिंदुराष्ट्र शिल्लक राहतें ?

त्या हिंदूंची आणि त्या 'हिंदु' राष्ट्राचीही भीषण ओळख आतां आपणाला पटली आहे. परमपूज्य राष्ट्रपिते महात्माजी यांच्या रक्तानें त्या हिंदूंचा व त्या 'हिंदु' राष्ट्राचा वज्रलेप कलंकमय इतिहास आपणांपुढें--साऱ्या जगापुढें मूर्तिमंत मांडला आहे. हा इतिहास ज्या हिंदूंचा आहे, त्यांतला हिंदु मी आहें असें कोणता माणूस माणुसकीला जागून छातीला हात लावून अभिमानानें सांगेल ?

त्यांतल्या त्यांत आणखी दुर्दैवाची व कोणाही सत्प्रवृत्त हिंदूला लाजेनें खालीं मान घालायला लावणारी गोष्ट ही कीं अशी ही ' हिंदु हिंदुस्थान'च्या प्रतिनिधित्वाचा खोटा दावा सांगणारी हिंदुमहासभा कॉंग्रेसच्या व त्या निमित्तानें साऱ्या हिंदुस्थानच्या राशीला एकटीच आली नाहीं; बरोबर उग्र पण आभासात्मक जाति–धर्म–सत्ता संस्कृतीचा दुरभिमान घेऊन आली, आणि ती हिंदु जमातींत नवीन जन्माला आलेल्या व येणाऱ्या भावना-प्रधान नव्या पिढीला त्या अमंगळ विषारी दुरभिमानानें भ्रष्टवीत सुटली ! हिंदुमहासभेच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांत विंचवाच्या पिलांसारखी त्या सभेच्या उदरांतूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही यथार्थतेनें हिंदुमहासभेची पूरक अशी उग्र हिटलरी फासिस्ट वृत्तीची लढावू संघटना जन्माला आली.

• • •

## ३३ उन्हांत कां ? कल्पवृक्षाच्या छायेला या !

राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेच्या बाबतींत विशेष ध्यानीं ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं बुद्धिजीवि पांढरपेशा अशा विशेषतः ब्राह्मण व तत्सम समाजांतून म्हणजे ज्या वर्गाला आज दिवसेंदिवस कठीण दिवस येत आहेत व त्यामुळें भांबावल्यासारखी–अग्निप्रळयांत सांपडल्यासारखी ज्याची केविलवाणी अवस्था

झाली आहे त्या वर्गांतून ही संघटना विशेषेंकरून उभी झाली आहे. काँग्रेसची स्थापना झाली ती ह्या वर्गाच्या असंतोषाची वाफ अपायकारक न ठरणाऱ्या उपायांनीं बाहेर सोडून देण्यासाठीं. लो. टिळकांच्या काळीं मुख्यतः हाच वर्ग राष्ट्रीय अथवा जहाल म्हणून काँग्रेसमध्यें अधिक प्रकाशांत आला. महात्मा गांधी पडले दरिद्री नारायणांचे उपासक व कैवारी. त्यांनीं काँग्रेस यथार्थानें हिंदी बहुजनसमाजाची करून वाढविली व नांवारूपाला आणली. आजच्या काँग्रेसमध्यें देखील आघाडीला बुद्धिजीवि पांढरपेशा वर्ग दिसतो खरा; पण तो वैचारिक कायापालट झालेला वर्ग आहे. बुद्धिजीवि वर्ग संक्रमणक्षमही असतो व परागतिसुलभहि असतो. परिस्थितीशीं झगडून मार्ग काढण्याची धमक त्याच्या ठायीं असते; पण त्या पात्रतेची जाणीव त्याला झाली, काळाचीं व परिस्थितीचीं पावलें कशीं पडत आहेत हें आकलन करतां आलें तर. स्वतःच्या निर्वाहासाठीं या वर्गाला धनिक वर्गावर अवलंबून राहावें लागतें. धनिक वर्ग कष्टाळू शेतकरी–कामगाराच्या पिळणुकीवर धनसंपन्न झालेला असतो व तो राष्ट्रपुरुषाच्या आर्थिक नाड्या व्यापार, उद्योगधंदे, सावकारी, जमीनदारी, सरंजामदारी अशा अनेक मार्गांनीं आपल्या हातीं आंखडून ठेवीत असतो. ह्या अरेराव वर्गापासून आपल्या सुखी जीवनाला किमान आवश्यक तेवढेंही श्रममूल्य संपादन करणें सोपें नसतें. अशा स्थितींत हा असंतुष्ट तरुण वर्ग लांडग्यांच्या कळपांत चुकून जाणाऱ्या वेड्या भोळ्या कोंकरांसारखा आपल्या तथाकथित थोर पुढाऱ्यांच्या, वीरांच्या व गुरूजींच्या पुढारीपणाच्या शिकवणकीला भाळतो. तो आपल्या मायभूच्या अभिमानानें प्रेरित होऊन आपल्या थोर आर्यसंस्कृतीच्या भूतकालीन थोरवीचीं प्रक्षोभक यशोगीतें ऐकून गुंग होतो व डोलूं लागतो. वर्तमान काळांतील भीषण जीवन त्याला भूतकाळांतील गतवैभवाच्या रम्य कथा ऐकून अधिक भीषण व असह्य वाटूं लागतें. त्यामुळें मग तो तरुण वर्ग फसून मृगजळाच्या मागें धांवणाऱ्या ताहानलेल्या हरिणासारखा भूतकाळाच्या मृगजळानें आपल्या उज्ज्वल भविष्यकाळाची ताहान भागविण्यासाठीं तळमळूं व धडपडूं लागतो. जर्मनींत मागें हिटलरी हुकुमशाही (फासिस्ट) तंत्र उफाळून आलें व मंथनविषाप्रमाणें जग जाळीत सुटलें, तें याच असंतुष्ट बुद्धिजीवि वर्गाच्या नव्या पिढींतून. तेंच उग्र फासिस्ट तंत्र गेल्या दीड तपाहून जास्त काळापासून हिंदुस्थानांत हिन्दूंचा

हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मुसलमानांची खाकसार संघटना, शीखांची अशीच नवी संघटना, अथवा हैदराबातेंत काल परवां मानवतेवर आक्रमण करून हलकल्लोळ उडवून देणारी रझाकार संघटना अशा विविध रूपांनीं उदय पावून वाढीला लागलें आहे.

एकटच्या हिंदुस्थानांतच हा फासिझमचा समंध निरनिराळ्या मायावी रूपांनीं सैतानी थैमान घालतो आहे असें नाहीं. जगाच्या पाठीवरील प्रत्येक जागा झालेल्या देशांत त्या त्या ठिकाणच्या विशिष्ठ परिस्थितीनुसार फासिझम डोकें वर काढून फोंफावूं पाहतो आहे. हिटलर–मुसोलिनींचा नाश झाला, जर्मनी, इटली, जपान अशा फासिस्ट राष्ट्रांत फासिझमला मरणमोलाची पिछेहाट सहन करावी लागली, म्हणून तो समूळ नष्ट झाला असें मुळींच नाहीं. तो आतां जगाच्या कोनाकोपऱ्यांतून संधी साधेल तिथून पुन्हा जोमानें फोंफावूं पाहत आहे.

राष्ट्रीय स्वयसेवक संघाची ही वर्गीय पूर्वपीठिका ध्यानीं घेतली कीं त्याच्या लढावू स्वरूपाची व त्याचें बौद्धिक संगोपन करणाऱ्या हिंदुमहासभेच्याही सत्य स्वरूपाची, त्याप्रमाणेंच उद्दिष्टांचीही संगति लागते. बंगाल, बिहार, दिल्ली, पंजाब, काश्मीर एथील कालपरवांच्या ताज्या भीषण रोमांचकारी घटना तरी हेंच दर्शवतात.

असें जर नसतें, या लोकांना वाटणारा भारतमातेचा जाज्वल्य अभिमान जर भारतसंतानांच्या सर्वोदयकारी भावनेनें मंडित असता, यांना मातृभूमीच्या स्वातंत्र्याची व प्राचीन थोर आर्यसंस्कृतीची वाटणारी कळकळ जर निष्कलंक व प्रामाणिक असती, तर थोर हिंदुधर्माची त्याच्या थोर नांवाप्रमाणें प्रतिष्ठा राखणारी व आपल्या शुचितर सत्य–अहिंसेच्या शिकवणीनें हिंदुधर्माला विश्वधर्माची मानमान्यता मिळवून देण्याला सर्वसमर्थ असलेल्या महात्मा गांधींच्या मूर्तीचें भजन करणारे मूर्तिभंजक याच हिंदुमहासभेच्या परिसरांत कसे जन्माला आले असते ? ते द्वेषाच्या–मत्सराच्या–असहिष्णुतेच्या, हिंसक प्रवृत्तीच्या विषान्नावर कसे पोसले,वाढविले गेले असते ? मुसलमान जमातीविरुद्ध असलेल्या हिंदुमहासभेच्या दाव्याचें स्वरूप खरें, खोटें, निर्मल, मलिन, स्वच्छ, गढूळ, कसेंही असो. अपरिहार्य घटना म्हणून पाकिस्तानचें नवराष्ट्र अलग करून दिल्यावर तो दावा वास्तविक संपला होता. हिंदराष्ट्र

स्वतंत्र झालें होतें. तें स्वातंत्र्य विविध अंतर्गत संकटांपासून व परचक्रांपासून कसें अभंग राखावें, वाढवावें, त्या आणि हिंदराष्ट्राची आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक अशी सर्वांगीण उन्नति कशी करावी, यासाठीं तनुमनधनानें अहर्निश झटणें हें हिंदच्या प्रत्येक सुकन्येचें व सुपुत्राचें कर्तव्य होतें. आपलेंच काँग्रेसचें सरकार आतां अधिकारारूढ झालें आहे, त्या सरकारचे हात सर्वतोपरी बळकट करून त्याला अधिकाधिक कार्यक्षम बनविण्याची जबाबदारी हिंदच्या प्रत्येक नागरिकावर होती व आहे.

पण काँग्रेसच्या कल्पवृक्षाच्या शीतल छायेखालीं हा फासिझमचा अनुयायी गण वाढणार नाहीं.काँग्रेस तो नष्टही करणार नाहीं. काँग्रेसला संकटाच्या खाईंत लोटण्यासाठीं स्वत: पेटविलेल्या खाईंतून तो स्वत:च भाजून, पेटून, जळून, शुद्ध होऊन निघेल, व काँग्रेसच्या कल्पवृक्षाखालीं सत्य–अहिंसा धर्माचा स्नातक म्हणून येऊन उभा राहील.

आपल्या स्वतंत्र हिंदचा राज्यकारभार करण्यास ठीं अधिकारारूढ झालेलें आपलें काँग्रेस सरकार हें आपल्या हिंदभूमीला इतक्या वर्षांच्या अविश्रांत परिश्रमांनीं लाभलेलें काँग्रेसच्या कल्पवृक्षाचें अमृतफळ होय. काँग्रेस म्हणजे गांधीजी आणि गांधीजी म्हणजे काँग्रेस. गांधीजींनीं सत्य–अहिंसा धर्माची शिकवण जी दिली, त्या गांधीवादी शिकवणीच्या प्रकाशांत आजचें आपलें स्वतंत्र हिंदचें सार्वभौम सरकार व आपलीं प्रांतोप्रांतींचीं सरकारें आपल्या ह्या हिंदभूच्या सर्वांगीण प्रगतीचा एकेक टप्पा गांठीत आहेत.

आपलें काँग्रेसचें सरकार हें साऱ्या हिंदी जनतेचें सरकार आहे. हिंदराष्ट्र हें धर्मविमुक्त राष्ट्र आहे. कोणत्याही धर्माचा पुरस्कार वा: तिरस्कार आपल्या राष्ट्रांत होणार नाहीं व होतां कामा नये. हिंदराष्ट्रांत बहुसंख्य जमात हिंदु असेल. पण म्हणून या राष्ट्राचे व्यवहार हिंदु धर्माप्रमाणें आणि धर्माधिष्ठित हिंदु संस्कृतीप्रमाणें चालले पाहिजेत असें आपणाला कसें म्हणतां येईल ? हिंदराष्ट्रांत हिंदूखेरीज इतर अल्पसंख्य जमातीही आहेत. आम्ही आमचा धर्माभिमान त्यांच्यावर राज्यकर्ते म्हणून लादूं लागलों तर तो जुलूम होणार नाहीं का ? आपणावर कोणी असा धर्मप्रवण जुलूम केलेला आपण सहन करणार नाहीं व करतां कामा नये, तसाच इतरांवरही आपण असा जुलूम करतां कामा नये. आपल्या हिंदराष्ट्राचे बहुसंख्य नागरिक आपण

राष्ट्रीय दृष्टिकोनांतून पाहतां हिंदु खरे. पण आपलें राष्ट्र हें 'हिंदु' राष्ट्र नसून 'हिंद' राष्ट्र आहे, व आपण प्रथम हिंदी असून नंतर हिंदु आहों. आपलाच नव्हे तर जगांतील साऱ्या मानवजातीचा माणुसकी हाच एकमेव विश्वधर्म आहे. आपण सारीं प्रथम माणसें आहों; व नंतर हिंदी आहों. हिंद राष्ट्रांतील सारी प्रजा—मग ती हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिस्ती, पारशी कोणत्याही उपनांवानें ओळखली जात असो. ती प्रथम माणूस व नंतर हिंदी आहे.

अज्ञानमूलक धर्मदुराभिमानाला बळी पडून आपणां मानवांच्या देशोदेशींच्या व खेडोखेडींच्या पूर्वजांनीं माणुसकीचें तोंड काळें करणारे अत्याचर अजाणपणें सहन केले आहेत व इतरांवरही केले आहेत. तो काळ, ती परिस्थिति, आजच्या मानानें तेव्हांचा ज्ञानविज्ञानविषयक मागासलेपणा, या सर्व गोष्टींचा विचार करून आपण मानव या नात्यानें शतावधि, सहस्रावधि वर्षांपासूनच्या आपल्या पूर्वजांना दोष न देतां त्यांनीं त्यांच्या मतीप्रमाणें मानवजातीच्या मंगलासाठीं जें काय केलें असेल त्या बद्दल कृतज्ञ राहूं. परंतु अनुभवानें अनर्थमूलक व मानवताविध्वंसक ठरलेल्या पूर्वज स्मृति-कृति पडताळून पाहून योग्यायोग्य विचार करून त्याप्रमाणें वागणें, इष्ट असेल तेवढें घेणें व अनिष्ट असेल त्याचा त्याग करणें म्हणजे पूर्वजांशीं व परंपरेशीं बेइमान होणें नव्हे. मानवी जीवन नित्य व विकासक्षम आहे. आणि विकासक्षमतेवा हा सृष्टीचा न्याय सुजाणपणें पाळून आपला आजच्या व उद्यांच्या मानवतेला सार्थ अभिमान वाटावा अशा पूज्य महात्माजींच्या विश्वमंगलकारी शिकवणुकीला स्मरूनच आपण आपल्या पार्लमेंटांत हिंद राष्ट्र हें धर्मभावनामुक्त राष्ट्र आहे असा निर्णय घेतला आहे. आपलें सरकार हा शुभ निर्णय कसोशीनें पाळावयाला बद्धपरिकर झालें आहे.

अर्थात् विशिष्ट जाति—धर्माभिमानी संस्था व चळवळी ह्या ओघानेंच आमच्या शत्रुपक्षीय ठरतात. पण आपली काँग्रेस त्या शत्रुपक्षीयांचाही धिक्कार न करतां कींव करते. वाट चुकून भलतीकडे जाऊन अनर्थ घडवून आणूं पाहणाऱ्या या आपल्याच देशबांधवांना आपल्या हातीं हात घालून कल्पवृक्षाच्या छायेखालीं सर्वोदयकारी शांति—सौख्य—समृद्ध—उदात्त व विशाल जीवन जगण्यासाठीं काँग्रेस थोर मनानें पाचारण करते.

जयहिंद

५४३३
५६८३

REFBK-0006983